


महाराष्ट्राचे जिल्हे

बीड

प्रसिद्धि विभाग महाराष्ट्र सरकार मुंबई

महाराष्ट्राचे जिल्हे

बीड जिल्हा

किमत २५ नये पैसे

अनुक्रमणिका

बीड जिल्हा

ऐतिहासिक पार्श्वभूमि

शब्द मग तो कोणताहि असो, एका विशिष्ट अर्थाचीं परंपरा आणि पिढयानपिढयाचा इतिहास आपल्या बरोबर घेऊन येतो. कारण प्रत्येक शब्दाला व्यक्ति वा समष्टि-कर्तृत्वाचा स्पर्श झालेला आहे. बीड हें या जिल्ह्याचें नांव त्याचें मुख्य ठाण्याचें ठिकाण जें बीड गांव त्यावरून पडलें. या गांवाला बीड असें कां म्हणतात या विषयीच्या दोन व्युत्पत्तीं सांगण्यांत येतात. पहिल्या व्युत्पत्तींनुसार या गांवांत पाण्याची कधींहि टंचाई नव्हतीं आणि नाहीं. खोदावयाला सुरुवात केलीं कीं, अगदीं थोडया अंतरावर पाणीं लागतें हा गांवच्या भूरचनेचा विशेष यावनी प्रशासकांच्या ध्यानांत आला आणि त्यांनीं "भीर" या पाण्याच्या समानार्थी फारशी शब्दावरून या गांवाला "बीर" असें नांव दिलें. लोकबोलींत याच शब्दाचा अपभ्रंश पुढें बीड असा झाला.

दुसऱ्या व्युत्पत्तींनुसार बालेघाटाच्या पायथ्याशीं लवणांत वसलेलें हें गांव असल्यामुळें तें एखाद्या बिळांत असल्यासारखें दिसतें. गांवाच्या या स्थान वैशिष्टयामुळें त्याला प्रथम बीळ आणि नंतर त्याचेंच अपभ्रष्ट स्वरूप 'बीड' असें नांव मिळालें.

थोडा इतिहास

बीड या नांवाचीं व्युत्पत्ती जरी वादातीत नसली तरी या जिल्ह्याचा आणि बीड या गांवाचा ऐतिहासिक मागोवा इसवीसनाच्या चौथ्या शतकापर्यंत निर्विवाद मिळतो. या काळाच्याहि मागें जावयाचें असेल तर मात्र पुराणांशिवाय दुसरा आधारभूत ग्रंथ नाहीं आणि ऐतिहासिक दृष्टीनें पुराणांचा आधार हा विश्वसनीय मानता येत नाहीं. पण तरींहि बीड गांवच्या मध्य-भागीं जें जटाशंकराचें अत्यंत सुबक आणि रेखीव पुरातनकालीन मंदिर आहे, त्या संबंधीं रामायणकालीन पुढील दंतकथा आज या जिल्ह्यांत प्रसृत आहे.

रावण हा सीतेचें अपहरण करून नेत असतांना पक्षीराज जटायूनें याच ठिकाणीं प्राण पणाला लावून सीतेला रावणाच्या हातून सोडविण्याचा प्रयत्न केला. दुर्दैवानें त्यांत जटायूचा पराजय होऊन रावण सीतेला घेऊन गेला. परंतु तशा विव्हळ आणि विपक्ष स्थितींत रामप्रभूला सीतेचा माग देण्यासाठीं जटायू त्यांची वाट पाहात शेवटच्या घटका मोजीत होता आणि रामचंद्राला सीताअपहरणाची माहिती देऊन त्यानें या गांवाच्या शीवेंत देह ठेवला असा लोकसमज आहे आणि त्याच्या पुष्टचर्थ जटाशंकराचें मंदिर दाखविण्यांत येतें. अर्थात् मंदिराचें शिल्प मात्र सर्वस्वी यादवकालीन असून त्याचा रामकालाशीं कसलाहि संबंध नाहीं.

लोकसमज

दंतकथा आणि लोकसमज कांहींहि असले तरी बीड जिल्हा हा नर्मदेच्या दक्षिणेला पसरलेल्या विशाल दक्षिण पथांतील दंडकारण्याचाच एक भाग होता असें विधान स्थूलमानानें करतां येईल. विंध्याचल पालथा घालून दक्षिणापथ आक्रमणाऱ्या महर्षि आस्तिकांच्या मागून आर्यकुलाची या भागांत वसाहत सुरू झाली असावी. या वसाहतींची प्रगति वा अधोगति, तींत झालेले उत्पात व संग्राम किंवा त्यावर राज्य केलेल्या राजांच्या वंशावली आज इतिहासाला माहीत नाहींत. स्कंद पुराणांतील श्री कणकालय महात्म्य हें बीड नगराचें वर्णन असून महाभारतांत दुर्गावती असा या नगराचा उल्लेख आहे.

इतिहासाचा दुवा सुरू होतो तो चालुक्य आणि आंध्रभृत्य वंशांच्या कालापासून, म्हणजे इसवीसनाच्या पांचव्या किंवा सहाव्या शतकापासून. तत्पूर्वी गोदातटाकीं पैठण नगरांत जीं साम्राज्यकुलें अस्तित्वांत आलीं त्यांतल्या, सातवाहन, कल्चुरी, वाकाटक आंणि कदंब या सम्राट कुलांचा संबध या जिल्ह्याशीं आलाच असला पाहिजे. निदान सातवाहनांचा तरी नक्की आला होता असा ऐतिहासिक पुरावा उपलब्ध आहे. चालुक्य, आंध्रभृत्य, राष्ट्रकूट आणि यादव यांचीं साम्राज्यें या जिल्ह्यावर होतीं असें निर्विवादपणें म्हणतां येईल. चालुक्य घराण्यांतील विक्रमादित्यानें या नगराचें चंपावती असें नामकरण केलें. यादव साम्राज्य लयाला नेणाऱ्या खिलजी घराण्याच्या अल्लाउद्दीनाच्या कालांतील अर्जे मालिक काफूर यानें बीड जिल्ह्यांत बंडाळी होऊं नये म्हणून १३१२ नंतर या जिल्ह्यांत बरेंच मोठें सैन्य ठेवलें होतें. परंतु तेराशेंसोळानंतर अल्लाउद्दीन वारल्यावर या जिल्ह्यांत बंडाळी होऊन अफगाण सैन्याचा उच्छेद झाला. तेराशेंतीस नंतर तुघलक घराण्यानें ही बंडाळी मोडून या जिल्ह्याचा आपल्या राज्यांत समावेश केला. दिल्लीची राजधानी देवगिरीला आणण्याला निघालेल्या महंमद तुघलकानें वरंगळकडे जातांना बीड येथें मुक्काम केला होता. या मुक्कामांत त्याचें दाताचें दुखणें फार वाढलें आणि बीडपासून जवळच असलेल्या पाली या खेड्यानजिक त्याचा दांत पडला. त्याचें स्मारक म्हणून त्यानें जें शिल्प बांधलें तें आजहि पाहावयास सापडतें.

याच तुघलक घराण्यांतील जुनाखाँ या सुभेदारानें बीड येथें दीर्घ काल वास्तव्य केलें आणि शहरांत खूप सुधारणा केल्या. गांवाच्या पश्चिम बाजूनें वाहणारा बिंदुसराचा प्रवाह जुनाखाँनें पूर्वेकडे वळविला असा लोकसमज आहे.

बहामनी राज्यचा उदय

कालांतरानें महाराष्ट्रावर बहामनी राज्य सुरू झालें आणि बहामनी शहांच्या ताब्यांत बीड जिल्हा गेला. बहामनी काळांत शहा हबीबुल्ला हा बीडचा जहागिरदार असतांना हुमानशा जालिम याने बीडवर स्वारी केली. या लढाईंत खूप लोक मारले गेले. ही लढाई कंकालेश्वर मंदिराच्या परिसरांत झाली. बहामनी राज्याचे तुकडे पडल्यानंतर बीड जिल्हा प्रथम बीदरशाहींत आणि नंतर निझामशाहींत समाविष्ट झाला.

बीड जिल्ह्याचा संबंध मोगलांशीं अकबराच्या मृत्यूनंतर आला. अकबराचा मुलगा मुराद यानें बीडवर स्वारी केली. यानंतर बराच काळ बीड मोगलांच्या ताब्यांत होतें. शहरांतील काजी कमान ही शहाजहानची आठवण आहे. औरंगजेब दक्षिणेचा सुभेदार म्हणून आल्यानंतर त्यानें महंमद सदरशहा यांची बीडवर नायबसुभा म्हणून नेमणूक केली; या नायबसुभ्यानें बीड शहराची दुरुस्ती करून त्याच्या नगररचनेंत भर घातली.

बीड या गांवांत जटाशंकराच्या व्यतिरिक्त कंकालेश्वराचें फार सुरेख मंदिर आहे. या मंदिराची पहिली बांधणी यादव कालांतील असून यादवकालीन शिल्पांची वैशिष्टयें व पोत या दोहोंचीं प्रसादचिन्हें आजहि या शिल्पावर स्पष्टपणें दिसतात. या मंदिराचा वारंवार जीर्णोद्धार झाला असावा.

तीर्थ व धारा-क्षेत्रें

बीडपासून तेरा मैलांवर कपिलधार हें तीर्थक्षेत्र असून त्या स्थानीं कपिलमुनींनीं उग्र तपश्चर्या केली असें पुराणांत वर्णन आहे. असुर निवासानें रक्तपिपासू व भ्रष्ट झालेल्या दंडकारण्याच्या भूमील आर्य संस्कृतीच्या प्रसारासाठीं शुद्ध करून घेण्याकरितां म्हणून अनेक मुनींनीं दंडकारण्यांत ठायी ठायीं तपश्चर्या केल्याचे पुराणांत दाखले आहेत. त्यांतलीच ही एक.

कपिलधार

या बरोबरच गांवाच्या परिसरांत पूर्वेला खंडेश्वरी कोल्हापूर निवासिनीचें देवालय आणि उत्तरेला खंडोबाचें मंदिर व दीपमाळ हे केवळ जुन्या धार्मिक निष्ठांचे अवशेषच नव्हेत, तर त्या कालांतील शिल्प व वास्तु-कलेचे नमुने आहेत.

परळी वैजनाथ हें बारा ज्योतिर्लिंगांपैकीं एक स्वयंभू ज्योतिर्लिंग आणि गणेशमहात्म्यांत ज्या प्रमुख गणपति मंदिरांचा उल्लेख केला आहे त्यापैकीं चार गणेश मंदिरें अनुक्रमें लिंबा गणेश नवगण राजुरी, गंगामसला व नामलगांव या जिल्ह्यांत आहेत. याच्या जोडीलाच अंबेजोगाईची अंबा हें पुरातन मंदिर याच जिल्ह्यांत आहे.

परळी वैजनाथ

मराठीचे आद्य कवि मुकुंदराज यांनीं मराठी सारस्वताची पहिली पद्यमय रचना या जिल्ह्यांत केली. त्यांचें समाधिस्थान अंबेजोगाईपासून सुमारे दोन मैलांवर आहे. सुविख्यात गणिती भास्कराचार्य यांनीं तर आपलें सर्व आयुष्य बीड शहरांतच घालविलें. दासोपंतांची सुविख्यात पासोडी याच जिल्ह्यांत लिहिली गेली आणि ती आज देखील अंबेजोगाईला पाहातां येते. कवि मुग्दल आणि कवि विठ्ठल हे देखील याच जिल्ह्यांत जन्माला आले. ज्ञानेश्वरीची पहिली हस्तलिखित प्रत याच जिल्ह्यांत सांपडली.

मुकुंदराज कवि

महानुभाव पंथाच्या प्रसाराची मूळ सुरुवात आणि चक्रधरांची कर्मभूमि म्हणून जरी विदर्भाचा उल्लेख होत असला तरी मराठवाड्यांत या पंथाला फार मोठ्या संख्येंत अनुयायी मिळाले. महानुभाव वाङ्मय आजच्या मराठी गद्याची सुरुवात मानण्यांत येते. मराठी गद्याचे हे सुरुवातीचे ग्रंथ लिहिणारे संत मराठवाड्यांतलेच होते. त्यांपैकीं मराठीची आद्य कवियित्री महदंबा ही बीड जिल्ह्यांतीलच. आजहि बीड गांवांत आणि जिल्ह्यांत सर्वत्र महानुभावांचीं तीर्थस्थानें आहेत.

महदंबेची कर्मभूमि

आज हीं सर्व तीर्थ-क्षेत्रें भाविक जनांचीं श्रद्धास्थानें झालेलीं आहेत आणि दरवर्षी असंख्य यात्रेकरू या ठिकाणीं दर्शनेच्छेनें येतात.

बीड जिल्ह्याची केवळ सहिष्णुत्र नव्हे तर जयिष्णु वृत्ति देखील इतिहासांत ख्याति पावली आहे. शिद्यांच्या कडव्या बालाघाटी फौजा ज्या बालेघाटापासच्या मुलुखांतून भरती करण्यांत येत तो बालेघाट बीड गांवापासून सुरू होतो. खुद्द बीड गांवांतील रणमैदान, केज तालुक्यांतील घोडखूर मैदान आणि जिल्ह्याच्या पश्चिम सीमेवर असलेली खरडा, धारूर आणि राक्षसभुवन हीं धारातीर्थे मराठ्यांच्या इतिहासाला इतकी परिचयाची आहेत कीं, त्यांची पुनरूक्ति न करतां त्यापेक्षां अगदीं अप्रसिद्ध असलेलीं दोन सशस्त्र उठावणींचीं वर्णन देणें जास्त उचित होईल.

हैद्राबाद राज्याची स्थापना

सन सतराशें चोवीसमध्यें मीर करीमुद्दीन निजाम उल्मुल्क यानें दक्षिणेंत भागानगर या वास्तूवर हैद्राबाद राज्याची स्थापना केली. हैद्राबाद राज्याच्या मूळ संस्थापकाला आणि त्याच्या वंशजांना ऐतिहासिक कागदपत्रामधून निजाम या सामान्य नामानें ओळखण्यांत येतें. बीड जिल्हा हा कांहीं काळ मराठी राज्यसत्तेकडे, तर कांहीं काळ निजामी राज्यसत्तेकडे होता. या जिल्ह्याच्या कांहीं भागावर निजामी राज्य तर कांहीं भागावर मराठी सत्ता अशीहि स्थिति होती. बारा ऑक्टोबर इसवीसन अठराशें रोजीं निजाम व ईस्ट इंडिया कंपनीचा तह झाला आणि हैद्राबाद येथें तैनाती फौज ठेवण्यांत आली. त्याचबरोबर हिंदुस्थानांतील समकालीन कोणत्याहि राजेरजवाड्याशीं संबंध ठेवणार नाहीं अशी कबुलायत निजामानें इंग्रजांना दिली. या तहामुळें संस्थानाचा अंतर्गत कारभार जरी निजामाच्या हातीं राहिला तरी एक स्वतंत्र सत्ता म्हणून त्याचें अस्तित्व संपुष्टांत आलें. परिणामतः निजामचे सर्व सरकार, दरकदार आणि मानकरी इंग्रजी राजवटीवर नाराज झाले आणि त्यांनीं इंग्रजी सत्ता उलथून पाडण्यासाठीं नाना कारस्थानें सुरू केलीं.

अठराशें सत्तावनच्या स्वातंत्र्य संग्रामांत बीड जिल्ह्यानें भाग घेतल्याची हकीगत अस्सल कागदपत्रांच्या स्वरूपांत आज उपलब्ध आहे. कांहीं स्वातंत्र्यप्रेमी मंडळींनीं एकत्र येऊन, फौजा एकत्र करून, दारूगोळा तयार करून सातारकर छत्रपतींच्या नांवाची द्वाही फिरवली. उठावणींत पुढें अपयश आलीं आणि त्यांतील प्रमुख वीरांना दीर्घ मुदतीच्या कैदेच्या शिक्षा झाल्या. या उठावणीशीं संबंधित असलेल्यांचें जीं नांवें कागदपत्रांत आहेत त्यांत बाळासाहेब सेनापती सातारकर (छत्रपति प्रतापसिंहाचे चुलतभाऊ) स्वतः छत्रपति प्रतापसिंह, छत्रपति आप्पासाहेबांचे दत्तक चिरंजीव राजे व्यंकटराव इत्यादि प्रसिद्ध व्यक्तींचीं नांवें आहेत. या लोकांनीं बीड जिल्ह्यांत बराच काळ अशांतता निर्माण केली होती असें खटल्याच्या कागद पत्रांवरून दिसून येतें.

अठराशें अठ्याण्णवमध्यें बाबा नामक कोण्या एका ब्राह्मणानें बीड जिल्ह्यांत पुन्हा एक सशस्त्र उठावणी केली. हा मनुष्य त्या काळच्या कॉंग्रेस सभामधून जे विषय चर्चिले जात त्यांची उघड चर्चा करीत असे आणि लोकांना सशस्त्र उठावणी करण्याबद्दल चिथावणी देत असे. पुढें पोलीस आणि फौजांच्या सहाय्यानें ही उठावणी जरी मोडण्यांत आली तरी त्याचा मुख्य सूत्रधार जो बाबा त्याचा कांहींहि तपास लागू शकला नाहीं.

स्वातंत्र्य लढ्यांत अग्रेसर

एकोणीसशें एक्केचाळीस सालीं हैद्राबाद राज्यांत महात्माजींनीं वैयक्तिक सत्याग्रह करण्यासाठीं जे पांच सत्याग्रही निवडले होते त्यांत बीड जिल्ह्यांतील एक होता. एकोणीसशें अडतीस, एकोणीसशें एक्केचाळीस , एकोणीसशें बेचाळीस, एकोणीसशें सत्तेचाळीसच्या स्वातंत्र्याच्या लढ्यांत बीड जिल्ह्यांतील समाजांतील सर्व थरांतील तरुणांनीं हिरीरीनें भाग घेतला आणि त्यासाठीं पडेल तो देहदंडहि भोगला.

जिल्ह्याच्या रणमर्दुमकीचे उपलब्ध पुरावे हे असे आहेत.

भौगोलिक रचना

स्थूल मानानें बीड जिल्हा हा औरंगाबाद विभागाच्या मध्यभागीं वसलेला आहे. त्याच्या उत्तरेस औरंगाबाद आणि परभणी हे दोन जिल्हे असून गोदावरी नदी ही जिल्ह्याची उत्तरेकडील सीमा आहे. जिल्ह्याच्या दक्षिणेस उस्मानाबाद जिल्हा असून त्या बाजूकडच्या सीमेवर मांजरा नदी वाहाते. परभणी जल्ह्याचा कांहीं भाग बीडच्या पूर्वेकडील सीमेला लागला असून पश्चिमेकडील सीमेला अहमदनगर जिल्हा आहे.

बालेघाट रांगा

बीड जिल्ह्याच्या मध्य भागांतून बालाघाट रांगा पूर्व-पश्चिम जातात. या सह्याद्रीच्या उपत्यका आहेत त्यामुळें जिल्ह्याचा मधला भाग डोंगराळ आहे. उत्तरेस पूर्व पश्चिम पट्टीचा सिंधफणा आणि गोदावरी यांच्या खोऱ्यामुळें सुपीक जमीन असून दक्षिणेस मांजरा नदीच्या खोऱ्यामुळें तिकडील भागहि सुपीक झाला आहे. बीड जिल्ह्याचें क्षेत्रफळ चार हजार दोनशें एकसष्ठ चौरस मैल आहे.

जिल्ह्याची भूरचना अधिक स्पष्ट होण्यासाठीं त्याची तालुकावार माहिती पुढें दिली आहे. जिल्ह्यांत एकूण तालुके व महाल सात आहेत.

बीड

बीड तालुक्याच्या मध्यभागांतून बालेघाटाच्या रांगा गेल्या असल्यानें तालुक्याचा तो भाग सामान्यतः डोंगराळ आहे. या डोंगराळ भागाला लागून असलेली जमीन मध्यम प्रतीची आहे. उत्तरेकडील भागांत सिंधफणा नदीमुळें 'तर दक्षिणेकडील भागांत मांजरा नदीमुळें या दोन्ही भागांतील कांहीं जमीन सुपीक आहे.


पाटोदा (महाल)

पाटोदा तालुक्याच्या दक्षिण भागास उपघाट असे म्हणतात. या भागांत पर्वतरांगांमुळें जमीन हलक्या प्रतीची आहे. उत्तरेकडील भागास तळघाट असें नामाभिधान असून येथील बराच भाग सुपीक आहे. मध्य भागांतून पर्वतांच्या रांगा जात असल्यानें जमीन हलकी व डोंगराळ आहे. या तालुक्यांतून विंचरणा, सिंधफणा, मांजरा, डोंबरी व बिन्दुसरा अशा पांच नद्या उगम पावतात.

अष्टी

या तालुक्याच्या उत्तरेस बालेघाटाच्या रांगा आहेत. त्यांच्या पूर्वपश्चिम उतारामुळें हा सर्व भाग पठारी व डोंगराळ आहे. या तालुक्याच्या दक्षिण भागांतून सीना नदी वाहात असल्यानें तिकडील जमीन थोडीफार सुपीक आहे. या तालुक्यांतून कडी कांबळी, मेहकरी व तलवार या नद्या वाहतात व त्या सीनेला जाऊन मिळतात.

स्वाभाविक रचना


पर्वत
नद्या
जंगलें
गोदावरी
गेवराई
मंजरथ
नदी
सिंदफणा
नदी
माजलगाव
नदी
बिड सांगवी
पाडळसींगी
दादेगाव
दर्वी
नीमगांव
बीड
सरस्वती
कोळवाडी
बिंदुसरा
सोलाडा
पाटोदा
परळी
जळगांव
अष्टी पार्डी
कडी नदी
बोरखेड
मेकनूर
केज
मस्साजोग
अम्बाजोगाई
मांजरा
नदी
वाघ
धानोरा

माजलगांव तालुक्याच्या उत्तरेस पूर्व-पश्चिम गोदावरी नदी वाहाते,त्यामुळें तो भाग बराच सुपीक आहे. तालुक्याच्या मधल्या भागांतील जमीन पठारी असली तरी चांगल्या प्रतीची आहे. दक्षिण भाग बाले-

गेवराई तालुक्याच्या उत्तरेस गोदावरी नदी पूर्व-पश्चिम वाहाते आणि दक्षिणेस सिंधफणा नदीचें खोरें आहे. त्यामुळें या दोन्हीहि विभागांतील जमीन चांगली सुपीक आहे. तालुक्याच्या मधल्या भागांतील जमीन मध्यम प्रतीची असून ईशान्येकडील भाग बालेघाटाच्या रांगामुळें पठारी व डोंगराळ आहे. या तालुक्यांतून आमृता व बाळंत या आणखी दोन छोटया नद्या वाहतात.

गेवराई

माजलगांव

घाटांच्या रांगामुळें संपूर्णपणें डोंगराळ आणि पठारी आहे. तालुक्यांतील इतर प्रमुख नद्या म्हणजे सिंधफणा व कुंडका या होत.

या तालुक्याचा उत्तर भाग बालेघाटांच्या रांगांमुळें डोंगराळ व पठारी आहे. दक्षिण भाग मांजरा नदीच्या खोऱ्यामुळें सुपीक झाला असून मध्यभाग जरी पठारी असला तरी बऱ्याच प्रमाणांत चांगल्या प्रतीच्या जमिनीचा आहे.

केज

तालुक्याच्या पूर्वेकडील व मध्यभागांतून बालेघाटाच्या रांगा गेल्या असल्यामुळें ही जमीन डोंगराळ आहे. परंतु दक्षिण व उत्तर भागांतील जमीन मात्र चांगल्या प्रतीची आहे. त्यांत मांजरा नदीच्या कांठची जमीन तर खूपच सुपीक आहे. तालुक्यांतील प्रमुख नद्या मांजरा, वाण व रेना या होत.

अंबाजोगाई

बीड जिल्ह्यांतून गेलेल्या बालेघाटाच्या रांगांत बऱ्याच नद्या उगम पावतात. त्यांपैकीं सिंधफणा, कुंटका, वाण, यळंबची, मांजरा, लमाणवुडवी, केजडी, होळणा आणि उंदरी या प्रमुख होत. इतरहि लहान सहान नद्या-नाले बरेच आहेत.

नद्या

बीड जिल्हा हा समुद्र किनाऱ्यापासून खूपच दूर असल्यानें येथील हवामान उष्ण कटिबंधांतील हवामानासारखें आहे. उन्हाळ्यांतील कमाल उष्णतामान एकशें तेरा फॅरनहैट तर हिवाळ्यांतील किमान उष्णतामान पंचावन फॅरनहैट असें असतें. पावसाचें प्रमाण कमी असल्यामुळें हवा सामान्यतः कोरडीच. हिवाळा व उन्हाळा यांतील उष्णतामानांतहि खूपच फरक आहे.

हवामान

आष्टी व पाटो हे तालुके समुद्रसपाटीपासून दोन हजार सातशें ते दोन हजार नऊशें फूट उंच असल्यानें इतर तालुक्यापेक्षां येथील हवामान बरेच थंड आहे. अंबाजोगाई या तालुक्याच्या मुख्य ठाण्याच्या ठिकाणीं हवा बरीच थंड व कोरडी असल्यानें येथें क्षयनिवारण केन्द्र उघडण्यांत आलें आहे. जिल्ह्यांतील सर्वांत अधिक उंचीचें गांव चिंचोली हें असून त्याची समुद्र सपाटीपासून उंची दोन हजार नऊशें फूट आहे. हे गांव पाटोदा तालुक्यांत आहे.

बीड जिल्ह्याच्या या नैसर्गिक रचनेमुळें पावसाचें प्रमाण सरासरी पंचवीस ते तीस इंच असतें. पाटोदा व आष्टी तालुक्यांतील पाऊस मात्र पुष्कळसा अनिश्चित असल्यानें हे दोन तालुके दुष्काळी म्हणून ओळखले जातात.

पर्जन्य

या शतकांत बीड जिल्ह्यांत एकोणीसशें दहा व एकोणीसशें एकोणचाळीस व चाळीस सालीं पावसाच्या अभावीं भयंकर दुष्काळ पडला होता.

लोकसंख्या

बीड जिल्ह्याची लोकसंख्या १९६१ च्या खानेसुमारीप्रमाणें १०·१ लक्ष आहे. १९५१ मध्यें ही लोकसंख्या ८,२६,०४६ होती. भारताच्या प्रत्येक चौरस मैलांत लोकसंख्येचें प्रमाण २८१ आहे. महा-

राष्ट्राचें ३७० आहे. तर बीड जिल्ह्याचें १९३ आहे. मराठवाड्यांतील दर चौरस मैलांत लोकसंख्येचें सर्वांत अधिक प्रमाण नांदेड व उस्मानाबाद जिल्ह्यांतील आहे. त्यानंतर परभणी (२०९), नंतर बीड जिल्हा व सर्वांत कमी प्रमाण औरंगाबाद जिल्ह्यांतील १८७ आहे.

बीड व अंबाजोगाई तालुक्यांची लोकसंख्या प्रत्येक चौरस मैलांत अधिक म्हणजे अनुक्रमें २२४ व २५९ आहे. इतर तालुक्यांतील लोकसंख्येचें प्रमाण त्यामानानें विरळ आहे. पावसाची अनिश्चितता, पाणी-पुरवठ्याच्या योजनांचें कमी प्रमाण, दळणवळणाच्या सोयींची कमतरता, उद्योगधंद्याचा अभाव हीं कमी वस्तीचीं मुख्य कारणें आहेत.

ग्रामीण व शहरी लोकसंख्या

जिल्ह्यांतील शेंकडा ८९.६ लोक खेड्यांत राहतात व फक्त १०.४ लोक शहरांत राहतात. महाराष्ट्रांतील हेंच प्रमाण अनुक्रमें ७१.१ व २८.९ आहे व भारतांतील प्रमाण अनुक्रमें ८२.६ व १७.४ आहे. यावरून एक प्रमुख अनुमान निघतें कीं या जिल्ह्यांतील लोक शेतीवरच आपली उपजीविका करतात व शहरांत काम मिळेल असे उद्योगधंदे नाहींत.

निजामी राजवटीच्या कारकीर्दीत अगर प्रमुख शहरांत कांहीं उद्योगधंदे काढण्यांत आले असते तर बरीचशीं गांवें अधिक लोकवस्तीचीं झालीं असतीं. बीड जिल्ह्यांत नवीन नवीन उद्योगधंदे काढणें अत्यावश्यक आहे.

लोकसंख्येचें वांटप

१९०१ पासून पुरुष व स्त्रिया यांच्या लोकसंख्येचें प्रमाण एक हजार लोकसंख्येवरून घेतलें आहे.

वर्ष	पुरुष	स्त्री	प्रमाण (१०००)
१९०१	२,५५,१३५	२,५१,२१४	९८४
१९११	३,२२,१३७	३,१५,७२४	९८०
१९२१	२,४३,३६२	२,३४,२६१	९६३
१९३१	३,३२,९६६	३,१६,०२०	९४९
१९४१	३,७५,१८७	३,५३,०१४	९४१
१९५१	४,२२,०६९	४,०३,९७७	९५७
१९६१	५.०९	४.९२	९६७

खेडें गांवांत स्त्रियांचें प्रमाण अधिक आहे तर शहरांत तें कमी आहे.

१९६१ च्या खानेसुमारी प्रमाणें बीड जिल्हाची लोकसंख्या

क्रमांक	तालुक्याचें नांव	सुशिक्षित	पुरुष	सुशिक्षित	स्त्रियां		एकंदर संख्या	शेरा
१	बीड (स्थानिक)	८,९१३	१७,१६६	३,५४५	१५,९०२	१२,४५८	३३,०६८	
२	बीड	१३,९९०	६१,२६६	२,६३४	६२,५२५	१६,६२४	१,२६,७९१	
३	गेवराई	१४,८३६	६८,८७०	२६९६	६६,७४१	१७,५३२	१,३५,६११	
४	माजलगांव	१४,८६२	७२,८०७	२,५७७	७१,०५८	१७,४३९	१,४३,८६५	
५	अष्टी	११,९९१	५४,२०२	२६१२	५३,५३७	१४,६०३	१,०७,७३९	
६	पाटोदा	१०,३७१	४५,५२५	१,९०५	४५,३१०	१२,२७६	९०,८३५	
७	केज	१९,०९७	८४,१३७	३,२०३	७९,९२१	२२,३००	१,६३,०५८	
८	अंबाजोगाई	२८,९०५	१,२०,०३५	६,३१०	९७,१०३	३५,२१५	१,९९,१३८	
	एकूण ...	१,२२,९५६	५,०९,००८	२५,४८२	४,९२,०९७	१,४८,४४७	१०,०१,१०५	

बीड जिल्ह्यांत फक्त आठ शहरें आहेत व १०२९ खेडीं आहेत. आठ शहरापैकीं दहा हजार लोकसंख्येचीं बीड, अंबाजोगाई व परळी हीं तीनच गांवें आहेत. तर पांच ते दहा हजार लोकसंख्येच्या आंत अष्टी, गेवराई, माजलगांव, पानगांव व धारूर अशीं पांच गांवें येतात. ५०० लोकसंख्येच्या आंत ४८५ खेडीं असून ५०० ते १,००० लोकसंख्येपर्यंत ३४४ गांवें तर १,००० ते ५,००० लोकसंख्येपर्यंत १९९ गांवें आहेत.

शहरें व खेडीं

जिल्ह्यांतील भाषा बीड जिल्ह्यामध्यें मराठीं, हिंदीं, उर्दू, व थोडचा प्रमाणांत कानडी, तेलगू आदि भाषा बोलल्या जातात.

दळणवळणाचे मार्ग

बीड जिल्ह्यांत सात तालुके असून जिल्ह्याचे कारभाराच्या सोयींच्या दृष्टींनें दोन उपविभाग पाडण्यांत आले आहेत. उपविभाग व तालुक्यांचीं नांवें खालीं दिलेलीं आहेत.

(१) बीड उपविभाग :–(१) बीड, (२) पाटोदा, (३) अष्टी, (४) गेवराई

(२) अंबाजोगाई उपविभाग :–(१) अंबाजोगाई (२) माजलगांव, (३) केज

जिल्ह्यांत एकण एक हजार बेचाळीस खेडीं आहेत. तालुकावर खेडीं पुढील प्रमाणें.

दळणवळणाचे मार्ग



~~	प्रमुख सडका
▪	जिल्ह्याचें मुख्य ठिकाण
—	तालुक्याच्या सरहद्दी
●	तालुक्याचें ठिकाण
	एस्. टी. डेपो
	रेल्वे मार्ग
××	रस्त्यावरील प्रमुख गांवें

तालुक्याचें नांव		खेडीं
बीड	...	१६८
पाटोदा	...	९१
अष्टी	...	१३०
गेवराई	...	१५४
माजलगांव	...	१६२
अंबाजोगाई	...	१६९
केज	...	१६५

बीड जिल्ह्यांत बीड, अष्टी, गेवराई, माजलगांव, अंबाजोगाई, परळी, पानगांव, आणि धारूर हीं आठ गांवें अधिक लोकसंख्येचीं आहेत. बीड हें जिल्ह्याचें मुख्य ठिकाण असून याला तालुक्याशीं जोडणाऱ्या सडका जिल्ह्यांत आहेत. वाहतुकीसाठीं स्टेट ट्रान्स्पोर्ट बसेसचीं व्यवस्था आहे. जिल्ह्यांत रेल्वे फक्त तीस मैल लांबीची असून परळी वैजनाथ हेंच मुख्य रेल्वे स्टेशन आहे. या ठिकाणाहून एक रेल्वे फाटा हैद्राबादकडे व दुसरा परभणीकडे जातो.

बीड जिल्ह्यांत एकूण मोटर गाड्यांचीं संख्या दोनशें तीन असून त्याशिवाय एस्. टी. गाड्यांची संख्या पस्तीस आहे. बीड व परळी येथें एस्. टी. चे मुख्य डेपो असून प्रत्येक एस्. टी. मार्गावर बस स्टेजेस आहेत. बीड जिल्ह्याच्या प्रवासासाठीं एस्. टी. हें एकमेव साधन असल्यानें एस्. टी. गाड्यांचे प्रमुख मार्ग पुढें दिलेले आहेत.

बीड ते अहमदनगर

या नव्वद मैलांच्या प्रवासांत बत्तीस मैलावर पाटोदा व बावन मैलावर अष्टी हीं दोन तालुक्याचीं ठिकाणें आहेत. या मार्गावर नवगण राजूरी, नायगांव, तांबाराजूरी, सौताडा, जामखेडा (जिल्हा नगर) कडा, धानोरा, वाघलुज हीं प्रमुख गांवें आहेत. बीड, नायगांव, सौताडा, जामखेड (जि. नगर) अष्टी, कडा या ठिकाणीं डाक बंगल्यांचीं व्यवस्था आहे. या मार्गावर जामखेड (जि. नगर) या ठिकाणीं तारकचेरी आहे. बालेघाटाच्या रांगांचें सौंदर्य आणि नायगांव घाटांत दिसून येणारे हरणांचे व मोरांचे कळप हें या मार्गाचें वैशिष्टच होय.

बीड ते अहमदनगर या मार्गावर अडतीस मैलांवर अमळनेर या गांवाकडे एक मार्ग जातो. या फाटयापासून अमळनेर हें गांव दहा मैल असून बीड ते अमळनेर स्वतंत्र एस्.टी. गाडी आहे. हें गांव भांडीं तयार करण्याबद्दल प्रसिद्ध आहे. या मार्गावर कुसळंब, पिंपळवडी हीं गांवें असून डोमरी मार्गानें डोंगर-कीन्ही व डोमरी हीं प्रमुख गांवें लागतात.

बीड ते औरंगाबद

या ऐंशी मैलांच्या प्रवासांत बीड जिल्ह्यांतील शेवटचें गांव खामगांव हें बीडपासून पंचवीस मैलांवर आहे. या मार्गावर हिरापूर, पाडळशिंगी, गेवराई (तालुक्याचें ठिकाण) हीं गांवें आहेत. गेवराई येथें डाकबंगला असून तार कचेरीसुद्धां आहे. हीं संपूर्ण सडक डांबरी आहे.

बीड ते माजलगांव

बीड ते औरंगाबाद या सडकेवर बीडपासून पंधरा मैलांवर पूर्वेकडे माजलगांव या तालुक्याच्या ठिकाणीं जाण्यासाठीं मार्ग वळतो. या मार्गावर शिरसदेवी, टाकरवन, तालखेड हीं प्रमुख गांवें आहेत. या मार्गावर बऱ्याच प्रमाणांत हरणें आढळतात. माजलगांव येथें डाकबंगला असून तार कचेरीसुद्धां आहे. माजलगांव येथून जालन्याकडे जाण्यासाठीं एस्. टी. बसेस आहेत. हा मार्ग गेवराई या गांवावरून जातो. बीड ते माजलगांव अंतर सेहेचाळीस मैल असून माजलगांव ते जालना हें अंतर पंचाहत्तर मैल आहे. जालना हें गांव औरंगाबाद जिल्ह्यांतील आहे.

बीड ते धोंडराई

धोंडराई हें गांव गेवराईपासून आठ मैल असून बीड ते धोंडराई हा स्वतंत्र एस्. टी. मार्ग आहे. या मार्गाचें अंतर एकोणतीस मैल आहे.

बीड ते परळी

या बहात्तर मैलांच्या प्रवासांत अडतीस मैलांवर केज हें तालुक्याचें ठिकाण व छप्पन मैलांवर अंबाजोगाई हें तालुका व उपविभागाचें ठिकाण आहे. पाली, मांजरसुवा, नेकनूर, यळंब, होळ, लोखंडी-सावरगांव, कणेरवाडी हीं गांवें या मार्गावर आहेत. अंबाजोगाई व परळी येथें डाक-बंगल्यांची व्यवस्था असून दोन्ही ठिकाणीं तार कचेरी व टेलिफोनची व्यवस्था आहे.

बीड ते सोलापूर

औरंगाबाद ते सोलापूर ही गाडी बीड, येडसी, उस्मानाबाद, या गांवावरून जाते. या रस्त्यावर बीड जिल्ह्यांतील गेवराई, बीड, मांजरसुंबा, चौसाळा हीं गांवें आहेत. या शिवाय बीड येथून येडसी येथें जाण्यासाठीं स्वतंत्र बस आहे. त्याचप्रमाणें बार्शी, उस्मानाबाद, चौसाळा या गांवीं जाण्यासाठीं स्वतंत्र गाड्या आहेत. चौसाळा या गांवीं डाकबंगल्याची व्यवस्था आहे. हें गांव बीडपासून एकवीस मैलांवर आहे. सोलापूर हें शहर बीडपासून एकशें बारा मैलांवर आहे.

बीड ते जालना

या साठ मैलांच्या प्रवासांत खामगांव हें जिल्ह्यांतील शेवटचें गांव होय. बीड ते औरंगाबाद या सडकेच्या पस्तीसाव्या मैलांवर जालन्या सजाण्यासाठीं रस्ता फुटतो.

परळी ते बार्शी

या मार्गावर अंबाजोगाई, लोखंडी सावरगांव, डिगुळ, युसुफ वडगांव व माळेगांव हीं या जिल्ह्यांतील गांवें आहेत. या मार्गाचें अंतर पंचाहत्तर मैल आहे. याच मार्गावरून येडसीकडे जाणारी गाडी जाते.

अंबाजोगाई ते उद्गीर

या चौसष्ठ मैलांच्या प्रवासांत बीड जिल्ह्यांतील पिंपळा, घाट नांदुरा व धर्मापूरी हीं गांवें असून पुढें किनगांवपासून उस्मानाबाद जिल्ह्याची सुरुवात होते.

अंबाजोगाई ते नांदेड

हा मार्गसुद्धा वरील नमुद केलेल्या मोमीनाबाद ते उदगीर या मार्गानेंच जातो. या मार्गाचें अंतर चौऱ्यांशी मैल आहे.

या बत्तीस मैलांच्या प्रवासांत सायगांव, बरदापूर, रेणापूर, महापूर हीं बीड जिल्ह्यांतील गांवें असून महापूर या गांवापासून दोन मैलांच्या अंतरावर मांजरा नदी आहे. नदीपली-

अंबाजोगाई ते लातूर कडील भाग उस्मानाबाद जिल्ह्यांत गणला जातो. रेणापूर या गांवीं सुमारे दीड दोनशें वर्षांपूर्वी बांधलेला डाकबंगला आहे.

बीड ते पुणें हा मार्ग डिसेम्बर एकोणीसशें साठपासून सुरू करण्यांत आला आहे. हा मार्ग बीड ते अहमदनगर या मार्गानें पुढें जातो. या मार्गाचें अंतर एकशें पासष्ठ मैल आहे.

या शिवाय नगर ने परळी, जालना ते अहमदनगर (उमापूर, गेतराई मार्गे) औरंगाबाद ते बार्शी (बीड मार्गे) धारुर ते परळी हे नवीन एस् टी चे मार्ग सुरूं करण्यांत आले आहेत. माजल-गांव ते परळी हा मार्ग पावसळां सोडून आठ महिनें चालू असतो.

बीड जिल्ह्यांतील गेवराई, बीड तालुक्यांतील पिंपळनेर, केज तालुक्यांतील धारूर, व मोमीनाबाद तालुक्यांतील रेणापूर या गांवीं सुमारे दीड दोनशें वर्षांपूर्वी बांधलेलें फ्रेंच धर्तीचे डाक बंगले आहेत. या सर्व डाक बंगल्यांची रचना एकाच प्रकारची आहे. या डाक बंगल्यांतील साहित्य सुद्धा (खुर्च्या, भांडीं) त्यावेळचेंच आहे. असे म्हणतात कीं, पूर्वी सैन्य जाण्याचा मार्ग हाच होता. प्रत्येक डाक बंगल्यामधील अंतर वीस ते तीस मैलांच्या दरम्यान आहे.

बीड, पाटोदा, परळी वैजनाथ, व रेणापूर, माजलगांव, अष्टी, अंबाजोगाई या गांवीं विजेची सोय आहे. १९६२ मध्यें गेवगाई या तालुक्याच्या ठिकाणीं वीजपुरवठा होईल. मोमीनाबाद, परळी, धारूर सौताडा, चिंचोली व बीड हीं प्राचीन स्थळें सृष्टिसौंदर्यामुळें प्रेक्षणीय आहेत.

याशिवाय खाजगी उतारूं मोटार गाड्यांची वाहतूक खालील प्रमाणें आहे :-

बीड ते नाथापूर
बीड ते वडवनी
माजलगांव ते परळी
माजलगांव ते अंबाजोगाई
केज ते धारूर
धारूर ते कळंब

पाटबंधारे, कृषिविकास व वनसंपत्ति

बीड जिल्ह्यांतील ऐंशीं टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबून असून शेतीची परिस्थिति महाराष्ट्रांतील इतर जिल्ह्यांपेक्षां फारशी भिन्न नाहीं. शेती करण्यासाठीं उपयोगांत आणण्यांत येणारीं अवजारें बव्हंशी परंपरागत असून जिल्ह्यांतील शेकडा पंचाण्णव टक्के जमीन कोरडवाहू आहे. त्यांत या जल्ह्यांतील तीन तालुके दुष्काळी म्हणून ओळखले जातात. बाकीच्या तालुक्यांतील पावसाचें प्रमाण पंचवीस ते तीस इंच आहे.

बेभरवशी मान्सून हीं भारतीय शेतकऱ्याचीं कायमचीं डोकेंदुखी . विशेषतः कोरडवाहू जिल्ह्यांत हा त्रास फारच. मान्सून वेळच्या वेळीं पडला असें वर्ष क्वचित. शेतमालाचें उत्पादन वाढविण्याच्या मार्गांतील हीं एक फार मोठी अडचण आहे. आणि तीं दूर करण्याचा मार्ग म्हणजे नद्या, नाले, ओढे यांना धरणें बांधून किंवा विहिरी खोदून जास्तींत जास्त जमीन किमान हंगामी ओलिताखालीं आणणें हीं होय. महाराष्ट्राच्या इतर जिल्ह्यांप्रमाणें बीड जिल्ह्यांत देखील असे प्रयत्न चालू आहेत.

जिल्ह्यांतील प्रमुख नद्या म्हणजे गोदावरी, सिंदफणा, बिंदुसरा, मांजरा, वाण किन्हीं, कुंडका व सीना या होत. यांतील गोदावरी नदी सोडल्यास बाकीच्या नद्या अगदींच लहान आहेत. तरी पण जिल्ह्यांत जी कांहीं जलशक्ति उपलब्ध आहे तिचा उपयोग करून घेण्याच्या दृष्टीनें पुढील धरणांचीं कामें जिल्ह्यांत सुरू आहेत. यापैकीं कांहीं धरणांचीं कामें पूर्ण झालीं असून बाकीचीं येत्या एक दोन वर्षांत पूर्ण होतील. शास्त्रीय परिभाषेंत ज्याला मोठें धरण म्हणतात तसलें कुठलेंहि धरण बीड जिल्ह्यांत नाहीं. आहेत तीं सारीं मध्यम किंवा लहान धरणें. त्या लहानांचीच संख्या फार. हातीं घेण्यांत आलेल्या धरणांचा तपशील नांवनिशीवार पुढील प्रमाणें :—

बिंदुसरा धरण

या धरणाचें काम बीडजवळील पाली या गांवाजवळ १९४९ सालीं सुरू करण्यांत आलें व १९५५ सालीं पूर्ण करण्यांत आलें. यासाठीं ५८,५२,००० रु. खर्च करण्यांत आला. यामुळें सुमारें८,३२५ एकर जमिनीस पाणीपुरवठ्याची सोय करतां येण्याजोगी आहे. या धरणामुळें पाली, वरवटी, धानोरा, बीड, पालवण, तळेगांव सिदेड या गांवांना फायदा मिळतो.

कामळी धरण

अष्टी तालुक्यांतील धानोरा या गांवाजवळ हें धरण बांधण्यांत आलें आहे. यासाठीं १९,९९,००० रु. खर्च करण्यांत आला आणि ३,२६० एकर जमिनीस पाणीपुरवठ्याची सोय झाली. या धरणाच्या कालव्याची लांबी सहा मैल आहे.

अष्टी तालुक्यांतील पिंपळगांवाजवळ या धरणाच्या कामास नुकतीच सुरुवात करण्यांत आली आहे. या कामासाठीं अंदाजें ५१,१७,००० रु. खर्च येणार असून त्यामुळें सुमारें १०,००० एकर जमिनीस पाणी

मेहेकरी धरण

मिळेल. या धरणाच्या उजव्या बाजूकडील कालव्याची लांबी सत्तावीस मैल व डाव्या बाजूकडील कालव्याची लांबी सहा मैल राहील. या धरणामुळें पिंपळगांव, कानडी, वडगावसराटेप, रूई, टाकळी, वडगांव खोटे, नांदूर, शिराळ, बाकीं, हिंगणी व दहिठाणा या गांवांतील जमिनीस पाणी मिळेल.

बीड जिल्ह्यांतील १९५७–५८ व १९५८–५९ वर्षी विविध पिकांचें उत्पन्न पुढील प्रमाणें होतें.

पीक	१९५७–५८		१९५८–५९	
	एकर	उत्पन्न (टन)	एकर	उत्पन्न (टन)
(१)	(२)	(३)	(४)	(५)
ज्वारी	७,५६,४४३	१,०३,८१७	७,५८,३५५	१,०३,२७२
बाजरी	२,४१,३८०	१९,९७५	२,४२,१४३	२३,४६८
गहूं	१,११,४४५	१३,७४८	१,०६,९९४	१४,४८५
तांदूळ	२०,१८३	३,३४२	२१,२१२	३,६३२
तूर	२३,२७७	३,५८७	५५,५४०	५,१०१
हरभरा	८२,०९८	१०,०१९	९५,१६६	१४,८३३
मूग	९४,७८७	७,७५६	८०,८१८	८,८७०
उडीद	२२,७८४	१,५८४	२३,८०१	२,१०२
शेंगदाणा	१,६५,७७१	१२,१९७	१,६१,६१५	२१,०५८
करडई	३४,९२६	३,४८७	४३,२५२	४,९७९
कापूस (३९२ पौंडाचा गठ्ठा) ...	१,७२,८७६	५१,५८९	१,७९,९५१	६२,२३८

जमिनींचें क्षेत्रफळ	जमीन मालक	एकंदर जमीन
(१)	(२)	(३)
१ ते ५ एकर ...	२२,५४३	६३,६९८
५ ते १५ एकर ...	४६,५१९	४,३९,७०१
१५ ते २५ एकर ...	२४,१७५	४,६६,५५१
२५ ते १०० एकर ...	२९,१७०	१२,३६,३२५
१०० ते ५०० एकर ...	१,७२५	२,६२,०२७
५०० च्या वर एकर ...	३५	२६,४६१
एकूण ...	१,२४,१६७	२४,९५,७६३

अष्टी तालुक्यांतील वळूंच या गांवाजवळ हें धरण बांधलें जात असून धरणाचें बरेंच काम संपलें आहे. या धरणासाठीं १४,२४,००० रुपये खर्च येणार असून त्यामुळें सुमारे १६५९ **तलवार धरण** एकर जमिनीस पाणी मिळेल.

अंबाजोगाई तालुक्यांतील नागापूर गांवाजवळ या धरणाच्या बांधकामास सुरुवात झाली असून त्यासाठीं अंदाजें ८०,३०,७०५ रुपये खर्च येणार आहे व यामुळें सुमारें १३,००० **वाण धरण** एकर जमिनींस पाणीपुरवठा करतां येईल.

अष्टी तालुक्यांतील निबुडी गांवाजवळ हें धरण बांधलें जात असून या कामावर सुमारें ३८,५८,००० रुपये खर्च केला जाणार आहे व यामुळें अंदाजें ७,००० एकर जमिनीस पाणी मिळण्याची सोय होणार आहे. येथील कालव्याची लांबी बारा मैल राहणार **कुडा धरण** असून यामुळें नऊ खेडयांच्या शिवारांतील जमिनीस पाणी देतां येईल.

पाटोदा तालुक्यांतील हिंगेवाडी या गांवाजवळ या धरणाच्या कामास नुकतीच सुरुवात करण्यांत आली असून यासाठीं ३८,५३,८०० रुपये खर्च होणार आहे व त्यामुळें ७,००० एकर **सिंदफणा धरण** जमिनीस पाणी मिळण्याची सोय होईल.

पाटोदा तालुक्यांतील महासांगवी या गांवाजवळ या धरणाचें काम लवकरच सुरू करण्यांत येईल. यासाठीं २७,५४,६१० रुपये खर्च करण्यांत येणार असून सुमारे ४,८०० एकर **महासांगवी धरण**

जमिनीस पाणी मिळण्याची सोय होणार आहे. येथील कालव्याची लांबी सोळा मैल राहील.

वंजारवाडी धरण

बीड तालुक्यांतील नवगणराजूरी या गांवाजवळ ह्या धरणाच्या कामाची सुरुवात झाली असून यासाठीं अंदाजे ११,४६,००० रुपये खर्च येणार आहे. यामुळें सुमारे १९५० एकर जमिनीस पाणी मिळण्याची सोय होईल.

डोंमरी बंधारा

डोंमरी नदीवर राजुरी नवगण गांवाजवळ या बंधाऱ्याचें काम जवळ जवळ संपलें आहे. यासाठीं २,९८,००० रु. खर्च आला असून त्यामुळें जवळजवळ १,००० एकर जमिनीस पाणी मिळण्याची सोय होत आहे.

याशिवाय १९४० सालीं अष्टी तालुक्यांतील रूटी या गांवाजवळ तलाव बांधण्यांत आला आहे. यासाठीं ५,२६,००० रु. खर्च आला असून यामुळें तीन हजार चारशे चाळीस एकर जमिनीस पाणी मिळण्याची सोय झाली. अंबाजोगाई तालुक्यांतील कणेरवाडी या गांवाजवळ व केज तालुक्यांतील हिंगणी या गांवाजवळ तलाव बांधण्याची योजना असून त्यांना अद्याप मंजुरी मिळावयाची आहे.

जिल्ह्यांतील जलशक्तीचा आणखी उपयोग करून घेण्यासाठीं धरणें बांधण्याच्या दृष्टीनें पाहाणी करणें चालू आहे.

प्रमुख पिकें

महाराष्ट्रांतील इतर जिल्ह्यांप्रमाणें बीड जिल्ह्यांत देखील बहुसंख्य लोकांचा व्यवसाय शेती हाच आहे. ज्वारी, बाजरी, गहूं, कापूस, जवस आणि कडधान्यें हीं बीड जिल्ह्यांतील प्रमुख पिकें. सामान्यतः सर्व जिल्ह्यांत खरीप आणि रब्बी हंगामांत दुबार पिकें घेण्याची पद्धत आहे. अर्थात् एखाधा वर्षी पाऊस कमी जास्त पडला तर मात्र दुबार पद्धतींत फरक पडतो. गेल्या कांहीं वर्षांत देवीराज ही कापसाची जाती आणि उंस यांच्या लागवडीचें क्षेत्र सतत वाढत आहे असे आढळून आलें आहे. या मागील पहिलें कारण असें कीं, हीं दोन्हीहि पिकें पैसे देणारीं आहेत. गेल्या कांहीं वर्षांत जिल्ह्यांत बांधण्यांत आलेल्या धरणांमुळें आणि विहिरीसाठीं मोठ्या प्रमाणांत देण्यांत आलेल्या तगाईमुळें पाटाच्या पाण्याखालील जमिनीचें क्षेत्रफळ वाढलें. साहजिकच शेतकऱ्यांनीं आपल्या पीक पद्धतींत त्या अनुषंगानें बदल केला असून ऊंस व कापूस यांची लागवड वाढविली आहे.

त्रेचाळीस टक्क्यांनीं वाढ

शेतीच्या सुधारलेल्या पद्धति, शास्त्रीय अवजारें, सुधारलेलीं बियाणीं, रासायनिक खतें आणि कीटकनाशकें यांचा वापर गेल्या कांहीं वर्षांत जिल्ह्यांत बराच वाढला आहे. सामान्यतः असें आढळून आलें आहे कीं, बीड जिल्ह्यांतील शेतकरी कुठल्याहि नव्या फायदेशीर पद्धतीचा स्वीकार करायला उत्सुक असतो. त्याच्या पुरोगामी दृष्टिकोनामुळें १९५८-५९ सालीं बीड जिल्ह्याच्या रब्बी उत्पादनांत त्रेचाळीस टक्क्यांनीं वाढ झाली. आणि भारत सरकारनें या जिल्ह्याला त्याबद्दल दहा हजार रुपयांचें रोख बक्षीस दिलें.

शेतकऱ्यांना मार्गदर्शन

सध्याच्या विकासाच्या युगांत शेतीसुधारणेवर जास्तींत जास्त भर देण्यांत आला आहे, हें सर्वांनाच माहीत आहे. शेतीची सुधारणा करून शेतमालाच्या उत्पादनांत वाढ व्हावी म्हणून शेतकऱ्यांना तांत्रिक, शास्त्रीय, सुधारलेल्या पद्धतींची माहिती, सल्ला, मार्गदर्शन आणि मदत देण्यासाठीं जिल्ह्यांत एक स्वतंत्र अधिकारी नेमण्यांत आला आहे. शेतकऱ्यांना सुधार-

लेल्या बियाण्यांचा नियमित पुरवठा व्हावा म्हणून जिल्ह्यांत ठिकठिकाणीं बीजसंवर्धन केन्द्रें स्थापन करण्यांत आलीं आहेत. बियाणांच्या व खतांच्यासाठीं जीं गुदामें तालुक्याच्या अगर इतर महत्त्वाच्या गावीं बांधण्यांत आलीं आहेत त्यावर गोडाऊन कीपर्स आहेत.

जिल्ह्यांतील फळबागांचें क्षेत्र वाढावें आणि उत्तम प्रतीच्या फळझाडांची लागवड व्हावीं या-करितां एक स्वतंत्र अधिकारी नेमण्याचा विचार चालू आहे. बीड जिल्ह्याच्या कांहीं भागांत केळीं व इतर काहीं फळें उत्तम होतात. जिल्ह्यांतील सर्व तालुक्यांना गटविकास योजना लागूं केली असल्यामुळें या गटांच्या क्षेत्रांत एक शेतकी विस्तार अधिकारी शेती सुधारण्याचें कार्य करीतच असतो.

शेतकरी संघ

शेतीच्या सुधारणा करून अन्नधान्याचें उत्पादन झपाट्यानें वाढवावयाचें असेल तर शेतकऱ्यांच्या अपक्ष संघटना स्थापून त्यांना या कार्याची प्रेरणा दिली पाहिजे आणि त्याबरोबरच शेतीच्या शास्त्रीय व आधुनिक पद्धतींची त्यांना पुरेपूर माहिती करून दिली पाहिजे. शेतकरी संघटित झाले तर अशी माहिती करून देणें आणि या राष्ट्रीय कार्याला उत्स्फूर्त करणें पुष्कळच सोपें जातें. त्या दृष्टीनें शेतकरी संघ अपरिहार्य आहेत. गेल्या कांहीं वर्षांत बीड जिल्ह्यांत ठिकठिकाणीं शेतकरी संघ स्थापन झाले असून त्यांची सदस्यसंख्या सारखी वाढत आहे. तालुकावर खेडी, शेतकरी संघ आणि त्यांच्या सदस्यांची संख्या पुढीलप्रमाणें : (हे आकडे सप्टेंबर एकोणीसशें साठ अखेरचे आहेत).

तालुक्याचें नांव		खेडीं	शेतकरी संघ	सभासदांची संख्या
बीड	...	१६८	१६८	४,९९५
पाटोदा	...	९१	९१	१,८९९
अष्टी	...	१२३	१२३	१,२३६
केज	...	१६५	१६५	३,०९०
मोमीनाबाद	...	१६९	१६९	३,०८८
गेवराई	...	१५४	१३७	१,५३५
माजलगांव	...	१६२	८७	१,७४०
		१,०४३	९४०	१७,५८२

१९५८-५९ मध्य बीड जिल्ह्यांत विविध पिकांखाली असलेली जमीन (एकरांत)

———o———

ऊंस:— ४,४१८
मोमीनाबाद :— १,२९६
बीड :— ९४५
केज :— ९८०

	बीड	पाटोदा	आष्टी	गेवराई	माजलगांव	अंबाजोगाई	केज	एकूण
	२,६०,५४३	२,१७,३११	२६६२१७	३,१३,०९०	२,७४,८७८	२,९६,७४९	३,१५,५४७	
(१) ख. ज्वारीं ...	—	—	—	—	—	—	—	३४३
	१६,४५९	१,२६०	१९	६,४३४	१,०३१	९२,३०३	८५,२७५	१,९७,०५३
(२) बाजरीं ...	२८०	१,८७५	१,४९१	—	—	—	४१०	४,०६६
	४२,६७७	५८,७६५	४१,८६६	३१,२३६	२३,४०९	६,८२०	३३,८४४	३८,६१७
(३) तांदूळ ...	१,१४५	३९०	३४६	१,८३७	६०८	१२३	१९०	४,५३९
	३,५५७	१,२३८	४७१	१,०७१	१,२२१	५,८७५	३२,३७५	१६,६७०
(४) मका ...	१९६	४५	१७९	२४	२०१	३५	१८५	६६५
	२२७	५०	३	३०५	३६	४२८	९०२	१,९६१
(५) भुईमूग ...	२७८	३१०	६३	—	—	—	—	६५१
	२२,०२३	१७,६१३	६,१४३	१८,८२६	२२,९५२	३७,४७३	३७,९३४	१,६०,९६३
(६) कापूस ...	१२७	३२	६०८	—	—	८३	२०	८,८७०
	११,२०५	७,६९६	१,१२६	६५,३२८	५३,५३५	१६,५६१	२३,६३०	१,७९,०८१
(७) तूर ...	—	६२	३	—	—	—	—	६३
	५,८७६	३,७८०	४,४४५	८,०७५	९,३८७	१८,१०४	५,८१०	५५,४७७
(८) मूग ...	—	९२०	१,१०७	—	—	—	८०	२,१०७
	१८,८१३	६,९६०	१३,७४३	१६,५२५	९,३८१	७,६४१	५,६४८	७८,७११

बीड, पाटोदा व अष्टी या तालुक्यांसाठीं तालुकापातळीवरील शेतकरी संघ स्थापन करण्यांत येत आहेत.

बीड जिल्ह्यांतील अष्टी, पाटोदा व बीड तालुक्यांतील जमीन साधारणच आहे. बीड जिल्ह्यांतील शेतकरीवर्ग खरीप पिकापेक्षां रब्बी पिकावरच अधिक अवलंबून असतो. तरीपण खरीप पिकें सुद्धां महत्त्वाचीं आहेत.

वन योजना

बीड जिल्ह्यांतील २६,६८,९५८ एकर क्षेत्रांपैकीं फक्त ५५,३७७ एकर जमीन वन विभागाकडे आहे. म्हणजेच एकूण जमिनींच्या फक्त २.०७ टक्के जमीन राखीव जंगलाखालीं आहे. वास्तविक हें प्रमाण शेकडा वीस असणें आवश्यक आहे.सबब जंगल संवर्धनाची योजना हातीं घेण्यांत आली व या कामासाठीं एक हजार एकर जमिनींचें क्षेत्र नायगांव व आंबेवाडीजवळ निवडण्यांत आलें. बीड जिल्ह्यांत रोपट्याची एकहि बाग नसल्यामुळें प्रत्येक वेळीं रोपटी दुसऱ्या जिल्ह्यांतून आणावीं लागतात. त्यामुळें रोपटीं चांगल्या प्रकारें वाढत नाहींत. ही अडचण दूर करण्यासाठीं बीड येथील खास बागेंतील विभाग निवडला असून त्या ठिकाणीं रोपांचें संवर्धन करण्यांत येईल. त्यामुळें बीड जिल्ह्यांतील एक प्रमुख अडचण दूर होईल.

सध्या अस्तित्वांत असलेलीं जंगलें अगदीं हलक्या प्रतीचीं असून त्यापासून म्हणण्यासारखें उत्पन्न नाहीं.

वनसंवर्धानाचें जें कार्य गेल्या पांच वर्षांत करण्यांत आलें त्याचा आंकडेवारीसह तपशील :

वर्ष	जंगलसंवर्धनाचें क्षेत्र	खर्च
१९५६–५७	पर्जन्याअगोदरची संपूर्ण तयारी	६,५०० रु.
१९५७–५८	१४४ एकर	८,०६४ रु.
१९५८–५९	२५९ एकर	१०,३०३ रु.
१९५९–६०	३०० एकर	१५,७८० रु.
१९६०–६१	३०० एकर	—
	१,००३ एकर	४०,६४७ रु.

व्यापार व बाजारपेठा

बीड जिल्ह्यांत सात तालुके आहेत. त्यापैकीं बीड, माजलगांव, अंबाजोगाई व गेवराई येथें मार्केटिंग सोसायटचा काम करीत आहेत. परंतु परळी (ता. अंबाजोगाई) येथील बाजारपेठ जिल्ह्यांत सर्वांत मोठी आहे. परळीपासून रेल्वेचा एक फाटा परभणीकडे व दुसरा हैदराबादकडे जात असल्यामुळें जालना, हिंगोली, लातूर सारख्या मोठ्या व्यापारी बाजारपेठांशीं तिचा संबंध येतो.

बीड बाजारपेठ

बीड हें जिल्ह्याचें ठिकाण असून सुद्धां रेल्वे नसल्यामुळें व्यापार त्यामानानें फारसा नाहीं. पण जालना (साठ मैल), अहमदनगर (नव्वद मैल), औरंगाबाद (ऐंशी मैल), बार्शी (चौसष्ठ मैल), परळी वैजनाथ (बाहत्तर मैल) यांसारख्या व्यापारी केन्द्रांशीं जोडणाऱ्या पक्कया सडका असल्यामुळें व्यापारास पुष्कळच वाव आहे.

कापूस, भुईमूग, ज्वारी, मूग, बाजरी, हरभरा, करडई, तूर, साळ, जवस हा महत्त्वाचा शेतमाल बीडच्या बाजारांत विक्रीसाठीं येतो. खऱ्या अर्थानें बीड बाजारपेठ ठोक माल विक्रीसाठींच अधिक प्रसिद्ध आहे. कारण आलेल्या मालापैकीं ऐंशी टक्के माल जालना, अहमदनगर व बार्शी, परळी, वैजनाथ वगैरे ठिकाणीं जातो. बीड शहरांत म्हणण्या सारखे उद्योगधंदे नाहींत. फक्त दोन तेलाच्या गिरण्या, दोन जिनींग व प्रेसिंग कारखाने व तीन जिनींग कारखाने आहेत. व्यापारासाठीं स्टेट बँक ऑफ हैदराबादची एक शाखा व बीड जिल्हा मध्यवर्ति सहकारी बँक अशा दोन बँका आहेत. ह्या बँकांमार्फतच सर्व व्यापारी व्यवहार व तदनुषंगानें होणारे आर्थिक व्यवहार चालतात.

मालाची विक्री

शेतमालाची खरेदी-विक्री हैदराबाद शेतकी व्यापारी कायद्यान्वयें (११५०) होत असते. या कायद्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी एक फेब्रुवारी १९४९ पासून करण्यांत आली. मार्केट कमिटीच्या देखरेखीखालीं खुल्या लिलावानें सर्व माल विकला जातो. माल विकल्यानंतर वजन केलें जातें. त्यामुळें मालाचें वजन करण्याबाबत फसवाफसवी होत नाहीं. शेतकऱ्याला त्याच्या मालाची जास्त किंमत मिळते. शेतकरी व मार्केट कमिटीतर्फे खालील सोयी करण्यांत आल्या आहेत.

व्यापारी उलाढालीसाठीं येणारे शेतकरी, व्यापारी, गुमास्ते किंवा गिऱ्हाईकें यांच्यासाठीं बाजाराच्या जागीं पुढील सोयी केल्या आहेत :—(१) शेतकऱ्यांना विश्रांति घेण्यासाठीं पत्र्यांचें अच्छादन असणारें विश्रामस्थान (२) रस्ते (३) उपहार गृह (४) गुरांना छाया देणारीं झाडें (५) पाणीपुरवठा (नळानें पाणी पुरविण्याची सोय लवकरच केली जात आहे.)

या शिवाय मुतारी, संडास व गुरांच्या गोठ्याची लवकरच व्यवस्था केली जाईल.

बीडच्या बाजारांत एक वर्षांत साधारणपणें पांच लाख बंगाली मण माल येतो व जवळ जवळ पंचाहत्तर ते ऐंशी लाख रुपयांची उलाढाल होते. येणाऱ्या मालाचा तपशील खालील प्रमाणें आहे. त्यावरून व्यापाराची स्पष्ट कल्पना येईल.

येणारा माल



-उद्योगधंदे-
विद्युत केंद्रें
तेल गिरण्या
बिडी कारखानें
जिनींग व प्रेसिंग फॅक्टरी
भांडयांचा कारखाना
गेवराई
माजलगांव
शिरूर
अमळनेर
बहननाद
यळंब
बीड
धारूर
परळी
अष्टी
पाटोदा
चौसाळा
केज
अम्बाजोगाई
रेनापूर

मालाचें नांव	१९५६-५७ ५८		१९५८-५९	
	आयात बंगाली मण	किंमत (रुपये)	आयात बंगाली मण	किंमत (रुपये)
कापूस	२५,०५९	५,४६,९०६	२४,५३९	१२,३१,७८१
शेंगा	९८,६०७	१५,१५,६४०	१,१४,८४९	१२,२१,१५०
करडई	४१,३४३	५,६२,४१०	२८,८६१	४,८८,५७५
जबस	६६,६६	१,२४,९०८	९,५५९	१,९३,७८८
ज्वारी	१,१०,७००	१२,१७,५०५	१,८७,५६५	२१,९२,४६४
बाजरी	२७,५७०	३,८५,८३३	८३,०६२	१२,५०,५०५
डाळ	८,४५४	१,१३,९१७	१०,४२९	१,५९,७९५
हरभरा	१४,५९८	१,७२,५४०	१२,२१४	१,३५,५४९
तूर	३०,८१३	३,७२,५१८	३०,७०४	४९,१५,५०१
उडीद	८,०३१	१,२६,८७०	१३,८८२	१,७५,४५८
मूग	१५,९९३	२,६१,४९	७२,०६४	१२,९४,५१०

केवळ बीड जिल्ह्यांतच नव्हे तर मराठवाड्यांत परळी हें गांव व्यापारी पेठ म्हणून प्रसिद्ध आहे. याला प्रमुख कारण म्हणजे है राबादकडे जाणारी ब्रॉड गेज रेल्वे व परभणीकडे जाणारी मीटर गेज रेल्वेची सोय हें होय. त्यशिवाय परळीला नांदेड, जालना, बार्शी, लातूर, हिंगोली आदि व्यापारी पेठांना जोडणाऱ्या सडका आहेत. परळींतून अकोला, अमळनेर, जामनगर, **परळी वैजनाथ** हावरा, दिल्ली, हुबळी, कल्याण, हैद्राबाद आदि ठिकाणीं माल निर्यात होतो. गांवांत पांच जिनींग कारखाने, दोन प्रेसिंग कारखाने व आठ ऑईल मिल्स आहेत. १९५९ ते ६० च्या काळांत ऑईल मिल्स्‌नीं केलेल्या तेलबियांच्या खरेदीची आणि तेलाच्या विक्रीची एकूण उलाढाल ५९०९४४१ रुपये होती. तर कापसाच्या एकूण उलाढालीचा आंकडा ३९,५१,३६० रुपये होता.

व्यापारी पेठेची कल्पना येण्यासाठीं गेल्या दोन वर्षांत आलेल्या मालाचा तपशील देण्यांत येत आहे.

(१९५८–५९)

मालाचें नांव		आयात (बंगाली मण)	मालाची किंमत (रुपये)
भुईमूग	...	२,१८,८५६	४१,२६,४१९
कापूस	...	५६,१७२	१२,४४,५११
ज्वारी (पांढरी)	...	१४,६७९	१४,८८,६३३
ज्वारी (बरडी)	...	४४,०६३	४,३१,४१५
बाजरी	...	३८,४६९	५,५९,५१४
गहूं	...	१५,३२९	३१,९६,७७
हरबरा	...	८,८४०	१,५०,३१२
तूर	...	३२,६७९	६,५९,०२७
मूग	...	४१,०१३	७,१३,८६७
उडीद	...	३,१६५	५,१४३३
लाख	...	६२४	११०६
करडई	...	२९,०४४	४,०२,३४२
अळशी	...	२१,१४३	२४,७५,६०३
एरंडी	...	६२८	१२,०८१
सिसम	...	१,७७९	३३,७६७
गूळ	...	३१,१७९	५,०४,१३८
(१९५९–६०)			
साळ	...	२४६८५	३,७६,४३६
गहूं	...	१८,३७१	४,३१,४१८
ज्वारी (पांढरी)	...	१,१६,२३६	१७,८१,०७
ज्वारी (बरडी)	...	६,१६९	८०,८६८
ज्वारी (पिवळी)	...	२८,५३३	३,६५,६५२
बाजरी	...	२७,८५२	४,०३,८५४
हरबरा	...	५,५५०	८,४६,३६
मूग	...	४८,९८८	१८,२०,५४९
तूर	...	३९,४४९	७,१५,६०४
उदीड	...	४,४३०	६७,५५
भुईमूग	...	३,७५,२६९	८१,५७,६००
अळशी (ताग)	...	१६,२९३	५८,४४६
सिसम	...	४,२२८	१,३५,२९६
केसरी	...	२३,४८७	४,२५,३१६
कापूस	...	९९,४०४	३९,०८,६८४
गूळ	...	३४,४९६	७,५८,९१२

परळी येथील बाजारक्षेत्रासाठीं मार्केट कमिटी असून तिनें केलेलें कार्य :

मार्केट कमिटीचें कार्य

व्यापारी पेठंत सिमेन्टचे व खडींचे पक्के रस्ते, स्वत:साठीं कार्यालय, विश्रांति गृह, पाणी पिण्याची विहीर, महात्मा गांधींचा पुतळा, गुरांना पाणी पिण्यासाठीं हळ, मुतारी आदि बांधकामें केलीं असून त्यासाठीं आतांपर्यंत ७८२१४ रुपये खर्च करण्यांत आला आहे. लवकरच पाणीपुरवठा योजनेसाठीं १७ हजार रुपये व नोकर वर्गाला राहाण्यासाठीं गाळे बांधण्यासाठीं ३५ हजार रुपये खर्च करण्यांत येतील.

गेवराई मार्केट

गेवराई हें तालुक्याचें ठिकाण आहे. जालना, औरंगाबाद व सोलापूर रस्त्यावरील हें गांव असल्यामुळें येथें व्यापारी पेठ वाढण्याची अधिक शक्यता असल्यानें ऑगस्ट १९६० मध्यें मार्केट कमिटी स्थापन करण्यांत आली. या गांवांत दोन जिनिंग फॅक्टरीज आहेत. मागील वर्षी १३६१४ रुपयांचें काम झालें.

एका वर्षाच्या अवधींत मार्केट कमिटीचें उत्पन्न १३४०० रुपये असून खर्च ८८७९ रुपये झाला आहे. म्हणजेच निव्वळ नफा ४५१५ रुपये पडला.

१९५९ ते १९६० ऑगस्ट अखेर या मार्केट कमिटींत आलेल्या मालाचा तपशील खालील प्रमाणें आहे.

मालाचें नांव		आयात (बंगाली मण)	मालाची किंमत (रुपये)
ज्वारी	...	१,०९,३०९	१६,३९,६३६
बाजरी	...	६,०६०	८४,८४०
तांदूळ	...	२५५	६,१२०
गहूं	...	८,४८१	१,७१,१०१
हरबरा	...	४३७	६,५५५
तूर	...	१,३३९	२२,७६३
भूईमूग	...	१५,०४७	४,०६,२९९
मूग	...	१५,३२२	२४,५३२
गूळ	...	२,०२०	४४,४४०
कापूस	...	३५,२४४	११,२७,८०८

माजलगांव बाजारपेठ

माजलगांव हें तालुक्याचें ठिकाण आहे. जालना ते माजलगांव अंतर जवळ जवळ ७० मैलांचें आहे. बीडपासून हें स्थान ४६ मैलांवर आहे. परभणी जिल्हा जवळ असून सुद्धां माजलगांव येथील सिंदफणा नदीमुळें परभणी जिल्ह्याकडे वाहतूक होऊं शकत नाहीं. या बाजारपेठेंतून नांदेडकडे ज्वारी अधिक प्रमाणांत रवाना केली जाते. १९५९-६० या वर्षी येथें आलेल्या मालाचा तपशील पुढें देण्यांत आला आहे. त्यावरून येथील व्यापारी पेठेची कल्पना सहज येईल.

मालाचें नांव		आयात (बंगाली मण)	किंमत (रुपयांत)
ज्वारी (पांढरी)	...	५४,४८०	३,५३,७६०
गहूं (लाल)	...	५,५८५	८७,३६०
बाजरी	...	४,०८०	५३,०४०
तूर	...	७,९५९	९५,५०८
मूग	...	३,९९०	५१,८७०
हरबरा	...	२,२५०	२९,२६०
भुईमूग	...	७४,७०५	११,९५,२८०
करडी	...	७१,६००	९,६४,४००
अळशी	...	६,८५५	१,१६,५३५

अंबाजोगाई मार्केट कमिटी

अंबाजोगाई हें तालुक्याचें व उपविभागाचें ठिकाण असल्यामुळें हें शहर सर्व दृष्टचा अग्रेसर आहे. येथें १९५५ सालीं मार्केट कमिटीची स्थापना झाली. याशिवाय येथें चार तेलाच्या गिरण्या व एक जिनिंग फॅक्टरी आहे. दरवर्षी या ठिकाणाहून मालाची आयात व निर्यात बऱ्याच प्रमाणांत होते. १९५९-६० सालीं झालेली मालाची आयात व त्याची किंमत पुढें दर्शविलेल्याप्रमाणें होती.

मालाचें नांव		आयात (बंगाली मण)	किंमत (रुपयांत)
साळ	...	१४,३२५	२,१६,९०७
तांदूळ	...	१७४	४,९१३
पांढरी ज्वारी	...	७,२३६	१,१५,२२४
गहूं	...	१५,८८५	३,५६,९८८
पिवळी ज्वारी	...	२३,८४४	२,९६,७७६
बाजरी	...	३,१९८	५०,५७४
हरबरा	...	२ ६०१	३६,९१०
तूर	...	८,७६३	१,५३,८३९
मूग	...	७,२६६	१,२६,२८४
उडीद	...	७,६०१	१,१४,३३८
भुईमूग	...	४८,५६४	९९४००९
एरंडी	...	४,४७४	९,९१९
करडी	...	४,१४०	६१,०९७
तीळ	...	३४८	९,५३८
करडई	...	६,४५९	१,१७,३६०
	...	१,४७४	३०,९३०
गूळ	...	८,१३२	१,५८,९५२
धने	...	४८७	१,८७१३
मिरची	...	५२७	९,३९४
कापूस	...	३,९६९	१,२१,८३७

शासन यंत्रणा

जिल्हाधिकारी हे जिल्हा शासन यंत्रणेचे मुख्याधिकारी आहेत. त्यांच्यावर जिल्ह्याच्या कारभाराची सर्वच जबाबदारी असते. जिल्ह्यांतील निरनिराळ्या विभागांतील कामांत एकसूत्रता आणणें आणि जनतेच्या अडचणी समजावून घेऊन त्यानुसार विविध विभागांना त्यांच्या कामांत मदत करणें तसेंच जिल्ह्यांत उद्‌भवणाऱ्या आर्थिक व सामाजिक समस्या सोडविणें हीं महात्त्वाचीं कार्यें जिल्हाधिकारी यांना करावीं लागतात. स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी जिल्हाधिकाऱ्यांना केवळ जमीन महसूल, कायदा व सुव्यवस्था एवढेंच काम पाहावें लागत असे. आतां लोकशाहींत जिल्हाधिकाऱ्यांचें कार्यक्षेत्र व्यापक झालेलें आहे. जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीनें त्यांना शासनयंत्रणा राबवावी लागते. ते सरकारचे जिल्हाप्रतिनिधि म्हणून काम करतात. जनतेच्या प्रश्नांचें व परिस्थितीचें सूक्ष्मावलोकन करून त्याबाबतची माहिती सरकारला देणें, तसेंच त्या अनुषंगानें जिल्ह्यांतील विकास कार्याला इष्ट तें वळण देणें हीं जिल्हाधिकाऱ्यांची जबाबदारी असून जनता व सरकार यामधील प्रमुख दुवा म्हणजे जिल्हाधिकारी होय असें विधान स्थूलमानानें करतां येईल.

कायदा आणि सुव्यवस्था राखण्याकरितां व शांतता रक्षणासाठीं उपाययोजना करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्याला असतात. यासाठीं त्यांना डिस्ट्रीक्ट मॅजिस्ट्रेट म्हणून काम करावें लागतें. जिल्ह्यांतील शांतता व सुव्यवस्था कायम राहील आणि जाती-जातीमधील वातावरण सलोख्याचें राहील अशी दक्षता डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट म्हणून त्यांना घ्यावी लागते.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून भारतांत विकास यंत्रणेचीं चक्रें फिरू लागलीं. विकासाचें लोण देशाच्या प्रत्येक खेड्यापर्यंत पोहोंचलें. निरक्षर जनतेला साक्षर करण्यापासून तो देशांतील आर्थिक विषमता कमी करण्यापर्यंतचें कार्य विकास यंत्रणेला करावें लागत.

विकास मंडळ

जिल्हाधिकारी हे जिल्हा विकास मंडळाचे अध्यक्ष असत. जिल्ह्याचा सर्वांगीण विकास करण्याच्या दृष्टीनें विकास मंडळाच्या सहाय्यानें त्यांना विविध योजनांची आखणी, अंमलबजावणी व देखरेख हीं कामें करावी लागत. पण १ मे १९६२ पासून जिल्हा परिषद स्थापन झाल्यामुळें विकास मंडळें बरखास्त झालीं आहेत.

ग्रामपंचायत पायाभूत-घटक

पूर्वी ग्रामपंचायतींच्या कारभारावर जिल्हा लोकल बोर्डाची देखरेख असे. आतां नवीन कायद्यानुसार ग्रामपंचायतींना गांवाच्या सर्वांगीण विकासाची मुख्य जबाबदारी स्वीकारावी लागत असून राष्ट्र विकासाच्या योजनेंतील पायाभूत घटक म्हणून काम करावें लागत आहे.

जिल्ह्यांत मुंबई कूळ कायद्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी कलेक्टरांनाच पार पाडावी लागते. कुळाला संरक्षण देणें, तो कसत असलेल्या जमिनीची मालकी त्याच्याकडून निर्धारित रक्कम घेऊन त्याला देणें इत्यादि कामें या कायद्याच्या अंतर्गत त्यांना करावीं लागतात.

जिल्ह्यांत दुष्काळाचीं वा चणचणींचीं चिन्हें दिसू लागतांच दुष्काळग्रस्त ठिकाणीं दुष्काळी कामें काढून जनतेला रोजगार मिळवून देण्याचें काम कलेक्टरानांच करावें लागतें. अशा भागाला वारंवार भेटीं देऊन परिस्थिति जास्त गंभीर न होऊं देण्याची जाबाबदारी व दक्षता त्यांना घ्यावीं लागते.


शासन विभाग
जिल्ह्याचें मुख्य ठिकाण
तालुक्याचें मुख्य ठिकाण
महालाचें मुख्य ठिकाण
प्रांताधिकाऱ्याचें ठिकाण
फौजदारी व दिवाणी न्यायालयें
जिल्हा न्यायालय
नगरपालिका
पूरपालिका
तालुक्याचें ठिकाण
महिलाश्रम
संस्कार केंद्रें
गेवराई
माजलगांव
बीड
धारूर
परळी
अष्टी
पाटोदा
केज
अम्बाजोगाई

जिल्ह्यांतील सरकारी पैशाचा व्यवहार सांभाळण्यासाठीं ट्रेझरी ऑफिसराची नेमणूक झालेली असते. त्याच्या देखरेखीचें काम जिल्हाधिकाऱ्यांना करावें लागतें. वेळोवेळीं जिल्हा खजिना तपासून सरकारी पैसा सुरक्षित ठेवण्याचें व अफरातफर होऊ न देण्याची खबरदारी त्यांना घ्यावी लागते. पूर्वीप्रमाणेंच महसूल विभागाचे मुख्याधिकारी म्हणूनहि ते काम करतात. हा महसूल गोळा करण्यापूर्वी पिकांच्या आणेवारीच्या प्रमाणांत महसूल गोळा करणें तसेंच पिकांची परिस्थिति समाधानकारक नसल्यास सारा-तहकूबी देण्याबाबतचा विचार करणें हीं कामें जिल्ह्याधिकाऱ्यांना करावीं लागतात.

वरील विवेचनावरून असें दिसून येईल कीं, कलेक्टराचे संबंध जिल्ह्यांतील जनतेच्या जीवनाशीं निगडित झालेले असतात. किंबहुना त्याच्या कार्यक्षमतेवरच राज्य सरकारची कार्यक्षमता कांहीं प्रमाणांत अवलंबून असते.

प्रशासन सुरळीत चालावें म्हणून बीड जिल्ह्याचे दोन प्रांत केलेले आहेत. ते पुढीलप्रमाणें आहेत.

(अ) बीड प्रांत, (ब) अंबाजोगाई प्रांत. प्रत्येक प्रांत डेप्युटी कलेक्टर यांच्या ताब्यांत असतो. बीड व अंबाजोगाई प्रांतांत प्रत्येकी चार व तीन तालुके आहेत. ते खालीलप्रमाणें :

बीड प्रांत : (१) बीड, (२) अष्टी, (३) पाटोदा, (४) गेवराई

अंबाजोगाई प्रांत :(१) अंबाजोगाई, (२) केज, (३) माजलगांव

बीड प्रांताची कचेरी बीडमध्यें व अंबाजोगाई प्रांताची कचेरी अंबाजोगाई येथें आहे. प्रांताधिकारी याचीं मुख्य कामें व अधिकार खालील प्रमाणें आहेत.

(१) पाटलाची नेमणूक करणें (२) तलाठ्याची नेमणूक करणें, (३) सरकारी पडिक जमिनी वाटणें , (४) सिटी सर्व्हे हद्दीबाहेर पडणारी गांवांतील पहिल्या वर्गाची शेतजमीन बिगर शेतीसाठीं उपयोगांत आणण्याची परवानगी देणें., (५) बैल खरेदी करण्यांसाठी पांचशें ते हजार रुपयापर्यंत आणि ताली व विहिरी यासाठीं रुपये दोन हजार पांचशेंपर्यंत तगाई मंजूर करणें. (६) रेकॉर्ड ऑफ राईट व कुळकायदा यांचीं अपिलें चालविणें आदि.

तालुक्याचे मुख्याधिकारी मामलेदार असतात. बीड जिल्ह्यांतील मामलेदाराचीं मुख्य कामें आणि अधिकार खालीलप्रमाणें आहे.

(१) कोतवालाच्या नेमणुका करणें , (२) सरकारी पडिक जमीन लागवडीस देणें, (३) वर्ग दोन मधील जमीन बिगर शेतकामासाठीं वापरण्यास देणें, (४) वाहत्या पाण्याचा पिकांसाठीं वापर करण्यास परवानगी देणें, (५) बैलासाठीं रुपये पांचशेंपर्यन्त व तालीसाठीं एक हजार रुपया-पर्यंत तगाई मंजूर करणें., (६) गांवच्या हद्दपत्रकांतील नोंदी करणें, (७) कुळकायद्याखालील खटले चालविणें, (८) मामलेदार कोर्टस ॲक्टखालील खटले चालविणें, (९) कोर्टाकडून आलेल्या अर्जाची रक्कम वसूल करणें. (१०) सर्व तऱ्हेची सरकारी बाकी वसूल करणें,

विहिरीसाठीं तगाई

आतां नवीन विहिरीसाठीं तगाई डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल को-ऑपरेटिव्ह लॅन्ड मार्गेज बँकेकडून मिळतें. नव्या विहिरींसाठीं जास्तीत जास्त दोन हजार पांचशे रुपये व जुन्या विहिरींसाठीं जास्तीत जास्त एक हजार रुपये तगाई मिळते. अर्जाचे फॉर्म तलाठी अगर मामलेदार यांच्याकडे मिळतात. अर्जाची चौकशी मामलेदार यांच्या मार्फत होते. तारण देऊं केलेल्या जमिनीची किंमत त्या जमिनीच्या साऱ्याच्या एकशें ऐंशी पट अधिक विहिरीची किंमत इतकी धरली जाते व या किमतीच्या निम्मी रक्कम कर्ज म्हणून दिली जाते. तारण देऊं केलेल्या जमिनीवर पूर्वीच्या कर्जाचे बोजे असतां कामा नयेत.

बीड जिल्ह्यांतील प्रत्येक तालुक्यास एक गट विकासाधिकारी असून त्याला प्रत्येक गांवीं एक सहकारी सोसायटी स्थापन करणें, शाळा बांधणें, प्रौढांना साक्षर करण्यासाठीं वर्ग चालविणें,

तालुक्यांतील होतकरू विद्यार्थ्यांना धंदेशिक्षण देणें, खेड्यांतील स्त्रियांना भरतकाम, शिवणकाम शिकवून सामाजिक सुधारणा करणें, तालुक्याच्या ठिकाणीं शेतकरी संघामार्फत एक इमारत बांधून तालुक्यांत कामानिमित्त आलेल्या शेतकऱ्यांची राहण्याची सोय करणें, जमीन सुधारण्याकरितां सुधारलेल्या बी-बियाण्यांचें वांटप करणें व नवीन विहिरींकरितां तगाई देणें, ग्रामपंचायतींच्या कारभारावर देखरेख ठेवणें व पंचायतींमार्फत गांवांत रस्तेदुरुस्ती, मोफत वाचनालय, औषधोपचार, वगैरे गोष्टी घडवून आणणें, महिला मंडळ, भजनी मंडळ स्थापून खेड्यांतील लोकांना खेड्याबाहेरील जगाची कल्पना आणून देण्यासाठीं मधून मधून सहली घडवून आणणें आदि कामें करावीं लागतात.

विकासाधिकाऱ्यांचीं कामें

प्रत्येक नागरिकानें कायदा-पालन करावें, समाजजीवन सुव्यवस्थित राहावें, घटनेंत नागरिकांना दिलेल्या हक्काचा आदर व्हावा आणि गुन्ह्यांना प्रभावी रीत्या प्रतिबंध व्हावा म्हणून जिल्ह्यांतील पोलीस यंत्रणा खेड्याच्या पातळीपर्यंत काम करीत असते. बीड येथें जिल्हा पोलीस प्रमुखांची कचेरी असून जिल्ह्यांतील पोलिसांच्या कार्यावर त्या कचेरीद्वारें देखरेख करण्यांत येते. तालुका पातळीवर पोलीस स्टेशन्स ठेवण्यांत आलीं असून तेथें एक सब इन्स्पेक्टर व त्याला मदतनीस पोलीस ठेवण्यांत आले आहेत. तसेच बीड व अंबाजोगाई विभागासाठीं जिल्हा उप-पोलीस प्रमुख नेमण्यांत आले आहेत. त्यांच्याकडे अनुक्रमें बीड, पाटोदा, अष्टी, अंबाजोगाई, गेवराई, केज व माजलगांव हे तालुके देण्यांत आले आहेत. जिल्ह्यांतील एकोणीस पोलीस स्टेशन्स व सहा आउट पोस्ट पुढील गांवांत आहेत.

पोलीस यंत्रणा

क्रमांक	पोलीस स्टेशन	आउट पोस्ट	तालुका
१	पिंपळनेर	चौसाळा	बीड
२	नेकनूर	......	......
३	तलवाडा	मादलमोही	गेवराई
४	गेवराई	......	गेवराई
५	चकलांबा	......	गेवराई
६	अष्टी	......	अष्टी
७	अंभोरा	......	अष्टी
८	पाटोदा	अमळनेर	पाटोदा
९	मानूर	......	पाटोदा
१०	माजलगांव	......	माजलगांव
११	दिंद्रुड	......	माजलगांव
१२	पिंप्री	......	माजलगांव
१३	केज	वडवणी	केज
१४	युसुफ वडगांव	नांदुरघाट	केज
१५	धारूर	......	केज
१६	अंबाजोगाई	पानगांव	अंबाजोगाई
१७	बरदापूर	......	अंबाजोगाई
१८	रेणापूर	......	अंबाजोगाई
१९	परळी	......	अंबाजोगाई

याशिवाय बीड येथें स्थानिक (शहरासाठीं) व बीड ग्रामीण विभागासाठीं दोन पोलीस स्टेशनें आहेत.

पोलीस कल्याण केंद्र

पोलिसांच्या सुखसोयींसाठीं बीड व अंबाजोगाई येथें पोलीस कल्याण केन्द्रें आहेत. या दोन्हीं ठिकाणीं स्वस्त धान्याचीं दुकानें आहेत. पोलिसांच्या कुटुंबांतील व्यक्तींना शैक्षणिक व वैद्यकीय मदत दिली जाते. कमी दरांत कपडे शिवून मिळावेत म्हणून शिवण्याचीं यंत्रेंहि ठेवण्यांत आलीं आहेत. बीड येथें पोलिसांच्या मुलांना दूधसुद्धां मोफत दिलें जातें. पोलिसांच्या स्त्रियांना अंबर चरख्याद्वारें शिक्षण देण्यांत आलें आहे. करमणुकीसाठीं रेडिओ, कॅरम आदि वस्तु ठेवण्यांत आल्या आहेत.

न्यायदानाची व्यवस्था

जिल्ह्यांतील जनतेचे जमीनमहसूलाबाबतचे दिवाणी व फौजदारी खटले निकालांत निघून लोकांना त्वरित न्याय मिळावा म्हणून जिल्हा व तालुका पातळीवर न्यायदानाची व्यवस्था करण्यांत आलेली आहे. न्यायदानाच्या व्यवस्थेसाठीं दोन विभाग असून जिल्हाधिकारी हे महसूल विभागाचे जिल्ह्याचे प्रमुख न्यायाधीश असून जिल्हा न्यायाधीश हे दिवाणी व फौजदारी न्यायालयाचे प्रमुख होत. न्यायदानाचें काम त्वरित व्हावें म्हणून तालुका पातळीवर न्यायालयाचे अधिकारी नेमण्यांत आले आहेत. या जिल्ह्यांत तालुक्याच्या ठिकाणीं मिळून सात न्यायालयें आहेत. त्याशिवाय अष्टी येथील न्यायाधीश प्रत्येक महिन्याच्या अकरा ते वीस तारखेपर्यंत पाटोदा या महालाच्या ठिकाणीं जाऊन न्यायदानाचें काम करतात व इतर तारखांना अष्टी येथें न्यायदानाचें काम करतात. तालुक्याचे मामलेदार अथवा महालकरी हे महसूल न्यायालयाचे प्रमुख असून त्यांच्यापुढें जमीनविषयक तंटे, कुळकायदा आणि किरकोळ मतभेद व तंटे याबाबत खटले चालविण्यांत येतात. या न्यायालयांत लागलेल्या निर्णयांत समाधान न पावलेल्या पक्षकारांना जिल्ह्यांतील बीड व मोमिनाबाद येथिल प्रांत ऑफिसरच्या न्यायालयांत दाद मागतां येते. तेथेंहि समाधान न झाल्यास जिल्ह्याच्या दृष्टीनें जिल्हाधिकारी हा शेवटचा पर्याय होय. जमीन सुधारणा निवाड्यासाठीं एक स्वतंत्र प्रांत अधिकारी जिल्ह्यासाठीं नेमण्यांत आला आहे.

न्यायालयें

पुढील गांवांना न्यायालयें आहेतः बीड :–जिल्हा व सेशन कोर्ट, सिव्हिल जज्ज सिनियर डिव्हिजन व प्रथम श्रेणी न्यायाधीश. **अष्टी :–**सिव्हिल जज्ज ज्युनियर डिव्हिजन, **केजः–** सिव्हिल जज्ज व ज्युनियर डिव्हीजन, **अंबाजोगाईः–**सिव्हील जज्ज ज्युनियर डिव्हीजन, **गेवराई :–**सिव्हील जज्ज, ज्युनियर डिव्हीजन, **माजलगांवः–** सिव्हील जज्ज ज्युनियर डिव्हीजन,

बीड येथें चार व अंबाजोगाई येथें दोन व अष्टी, केज माजलगांव व गेवराई येथें प्रत्येकी एक याप्रमाणें न्यायाधिशांची संख्या दहा आहे.

बीड येथील सेशन कोर्ट, अंबाजोगाई, अष्टी व माजलगांव येथील न्यायाधीश कचेऱ्या सरकारी इमारतींत असून गेवराई, केज व पाटोदा येथील कचेऱ्या खाजगी इमारतींत आहेत. गेवराई व केज येथें लवकरच बांधकाम विभागातर्फे इमारती बांधल्या जातील.

कायदा, सुव्यवस्था, शांतता, न्यायदान आणि जमीन महसूल हीं कार्यें करणारे हे विभाग सोडले तर इतर विभागांची विस्तृत माहिती व त्यांनीं केलेलें कार्य यांचा तपशील इतर प्रकरणांत आला आहेच. ज्या इतर विभागांची माहिती आलेली नाहीं, त्यांची माहिती पुढें दिली आहे.

विक्रीकर विभागाची प्रमुख कचेरी यापूर्वी बीड जिल्ह्यांतील प्रमुख व्यापारपेठ परळी वैजनाथ या गांवीं होती. दिनांक १८ सप्टेंबर १९६० पासून ही कचेरी बीड येथें आणण्यांत आली.

१९५० च्या हैद्राबाद विक्रीकर कायद्यानुसार नोंदणी झालेल्या व्यापाऱ्यांची संख्या पुढील प्रमाणें–

तालुका	व्यापाऱ्यांची संख्या
अंबाजोगाई	३३२
बीड	२५४
माजलगांव	१५४
केज	१४२
गेवराई	५९
पाटोदा	५३
अष्टी	२९
एकूण	१,०२३

१९५९ च्या (जुन्या) मुंबई राज्य विक्रीकर कायद्यान्वयें नोंदणी केलेल्या व्यापाऱ्यांची संख्या पुढील प्रमाणें आहे.

तालुका	व्यापाऱ्यांची संख्या
अंबाजोगाई	१५३
बीड	११९
माजलगांव	४०
गेवराई	२९
केज	१९
पाटोदा	६
अष्टी	५
एकूण	३७१

यापैकीं सर्वसाधारण पन्नास हजार रुपयांपर्यंत विक्रीची उलाढाल करणाऱ्यांची संख्या बावीस आहे. त्याचप्रमाणें एका राज्यांतून दुसऱ्या राज्यांत किंवा परदेशांत माल विक्रीस पाठविणाऱ्यांची संख्या सहा आहे. या विक्रेत्यांची मालाची उलाढाल तीस हजार रुपयांच्यावर असते. विक्रीकर असणाऱ्या वस्तूंचें उत्पादन करणें व तें विक्रीसाठीं पाठविणें यास्तव ज्यांची नोंद ठेवली गेली आहे, त्यांची संख्या फक्त एक आहे. हा माल दोन हजार पांचशें रुपयापेक्षां अधिक किंमतीचा असतो. जे व्यापारी माल विकत घेतात किंवा विकतात व जो व्यवहार जवळ जवळ तीस हजारपर्यंत असतो, अशा तऱ्हेचे परवाना घेतलेल्या व्यापाऱ्यांची संख्या सतरा आहे.

या कचेरीतर्फे केन्द्रीय विक्रीकर कायदा (१९५६), (जुनें) मुंबई राज्य मोटर स्पिरीट कर (१९५८) कायदा, हैद्राबाद शेतकी उत्पन्न कर कायदा (१९५२), (जुनें) मुंबई ऊंस कर कायदा (१९५९), या कायद्यांची देखील दखल या कचेरीतर्फे घेतली जाते. या विभागाच्या नोकरवर्गाची संख्या तेवीस आहे.

आयुर्विमा विभाग

बीड येथें आयुर्विमा विभागाचा भाग असून आठ फील्ड ऑफिसर आहेत, व सव्वाशें परवाना घेतलेले एजंट आहेत. त्यांच्यावर देखरेख ठेवण्यासाठीं एक असिस्टंट ब्रँच मॅनेजर आहे. १९६०–६१ सालीं जवळ जवळ पंचावन्न लक्ष रुपयांचें विम्याचें काम झालें आहे.

खनिज संपत्ति

खनिज संपत्तीच्या बाबतींत बीड जिल्हा दुर्दैवीच म्हटला पाहिजे. कारण अजून तरी बीड जिल्ह्यांत कुठलीच खनिज संपत्ति सांपडलेली नाहीं. जिल्ह्यांतील मालाची आयात निर्यात रस्त्यानेंच होते. कारण जिल्ह्यांत फक्त तीस मैल लांबीची रेल्वे आहे व एकच मोठें स्टेशन आहे आणि तें म्हणजे परळी होय. अशा स्थितींत बीड जिल्ह्यांत मोठ्या उद्योगधंद्याचा विकास न होणें स्वाभाविक. जिल्ह्यांतील शेकडा ऐंशी टक्के लोकांची उपजीविका शेतीवर अवलंबून असल्याचें मागें आपण पाहिलेंच आहे. त्यामुळें जीं कांहीं व्यापारी पिकें जिल्ह्यांत निर्माण होतात त्यांच्या प्रोसेसिंगचे थोडे फार कारखाने जिल्ह्यांत आहेत. त्यांत दहा तेल गिरण्या, सात जिनिंग आणि दोन प्रेसींग गिरण्या हे प्रमुख कारखाने आहेत. याशिवाय नांव घेण्यासारखे असे चार गुळाचे कारखाने जिल्ह्यांत आहेत.

पितळी भांडीं

ज्यांचा समावेश छोटचा उद्योगधंद्यांत करतां येईल असा एकच उद्योगधंदा जिल्ह्यांत आहे तो म्हणजे पितळी भांडीं तयार करण्याचा. पाटोदा तालुक्यांतील अमळनेर या गांवीं पितळी भांडीं मोठ्या प्रमाणावर तयार होतात आणि त्यांना फार दूरवरून मागणी असते.

छोटचा उद्योगधंद्यांच्या वाढीला वाव

खनिज संपत्तीच्या अभावीं बीड जिल्ह्यांत अवजड किंवा मोठ्या उद्योगधंद्यांची स्थापना होणें कठीण आहे. जिल्ह्यांत फक्त मध्यम, लहान आणि घरगुती उद्योगधंद्यांच्या वाढीला वाव आहे. शेतीवरील भार कमी करण्यासाठीं किंवा शेतकऱ्यांच्या कुटुंबांतील व्यक्तींना जोडधंदा मिळवून देण्याच्या दृष्टीनें या धंद्यांच्या वाढीला फार महत्त्व आहे. किंबहुना ग्रामीण अर्थरचनेंतील सध्याची अस्थिर अवस्था घालवावयाची असेल तर मध्यम, लहान, किंवा घरगुती उद्योगधंद्याची वाढ करणें अत्यंत आवश्यक आहे. तेव्हां त्या दृष्टीनें या उद्योग धंद्यांचा-विशेषतः लहान व घरगुती उद्योगधंद्यांचा–विकास करण्याचा पद्धतशीर प्रयत्न गेल्या तीनचार वर्षांपासून सुरू आहे.

उद्योगधंद्यांच्या विकासासाठीं प्रथमतः तंत्रज्ञ व कसबी कारागीर शिकवून तयार करावे लागतात आणि नंतर त्यांना उत्पादनासाठीं लागणारें साहित्य पुरवावें लागतें. उद्योगधंद्यांच्या प्रशिक्षणासाठीं ज्या विविध शाळा सुरू करण्यांत आल्या आहेत व ज्या लवकरच सुरू होत आहेत त्यांचा तपशील पुढीलप्रमाणें :

प्रशिक्षण शाळा

क्रमांक	शाळेचें नांव	गांव	तालुका	मंजूर रक्कम	शिक्षणाची मुदत
				रु.	
१	ट्रेनिंग स्कूल	परभणी	बीड	१०,०००	दोन वर्षे चाल
२	तंतु विणकाम शाळा	खांडेपारगांव	बीड	५,०००	एक वर्ष
३	शिवण कला केंद्र (पुरुषांसाठीं)	पिंपळनेर	बीड	१३,०००	दोन वर्षें
४	महिला शिवण वर्ग	ताडसोना, पिंपळनेर, जरूड शिवण	बीड	७,०००	दोन वर्षें
५	सुतार, लोहार, विणकाम चर्मोद्योग शाळा (जिल्ह्यासाठीं)	नेकनूर	बीड	४९,६४०	एक ते दीड वर्ष
६	चर्मोद्योग प्रशिक्षण शाळा	कडा	अष्टी	१३,०००	एक वर्ष
७	महिला शिवण कला वर्ग	कडा	अष्टी	७,०००	एक वर्ष
८	साबण उत्पादक शाळा	अष्टी, कडा, बेलगांव, जवळगांव राधापूर, मांडला	अष्टी	१,५४०	एक वर्ष
९	सुतार, लोहार, प्रशिक्षण केंद्र	खिळद	अष्टी	६,५००	दोन वर्षें
१०	शिवण कला केंद्र (पुरुषांसाठीं)	पानगांव	अंबाजोगाई	१४,०००	एक वर्ष
११	शिवण कला केंद्र (महिला)	परळी	अंबाजोगाई,	११,०००	दोन वर्षें
१२	सुतार, लोहार प्रशिक्षण शाळा	अंबाजोगाई	......	१६,०००	दीड वर्ष
१३	महिला शिवण शाळा	नागापूर	अंबाजोगाई	१९,३१०	एक वर्ष
१४	लोकर विणकाम शाळा	खोकरमोह	पाटोदा	३७,६४०	दोन वर्षें
१५	महिला शिवण वर्ग	पाटोदा	......	७,१०४	तीन महिने
१६	चर्मोद्योग शाळा	पिंपळवंडी	पाटोदा	१६,८२२	दोन वर्षें

शाळांची मुदत संपल्यानंतर नवीन गांवीं शाळा उघडल्या जातात.

बीड येथें छोटे उद्योग व हस्तकला व्यवसायांना हवें तें मार्गदर्शन व आर्थिक सहाय्य देण्यासाठीं जिल्हा पातळीवर एक स्वतंत्र विभाग उघडण्यांत आला आहे. या विभागातर्फे झालेल्या कामाचा तपशील पुढीलप्रमाणें आहे.

औद्योगिक सहकारी संस्थांची स्थापना

आर्थिक काटकसर, स्वावलंबन, परस्पर सहकार या ध्येयानें प्रेरित झालेल्या कारागीरांच्या संघटनांना आर्थिक मदत पुढीलप्रमाणें करण्यांत आली. बीड जिल्ह्यांत आतांपर्यंत चौऱ्यांशीं औद्योगिक सहकारी संस्था स्थापन करण्यांत आल्या असून त्याच्या सभासदांची संख्या दोन हजार सहाशें वीस आहे.

या संस्थेचें शेअर भांडवल १६२१२२ रुपये आहे. त्याशिवाय १९४८४ रुपये गंगाजळी व इतर निधि आहे. कुटिरोद्योग विभागातर्फे एकूण ५०३०८ रुपये, मध्यवर्ती सहकारी बँकेतर्फे ७८३९४ रुपये व खादी ग्रामोद्योग बोर्डातर्फे कर्ज व मदत म्हणून ८७८९२ रुपये, या संस्थांना देण्यांत आले. या संस्थेचें एकूण खेळतें भांडवल ६१७६६९ रुपये आहे.

विविध प्रकारच्या सोसायटचा

बीड जिल्ह्यांत ११ हातमाग विणकर सहकारी सोसायटचा, आठ लोंकर विणकर, २१ चर्मोद्योग, १३ तेल उत्पादक, एक तांबा पितळी धातुकाम, १२ वीट कामगार, सहा दोर कामगार, तीन मजूर सहकारी , तीन सुतार काम, एक साबण उत्पादक, एक जिल्हा औद्योगिक मंडळ, चार इतर प्रकारच्या संस्था अशा एकंदर ८४ विविध प्रकारच्या लहान व कुटिरोद्योगांच्या संस्था कार्य करीत आहेत. १९५६–५७ सालीं अशा प्रकारच्या फक्त २२ संस्था होत्या.

औद्योगिक सहकारी संस्थांना आर्थिक मदत

बीड जिल्ह्यांतील औद्योगिक सहकारी संस्थांना पुढीलप्रमाणें मदत देण्यांत आली आहे :– (१) खेळत्या भांडवलासाठीं कर्ज–रु. ३५,८००; (२) सभासदांना शेअर विकत घेण्यासाठीं रु. ३,८२७; (३) हत्यारें व अवजारांसाठीं अनुदान कर्ज–रु. १५,१४०; (४) गुदाम शेड बांधण्यासाठीं मदत–रु. ५,२००; (५) भांडवली खर्चाकरितां अनुदान –रु.७,७६५; (६) सोसायटीच्या शेअर भांडवलांत सरकारनें गुंतविलेली रक्कम–रु. १,०००; (७) जिल्हा मध्यवर्ति सहकारी बँकांना कर्ज –रु. ८०,०००; अशा तऱ्हेने कुटिरोद्योग विभागातर्फे १,४८,७३२ रुपये देण्यांत आले.

हातमाग योजनेनुसार देण्यांत आलेलें कर्ज–

हत्यारें व अवजारासाठीं कर्ज – ६,१०१ रु.
हत्यारें व अवजारासाठीं अनुदान– २९,९०३ रु.
कापडाचें नमुना पुस्तक तयार करण्यासाठीं १२० रु.
कापड विक्री रिबेट अनुदान – १८,३८५ रु.
रंगगृहासाठीं कर्ज– ६०० रु. व अनुदान–१,५१० रु.
रिझर्व बँकेनें सहकारी बँकेस हातमाग योजनेसाठीं दिलेलें कर्ज– ३९,९०० रु.

खादी ग्रामोद्योग कमिशनच्या योजना —	रुपये		रुपये
शेअर भांडवलासाठीं कर्ज ...	२०,२०७		
खेळत्या भांडवलासाठीं कर्ज ...	६१,६००		
सुधारलेली घाणी खरेदीसाठीं कर्ज...	१३,०५०	अनुदान	१३,०५०
शेड बांधण्यासाठीं कर्ज ...	५,७५०	अनुदान	५,७५०
विक्री केन्द्र व्यवस्था ...	१,२८०		
तेल विक्रीवर रिबेट ...	८,५०८		
तेलउत्पादन शिक्षण केन्द्रास अनुदान	१,५५५		
एकूण रुपये	१,३०,७५०		

			रुपये
ग्रामीण चर्मोद्योग—	(१) सभासदांना शेअर खरेदीसाठीं कर्ज	... ...	६,०७२
	(२) जुने खड्डे (टॅनिंग) दुरुस्तीसाठीं अनुदान	...	१,७००
	(३) कातडी कमावण्याचा कारखाना उभारण्यासाठीं कर्ज		२१,४००
	अनुदान	... ...	१६,९००
	(४) नवीन खड्डे बांधण्यासाठीं अनुदान	... ...	८००
	(५) कातडें काढण्याच्या केन्द्रासाठीं कर्ज	... ...	५,३२०
	अनुदान	... ...	६,४००
अखाद्य तेलापासून साबण उत्पादन—	कर्ज	... ...	२०,५००
	अनुदान	... ...	१२,३५०
ग्रामीण कुंभार धंद्यासाठीं	(१) खेळतें भांडवल— कर्ज	... ...	२,५००
	(२) शेअर भांडवल— कर्ज	... ...	१,५००

वैयक्तिक कारागिरांना कर्ज ज्या ठिकाणीं कारागिरांच्या औद्योगिक सहकारी संस्था स्थापन करणें शक्य नसतें अशा ठिकाणीं कुटिरोद्योगांचें काम करणाऱ्या कारागिरांना हत्यारें व अवजारें आणि खेळत्या भांडवलासाठीं वैयक्तिक कर्ज व अनुदान देण्यांत येतें.

		रुपये
(१) लहान लहान उद्योगधंदे व कुटिरोद्योग यांच्या १९३५ च्या नियमाप्रमाणें लहान उद्योगधंद्यांना कर्ज	... ...	११,६००
(२) अधिकृत कारागिरांना कर्ज व मदत	... ...	२,८२५

आतांपर्यंत चौतीस कारागिरांना २६९२५ रुपये कर्ज म्हणून देण्यांत आले.

सध्याच्या विज्ञान युगांत प्रत्येक उद्योगधंद्याच्या तांत्रिक बाबींमध्यें हरघडी सुधारणा घडून येत आहेत. यास्तव या विभागामार्फत नवीन पद्धतींचीं हत्यारें व अवजारें वापरण्याचें शिक्षण देण्यासाठीं जिल्ह्यांत फिरत्या शाळा काढण्यांत आल्या आहेत. या शाळेंत प्रत्येक विद्यार्थ्यास खेडेगांवांत दरमहा वीस रुपये व शहरीं भागांत शाळा असल्यास पंचवीस रुपये विद्यावेतन देण्यांत येतें. **धंदेशिक्षण शाळा**

लहान लहान उद्योगधंद्यांत वापरलीं जाणारें हत्यारें व अवजारें यांच्या उत्पादन पद्धतींत सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीनें संशोधन व प्रयोग करण्यासाठीं पुणें व नागपूर येथें स्वतंत्र संस्था विभागामार्फत काम करीत आहेत. त्यांतील संशोधनाचा फायदा वेळोवेळीं कारागिरांना देण्यांत येतो. **संशोधन व प्रयोग**

या कामासाठीं जिल्ह्यांत सर्व औद्योगिक सहकारी संस्थांचें असोशिएशन असून कच्चा माल असोसिएशनमार्फत पुरविण्यांत येतो व संस्थांचा पक्का माल असोसिएशन मार्फतच विकला जातो. **विक्री व्यवस्था**

राज्यपुनर्रचनेनंतरच्या चार वर्षांच्या काळांत जे विविध कार्य या क्षेत्रांत केलें गेलें त्याचा आंकडेवारीसह तपशील—

		रुपये
(१)	कारागिरांना वैयक्तिक आर्थिक सहाय्य	१४,४२५
(२)	सोसायटींचे शेअर खरेदी योजना	१,०००
(३)	लोंकर विणकर सोसायट्यांना सहाय्यार्थ भांडवलासाठीं कर्ज ...	८,०००
	शेअर भांडवलासाठीं कर्ज	३,८२७
		१९५९–६० चा खर्च रुपये
(४)	मध्यवर्ती सहकारी बँकाना कर्ज	३०,०००
(५)	भांडवली खर्च अनुदान	४,७३०
(६)	हातमाग विकास योजना कर्ज व मदत	४१,११८
(७)	दोरकाम, तंतुकाम शाळा	६,५१८
(८)	खादी व ग्रामोद्योग बोर्डाचा कार्यक्रम—	
	(अ) ग्रामीण तेल उद्योग	५८,०९७
	(ब) चर्मोद्योग	२५,७९५
	(क) अखाद्य तेल, साबण उत्पादन	......
	(ड) मातकाम विकास योजना	४,०००

या प्रमाणें १९५६ - ५७ सालीं २०२००० रुपये, १९५७ - ५८ सालीं २५९०५ रुपये, १९५८ - ५९ सालीं १७८५२५ रुपये, १९५९ - ६० सालीं १९७५१० रुपये खर्च करण्यांत आले.

बीड जिल्ह्यांत खनिज संपत्ति नसल्यामुळें इतर औद्योगिक कारखाने निघण्याची शक्यता कमी आहे. परंतु अंबाजोगाई तालुक्यांत परळी वैजनाथच्या सभोंवतीं सरकारच्या मालकीचीं गायरान तेरा हजार एकर गवती जमीन असून खाजगी मालकीची गवती जमीन सत्तावीस हजार एकरापेक्षां कमी नाहीं. या गवतापासून उत्तम प्रकारचा कागद तयार करणें शक्य आहे. या गवताची उत्तम प्रकारे जोपासना केल्यास चाळीस हजार एकर जमिनींत उत्तम तऱ्हेचें गवत मिळूं शकेल. पूर्णा धरणामुळें वीज उपलब्ध होईल. परळी वैजनाथ हें मराठवाडयांत मीटर गेज व ब्रॉडगेज रेल्वेचें एकमेव जंक्शन असून मोटार वाहतुकीची सोय आहे. परळीपासून सहा मैलावर वाण धरण बांधण्यांत येत आहे. त्यामुळें पाण्याचाहि प्रश्न आपोआप सुटेल. या सर्व कारणामुळें अंबाजोगाई तालुक्यांत एक कागद कारखाना निघण्याची शक्यता आहे. अंबाजोगाई येथील नागरिकांनीं सहकारी तत्त्वावर तसा कारखाना काढण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत.

सर्वांगीण विकासाच्या वाटेवर

१ नोव्हेंबर १९५६ रोजीं बीड जिल्हा मराठवाड्यांतील इतर जिल्ह्यांबरोबर त्यावेळच्या विशाल मुंबई राज्यांत सामील झाला. मराठवाड्याच्या इतर जिल्ह्यांप्रमाणें बीड जिल्ह्यांतील परिस्थिति देखील अतिशय असमाधानकारक होती. पहिली पंचवार्षिक योजना संपून दुसरींचीं सुरुवात झालीं होती. तरी जिल्ह्याच्या विकासविषयक कार्याला हात देखील लागला नव्हता. त्या वेळच्या विशाल मुंबई राज्यांत बीड जिल्हा कमालीचा अविकसित होता. विशाल मुंबई राज्यांत सामील झाल्यानंतर जिल्ह्याच्या विकासविषयक कार्याकडे तत्परतेनें लक्ष देण्यास सुरुवात झाली.

या विकासविषयक कार्यांत अग्रक्रम होता शेती सुधारण्याचा. जिल्ह्यांतील शेतींचीं अवस्था अगदींच निकृष्ट होतीं. शेतकरी वापरीत असलेलीं अवजारें परंपरागत होतीं. त्यांच्या जमिनीं कसण्याच्या पद्धति जुन्या होत्या. बियाण्यांचा व खतांचा पुरवठा अजिबात नव्हता. ओलिताच्या सोयीं अत्यल्प होत्या. या सर्व गरजांकडे पुरेसें लक्ष देऊन अन्नधान्योत्पादन वाढविण्याचें काम शेतकीं विभागानें हातीं घेतलें. गेल्या चार वर्षांत या क्षेत्रांत जें कार्य केलें त्याचा वर्गवार तपशील आंकडेवारीसह पुढीलप्रमाणें – (मार्च १९६० अखेरपर्यंत).

या काळांत एकूण ४७८००० रुपये या कार्यासाठीं मंजूर करण्यांत आले. त्यापैकीं सन १९५६–५७ मध्यें २५५१० रुपये, सन १९५७–५८ मध्यें ३३२२४ रुपये व सन १९५८–५९ मध्यें ७१०७९ रुपये खर्च करण्यांत आले. सन १९५९–६० मध्यें वरील कार्यासाठीं एक १११९०० रुपये मंजूर झाले होते. त्या काळांत बियाण्यांच्या वांटपाचीं आंकडेवारीं :—

क्रमांक	बियाण्यांचें नांव	(बंगाली मणांत) १९५६–५७	१९५७-५८	१९५८-५९	१५५९-६०		एकूण क्षेत्र (एकरांत)
१	ख. ज्वारीं ...	२५६-००	...	९४-००	६५२-००	२५९-००	१,२६२
२	र. ज्वारीं ...	८६८-००	१,४५१-००	१,७६२-००	१,९५१-००	६,०६२	६०,४९५
३	गहूं ...	८९७	४८५	८८३	९२४	२,१८१	५,९७८
४	बाजरीं ...	......	......	२०-००	११०-००	१३०-००	१,५६०

सुधारलेल्या बियाण्यांच्याबरोबर पीक चांगलें येण्यासाठीं रासायनिक खतें शेतकऱ्यांना पुरविण्याची गरज होती. खतवांटपाची १९५९–६० सालची आंकडेवारी :—

क्रमांक	रासायनिक खतांचें नांव	१९५६-५७	१९५७-५८	१९५८-५९	१९५९-६०		एकूण क्षेत्र (एकरांत)
१	अमोनियम सल्फेट	१०९-९७	३९९-००	१८३-११	३२६-३९	१,०१-४७	१,८३४२
२	सुपर फॉस्फेट ...	६-२७	५२-२३	५३-०६	१२०-००	२१३-५६	
३	युरिया ...	......	......	७-००	२१-०६	२८-६	१,०१४

वरील खतवांटपापैकीं सुफर फॉस्फेट मुद्दाम कमी किमतींत विकण्यांत आलें. त्यांत होणारा तोटा विभागानें सोसला.

सेन्द्रीय खताचें उत्पादन

रासायनिक खतांचा पुरवठा करीत असतांना त्यांना परिणामकारक जोड देण्यासाठीं कंपोस्ट आणि इतर सेन्द्रीय खतांच्या उत्पादनाकडेहि विशेष लक्ष पुरविण्यांत आलें. वरील योजनेच्या काळांत ५,४२७ नवे कंपोस्ट खड्डे करण्यांत आले व त्यापासून १६,२८१-०० टन कंपोस्ट मिळालें. शेतकऱ्यांना आतां या खताचें महत्त्व पुरेपूर पटलें असल्यानें खतांच्या खड्ड्यांत सारखी वाढ होत असून कंपोस्टचें उत्पादन सारखें वाढत आहे.

पिकांवर पडणारा रोग हा दैवी प्रकोप आहे असें म्हणून स्वस्थ बसण्याऐवजीं आजाऱ्याला जसें औषध देऊन बरें करण्यांत, येतें तसेंच कीटकनाशकें फवारून पिकांवरील रोग घालवितां येतात, हें शेतकऱ्यांना पटविण्यासाठीं व पिकांच्या रोगांचा प्रतिकार कसा करावा हें त्यांना समजाविण्यासाठीं पीकसंरक्षण कार्य हातीं घेण्यांत आलें.

पीकसंरक्षण

पिकांचा नाश करणाऱ्या निरनिराळ्या किडीच्या व रोगांच्या विरुद्ध उपाययोजना करण्यासाठीं प्रत्येक तालुका गोदाम व इतर उप-केन्द्रांत पीकसंरक्षणासाठीं लागणारीं यंत्रें व औषधें ठेवण्यांत आलीं आहेत. हीं यंत्रें नाममात्र भाडें घेऊन शेतकऱ्यांना वापरण्यासाठीं देण्यांत येतात. कीटकनाशकांपैकीं कांहींची विक्री कमी किंमतींत करण्यांत येते व त्यामुळें येणारा तोटा सरकार सोसतें.

तागाच्या बियाण्यांचें वांटप

हिरव्या खतामुळें जमिनीचा मगदूर व पोत सुधारून ती सुपीक बनते. म्हणून ही योजना चालू केली असून शेतकऱ्यांना त्यांचें महत्त्व कळून यावें म्हणून बीजसंवर्धन केंद्रावर प्रात्यक्षिकें केलीं जातात व कमी किंमतींत तागाच्या बियाण्यांचें वांटप केलें जातें.

तागाच्या पिकाचा अधिक प्रसार होण्याच्या बाबतींत दोन मुख्य अडचणी आहेत. कोरडवाहू जमीन एक पिकी असल्या कारणानें तागाचें पीक जर घेतलें तर मुख्य पीक बुडतें. जिल्ह्यांतील बहुतेक जमीन कोरडवाहू आहे. बागायती जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांना तात्काळ पैसा देणाऱ्या पिकांचें आकर्षण जास्त वाटत असल्यामुळें हिरव्या खतांचें महत्त्व पटून देखील त्याचा व्हावा तितका प्रसार होत नाहीं.

कापसाची लागवड

कापूस हें महाराष्ट्रांतील महत्त्वाचें व्यापारी पीक. जिल्ह्याची जमीन या पिकाच्या लागवडीस फार चांगली. तेव्हां या लागवडीचा प्रसार होण्यासाठीं कपाशीच्या सुधारलेल्या बियाण्यांचें वांटप करण्याचें कार्य हातीं घेण्यांत आलें. कोरडवाहू व बागायती दोन्हीं प्रकारच्या कपाशीच्या बियांचें वांटप करण्यांत येत असतें. बागायतीसाठीं १७० सी. ओ. २ व कोरडवाहूसाठीं १४२२ नंबरच्या सरकीचें वांटप करण्यांत येतें. या काळांत या सरकीचें वांटप खालील-प्रमाणें आहे.

क्रमांक	बियांचें नांव	१९५६-५७	१९५७-५८	१९५८-५९	१९५९-६०	एकूण	क्षेत्र(एकरांत)
१	गावरानी १२ ...	३७२-००	या बियांचें वाटप बंद करण्यांत आलें.				३,२२०
२	१७० सी. ओ. टू...	......	१८६-००	१७६-२५	१७३-००	५३५-२५	५,३५२
३	१४२२	......	......	......	४१-००	४१-००	४१०

१७० सी. ओ. टू. च्या सरकीच्या वांटपास बीड जिल्ह्यांत बराच वाव आहे. परंतु मुख्य अडचण बाजारपेठेची आहे. बीड जिल्ह्यांत या पिकास योग्य भाव येत नाहीं म्हणून शेतकरी या कपाशीच्या लागवडीस कचरतात. तथापि या वर्षी अंबाजोगाई, परळी येथें बाजारपेठ सुरू झाल्यानें लागवड बरीच वाढेल.

खरीप व रब्बी मोहीम

सन १९५८ च्या रब्बी हंगामापासून ही मोहीम सुरू असून त्यांत उत्तम यश मिळालें आहे. मोहीम चालू झाल्यापासून खत, बियाणें व औषधें यांच्या वांटपाबाबत पुष्कळ प्रगति झाली असून शेती सुधारण्याचीं आधुनिक साधनें शेतकऱ्यांपर्यंत पोहोंचविलीं गेलीं आहेत. ही मोहीम यशस्वी झाल्याचा निकष म्हणजे सन १९५९-६० मध्यें त्रेचाळीस टक्के उत्पादन अधिक वाढविल्याबद्दल बीड जिल्ह्यास १०,००० रुपयांचें बक्षीस मिळालें आहे.

१९६१-६२ मध्यें बीड तालुक्यांतील नेकनूर व नवगण राजुरी येथील तीन शेतकऱ्यांनी महाराष्ट्र राज्य पातळी वरील तिन्हीही बक्षिसें मिळविली.

क्रमांक	बियांचें नांव	१९५८-५९	१९५९-६०	एकूण	क्षेत्र
१	खरीप ज्वारी ...	... .	२६०-००	२६०-००	२,६००-००
२	रब्बी ज्वारी ...	... १,७७२-००	१,९५१-००	३,७२३-००	३,७२३३-००
३	गहूं ...	... ६८३-००	९४४-००	१,६०७-००	३,२१४-९९
४	अमोनियम सल्फेट ...	... ९४-३६	२८९-९९	३८४-२५	७,६८३-००
५	सुफर फॉस्फेट ...	... १६-००	१०८-७९	१२४-८२	४,९९२-००

गळिताचीं धान्यें हें आणखी एक महत्त्वाचें व्यापारी पीक असल्यानें त्याचें उत्पादन वाढविण्यासाठीं सन १९५९-६० पासून शेतकऱ्यांच्या शेतांत व सरकारी फार्मवर नमुन्यादाखल प्रायोगिक व प्रात्यक्षिक प्लॉट केले जातात. या प्लॉटसाठीं शेतकऱ्यास अधिक खर्च येतो. त्यासाठीं प्रत्येक प्लॉटमागें पंचवीस रुपये सरकारी मदत मिळते. आतांपर्यंत या प्लॉटचा अनुभव चांगला आहे. या प्लॉटसाठीं एकूण पाचशें पंधरा रुपये खर्च झाले असून तें कार्य पुढें चालू राहणार आहे. याशिवाय शेतकऱ्यांना तेलबियांचें अधिक उत्पादन करण्यास उत्तेजन मिळावें म्हणून पिकांच्या चढाओढी लावल्या जातात व अधिक उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यास पन्नास रुपये बक्षीस दिलें जातें. आतांपर्यंत एकूण एकशें पंचवीस शेतकऱ्यांनीं या योजनेंत भाग घेतला आहे.

तेल बियांचें अधिक उत्पन्न

सुधारलेल्या बियाण्यांच्या वाटपांत सातत्य ठेवावयाचें असेल तर त्याचें उत्पादन हातीं घेतलें पाहिजे. या दृष्टीनें जिल्ह्यांत सध्या प्रत्येक तालुक्यास एक या प्रमाणें सहा केंद्रें चालू असून चारशें चौऱ्याशी एकर क्षेत्र त्याखालीं आहे. या ठिकाणीं प्रत्येक पिकासाठीं दर हजार एकरास एक एकर या प्रमाणें सुधारलेल्या बियाणांचें उत्पादन केलें जातें. आतांपर्यंत या कार्याचा अनुभव आशादायक आहे. उत्पन्न झालेलें 'अ' वर्गाचें बीं विकास गटांतील ग्रामसेवकामार्फत नोंदलेल्या बीसंवर्धन शेतकऱ्यांना पेरण्यासाठीं दिलें जातें. त्यापासून तयार होणाऱ्या बियांपैकीं निम्मे सहकारी संस्था विकत घेतील व 'ब' वर्गाच्या शेतकऱ्यांना वांटप करतील. त्यांच्या शेतांत यापासून जें बीं उत्पन्न होईल त्यापैकीं निम्में बीं परत विकत घेतलें जाऊन 'क' वर्गाच्या शेतकऱ्यांना पेरण्यासाठीं दिलें जाईल. अशी एकूण ही योजना आहे. लवकरच बीज संवर्धन केन्द्राचें क्षेत्र साठ एकरांपर्यंत वाढवलें जाणार असून एकूण सातशें एकर क्षेत्रफळ या केन्द्राखालीं आणलें जाईल.

बीजसंवर्धन क्षेत्र

शेतकऱ्यांना अडीअडचणीच्या प्रसंगीं तगाई कर्जें देण्याची पद्धत पूर्वापार आहे. परंतु या काळांत या कार्यास जोराची चालना मिळाली. या योजनेप्रमाणें नवीन विहिरीस २५०० रुपयांपर्यंत व जुन्या विहिरीस १००० रुपयांपर्यंत कर्ज दिलें जातें. आतांपर्यंत १५२० नव्या व १००२ जुन्या विहिरींसाठीं रु. २४,०६,८४७–५० न. पैं. रुपये कर्ज देण्यांत आलें.

तगाई कर्जें

ज्यांच्या विहिरींना भरपूर पाणी असून केवळ साधनाभावीं अधिक क्षेत्र पाण्याखालीं आणतां येत नाहीं त्यांच्यासाठीं या योजनेनुसार एंजिन व पंप बसविण्यासाठीं २५०० रुपयांपर्यंत कर्ज दिलें जातें. आतांपर्यंत १५२ पंपिंगसेटसाठीं २,६७,६७७ रुपये कर्ज देण्यांत आलें. यामुळें ९१२ एकर जमीन पाण्याखालीं आली.

पंपांसाठीं कर्ज

अंबाजोगाई येथें जून १९५९ पासून शेतकी शाळा सुरू करण्यांत आली आहे. या शाळेंत पन्नास विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यांत आला असून प्रत्येक विद्यार्थ्यास दरमहा २० रुपये शिष्यवृत्ति दिली जाते. येथील अभ्यासक्रम दोन वर्षांचा आहे. या शाळेमुळें शेतकऱ्यांच्या मुलांना नवीन पद्धतीच्या शेतीचीं प्रत्यक्ष माहिती मिळेल व कांहीं प्रमाणांत बेकारीचाहि प्रश्न सुटेल. या शाळांमुळें बीड जिल्ह्यांतील शेतकी शिक्षणाची एक प्रमुख अडचण दूर झाली आहे.

शेतकरी शाळा

या योजनेप्रमाणें बिंदुसरा धरणाखालीं भिजणाऱ्या क्षेत्रांत बीडपासून दोन मैलांवर पाली रस्त्यावर ५० एकर क्षेत्र घेतलें जाणार आहे. त्यापैकीं ४४ एकर क्षेत्र तळ्यांत घेतलें आहे. त्याठिकाणीं

प्रायोगिक क्षेत्रें बिंदुसरा प्रकल्प लवकरच काम चालू होऊन आदर्श शेती कशी करावी, धरणाखालील जमिनींत कोणत्या प्रकारची पीकपद्धति अवलंबावी याचें शेतकऱ्यांना प्रात्यक्षिक पाहावयास मिळेल.

भूसंरक्षण

शेती सुधारण्याशीं व उत्पादन वाढविण्याशीं संबंधित असलेला एक महत्त्वाचा कार्यक्रम म्हणजे भूसंरक्षणाचा होय. जमिनींच्या चढउतारामुळें पावसाच्या पाण्यानें व जोरदार धूळ वादळानें जमिनीचें फूल नित्य वाहून जात असतें. वरून खतांचा किंवा आधुनिक पद्धतींच्या मशागतींचा कितीहि जोर केला तरी जोंवर जमिनीच्या फुलाची ही झीज थांबवली जात नाहीं तोंवर जमिनींचा कस व पोत फारसा वाढत नाहीं. कोरडवाहू जमिनींत तर भूसंरक्षणाचें महत्त्व फार आहे. कोरडवाहू जमिनींला चढउतारानुसार ताली घातल्यावर बराच काळ वरचें पाणी धरून राहतें.

ताली घातल्यानें शेतमालाचें उत्पादन पांच ते पंधरा टक्क्यानें वाढतें असा अनुभव आहे. जिल्ह्यांतील जमीन बव्हंशीं कोरडवाहू असल्यानें तिचा कस व पोत वाढविण्याच्या दृष्टीनें ताली घालण्याच्या कार्यावर गेल्या चार वर्षांत खूपच भर देण्यांत आला. जून १९५८ पूर्वी बीड जिल्हा उस्मानाबाद उपविभाग भूसंरक्षण अधिकारी यांच्या अधिकार क्षेत्रांत होता. बीड जिल्ह्यांत ताली घालण्याच्या कामाची गति वाढविण्यासाठीं १६ जून १९५८ पासून बीड जिल्ह्यासाठीं एक नवीन उपविभाग उघडण्यांत आला व त्यासाठीं भूसंरक्षण अधिकाऱ्याची खास नेमणूक करण्यांत आली. ताली घालण्याचें काम वेगानें चालावें हा त्यामागील उद्देश आहे.

धूप थांबविणें

या उपविभागांत भूसंरक्षण विभागातर्फे प्रामुख्यानें (१) जमिनींची धूप थांबविणें, (२) दुर्जल शेती करणें, अशा दोन योजना चालू आहेत. जमिनींची धूप थांबविण्यासाठीं सर्व्हीस कृषि मदतनीसांची नेमणूक झाली असून दुर्जल शेतीच्या प्रयोगासाठी आठ कृषि मदतनीस आहेत. या उपविभागानें खालीं दर्शविल्याप्रमाणें कार्य केलें.

		मंजूर झालेली रक्कम	झालेला खर्च (रुपयांत)	ताली घालण्याचें क्षेत्र (एकरांत)	ताली घातलेलें क्षेत्र (एकरांत)
१९५६-५७	...	......	९१,२१९-८८	२,४३०-००	२,६९७-०४
१९५७-५८	...	१,००,०००	७९,२९३-६८	४,०००-००	१,२६२-३३
१९५८-५९	...	३५,०,०००	१,१०,२७६-६०	४,०००-००	३,७८८-००
१९५९-६०	...	४,००,०००	२,४०,९२१-२५	९,०००-००	८,८५५-००
एकूण	...	८,५०,०००	४,२१,७११-४१	१५,४३०-००	१६,५९७-३७

बीड जिल्ह्यांत खालीं दर्शविलेल्या गांवीं ताली घालण्याचें काम सुरू आहे.

(१) बीड तालुका– बीड, यळंब, नेकनूर **(२) केज तालुका–** केज, मस्सा, जोग

पाटोदा तालुका– पाटोदा, थेरला, सौताडा, तळे, पिंपळगांव

अष्टी तालुका अष्टीं, ब्रम्हगांव, पोखरी, खडकत, अष्टा, जळगांव, कडा, धोनोरा, पांढरी, पिंपरी, कासारी, देवी निमगांव

या शिवाय चौसापुरी, पाडळसिंगी, धारूर व तालखेड या गांवीं माजी हैद्राबाद सरकारतर्फे ताली घालण्यांत आल्या होत्या. त्यांची पूर्ण दुरुस्ती या विभागातर्फे करण्यांत आली.

पशुसंवर्धन

अनादि कालापासून आपला देश हा गोपालांचा देश म्हणून ओळखला जातो. जगांतलें सुमारें १/५ पशुधन आपल्या देशांत असलें तरीं त्याची अवस्था मात्र अत्यंत निकृष्ट आहे. दुधाळ गायी आणि पुष्ट वृषभ हें केवळ शेतकऱ्याचेंच नव्हे तर देशाचें भूषण असतें असें मानलें जातें. समाजाचें जीवन निरोगी आणि सकस करण्यांत पशुधनाचा फार मोठा वांटा आहे. तेव्हां त्यांची सध्याची निकृष्ट अवस्था सुधारून त्यांनासशक्त व दुधाळ करण्याचे संघटित प्रयत्न करणें हें कुठल्याहि प्रगतिपर समाजाचें महत्त्वाचें कार्य ठरतें.

बीड जिल्ह्यांतील गुराची संख्या ही लोकसंख्येपेक्षां ज़ास्त म्हणजे ९,४९,०८८ इतकी आहे. या सर्व गुरांचें आरोग्य सुधारून आणि त्यांची पैदास जातवार करण्याचें काम चार वर्षांपूर्वीं अधिक जोरानें हातीं घेण्यांत आलें. त्यासाठीं पुढील योजना अमलांत आणण्यांत आली.

नवीन पशुचिकित्सालय

कार्याच्या प्रारंभीं बीड जिल्ह्यांत दहा दवाखाने होते. परंतु तालुक्याच्या ठिकाणीं मोठे दवाखाने नसल्यामुळें प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणीं पदवीधर डॉक्टर असलेला मोठा दवाखाना उघडण्यांत येत आहे. माजलगांव येथें याप्रमाणें एक दवाखाना उघडण्यांत आला आहे. परंतु केवळ तालुक्यांच्या ठिकाणीं दवाखाने असून भागत नाहीं, तर तालुक्याच्या अगदीं दूरदूरच्या भागांत देखील पशुचिकित्सेच्या सोयी पोचावयास हव्यात. ही गरज लक्षांत घेऊन तालुक्याच्या प्रत्येक दिशेस एक एक याप्रमाणें चार ग्राम पशुचिकित्सालयें निवडक अशा मोठ्या खेड्यांत १९५८-५९-६० सालीं उघडण्यांत आलीं.


बीड तालुका	...	पिंपळनेर, वडवणी	माजलगांव तालुका	...	शिरसाळा, तालखेड
अष्टी	...	देवळाली	केज तालुका	...	नांदुरघाट
अंबाजोगाई	...	रणापूर	पाटोदा	...	शिरूर

या पशुचिकित्सालयांत स्टॉकमन आले असून आतांपर्यंत या दवाखान्यांतून २,२६,०७७ जनावरांवर औषधोपचार करण्यांत आले, ४,४४५ बैल खच्ची कारण्यात आले व ९,५९७ जनावरांना रोगप्रतिबंधक लस टोचण्यांत आली. सध्या बीड जिल्ह्यांत चार मोठे दवाखाने व १४ ग्राम पशुचिकित्सालयें आहेत. या कामासाठीं जवळ जवळ ४९,५०० रुपये खर्च करण्यांत आले.

पशुसुधार केन्द्र

मध्यवर्ती सरकार व प्रादेशिक सरकार यांच्या सहाय्यानें बीड जिल्ह्यांतील अंबाजोगाई या तालुक्याच्या ठिकाणीं पशुसुधार केन्द्राची योजना १९५८-५९ सालीं लागू करण्यांत आली. या केंद्रामध्ये उत्तम जातीच्या जनावरांची पैदास होते व त्यांचें संवर्धन योग्य रीतीनें करण्याबद्दल मार्गदर्शन दिलें जातें. या कार्यासाठीं बत्तीस हजार रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. येथें ठेवण्यांत आलेल्या देवणी जातीच्या वळूचा फायदा या केन्द्राच्या विभागांतील खेड्यांना उत्तम जनावरांची निपज करण्यासाठीं दिला जातो. या केंद्रांत

पशुसंवर्धन



जनावरांचे दवाखानें
कुक्कुट पालन विभाग
कुक्कुट पालन केंद्र
मेंढी विकास केंद्र
पशु सुधार केंद्र
डमापूर
गेवराई
शिरूर
बीड
राजूरी
पिंपळनेर
वडवणी
मदनादपूर
साकूद
परळी
गिरवली
घाटनांदूर
अंबाजोगाई
केज
नांदूर घाट
सायगांव
रेनापूर
पिंपळवली
देवळाली
अष्टी
पाटोदा

एक रेडा व एक वळू आहे. चौदा मैलांच्या परिसरांत सहा उपकेंद्रें उघडण्यांत आलीं आहेत. कृत्रिम गर्भ-धारणेचीं व्यवस्थाहि या ठिकाणीं आहे. आतांपर्यंत १२१३ बैलांना खच्चीं करण्यांत आलें असून १९०७ गाईंच्या बाबतींत कृत्रिम गर्भधारणा करण्यांत आली आहे. या केंद्रामार्फत शेतकऱ्यांना वळू पाळण्यासाठीं आर्थिक मदत दिलीं जाते. तसेंच सजल पिटमधून प्रदीर्घ काळापर्यंत ताजा चारा ठेवण्यासाठीं आर्थिक मदत दिलीं जाते.

कृत्रिम गर्भ-धारणा

बीड तालुक्यांतील नेकनूर या गांवीं १९५८–५९ सालीं एक जनावरांच्या दवाखान्यासहित कृत्रिम गर्भधारणा केंद्र उघडण्यांत आलें. या ठिकाणीं पदवीधर पशुवैद्यक आहे. एका वेळच्या वीर्य संकलनांत पंचवीस गायींवर कृत्रिम गर्भधारणा करतां येते.

कुक्कुट पालन केन्द्र

उत्तम जातींच्या व जास्त अंडीं देणाऱ्या कोंबड्यांचीं शास्त्रीय दृष्टया निपज व्हावी या उद्देशानें अंबाजोगाई या तालुक्याच्या ठिकाणीं १९५८–५९ सालीं १५,३३५ रुपये अर्थसंकल्प असलेलें एक केंद्र उघडण्यांत आलें. बीड या जिल्ह्याच्या ठिकाणीं पोल्ट्री युनिट उघडण्यांत आलें आहे. प्रात्यक्षिक केन्द्रावर शंभर व युनिटमध्यें पांचशें कोंबड्या आहेत. या केंद्रांतून उत्तम जातींचीं अंडीं व कोंबड्यांचीं पिलें मिळतात.

मेष पालन केन्द्र

मेंढ्यांचीं शास्त्रीय दृष्टया निवड होऊन सध्या होत असलेल्या लोंकर उत्पादनांत वाढ व्हावी म्हणून अंबाजोगाई या तालुक्याच्या ठिकाणीं १९५९-६० सालीं ३०००० रुपयांचा अर्थ संकल्पअसलेले मेंढ्या संगोपन केंद्र उघडण्यांत आलें. दख्खन जातींच्याशंभर उत्तम मेंढ्या येथें असून त्यामुळें लोंकर उत्पादन पांच पटीनें वाढण्याचीं शक्यता आहे.

इमारती–या विभागाच्या अनेक इमारती बांधकाम विभागातर्फे लवकरच बांधण्यांत येत आहेत. त्या पुढील प्रमाणें.

बीडयेथें कुक्कुट पालन केन्द्र, मेष पालन केंद्र व पशु चिकित्सालयासाठीं १,८५००० रु. मंजूर करण्यांत आले आहेत. दवाखाने–माजलगांव, गेवराई, कडा. यासाठीं ९८००० रुपयाचीं मंजूरीं मिळालीं आहे.

देवरोग निर्मूलन योजना

केंद्र सरकार व प्रादेशिक सरकार यांच्या सहाय्यानें पाटोदा, अष्टी व अंबाजोगाई तालुक्यांत रोगप्रतिबंधक लस टोचण्याचें काम पूर्ण झालें असून केज, गेवराई व बीड येथील काम जवळ जवळ अर्धे संपलें आहे. आतांपर्यंत जवळ जवळ २७०००० जनावरांना लस टोचण्यांत आलीं.

जनावरांना औषधोपचार

आतांपर्यंत १००९४०६ जनावरांना औषधोपचार करण्यांत आला. १५९७०२ जनावरांना प्रतिबंधक लस टोचण्यांत आलीं. ५५१८२३ बैलांना खच्चीं करण्यांत आलें. कृत्रिम गर्भधारणा केन्द्रांतून १२१३ बैलांना खच्चीं करण्यांत आलें व २२२३ गायींना व म्हशींना वळूपासून गर्भधारणा करण्यांत आली.

प्रमुख यात्रेच्या ठिकाणीं व जनावरांचे मोठे बाजार भरतात अशा ठिकाणीं उत्तम जातीच्या

जनावरांचें प्रदर्शन

जनावरांच्या उत्तेजनार्थ आतांपर्यंत २५७०० रुपयांचीं बक्षिसें वाटण्यांत आलीं. प्रदर्शनाच्या वेळीं जनावरांच्या रोगासंबंधीं लोकांना माहिती देण्यांत आली.

सहकारी संस्था

कर्जपुरवठ्याच्या व शेतमाल विक्रीच्या सोयींत सुधारणा करणें, शेतीसुधारणा आणि जलसिंचन संस्था स्थापणें, सावकारीचें नियंत्रण करणें व शेतकऱ्यांचीं कर्जें कमी करणें तसेंच शेतकऱ्यांतील सहकारी प्रयत्नांना प्रेरणा देणें व मार्गदर्शन करणें हा सहकारी कार्यक्रमाचा प्रमुख हेतु होय. संतांची कर्मभूमि म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मराठवाड्यांतील बीड जिल्ह्यांत एकता, प्रेम व सहकार हे गुण वंशपरंपरेनें चालत आलेले आहेत. एकाकरितां सर्व व सर्वांकरितां एक या सहकारी भूमिकेला कमालीचें प्रोत्साहन लाभेल अशीच पार्श्वभूमि व सद्यःपरिस्थिति असल्यामुळें या जिल्ह्यांतील सहकारी चळवळ अग्रेसर आहे हें निःसंशय. योग्य मार्गदर्शन, भरपूर माहिती व कार्य प्रेरणा दिल्यास लोक सहकारी कार्यांत योग्य ती साथ देतात याचें प्रत्यंतर म्हणजे बीड जिल्ह्यांतील शेकडा चौऱ्यांशी टक्के खेडीं सहकारी चळवळीच्या क्षेत्रांत आलीं आहेत हे होय. पुढील अहवाल हा त्याचा सबळ पुरावा म्हणून सादर करतां येईल.

शेतकी पत-पुरवठ्याची वाढ

सन १९५७–५८ सालीं मध्यवर्ती सहकारी बँकेच्या भाग भांडवलांतील हिस्सा म्हणून सरकारनें एक लक्ष रुपये गुंतविले. त्याचप्रमाणें पांच विविध कार्यकारी सोसायट्यांना प्रत्येकीं रुपये सहाशें प्रमाणें सेक्रेटरीच्या खर्चाकरितां मदत देण्यांत आली. सन् १९५८–५९ मध्यें सरकारनें पुन्हां एक लक्ष रुपये मध्यवर्ति सहकारी बँकेच्या भाग भांडवलांत गुंतविले. त्याचप्रमाणें सरकारने पुन्हा ५५०० रुपये अकरा विविध कार्य संस्थांच्या भाग भांडवलामध्यें गुंतविले आहेत. विविध कार्यकारी सोसायट्यांना सरकारने प्रत्येकी सहाशें रुपये मदत म्हणून दिले आहेत. या संस्थांचे १५०० सभासद करावयाचे होते. परंतु १९५८–५९ सालीं आणखी ९९४६ नवीन सभासद वाढविण्यांत आले. सहकारी संस्थांचे सभासद वाढविण्यामध्यें बीड जिल्हा मराठवाड्यामध्यें या वर्षी पहिला आला.

मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शाखा

मध्यवर्ती सहकारी बँकेच्या दोन शाखा उघडण्याचें ठरलें होतें. परंतु गेवराई, पाटोदा, मालगांव या तीन ठिकाणीं शाखा उघडण्यांत आल्या. पांच नवीन सहकारी विविध कार्यकारी संस्था स्थापन करण्याचें ठरलें होतें. परंतु सत्तावीस नवीन विविध कार्यकारी संस्था स्थापन करण्यांत आल्या. त्याचप्रमाणें चार नवीन लघु विविध कार्यकारी सहकारी संस्थांच्या स्थापना करण्यांत आल्या. मध्यवर्ती सहकारी बँकेने रु. अठ्यात्तर हजाराचें अल्प मुदतीचें कर्ज या संस्थांच्या सभासदांना वाटलें आहे.

आतांपर्यंत एकूण तीन लक्ष रुपये सरकारनें बँकेच्या भाग भांडवलामध्यें गुंतविले आहेत. विविध कार्यकारी सहकारी सोसायट्यांना सहाशें रु. मदत देण्यांत आली. त्याचप्रमाणें त्र्याण्णव सेवा सहकारी सोसायट्यांना प्रत्येकीं रुपये पांचशेंप्रमाणें सेक्रेटरीच्या खर्चाकरितां मदत देण्यांत आली. मध्यवर्ती

सहकारी बँकेच्या तीन शाखांना पंधरा हजार आठशें तीस रुपयांची सरकारतर्फे मदत देण्यांत आली. त्या शाखा खालीलप्रमाणें :—गेवराई, पाटोदा व माजलगांव.

दोनशें पन्नास खेडीं सहकारी सोसायटचांच्या कार्यक्षेत्राखालीं आणण्याचें लक्ष्य ठेवण्यांत आलें होतें. परंतु सन १९५९–६० सालीं दीडशें नवीन खेडीं सहकारी सोसायटचांच्या कार्यक्षेत्रांत आणण्यांत आलीं. साठ बहुविधकार्यकारी सहकारी संस्था स्थापन करण्याचें लक्ष्य निश्चित केलें होतें. परंतु अठ्यात्तर नवीन बहुविध कार्यकारी सहकारी संस्था स्थापन करण्यांत आल्या. मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अष्टी व धारूर या ठिकाणीं आणखी दोन शाखा उघडण्यांत आल्या. शेतीतारण बँकेची शाखा बीड मालगांव या ठिकाणीं उघडण्यांत आली. दोनशें त्र्याण्णव शेतकी पतपेढ्यांचे सेवा सहकारी सोसायटचांमध्यें रूपांतर करण्यांत आलें आणि बारा हजार दोनशें एक्याऐंशीं नवीन सभासद वाढविण्यांत आले.

शेतमालाच्या बिक्रींत वाढ

बीड जिल्ह्यांत बीड, माजलगांव, अंबाजोगाई व गेवराई येथें सहकारी मार्केटिंग सोसायटचा काम करीत आहेत. त्याचप्रमाणें बीड तालुका सहकारी मार्केटिंग सोसायटीचें रूपांतर बीड जिल्हा सहकारी मार्केटिंग सोसायटीमध्यें करण्यांत आलें आहे. सन १९५८–५९ सालीं सरकारनें बीड को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग सोसायटीचे व अंबाजोगाई सहकारी सोसायटीचे प्रत्येकी बावीस हजार रुपयांचे शेअर्स खरेदी केले आहेत. त्याच सालीं एक हजार रुपयांची मदत बीड सहकारी मार्केटिंग सोसायटीस देण्यांत आली. त्याचप्रमाणें लहान आकाराचे गोदाम बांधण्यांस चार विविध कार्यकारी सोसायटचांना प्रत्येकी दहा हजार रु. देण्यांत आले. बीड सहकारी मार्केटिंग सोसायटीस मोठ्या आकाराचें गुदाम बांधण्यास २० हजार रुपयांचा पहिला हप्ता दिला आहे. सन १९५९–६० मध्यें सरकारनें माजलगांव सहकारी मार्केटिंग सोसायटीचे ८८३० रुपयांचे शेअर्स खरेदी केले आहेत. गुदामें बांधण्यास सहकारी संस्थास सरकारनें कर्ज व मदत दिली आहे. त्याची आंकडेवारी ——–

सोसायटीचें नांव	गुदामाचा आकार	रुपये	शेरा
अंबाजोगाई सहकारी मार्केटिंग सोसायटी …	मोठा	२०,०००	पहिला हप्ता
मालगांव सहकारी मार्केटिंग सोसायटी …	मध्यम	१०,०००	पहिला हप्ता
राजूरी नवगण सेवा सहकारी सोसायटी, बीड …	लहान	१०,०००	पूर्ण रक्कम
ताडसोना विविध कार्यकारी संस्था, तालुका बीड …	लहान	५,०००	पहिला हप्ता
नेकनूर विविध सहकारी संस्था, …	लहान	५,०००	पहिला हप्ता
नालवडी विविध कार्यकारी संस्था, …	लहान	५,०००	पहिला हप्ता

रंजणी विविध कार्यकारी संस्था, तालुका गेवारई	...	लहान	५,०००	पहिला हप्ता
अष्टी विविध कार्यकारी संस्था, तालुका अष्टी	...	लहान	५,०००	पहिला हप्ता
कडा विविध कार्यकारी संस्था,	...	लहान	५,०००	पहिला हप्ता
कुंभेफळ विविध कार्यकारी संस्था, तालुका अंबाजोगाई	...	लहान	५,०००	पहिला हप्ता
परळी विविध कार्यकारी संस्था, तालुका अंबाजोगाई	...	लहान	५,०००	पहिला हप्ता
जवळगांव विविध कार्यकारी संस्था,	...	लहान	५,०००	पहिला हप्ता
मुरुकुडवाडी विविध कार्यकारी संस्था,	...	लहान	५,०००	पहिला हप्ता
पिंपळवडी विविध कार्यकारी संस्था,	...	लहान	५,०००	पहिला हप्ता
जाटनांदूर विविध कार्यकारी संस्था,	...	लहान	५,०००	पहिला हप्ता

शेतमालाचे नियंत्रित बाजार–सध्या बीड जिल्ह्यांत सहा ठिकाणीं नियंत्रित बाजार अस्तित्वांत आहेत. ते पुढीलप्रमाणें–बीड, अंबाजोगाई, माजलगांव, परळी, गेवराई व धारूर.

सन १९५९–६० सालीं केज तालुक्यांतील कोळेगांव व वरपगागांव येथें सामुदायिक शेतीच्या संस्था सुरू करण्यांत आल्या आहेत. बीड तालुक्यांत पेडगांव येथें सामुदायिक शेतीचे कागदपत्र वरिष्ठ अधिकाऱ्याकडे नोंदणीकरितां पाठविण्यांत आले आहेत. त्याचप्रमाणें सरकारनें प्रत्येकीं रु. ४,००० काळेगांव व वरपगागांव संस्थांच्या भागभांडवलांत गुंतविले आहेत व त्यांना मदत म्हणून प्रत्येकी रुपये १२०० दिले आहेत.

मागासलेल्या वर्गासाठीं सहकारी घरबांधणी संस्था

सध्या बीड जिल्ह्यांत दहा सहकारी घर बांधणी संस्था कार्य करीत आहेत. त्यापैकीं सहा सहकारी संस्था मागासलेल्या वर्गाकरितां आहेत. त्यांतील कांहीं सोसायटयांना विकास गटाकडून घरबांधणीसाठीं कर्ज देण्यांत आलें आहे. मध्यम वर्गासाठीं घरें बांधणाऱ्या अंबाजोगाई येथील संस्थेस सरकारकडून आतांपर्यंत ४६९५७ रुपयांचें कर्ज देण्यांत आलें आहे. या संस्थेनें ११ घरांचें बांधकाम पूर्ण केलें आहे. मागासलेल्या वर्गासाठीं ज्या संस्था आहेत त्यांनीं आतांपर्यंत ९५ घरें बांधली आहेत.

सहकारी शिक्षण व प्रसार

सन १९५९–६० सालीं बीड जिल्ह्याकरितां दोन को-ऑपरेटिव्ह इन्स्पेक्टरांची नेमणूक करण्यांत आली त्याचप्रमाणें १८२०४ सोसायटयांच्या मॅनेजिंग कमेटीच्या सभासदांना व सामान्य सभासदांना सहकारी सोसायटयांच्या कार्याची महिती देण्यांत आली. आतांपर्यंत एकशेंएक सेक्रेटरीना प्रशिक्षित करण्यांत आलें आहे. आतांपर्यंत शेकडा ८५ खेडीं व ४८.२ टक्के लोकसंख्या सहकारी क्षेत्रांत आणण्यांत आली आहे.

सहकारी चळवळींच्या प्रगतीचा गेल्या तीन वर्षांचा तुलनात्मक तक्ता :

विशेष माहिती			१९५६–५७	१९५७–५८	१९५८–५९
सोसायटयांची संख्या	...	...	९७१	१,०२७	१,१९१
सदस्यांची संख्या	...	...	५३,७४२	५९,०४३	७५,३२३
कर्ज येणें :			रु.	रु.	रु.
(अ) व्यक्तिशः	...	...	१६,२३,२६०	२०,५३,६११	३८,७७,१४८
(ब) बँक व सोसायटचा		...	६,४८,१२३	१०,०६,३४८	२३,५७,३०९
शेअर्स भांडवल	...	...	९,९०,३४१	१२,२६,४४५	१८,६२,५०९
डिपॉझिट	...	...	५,३८,२२६	६,४६,८१६	१४,३५,५७६
इतर कर्ज	...	...	१२,२६,०७५	२०,६७,५६७	४९,८३,९२३
रिझर्व आणि इतर फंड	...	...	१७,९२,९३५	१८,१३,३४६	१६,७६,२६०
खेळतें भांडवल	...	...	४५,४७,५७७	५७,५६,१५६	९९,५८,२६८

शैक्षणिक सोयी

देशाच्या अगदीं दूरदूरच्या भागांत देखील सामाजिक सुखसोयी उपलब्ध करून समाजजीवन विकसित व प्रगत करणें हें लोकशाही सरकारचें महत्त्वाचें कार्य असतें. सर्व सामाजिक सुखसोयींत अग्रहक्क आहे शिक्षणाचा. राज्यपुनर्रचनेच्या वेळीं बीड जिल्ह्यांत साक्षरतेचें प्रमाण अत्यल्प होतें आणि शिक्षणाच्या सोयी देखील फारशा उपलब्ध नव्हत्या. जिल्ह्यांतील शिक्षण प्रसाराबद्दलची निकड लक्षांत घेऊन शैक्षणिक कार्यावर गेल्या चार वर्षांत फार जोर देण्यांत आला. फलस्वरूप या घटकेला जिल्ह्यांत एक हजार प्राथमिक शाळा स्थापन झाल्या आहेत. जिल्ह्यांतील खेड्यांची संख्या १०४७ आहे. ही संख्या लक्षांत घेतां गेल्या चार वर्षांतील कार्याचा व्याप ध्यानीं येईल.

पूर्व प्राथमिक शिक्षण

बीड जिल्ह्यांत पूर्व प्राथमिक शिक्षणाची पद्धत सन १९५६ पूर्वी नव्हती. परंतु १९५६ सालीं अशाप्रकारचीं दोन बालक मंदिरें बीड व परळी येथें सुरू करण्यांत आलीं. त्यांची देखरेख खाजगी संस्थांमार्फत होत आहे. वरील दोन्ही शाळेंतील मुलांचें संख्याबळ जवळ जवळ शंभर आहे.

सदर शाळेस सरकारमार्फत खालील प्रमाणें वार्षिक अनुदान देण्यांत आलें.

१९५७	...	रुपये	२,०००	अनुदान
१९५८-५९	...	,,	२,०००	अनुदान
१९५९-६०	...	,,	२,५००	अनुदान

व्हॉलेंटरी शाळा

१९५९-६० च्या मंजूर रकमेपैकीं आतांपर्यंत एक हजार रुपये खर्च करण्यांत आले आहेत. बीड जिल्ह्यांत १९५६ सालच्या सुरुवातीस १४१ व्हॉलेंटरी शाळा अस्तित्वांत होत्या. गेल्या चार वर्षांत त्यापैकीं ११२ शाळांचें एक शिक्षकी शाळेंत रूपांतर करण्यांत आलें. त्यांची माहिती पुढीलप्रमाणें देतां येईल—

वर्ष	रूपांतर झालेल्या शाळांची संख्या	खर्च
		रु. न.पैसे
१९५६-५७ ...	१४	७,८३६
१९५७-५८ ...	९	२७१.०४

१९५८-५९ ...	७०	७०,७०१
१९५९-६० ...	३८	८४,०५५
एकूण ...	११२	१,८९,७९०

खर्चाचे वरील आंकडे दरवर्षी रूपांतरित होणाऱ्या व मागील वर्षांत रूपांतरित झालेल्या शाळांवर होणाऱ्या खर्चाचे आहेत.

गेल्या चार वर्षांत बीड जिल्ह्यांत ज्या नवीन एक शिक्षक असलेल्या शाळा उघडण्यांत आल्या आहेत त्यांच्यावर होत असलेला खर्च पुढील प्रमाणें आहे–

वर्ष		शाळांची संख्या	शाळांवरील खर्च
			रुपये
१९५६-५७	...	१४	७,१०१
१९५७-५८	...	...	१३,२३०
१९५८-५९	...	१६	१३,७७०
१९५९-६०	...	११०	१८,१४०
एकूण	...	१४०	५२,०४१

या शिवाय बीड जिल्ह्यांतील पंधरा शाळांत १९५७ सालीं आणि १९५८-५९ सालीं आणखी चार शाळांकरितां जास्तीचे शिक्षक नेमण्यांत आले.

शाळांना फर्निचर

या काळांत प्राथमिक शाळा व ज्या शाळांतून जादा शिक्षकांची नेमणूक झाली त्या प्रत्येक शाळेस फर्निचर खरेदीकरितां शंभर रुपयेप्रमाणें रक्कम मंजूर करण्यांत आली व संबंधित शाळांना पुरविण्यांत आलें. या कामावर आतांपर्यंत करून खरेदी फर्निचर ३६४०० रुपये खर्च झाले असून कांहीं शाळांना फर्निचर पुरविण्याचें काम चालू आहे.

बेसिक शाळा

पंचवार्षिक योजनेंत बीड जिल्ह्यांत २६ बेसिक शाळा कायम केल्या गेल्या होत्या. त्यापैकीं २४ शाळा ज्युनिअर बेसिक आणि दोन शाळा सिनियर बेसिक होत्या.

१९५८-५९ सालीं सोळा शाळांचें बेसिक शाळांत रूपांतर करण्यांत आलें. प्रत्येक सिनियर शाळेस प्रत्येक तीन वर्षास रु. ४०० व जुनियर शाळेस रु. २०० अशा रीतीनें या शाळांवर खर्च होत आहे.

सामानाची खरेदी

१९५९-६० सालीं बेसिक शाळांसाठीं लागणारें साहित्य खरेदी करण्यासाठीं १६ हजार रुपये मंजूर केले होते. याकाळांत बीड जिल्ह्यांत शिक्षण विभागातर्फे खालीलप्रमाणें सालवारी खोल्या मंजूर झाल्या होत्या. त्यांचें बांधकाम पी. डब्ल्यु. डी. विभागामार्फत चालू होतें.

वर्ष		शाळांची संख्या	शाळांवरील खर्च
			रु. न.पैसे
१९५६-५७	...	१४	२६,७८५.१२
१९५७-५८	...	१०	१४,४८३.०४
१९५९-६०	...	६	......
एकूण	...	३०	३८,२६८.१६

बीड जिल्हा शिक्षण विभागांमार्फत खालील प्रमाणें सालवारी बेसिक शेडची बांधकामें मंजूर झालीं तीं बांधकामें पी. डब्ल्यू. डी. विभागांमार्फत चालू होतीं.

वर्ष		शाळांची संख्या	शाळांवरील खर्च
			रु. न.पैसे
१९५६-५७	...	...	......
१९५७-५८	...	...	......
१९५८-५९	...	१	४,४५३.००
१९५९-६०	...	१	......

मुलांना बेसिक शिक्षण देण्यासाठीं अशा शाळांतून काम करीत असलेल्या शिक्षकांना बेसिक शिक्षण घेण्यासाठीं पाठविण्यांत येते.


जिल्ह्यांत सातवीपर्यंत ज्या शाळा आहेत त्यांत गेल्या चार वर्षांच्या काळांत ४१ जादा शिक्षक नेमण्यात आले आहेत. त्याचप्रमाणें या शाळांतून फर्निचर व इतर शालेय साहित्य पुरविण्यासाठीं २६६०० रुपये आतांपर्यंत खर्च झाले. तसेच या शाळांचा व्याप वाढल्यानें ह्यांच्यासाठीं जास्तीच्या खोल्या पण बांधण्याचें काम चालूं आहे.

हस्तव्यवसाय

१९५७-५८ सालीं बीड जिल्ह्यांत तीन माध्यमिक शाळांत वरील हस्तव्यवसायाच्या शिक्षणाची सोय करण्यांत आली. १९५९-६० सालीं आणखी सात शाळांत या शिक्षणाची सोय करण्यांत आली आहे. त्याकरितां प्रत्येक शाळेंत आवश्यक तें जास्तीचें साहित्य पुरविण्यांत येतें.

बीड जिल्ह्यांत शिक्षण विभागामार्फत आठपासून दहापर्यंत वर्ग असलेल्या शाळांकरितां त्या शाळांच्या गरजांनुसार जादा शिक्षक नेमण्यांत आले व त्यासाठीं २२५०८ रुपये खर्च करण्यांत आला. तसेच या शाळांना फर्निचर व जरूर तें साहित्य पुरविण्याचें काम चालूं आहे. या शाळांसाठीं इमारती बांधण्याचें कामहि चालूं आहे.

शैक्षणिक सोयी



सरकारी मुलींची शाळा
सरकारी मुलांची शाळा
प्राशिक्षण महाविद्यालय
वसति गृह
मल्टी परपज हायस्कूल
वाचनालयें
मूलोद्योग शिक्षण केंद्र
खासगी विद्यालय
महाविद्यालय
गेवराई
माजलगांव
गोवर्धन
बीड
धारूर
पिंपळवाडी
कडा
अमळनेर
अष्टी
पाटोदा
नेकनूर
हिंगणीघाट
केज
अम्बाजोगाई
गिरवली
परळी
घाटनांदूर
बर्दापूर
रेनापूर

जिल्ह्यांतील चार माध्यमिक शाळांना शालोपयोगी वाचनालयासाठीं पुस्तकें घेण्याकरितां प्रत्येकीं २५००० रुपये देण्यांत आले आहेत. शिवाय प्राथमिक शाळांना अनुदानें देऊन त्यांत पांचवींपासून दहावींपर्यंत वर्ग चालू करण्याचे प्रयत्न चालू आहेत.

हिंदी शिक्षणाचा प्रसार करण्याच्या दृष्टीनें जिल्ह्यांतील नऊ माध्यमिक शाळांकडे प्रशिक्षित हिंदी शिक्षकांची नेमणूक करण्यांत आली. ज्या जागांवर हिंदी ट्रेन्ड शिक्षक आहेत त्यांचा खर्च विभागामार्फतच होतो.

विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या द्वितीय पंचवार्षिक योजनेंत बीड जिल्ह्यांतील होतकरू विद्यार्थ्यांना खालील प्रमाणें रियायती शिष्यवृत्त्या देण्यांत आल्या.

वर्ष	शिष्यवृत्त्या
	रु. न.पैसे
१९५६-५७	४,४००.००
१९५७-५८	४४००.००
१९५८-५९	१४४.००
१९५९-६०	१४५.००
एकूण	३७,७००.००

सार्वजनिक आरोग्य

शिक्षणाच्या खालोखाल दुसरी महत्त्वाची सार्वजनिक बाब म्हणजे सार्वजनिक आरोग्य आणि सोई हीं होय. हें काम प्रभावीपणें करतां यावें म्हणून या कामाची पुनर्रचना करण्यांत आली. उपचारांच्या

जुन्या हैद्राबाद राज्यांत आरोग्य आणि स्वास्थ्य एकत्र होतें. १ नोव्हेंबर १९५८ पासून हे दोन भाग वेगळे करण्यांत आले. जिल्हा आरोग्य अधिकारी हे संपूर्ण जिल्ह्यांतील आरोग्य विषयक कामावर देखरेख ठेवतात.

देवी, कॉलरा प्रतिबंधक मोहीम

डिसेंबर १९५८ ते एप्रिल १९५९ पर्यंत व नोव्हेंबर १९५९ पासून जानेवारी १९६० पर्यंत देवी काढण्याची मोहीम मोठ्या प्रमाणावर घेण्यांत आली. एकूण ८२६०० लोकसंख्येपैकीं ५५५४४१ लोकांना देवी काढण्यांत आल्या. दरवर्षी जवळ जवळ दीड लाख लोकांना देवी काढण्यांत येतात. जिल्ह्यांतील नदीकाठावरील २२५ गांवांतील चाळीस हजार लोकांना कॉलराप्रतिबंधक लस टोंचण्यांत आली. दरवर्षी जवळ जवळ पंचाहत्तर हजार लोकांना कॉलरा प्रतिबंधक लस टोंचण्यांत येते.

औषधपुरवठा

जिल्ह्यांतील निरनिराळ्या गांवीं शंभर ग्रामीण औषधींपेट्या देण्यांत आल्या आहेत. प्रत्येक तीन महिन्याला या पेट्यांना नियमीतपणें औषधांचा पुरवठा करण्यांत येतो. या योजनेचा फायदा दरवर्षी चाळीस हजार रोग्यांना मिळतो. याशिवाय दरवर्षी ३६०० विहिरींत जंतुनाशक औषध टाकण्यांत येतें. जिल्ह्यांत अकरा ग्रामीण दाया आहेत. त्यांच्या मार्फत औषधांचा पुरवठा केला जातो. त्या दरवर्षी ग्रामीण भागांतील जवळ जवळ बाराशें बाळंतपणें करतात.

यात्रेची व्यवस्था

परळी वैजनाथ, तलवाडा व नारायणगड येथें मोठ्या प्रमाणावर यात्रा भरत असते. यात्रेच्या ठिकाणचें आरोग्य व स्वच्छता चांगली ठेवण्यासाठीं विशेष प्रयत्न केले जातात. तसेच या निमित्त एकत्र येणाऱ्या रोग्यांना आरोग्यविषयक शिक्षण, चित्रपट व इतर करमणुकीच्या माध्यमांतून दिलें जातें.

स्वास्थ्य व आरोग्य विभाग

पाटोदा विभागाचें काम ऑक्टोबर १९५६ पासून पाटोदा येथें चालू आहे. या विभागांत ३० खेडीं असून लोकसंख्या २८३०० आहे. दरवर्षी जवळ जवळ चार हजार रोग्यांना औषधोपचार करण्यांत येतो व ग्रामीण दायांतर्फे पांचशेंचे वर बाळंतपणें करण्यांत येतात.

आरोग्यसंपन्न राष्ट्र उभारण्यासाठीं आरोग्याचा प्रश्न सुरुवातीपासून हाताळला पाहिजे. यास्तव शालेय आरोग्य विभाग सुरू करण्यांत आला आहे. या योजनेमुळें मुलांतील व्यंग लवकर शोधून त्यावर त्वरित उपाय योजना करतां येते. संसर्गजन्य रोगांच्या प्रसारास यामुळें आळा बसतो. सहाव्या वर्षी मुलांची शारीरिक तपासणी होते. ज्या विद्यार्थ्यांना उपचाराची आवश्यकता आहे अशांना प्रमुख चिकित्सालयांत पाठविण्यांत येते. या योजनेचें मुख्य कार्यालय बीड येथें आहे.

शालेय आरोग्य विभाग

वाढत्या लोकसंख्येस आळा घालणें ही एक महत्त्वाची समस्या आहे. लोकसंख्या आणि उत्पादन यांत तफावत असल्यानें त्यांची सांगड घालण्यासाठीं कुटुंब नियोजन हा एकमेव प्रभावी उपाय आहे. कुटुंब नियोजनाचा प्रसार, उपचार व शिक्षण देण्यासाठीं पाटोदा व रेणापूर या गांवीं कुटुंब नियोजन केन्द्रें उघडण्यांत आलीं आहेत. जे लोक कुटुंब नियोजन करण्यास उत्सुक आहेत, अशांना विनामूल्य साधनें पुरविलीं जातात व योग्य तो सल्ला देण्यांत येतो. साधनें नियमितपणें वापरण्यांत येतात किंवा नाहीं याची चौकशी करण्यांत येते. कुटुंब नियोजन सप्ताह दरवर्षी पाळण्यांत येतो रेणापूर, येळंब, पाटोदा व बीड येथें कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया शिबिरें घेण्यांत आलीं व शस्त्रक्रिया करण्यांत आल्या.

कुटुंब नियोजन

आपल्या देशांत जवळ जवळ दोन दशलक्ष कुष्ठरोगी आहेत. कुष्ठरोग हा केवळ वैद्यकीय नव्हे तर सामाजिक प्रश्न झाला आहे.म्हणून हा प्रश्न शास्त्रशुद्ध पद्धतीनें हाताळण्यासाठीं गेवराई येथें कुष्ठरोग निवारण केंद्र आणि अष्टी व केज या तालुक्यांच्या ठिकाणीं कुष्ठरोग पाहाणी, शिक्षण व औषधोपचार केन्द्रें उघण्यांत आलीं आहेत. तसेच अंबाजोगाई या तालुक्याच्या ठिकाणीं सुद्धां कुष्ठरोग नियंत्रण केन्द्रें आहेत. गेवराई येथें २६ जानेवारी १९५८ पासून कार्य सुरू असून दरवर्षी या केन्द्रांतून ३६८० रोग्यांवर औषधोपचार केला जातो. येथें रोग्यांना ठेवण्याची व्यवस्था आहे.

कुष्ठ रोग नियंत्रण

अशा प्रकारचीं दोन केन्द्रें १ सप्टेंबर १९५९ पासून केज व अष्टी येथें कार्य करीत आहेत. या केन्द्रांत पाहणी कार्य चालूं असून रोग्यांवर औषधोपचार केला जातो.

कुष्ठरोग पाहणी शिक्षण केन्द्र


हें केन्द्र १ सप्टेंबर १९५९ पासून कार्य करीत आहे. या केन्द्रातर्फे रोगविषयक पाहणी चालूं असून रोग्यांना औषधोपचार केला जातो. शनिवारी व मंगळवारी रोग्यांना क्लिनिकच्या सोयी उपलब्ध करून देण्यांत येतात. आधुनिक उपकरणांनीं सुसज्जा अशी प्रयोग शाळा रोगजंतुविषयक पाहणीसाठीं या केन्द्राला जोडण्यांत आली आहे.

कुष्ठरोग निवारण केन्द्र, अंबाजोगाई

रोग्याला रुग्णालयांत ठेवून औषधोपचार करण्यापेक्षां त्याला त्याच्या घरीं जाऊन औषधोपचार केल्यास आजारी माणसास बरें वाटतें या नवीन विचार प्रणालीनुसार व रोगनिवारक आणि रोगप्रतिबंधक उपाययोजना सामान्य जनतेला सहजासहजी उपलब्ध व्हावी म्हणून प्राथमिक आरोग्य केन्द्रें ग्रामीण भागांत येळंब व रेणापूर या दोन गांवीं उघडण्यांत आलीं आहेत.

प्राथमिक आरोग्य

आरोग्यसंवर्धन



× युनानी दवाखाना
⊠ सिव्हिल हॉस्पिटल
TB क्षय निवारण केंद्र
△ हेल्थ क्लिनिक
शालेय आरोग्य केंद्र
प्रसूति गृह
प्राथमिक आरोग्य केंद्र
♡ स्वास्थ्य व आरोग्य विभाग
卐 कुटुंब नियोजन केंद्र
मलेरिया निर्मूलन केंद्र
★ कुष्ठरोग उपकेंद्र
= कुष्ठरोग नियंत्रण विभाग

प्राथमिक आरोग्य केन्द्र, यळंब

हें केन्द्र २२ स॰ बर १९५९ पासून कार्य करीत आहे. या केन्द्राचें कार्यक्षेत्र ८२ गांवांत पसरलें असून त्यांच्या कक्षेंत एकूण लोकसंख्या ६० हजार आहे. दर वर्षी नऊ ते दहा हजार रोग्यांवर उपचार करण्यांत येतो. या केन्द्रांत प्रसूति व बालसंगोपनाची सोय असून दरवर्षी सरासरी दोनशें बाळंतपणें करण्यांत येतात. या केन्द्राचीं नेकनूर, इडा व चौसाळा अशीं तीन उपकेन्द्रें आहेत. प्रत्येक उपकेन्द्रावर एका दायीची नेमणूक करण्यांत आली असून तिच्याकडे दूधवांटप योजनेची पण जबाबदारी आहे. या केन्द्रामार्फत देवी काढणें, रोगप्रतिबंधक लस टोचणें, विहिरींत जंतुनाशक औषधें टाकणें व इतर सार्वजनिक बाबींकडे लक्ष पुरविणें आदि कामें केलीं जातात. गतवर्षी ३४५ मुलांना देवी काढण्यांत आल्या.

प्राथमिक आरोग्य केन्द्र रेणापूर

या केन्द्राचें मुख्य ठिकाण अंबाजोगाई तालुक्यांतील रेणापूर या गांवीं आहे. वरदापूर, शिंदगांव, पानगांव या तीन ठिकाणीं उपकेन्द्रें आहेत. याशिवाय येथें कुटुंबनियोजन केन्द्रहि आहे. या वर्षी येथील रोग्यांची संख्या ११०७० असून ३८ बाळंतपणें करण्यांत आलीं व ३६२ गांवीं मातांना प्रसूतिपूर्व सल्ला देण्यांत आला.

अष्टी तालुक्यांतील कडा, पाटोदा तालुक्यांतील रायमोह, बीड तालुक्यांतील ताडसोना, अंबाजोगाई तालुक्यांतील लमाणतांडा या गांवीं प्राथमिक आरोग्य केन्द्र उघडण्याबाबत प्रयत्न चालू आहेत.

दूधवांटप योजना

१९५८ पासून बीड येथील पांच शाळांतून व पाटोदा, यळंब आणि रेणापूर येथील प्रसूति केन्द्रांतून दूध वांटपाचें कार्य चालू आहे. एक हजार विद्यार्थ्यांना व दीडशें मातांना दररोज दूध वाटण्यांत येतें. त्यांचें आरोग्य व वजन यांच्यावर होणाऱ्या परिणामाची नोंद ठेवण्यांत येते. दररोज प्रत्येकीं आठ औंस दूध देण्यांत येतें.

मलेरिया

बीड येथें ऑगस्ट १९५८ पासून मलेरिया निर्मूलन केन्द्र सुरू करण्यांत आलें. या योजनेंतील दोन प्रमुख टप्पे पुढील प्रमाणें होत :–

(१) योजनेचा पहिला टप्पा (१९५८–५९ ते १९६१ अखेर)–रोग फैलण्याची शक्यता असलेल्या भागांतील प्रत्येक घरांत व गोठ्यांत डी. डी. टी. च्या जंतुनाशक फवारले जाईल. यामुळें ॲनाफिलिस डासाचा नाश होऊन रोगप्रसार थांबेल.

(२) दुसरा टप्पा (१९६०–६१ ते १९६४ पर्यंत)–मलेरियाचा प्रत्येक रोगी शोधून काढून त्यावर उपचार केला जाईल व अशा तऱ्हेनें मलेरिया रोग संपूर्ण नष्ट करण्यांत येईल.

कार्याच्या सोयीसाठीं बीड, अंबाजोगाई, पाटोदा व गेवराई हे चार उप-विभाग पाडण्यांत आलेले आहेत.

डी. डी. टी. फवारणें

डीं. डीं. टीं. फवारण्याचें काम मे ते ऑक्टोबर या पांच महिन्यांत दोन वेळां केलें जातें. १९५९ सालीं जिल्ह्यांतील सर्व म्हणजे १०३७ खेड्यांत डीं. डीं. टीं. फवारली गेली. एकूण १,७७,६७० घरांत डी. डी. टीं. जंतुनाशकें दोन वेळां फवारण्यांत आलीं व ३१ ऑक्टोबर १९६० अखेर १,९२,५७० घरांत डीं. डीं. टीं. फवारण्यांत आलीं. यामुळें बीड जिल्ह्यांतील शेकडा ९४.१२ टक्के घरें फवारण्यांत आलीं. यासाठीं १,५१,६९० पौंड डीं. डीं. टीं. खर्च झालीं. तपशीलवार माहिती खालीलप्रमाणें आहे.

क्रमांक	तालुका	ग्रामसंख्या	गृहसंख्या	जंतुनाशकांचा खर्च
१	बीड	१६८	२४,१४२	२१,५९९ पौंड
१	केज	१६४	३२,७५६	२६,५३२ ,,
३	अंबाजोगाई	१६९	३६,८७३	२६,९५१ ,,
४	माजलगांव	१६१	२३,८५४	२०,२९१ ,,
५	गेवराई	१५३	२१,७२५	२१,२४३ ,,
६	पाटोदा	९१	१९,२६३	१४,३०८ ,,
७	अष्टी	१२१	१९,०१२	१४,१२४ ,,

अधिक कर्मचारी

या कार्यासाठीं २७ वरिष्ठ वर्कर्स व १४८ फिल्ड वर्कर्स पांचच महिन्याकरितां नेमले होते. या व्यतिरिक्त डीं. डीं. टीं. फवारण्यामुळें झालेल्या परिणामाचा आढावा घेण्यासाठीं १३६ गांवांची पाहणी करण्यांत आली. या पाहणींत– (१) दोन ते दहा वयाच्या अंदाजे सोळा हजार मुलांची प्लीहा तपासली गेली, (२) दोन ते दहा वयाच्या अंदाजें आठ हजार मुलांचें रक्त तपासलें गेलें, (३) बारा महिन्यापेक्षां कमी वय असलेल्या नऊशें त्रेचाळीस अर्भकांचें रक्त तपासण्यासाठीं घेतलें गेलें, (४) सहाशें पन्नास अल्वक्लोट गोळ्या औषधोपचार म्हणून वाटण्यांत आल्या. १९५७ सालीं मलेरिया रोग्यांची संख्या १७,९६४ होती. तर १९५९ सालीं ती संख्या ८,८६६ झाली. या कार्यासाठीं मंजूर असलेल्या रकमेपैकीं १,४८,९७५ रुपये खर्च करण्यांत आले.

या योजनेंतील दुसऱ्या टप्प्यांतील कार्यानुसार प्रत्येक घरास मलेरिया विभागांतील कर्मचारी वर्गानें भेट देण्यास सुरुवात केली असून मलेरियाच्या रोग्यांची संपूर्ण पाहाणी करण्यांत येत आहे. हें कार्य १ नोव्हेंबर १९६० पासून सुरू करण्यांत आलें आहे. यासाठीं मुद्दाम २० तपासनीस व ८० मलेरिया सहाय्यक नेमले गेले आहेत.

सिव्हिल हॉस्पिटल मध्यें अधिक सुधारणा

बीड येथील सिव्हिल हॉस्पिटलमध्यें एका नर्सची नेमणूक, ऑपरेशन थिएटरमधील कर्मचारी नोकर वर्गास अधिक पगार, क्षय झालेल्या रोग्यांना फुकट गोळ्या, गुप्त रोगासाठीं नवीन उपकरणें, रोगनिदान शास्त्र प्रयोगशाळेसाठीं नोकर वर्गाची वाढ, रेडिओ-लॉजिकल युनिटसाठीं उपकरणांची खरेदी व परळी येथें प्रसूतिगृह उघडणें, केज तालुक्यांतील आसरढोव या गांवीं दवाखान्याची शाखा वाढविणें आदि योजनांसाठीं जवळ जवळ २० हजार रुपये खर्च झाला असून बीड येथें लवकरच सिव्हिल हॉस्पिटलची इमारत बांधण्यास सुरुवात केली जाणार आहे. या योजनेसाठीं आतांपर्यंत ११३००० रुपये खर्च करण्यांत आले.

आयुर्वेदिक दवाखाना

रेणापूर येथें १९५८ सालीं आयुर्वेदिक दवाखाना उघडण्यांत आला असून त्यासाठीं योग्य तो नोकर वर्ग नेमण्यांत आला आहे. या योजनेसाठीं मंजूर झालेल्या ४९६९ रुपयांपैकीं ३९१३ रुपये खर्च करण्यांत आले.

नऊ दायांची नेमणूक

राक्षस भुवन, मानगाव, कड़ा ,घाटनांदुर, शिरूर येथील आयुर्वेदिक दवाखान्यांत व सिरसाळा, अमळनेर चकलांबा येथील युनानी दवाखान्यांत नऊ दायांची नेमणूक करण्यांत आली व यासाठीं मंजूर झालेल्या ८२६२ रुपयांपैकीं ७८०० रुपये खर्च करण्यांत आले.

विहीरी

१९५९-६० अखेर पिण्याच्या पाण्याच्या ३३ विहिरी व अनुदानें देऊन बांधण्यांत येणाऱ्या ३९ विहिरींची योजना हातीं घेण्यांत आली. यापैकीं अनुदानें देऊन बांधण्यांत येणाऱ्या विहिरींपैकीं आठ विहिरींचें बांधकाम पूर्ण झालें. डिसेंबर १९६१ अखेर बहुतेक विहिरीचें काम पूर्ण होईल.

ग्रामीण विकास

सामाजिक परिवर्तन घडवून ग्रामीण जीवनांतील दारिद्रय, रोगराई, अज्ञान यांचें समूळ निर्मूलन करणें आणि सर्वंकष उन्नतीसाठीं प्रत्येक कुटुंबास प्रोत्साहन देणें याकरितां १९५२ मध्यें देशाच्या निवडक भागांत समाज विकास योजना सुरू करण्यांत आली. शेतमालाचें उत्पन्न वाढविणें, शिक्षणाचा प्रसार करणें, आरोग्य व ग्रामीण स्वच्छता, नवीन कुटीरोद्योग सुरू करणें आदि अनेक योजनांचा या कार्यक्रमांत समावेश आहे. ग्रामीण विभागांतील सुप्त शक्तींची विधायक नियोजनाशीं योग्य रीतीनें सांगड घातल्यास सर्वांगीण विकास सहज सुलभ होईल ही या कार्यक्रमामागील प्रेरणा आहे.

विकास गट

आतांपर्यंत बीड जिल्ह्यांतील सातहि तालुक्यांत विकास योजना लागू करण्यांत आलेली आहे. त्यापैकीं, केज व माजलगांव हे पूर्व अवस्था विकास गट असून बीड तालुक्यांतील एक विकास गट दुसऱ्या अवस्थेंत आहे. बाकीचे म्हणजे अष्टी, पाटोदा, बीड (नवा गट), गेवराई, अंबेजोगाई येथील दोन्ही विकास गट प्रथमावस्थेंत आहे. अशा तऱ्हेनें बीड जिल्ह्यांत नऊ विकास गट कार्य करीत आहेत. जिल्ह्यांतील सर्व खेडीं विकास गटाच्या कक्षेंत आलीं आहेत. या कार्यावर जिल्हा प्रकल्प अधिकारी व जिल्हा विकास मंडळ देखरेख ठेवतें. हे अधिकारी सर्व विकास गटांतील पाहणी करून विकास गट अधिकाऱ्यांना योग्य तें मार्गदर्शन करीत असतात.

विकास मंडळ

जिल्ह्यांतील विविध क्षेत्रांतील आणि विभागांतील जनतेचे प्रतिनिधी आणि सरकारी अधिकारी सभासद असलेले जिल्हा पातळीवर एक व तालुका पातळीवर एक अशीं विकास मंडळें काम करीत आहेत. जिल्हाधिकारी हे जिल्हा विकास मंडळाचे अध्यक्ष असतात व उपाध्यक्ष म्हणून सरकार बिनसरकारी व्यक्तींची नेमणूक करीत असते. बीड जिल्हा विकास मंडळाचे ७६ सभासद असून त्यांत सरकारी २१ व बिनसरकारी ५५ सभासद आहेत. या मंडळाची कचेरी बीड येथील कलेक्टर कचेरींत आहे. या मंडळाच्या ११ उपसमित्यांमार्फत जिल्ह्यांतील विविध विभागाच्या समाज कल्याण योजनांना मार्गदर्शन व सहाय्य करण्यांत येतें. या उपसमित्यांच्या सभा सर्वसाधारणपणें प्रत्येक महिन्यांत होत असतात. जिल्हा विकास मंडळाची सर्वसाधारण सभा वर्षांतून दोन वेळेस होत असते.

जिल्ह्यांतील विकास गट, त्यांच्या कार्याची सुरुवात, त्याखालील खेड्यांची संख्या व विकास गटाची अवस्था पुढीलप्रमाणें आहे.

बीड विकास गट (नवा)

हा विकास गट ऑक्टोबर १९५७ मध्यें स्थापन करण्यांत आला असून या गटांत पिंपळनेर विभागांतील ६९ गांवांचा समावेश आहे. लोकसंख्या ३५,३६४ आहे.

गहूं २२ मण, ज्वारी २५० मण, कापूस (१७०,६०२) सहा मण, बाजरी २१ मण, ताग तीन मण, तूर सहा मण, मूग एक मण, भुईमूग आठ मण, खरीप ज्वारी ४० मण याप्रमाणें वांटप झालें असून

सुधारलेल्या बियाण्याचें वांटप ३३२ मण अमोनियम सल्फेट, १९१ मण सुपर फॉस्फेट व २० मण गंधकाचें वांटप झालें आहे. १५५ शेतकी प्रात्यक्षिकें, ५८ प्रात्यक्षिक प्लॉट व सात प्रात्यक्षिक केंद्रें स्थापन करण्याचें ठरलें आहे. ६४८ कंपोस्ट खड्डे करण्यांत आले. ६६ गांवांतून शेतकरी संघांची स्थापना करण्यांत आली. रब्बी व खरीप मोहिमेचा प्रचार स्वतंत्ररीत्या करण्यांत आला. २० स्प्रेअर्स, २० डस्टर्स व २० सीड ड्रम्स गांवांत देण्यांत आले. परळी वैजनाथ येथील प्रदर्शनांत विकास गटाच्या कार्याची माहिती देणारा एक स्टॉल मांडण्यांत आला. ७० प्रगतिशील शेतकऱ्यांचा एक दौरा काढण्यांत येऊन महाराष्ट्र राज्यांतील प्रमुख योजना दाखविण्यांत आल्या.

११६ नवीन विहिरींसाठीं व ६८ जुन्या विहिरींसाठीं १,९४,२५० रु. कर्ज वांटण्यांत आलें. त्याशिवाय १३ ऑईल एंजिन्ससाठीं २६,००० रुपयाचें कर्ज देण्यांत आलें.

आरोग्य पाणी पिण्याच्या सात विहिरींसाठीं १,०७,१०० रुपये खर्च करण्यांत आले. एका जुन्या विहिरीच्या दुरुस्तीसाठीं ३,६५० रुपये खर्च करण्यांत आले. देवीची लस टोंचण्यासाठीं २,३०४ रुपये खर्च करण्यांत आले.

११ शाळांच्या बांधकामासाठीं २३,३६३ रुपये खर्च करण्यांत आले.

समाजशिक्षण ३२ प्रौढ वर्ग सुरू करण्यांत आले असून ७,३०७ प्रौढ साक्षर करण्यांत आले. साक्षरता मोहीमेंत १,९०० प्रौढ साक्षर करण्यांत आले. यासाठीं ९,९४८ रुपये खर्च करण्यांत आले. २० ग्रामसहाय्यक शिबिरें घेण्यांत येऊन १,००० ग्रामसहाय्यक यांना साक्षर करण्यांत आले. यासाठीं ९,९४८ रुपये खर्च करण्यांत आले. याशिवाय ६८ भजनी मंडळें, २८ युवक मंडळें, दहा महिला मंडळें, व १२ वाचनालयें स्थापन करण्यांत आलीं. यासाठीं ६,०४० रुपये अनुदान म्हणून देण्यांत आले बाल उद्यानासाठीं, खेळांच्या साहित्यासाठीं १,५०० रुपये देण्यांत आले. जरूड व औरंगपूर या गांवीं समाज मंदिर बांधण्यासाठीं आतांपर्यंत ३२० रुपये खर्च झाला.

सहकार दहा औद्योगिक सहकारी संस्था स्थापन करण्यांत आल्या असून सभासदांची संख्या १४८ व भाग भांडवल ८,००९ रुपये आहे.

संपूर्ण ६९ गांवें सहकारी चळवळीच्या क्षेत्रांत आलीं असून सहकारी संस्थांचा तपशील पुढें देण्यांत आला आहे.

क्रमांक	संस्थेचें नांव	२–१०–१९५७ पूर्वी		३०–६–१९६० रोजीं	
		संस्था	सभासद	संस्था	सभासद
१	सहकारी पतपेढ्या ...	००	००	१३	४१३
२	औद्योगिक सोसायट्या	००	००	१०	१४८
३	क्रेडिट सोसायट्या ...	११	३१७	१०	२५४
४	सेवा सहकारी संस्था ...	००	००	३०	२,१८४

या योजनेसाठीं ४,२३९ रुपये खर्च झाला असून कार्यालयाचें बांधकाम सुरू झालें आहे. **घरबांधणी**

विकास गटांतील मंजूर झालेल्या १२ लाख रुपयांपैकीं ८,२१,१११ रुपये खर्च झाला आहे.

बीड विकास गट (जुना)

या विकास गटांत राजुरी व चोसाळा विभागांतील १०० खेडीं आहेत.

शेती

गहूं २६० मण, रब्बी ज्वारी ८०० मण, खरीप ज्वारी १३ मण, हरभरा २४ मण, देवराज कापूस ५८ मण, बाजरी ४८ मण व भुईमूग दहा मण या प्रमाणें वांटप झालें असून रासायनिक खतांत २,५६९ मण अमोनियम सल्फेट व सुपर फॉस्फेट ५६४ मण यांचें वांटप करण्यांत आलें, ३,६६६ पौंड कीड व जंतुनाशक औषध वांटण्यांत आलें, ६८ शेतकी प्रात्यक्षिकें दाखविलीं गेलीं व ४४३ कंपोस्ट खड्डे खोदण्यांत आले. ८५ गांवांत शेतकरी संघ स्थापन करण्यांत आले. १२ विहिरींसाठीं १२,९५० रुपये मंजूर करण्यांत आले व त्यांपैकी १०,५२५ रुपये देण्यांत आले. ११ ऑईल एंजिन्ससाठीं २२,००० रुपये खर्च करण्यांत आला. ५७० रुपयांचीं बक्षिसें देण्यांत आलीं. परळी वैजनाथ येथील प्रदर्शनांत भाग घेऊन ७१ रुपयांचीं बक्षिसें मिळविलीं. रब्बी मोहिमेसाठीं खास बियाणें वाटण्यांत येऊन स्वतंत्र पीक–स्पर्धा घेण्यांत आल्या.

आरोग्य

येळंव येथें प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत बांधलीं असून या केंद्रांतून ८,०८४,लोकांवर उपचार करण्यांत आले. २२ शोष खड्डे, दोन कच्चे संडास, तयार करण्यांत आले. १० पाणी पिण्याच्या विहिरी व एक जुन्या विहिरींचीं दुरुस्ती या कामासाठीं १५,१५५ रुपये खर्च करण्यांत आला.

शिक्षण व समाज शिक्षण

सहा प्राथमिक शाळांचें बांधकाम पूर्ण झालें असून त्यासाठीं १२,९०९ रुपये खर्च करण्यांत आला. तीस प्रौढ वर्ग उघडण्यांत येऊन ९७५ लोक साक्षर करण्यांत आले. २५ शिबिरांतील १,१९६ ग्रामसहाय-कांना ग्रामीण विषयांबद्दल माहिती देण्यांत आली. जवळ जवळ प्रत्येक गांवांत भजनी मंडळ स्थापन करण्यांत आलें आहे. भजनाचें साहित्य घेण्यासाठीं ९६१ रुपये देण्यांत आले. १४ महिला मंडळें स्थापन करण्यांत येऊन दोन महिला शिबिरें घेण्यांत आलीं. बालोद्यानासाठीं २,१२६ रुपये साहित्य घेण्यासाठीं देण्यांत आले. खेळाच्या सामन्या-साठीं २०० रुपये व नाटक महोत्सवासाठीं २०० रुपये अनुदान देण्यांत आलें. बालवाडयांना अनुदानरूपानें १,९६४ रुपयांचें शैक्षणिक साहित्य देण्यांत आलें.

पशुसंवर्धन

२५५२ बैल खच्ची करण्यांत आले, १३,९४० जनावरांना प्रतिबंधक लस टोंचण्यांत येऊन १,१६० जनावरांवर औषधोपचार करण्यांत आले. कुक्कुटपालनासाठीं १५ शेतकऱ्यांना ५,००० रुपयांचें कर्ज देण्यांत आलें.

दळणवळण

जोड रस्त्यांच्या कामासाठीं ८०३ रुपये खर्च करण्यांत आले.

सहकार

१०० खेडयापैकीं फक्त सहा खेडीं सहकारी क्षेत्रांत नाहींत. सहकारी संस्थाचा तपशील पुढील-प्रमाणें :–

संस्थेचें नांव		२-१०-१९५३	३१-३-१९६०
सहकारी पतपेढ्या	...	५७	८२
विविध कार्यकारी संस्था	...	......	१२
औद्योगिक संस्था	...	...	१४
सहकारी शेती संस्था	...	...	१
सहकारी क्षेत्रांत असलेलीं गांवें		३५	९२

अंबेजोगाई विकास गट (नवा)

हा विकास गट ऑक्टोबर १९५७ मध्यें स्थापन करण्यांत आला असून या विकास गटांत १०३ खेडीं आहेत. त्याखालीं १७,८५७ कुटुंबें येतात.

शेती

शेती या सदराखालीं आतांपर्यंत १९,१८१ रुपये खर्च करण्यांत आले. १५ प्रात्यक्षिक केंद्रें स्थापण्यांत आलीं असून ४० डस्टर्स, १५ गंधकाम्लाचीं यंत्रें, ४० औषधें मारण्याचे पंप व नांगर शेतकऱ्यांना वापरण्यास देण्यासाठीं खरेदी करण्यांत आले आहेत. दरवर्षी सुधारलेलें बीबियाणें ५०० मण व रासायनिक खतें ४,०४० मण शेतकऱ्यांना दिलीं जातात. पिकांवरील रोगप्रतिबंधक औषधें दरवर्षी १,२०० पौंड दिलीं जातात. १,१०० एकर जमीन पुणेरी पद्धतीनुसार दरवर्षी पेरण्यांत येते.

पशुसंवर्धन

नागापूर व पानगांव येथें गुरांच्या दवाखान्याच्या दोन शाखा उघडण्यांत आल्या आहेत. औषधांच्या १५ पेटया निरनिराळ्या गांवास देण्यांत आल्या असून ६,००० जनावरांवर औषधोपचार करण्यांत आला. ५० सुधारलेल्या जातीच्या मेंढ्या शेतकऱ्यांना पुरविण्यांत आल्या. दरवर्षी ६०० बैल खच्ची करण्यांत येतात व ९,१४४ बैलांना रोगप्रतिबंधक लस टोंचण्यांत येते.

पाटबंधारे

८२ विहिरी, ७४ जुन्या विहिरींची दुरुस्ती व ४४ ऑईल एंजिन्स पंपिंग सेटसाठीं २,७३,००० रुपये कर्ज वाटण्यांत आलें.

ग्रामीण आरोग्य-व्यवस्था

रेणापूर येथें प्राथमिक आरोग्य केन्द्र स्थापन करण्यांत आलें असून त्याच्या शाखा पानगांव बरदापूर, सिंदगांव येथें आहेत. मंजूर झालेल्या ३२ विहिरींपकीं चार सार्वजनिक विहिरींचें बांधकाम पूर्ण झालें आहे. नाथरा या गांवीं १,८०० फूट लांबीच्या गटाराचें काम पूर्ण झालें. आतांपर्यंत या योजनेवर ३२,००० रुपये खर्च करण्यांत आला.

शिक्षण

११ प्राथमिक शाळांच्या २८ खोल्यांचें बांधकाम पूर्ण झालें असून त्यासाठीं ६०,००० रुपये खर्च करण्यांत आला आहे.

२,०५० व्यक्ती साक्षर करण्यांत आल्या असून ३८ तरुण मंडळें, २६ भजनी मंडळें, १२ वाचनालयें, २७ शेतकरी संघ, सहा महिला मंडळें स्थापन करण्यांत आलीं. दोन महिला शिवण कला वर्ग उघडण्यांत आले आहेत. एक समाज मंदिर व १२ चावड्या बांधण्याचें काम चालू आहे. आतांपर्यंत या कार्यासाठीं ३०,००० रुपये खर्च करण्यांत आला.

समाजशिक्षण

लाडझरी व धर्मापुरी येथील जोड रस्त्यासाठीं १,२०० रुपये खर्च करण्यांत आले.

दळणवळण

परळी येथें महिला शिवणकलावर्ग सुरू करण्यांत आला असून नागापूर येथें विटा तयार करण्याचा उद्योग करण्यासाठीं एक हजार रुपये वैयक्तिक कर्ज देण्यांत आलें. सहा औद्योगिक सहकार संघ स्थापन करण्यांत आले. आतांपर्यंत १०,००० रुपये या योजनेवर खर्च करण्यांत आले आहेत.

ग्रामीण उद्योगधंदे

सध्या ३८ सहकार सेवा संघ असून त्यांचे एकंदर २,९४५ सभासद आहेत. १७ सहकारी पतपेढ्या व दोन ग्रामीण बँका आहेत.

सहकार

या विकास गटासाठीं मंजूर झालेल्या १३,५०,००० रुपयांपैकीं ३,०७,६७३ रुपये खर्च करण्यांत आले आहेत.

अंबेजोगाई विकास गट (जुना)

या विकास गटांत ६७ खेडीं असून लोकसंख्या ७०,१९३ आहे. हा विकास गट ऑक्टोबर १९५६ मध्यें स्थापन करण्यांत आला.

शेती

शेतकऱ्यांना खालीलप्रमाणें बी-बियाणें व खताचें वांटप करण्यांत आलें आहे.

ज्वारी ८८० मण, गहूं ६७८ मण, कडधान्यें ६० मण, अमोनियम सल्फेट २,९५० मण, सुपर फॉस्फेट ८०६ मण, युरीया २३५ मण.

याव्यतिरिक्त कंपोस्ट खताचे खड्डे खोदणें, प्रात्यक्षिक केंद्रें स्थापन करणें, सुधारलेलीं अवजारें देणें व शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणें आदि कार्यावरहि बराच जोर देण्यांत आला.

अंबेजोगाई येथें कृत्रिम गर्भधारणा केंद्र स्थापण्यांत आलें असून उत्कृष्ट प्रतीचे बैल पैदा करण्यांत येत आहेत. त्याचप्रमाणें उत्तम प्रतीचे वळू, मेंढ्या व कोंबड्याहि गरजूंना दिल्या जातात.

पशुसंवर्धन

नव्याविहिरी खोदणें, जुन्या विहिरींची दुरुस्ती व ऑईल एंजिनसाठीं, २,२०,००० रुपये वांटण्यांत आले. या योगें ३३२ एकर अधिक जमीन पाण्याखालीं आणण्यांत आली.

पाणीपुरवठा

...तांपर्यंत . प्राथमिक शाळेच्या सात इमारती पूर्ण झाल्या असून त्यासाठीं ४०,०८५ ...यें खर्च करण्यांत आले.

शिक्षण

समाजशिक्षण

३५ युवक मंडळें, १५ वाचनालयें, १५ भजनी मंडळें, आठ महिला मंडळें, दहा अभ्यास मंडळें स्थापन करण्यांत आलीं असून ८८ प्रौढ शिक्षण वर्ग उघडण्यांत आले. साक्षरता मोहिमेंत ३५ वर्ग चालविण्यांत येऊन ८५६ प्रौढ साक्षर करण्यांत आले. तीन समाज मंदिरें बांधून पूर्ण झालीं आहेत. आतांपर्यंत एकूण २९,०३८ रुपये खर्च करण्यांत आले.

सहकार

५५ सहकारी पतपेढ्या स्थापन झाल्या असून सभासदांची संख्या ३,६१३ आहे. विकास गटांतील ९७ टक्के खेडीं सहकारी क्षेत्रांत आलीं आहेत.

ग्रामीण उद्योगधंदे

सहा सहकारी औद्योगिक संस्था चालू असून अंबेजोगाई येथें चर्मोद्योग प्रशिक्षण शाळा उघडण्यांत आली आहे.

या विकास गटाकरितां आतांपर्यंत मंजूर झालेल्या १२ लाख रुपयापैकीं ५,२२,५३० रुपये खर्च झाला आहे.

अष्टी विकास गट

हा विकास गट एप्रिल १९५५ मध्यें स्थापन झाला असून या गटांत १०१ गांवें आहेत. लोकसंख्या सुमारे ८६,०००, आहे.

शेती

सुधारलेलें बी बियाणें २,९९२ मण, रासायनिक खत ८,०८७ मण व कीटकनाशकें ३४ मण वांटण्यांत आलीं. त्याचप्रमाणें २२ नांगर, बियांना औषध लावण्याचीं यंत्रें ३२, चरक सहा, स्प्रे पंप २० व डस्टर्स २० देण्यांत आले. त्याशिवाय २२ ७२ कंपोस्ट खड्डे खोदण्यांत आले. १६२ प्रात्यक्षिक केंद्रें व एक बीज-उत्पादन केंद्र स्थापन करण्यांत आलें. ६७५ एकर जमिनीवर फळझाडें लावण्यांत आलीं.

पशुसंवर्धन

२२ ठिकाणीं औषधी पेट्या देण्यांत आल्या. पांच वळू, ३३९ सुधारलेले पक्षी देण्यांत आले असून ५४,५५५ जनावरांना रोग प्रतिबंधक लस टोंचण्यांत आली. २,२७५ कोंबड्यांना औषधोपचार करण्यांत आला व ३,२७८ जनावरांना खच्ची करण्यांत आलें. अष्टी येथें जनावरांच्या दवाखान्याची इमारत पूर्ण झाली असून अष्टी, धानोरा, देवळाली व दहिठण येथें स्टॉकमनची नेमणूक करण्यांत आली आहे. कुक्कुटपालनासाठीं ४,५०० रुपये वाटण्यांत आले. सात प्रदर्शनें भरविण्यांत आलीं.

पाणीपुरवठा

३९ ऑईल एंजिन्स, २०५ नवीन विहिरी खोदणें व जुन्या विहिरींच्या दुरुस्तीसाठीं २,८७,००० रुपये कर्ज देण्यांत आलें. नऊ मैल लांबीच्या कालव्याचें बांधकाम झालें आहे. ४,४८५ एकर अधिक जमीन पाण्याखालीं आली आहे.

स्वच्छता व आरोग्य

१,५५० शोषखड्डे, ६८६ यार्ड गटारें व चार संडास बांधण्यांत आले असून दहा औषधाच्या पेट्या दहा खेड्यांत देण्यांत आल्या आहेत. आठ पिण्याच्या पाण्याच्या विहिरींचें बांधकाम हातीं घेण्यांत आलें आहे. ६८ टक्के लोकांस देवी काढण्यांत आल्या आहेत.

शिक्षण

३८ शाळांपैकीं २२ प्राथमिक शाळांचें बांधकाम पूर्ण झालें असून १२ प्राथमिक शाळांच रूपांतर मूलोद्योग शाळांमध्यें करण्यांत आलें आहे.

समाजशिक्षण

खालीलप्रमाणें समाज शिक्षण संस्था विकास गटांत आहेत. :– ८८ तरुण मंडळें, ६२ करमणूक केंद्रें, १० नाटच मंडळें, दहा ग्रामरक्षा दलें, दहा वाचनालयें, ६३ पुस्तकालयें, सात रेडिओ मंडळें, १२१ भजनी मंडळें, दोन बालोद्योग, २६ बालकल्याणकारी संस्था, ३१ ग्रामसहाय्यक शिबिरें, १६५७ ग्रामसहाय्यकांना प्रशिक्षण, १ दिवसाची ११ शिबिरें घेण्यांत आलीं. शिराळ व खुंटेफळ या दोन गांवीं गांधी घराच्या इमारती बांधण्यांत आल्या असून एक करमणूक केंद्र बांधण्यांत आलें आहे. साक्षरता मोहिमेंत ४० वर्ग उघडण्यांत आले होते.

सहकार

पांच विविध कार्यकारी संस्था, ६५ सेवा सहकारी संस्था, आठ शेतकी पतपेढया, सात औद्योगिक सहकारी संस्था काम करीत आहेत. सभासद संख्या ४,६२७ आहे. भाग भांडवल ३६,०७७ रु. असून सर्व खेडीं सहकारी क्षेत्रांत आलीं आहेत. दोन संस्थांना गुदाम बांधण्यासाठीं प्रत्येकीं दहा हजार रुपये देण्यांत आले. एक ग्रामीण पुनरुज्जीवन संस्था व दोन शिक्षकांच्या पतपेढया आहेत.

ग्रामीण उद्योगधंदे

एक सुतारी व लोहारी प्रशिक्षण केंद्र खिळद या गांवीं उघडण्यांत आलें आहे. दोन शिंप्यांना १५०० रुपये कर्ज देण्यांत आलें.

दळणवळण

पोखरी येथें मुख्य रस्ता, हिवरा ते अंभोरा ते सुलेमान देवळा या रस्त्याचें बांधकाम चालूं आहे.

घर बांधणी

रूटी व यमनगांव येथील ४९ लोकांना घरें बांधण्यासाठीं २८,४२० रुपये कर्जाऊ देण्यांत आले.

मंजूर झालेल्या १२ लाख रुपयांपैकीं ८,२१,१११ रुपये खर्च करण्यांत आले.

पूर्व अवस्था विकास गट

गेवराई विकास गट

गेवराई विकास गट

१ एप्रिल १९६० पासून गेवराई तालुक्यांत पूर्व अवस्था विकास गट योजना लागू करण्यांत आली. या विकास गटांत १५४ खेडीं आहेत. तालुक्याची लोकसंख्या १,१३,७९४ आहे. हा पूर्व अवस्था विकास गट असल्यामुळें या विकास गटांत एक विकास गट अधिकारी, एक शेतकी विस्तार अधिकारी, एक सहकार विस्तार अधिकारी व सात ग्रामसेवक काम करीत आहेत. शेती, सहकार या दोनच क्षेत्रांतील कार्य या विकास गटास करावयाचें असल्यामुळें इतर विकास गटांप्रमाणें संपूर्ण क्षेत्रांतील योजनांचा समावेश यांत नाहीं.

विकास गटांत झालेलें कार्य

शेती

तालुक्यांत ७९ शेतकी संघ स्थापन झाले असून संघाचे ८५५ सभासद आहेत.

१,४८७ मण अमोनियम सल्फेट, ३०३ मण सुपर फॉस्फेट, ३९७ मण गहूं, ३१३ मण ज्वारी, १५ मण हरभरे, १६ मण कंबोडीया, १,७९४ पौंड गंधक, १८५ पौंड गॅमीक्झीन, ३४ पौंड बी. एच.

सी, तीन गॅलन एंड्रिन, व भाजीपाल्याचें बी वांटप करण्यांत आलें. साडे नऊ एकर जमीन फळझाडाखालीं लागवडीस आणली. ५०० एकर जमीन नवीन पद्धतीनें पेरण्यांत आली. वनमहोत्सवांत १,०५६ झाडें लावण्यांत आलीं.

सहकार

एकूण नवीन १८ सेवा सहकारी संस्था, ४५ गांवांतून स्थापन करण्यांत येऊन १,५२१ नवीन सभासदांची नोंदणी करण्यांत आली. आठ औद्योगिक संस्था स्थापन करण्यांत आल्या.

समाजशिक्षण

गेवराई येथें एक बालक मंदिर व एक महिला मंडळ स्थापन करण्यांत आलें. तीन ग्रामसहाय्यक नेता प्रशिक्षण शिबिरें व एक ग्रामपंचायत शिबिर घेण्यांत आलें.

केज विकास गट

केज पूर्व अवस्था विकास गटाचें उद्‌घाटन दिनांक १६ फेब्रुवारी १९६० रोजीं महाराष्ट्र राज्याचे मुख्य मंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या शुभ हस्तें झालें. या गटांत १६५ खेडीं असून लोकसंख्या १,२९,९२० आहे.

शेतीविषयक कार्यक्रम

विकास गटांतील प्रत्येक खेड्यांत शेतकरी संघ स्थापन करण्यांत आला असून त्या संघाचे ३,०९० सभासद आहेत. संघाच्या २१५ सभा झाल्या. एका वर्षांत आतापर्यंत ४४७ कंपोस्ट खड्डे खोदण्यांत आले व ३६४ खड्डे भरण्यांत आले. यापैकीं २१८ खेड्यांतून १,२७८ गाड्या खत मिळालें. धारूर या गांवीं २३० टन कंपोस्ट खत तयार करण्यांत आलें.

बी बियाणें व खताचें वांटप

अमोनियम सल्फेट १,१३७ मण, युरिया १७ मण, सुपर फॉस्फेट ३७२ मण व पेंड ४० मण, बाजरी दोन मण, खरीप ज्वारी २२२ मण, कापूस (१४२२) ४७ मण, कापूस (१७० — ओटू) १६ मण, गहूं १३१ मण, रब्बी ज्वारी १२७ मण, भुईमूग २५ मण. याशिवाय धारूर सर्वोदय केन्द्रातर्फे स्वतंत्ररीत्या बी-बियाणें व खत वांटप झालें आहे. उत्तम प्रकारच्या बी-बियाण्याच्या वांटपासाठीं अ, ब व क वर्गाचे शेतकरी तयार करण्यांत आले आहेत.

विहिरींची वाढ

१८ नवीन विहिरी खोदण्याचें काम चालू आहे व एक ऑईल एंजिन व पंपिंग सेट बसविण्यांत आला आहे. यामुळें बागायत क्षेत्रांत २५ एकर वाढ झाली आहे. फळझाडांसाठीं ३३ एकर दहा गुंठे व भाजीपाल्यासाठीं सहा एकर १२ गुंठे क्षेत्रांत वाढ झाली आहे. १२३ प्रात्यक्षिक प्लॉट्स पाडण्यांत आले.

पिकांचें कीड व रोगापासून संरक्षण करण्यासाठीं सप्टेंबर १९६० अखेर २,५७० पौंड औषध वांटण्यांत आलें व त्याचा वापर १,६७६ एकर क्षेत्रांत झाला. या शिवाय दोन डस्टर्स व फवारे मारण्याचीं दोन यंत्रें मागवून देण्यांत आलीं. सुधारलेल्या दहा कोंबड्या पुरविण्यांत आल्या. निरनिराळ्या पीक-स्पर्धा घेण्यांत आल्या. वनमहोत्सव सप्ताहामध्यें ९०० झाडें लावण्यांत आलीं.

तालुक्यांत पांच तरुण मंडळें, दोन महिला मंडळें व पांच भजनी मंडळें स्थापन करण्यांत आलीं.

या वर्षात २२ सहकारी संस्था स्थापन करण्यांत आल्या. तालुक्यांतील फक्त ४० गांवें सहकारी क्षेत्रांत यावयाचीं राहिलीं आहेत. १२ जुन्या सहकारी पतपेढ्यांचें सेवा सहकारी संस्थांमध्यें रूपांतर करण्यांत आलें. सर्व सहकारी संस्थांच्या सभासदांची संख्या ८,३४२ आहे व एकूण भांडवल २,००,७४४ रुपये आहे. या तालुक्यांत सहकारी सामुदायिक शेती दोन **सहकारी संस्था** गांवांत चालू असून त्यांना विकास गटातर्फे मार्गदर्शन करण्यांत येत आहे. त्याच-प्रमाणें ११ औद्योगिक संस्था कार्य करीत आहेत. त्यांनाहि योग्य तें मार्गदर्शन केलें जातें.

पाटोदा विकास गट

पाटोदा विकास गट १ एप्रिल १९५६ पासून कार्य करीत आहे. आतांपर्यंत केलेल्या कार्याचा आढावा थोडक्यांत खालील प्रमाणें आहे. :—

(१) शेती–	(१) कंपोस्ट खड्डे खणले	२,१४५
	(२) खताचें वांटप (बंगाली मण) ...	२,३८४
	(३) सुधारलेल्या बी-बियाण्याचें वांटप... ...	७६४
	(४) फळबागांखालीं आणलेलें क्षेत्र एकर ...	१६८
	(५) बागायती खालीं आणलेलें क्षेत्र एकर ...	५६७
(२) पशुसंवर्धन–	(१) खच्ची केलेल्या बैलाची संख्या	२,९७२
	(२) सुधारलेल्या पक्षांचें वांटप	५०
	(३) रोग प्रतिबंधक लस टोंचलेल्या गुरांची संख्या...	२३०९८
(३) सिंचन योजना :–	(१) बंडिंगच्या कामासहित जमीन– ... सुधारणा	६,२२९ ए. २० गुंठे
	(२) बागायती खाली आणलेलें क्षेत्र ...	९९३ एकर
(४) आरोग्य व ग्रामीण स्वच्छता–	(१) शोषखड्डे खोदले	५६४
	(२) संडास बांधले	५
	(३) गटार दुरुस्ती	७,१८२ यार्ड
	(४) पिण्याच्या पाण्याच्या विहिरी ...	९
	(५) जुन्या विहिरींची दुरुस्ती	११
(५) शिक्षण–	(१) शाळांचें मूलोद्योग शाळांत रूपांतर ...	३
	(२) शाळागृहांचें बांधकाम	३
	(३) प्रौढ साक्षर केले	२,२२५
(६) दळणवळण–	(१) कच्चे रस्ते (फर्लांग)	३१३
	(२) पक्के रस्ते (फर्लांग)	१४६
(७) इतर संस्थांची वाढ–	(१) शेतकी पतपेढ्यांचे सभासद	१३१८
	(२) इतर सहकारी संस्थांचे सभासद ...	६,८५४
	(३) ग्रामपंचायत	६८
	(४) शेतकी संघ स्थापले	९१
	(५) महिला मंडळें	२४

बीड जिल्ह्यांतील विकास गट

क्रमांक	विकास गटाचें नांव	सुरू झाल्याची तारीख	खेडीं	लोकसंख्या	१९६० मार्च अखेर झालेला खर्च	लोकांचा हिस्सा	अवस्था
१	बीड	... २-१०-१९५७	६९	३५,३६४	३,९२,१८२	१४,८९६	प्रथम अवस्था
२	बीड	... २-१०-१९५३	१०२	६४,०००	१,६४,८०९	३१,८८२	दुसरी अवस्था
३	अष्टी	... १- ४-१९५६	१२३	८६,२३८	२,१६,४०६	३९,६७०	प्रथम अवस्था
४	पाटोदा	... १- ४-१९५६	९१	८३,६०३	६,६७,९०९	४१,२८०	प्रथम अवस्था
५	अंबेजोगाई	... २-१०-१९५७	१०२	९४,९८१	२,१०,६२४	२८,४९४	प्रथम अवस्था
६	अंबेजोगाई	... २-१०-१९५६	६७	७०,१९३	१,७१,५५१	५८,५६८	प्रथम अवस्था
७	गेवराई	... १-४ -१९५९	१५४	१,१८,७९४	२१,६०५	...	प्रथम अवस्था
८	केज	... २-१०-१९५९	१६५	१,२९,९२०	१०,०६०	...	पूर्व अवस्था
९	माजलगांव	... १-४ -१९६०	१६२	१,१७,०२०	...	...	पूर्व अवस्था

पूर्व अवस्था विकास गटांत तालुक्यांतील खेड्यांची सर्व दृष्टीनीं पहाणी चालू असून प्रत्येक खेड्यांत कोणता विकास कार्यक्रम घ्यावयाचा त्याबाबत विचार चालूं आहे.

सार्वजनिक बांधकाम

मराठवाडयांतील पांच जिल्ह्यांपैकीं बीड हा जिल्हा सर्वांत लहान व अविकसित आहे. या जिल्ह्याचें क्षेत्रफळ ४,२३३ चौरस मैल असून लोकसंख्या ८,२६,०४६ आहे. जिल्ह्याच्या एकूण क्षेत्रफळापैकीं १९,२४,१६५ एकर जमीन लागवडीच्या उपयोगी आहे. जिल्ह्यांत एकंदर सात तालुके असून परळी वैज-नाथ रेल्वे स्टेशन सोडल्यास दुसरें रेल्वें स्टेशन नाहीं. बीडपासून साठ मैलांवर जालना रेल्वे स्टेशन (औरंगाबाद) व ९० मैलांवर अहमदनगर रेल्वे स्टेशन आहे. यावरून या जिल्ह्यांमध्यें सडकांची आवश्य-कता किती आहे, हें सहज लक्षांत येईल.

सबंध बीड जिल्ह्याचा समावेश बांधकाम विभागाच्या बीड विभागांत होतो. (पी. डब्ल्यू. डी २ आर्. बी. डिव्हिजन.) या विभागांतील कामें लक्षांत घेऊन कारभार विषयक चार उपविभाग केले आहेत. या उपविभागांना सब-डिव्हिजन म्हणतात. तूर्त या उपविभागाच्या कचेऱ्या बीड, अंबेजोगाई, अष्टी व माजलगांव ह्या ठिकाणीं आहेत. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील कामें विचारांत घेऊन अजून एका उपविभागास नुकतीच मंजुरी आलेली आहे.

बीड जिल्ह्यांत दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या सुरुवातीस २८८ मैल लांबीचे पक्के रस्ते होते व नऊ मैल लांबीचे कच्चे रस्ते होते. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या समाप्तीनंतर पक्के रस्ते ४२० मैल व कच्चे रस्ते नऊ मैल लांबीचे होतील, अशी अपेक्षा आहे. म्हणजे पक्क्या रस्त्यांमध्यें १३२ मैलांची वाढ होईल. ह्या संदर्भात नागपूर प्लॅनचा उल्लेख आवश्यक आहे.

नागपूर प्लॅन

जिल्ह्याचें क्षेत्रफळ, लोकसंख्या, शेतीयोग्य क्षेत्रफळ वगैरे बाबी लक्षांत घेऊन नागपूर प्लॅन तयार केलेला असून हा प्लॅन महाराष्ट्र सरकारनें अंमलांत आणण्याचें धोरण ठेवलेलें आहे. ह्या प्लॅन प्रमाणें बीड जिल्ह्याचें वाटयास वरील सर्व बाबींचा विचार करतां १,००० मैलांचे मोठे रस्ते व ९०० मैलांचे लहान रस्ते येतात. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत ह्यापैकींच १३२ मैल रस्त्याचें काम होऊन एकूण ४२० मैलांचे रस्ते तयार होतील. नागपूर प्लॅन जिल्हा विकास मंडळाचे सम्मतीनुसार व ज्या रस्त्यांना अग्रक्रम देण्यांत येईल त्याप्रमाणें टप्पा टप्प्यानें अंमलांत आणण्याचें धोरण आहे.

लोखंडी सावरगांव ते लातूर रस्ता (तीस मैल व दोन फर्लांग)

उस्मानाबाद जिल्ह्यांतील लातूर रेल्वे स्टेशन मराठवाडयांतील व्यापारी केन्द्र असल्यामुळें ही सडक महत्त्वाची आहे. या सडकेचें काम जवळ जवळ पूर्ण झालें असून मोमीनाबाद ते लातूर या रस्त्यावर एस्. टी. ची वहातुक चालू झाली आहे. या कामासाठीं आतां-पर्यंत १०,८५,३९० रुपये खर्च करण्यांत आला.

धारूर ते कळंब रस्ता (चौदा मैल व चार फर्लांग)

या सडकेमुळें बीड व उस्मानाबाद जिल्ह्याचें अंतर कमी होणार असून धारूर व केज विभागांतील लोकांचा वेळ व पैसा बऱ्याच प्रमाणांत वाचणार आहे. धारूर हें गांव डोंगराळ विभागांत आहे व धारूरजवळ एकही सडक नसल्यामुळें ही सडक खूपच फायदेशीर होणार आहे.

केज ते धारूर रस्त्याचें मातकाम व पृष्ठभागास लागणाऱ्या साहित्याची (खडी, दगड, मुरूम) जमवाजमव पूर्ण झाली आहे. दोन मैल रस्ता रुळानें दाबून तयार झाला आहे. त्याचप्रमाणें कळंब ते केज या रस्त्यावरील तीन मैल चार फर्लांगाची सडक रुळानें दाबून तयार झाली आहे. या रस्त्यासाठीं आतांपर्यंत ३,५९,७३२ रुपये खर्च करण्यांत आले आहेत.

धारूर ते मालजगांव रस्ता (एकवीस मैल सहा फर्लांग)

या रस्त्याचें काम सहा विभागांत विभागलें गेलें आहे. पांच विभागांत काम सुरू आहे. रस्त्याचें मातकाम, पृष्ठभागास लागणारे साहित्य वगैरे तयार असून त्यावरील लहान पुलाच्या कामाची सुरुवात झालीं आहे. धारूर ते कळंब या सडकेचें काम चालू असल्यामुळ धारूर ते माजलगांव या नवीन सडकेमुळें माजलगांव तालुक्यांतील दळणवळण उस्मानाबाद जिल्ह्याशीं जोडलें जाणार आहे. या रस्त्यावर आतांपर्यंत १,३८,४५८ रुपये खर्च झाला आहे.

परळी तेगंगाखेड रस्ता (चार मैल तीन फर्लांग)

या सडकेच्या पूर्व कामाची तयारी संपली असून या सडकेमुळें परभणी जिल्ह्यांतील गंगाखेड या व्यापारी शहराशीं बीड जिल्ह्यांतील प्रमुख व्यापारी व धार्मिक क्षेत्र परळी वैजनाथ हें जोडलें जाणार आहे. विशेषतः व्यापारी वर्गास ही सडक अत्यंत फायदेशीर होणार आहे. या सडकेवर आतांपर्यंत १,८६,१०८ रुपये खर्च झाला आहे.

मांजरसंबा ते पाटोदा (सतरा मैल)

जिल्ह्याच्या एकंदरींत नैसर्गिक रचनेमुळें अंबेजोगाई व पाटोदा ही दोन्हीं गांवें तालुक्याची असून सुद्धां त्यांना जोडणारा रस्ता सरळ नव्हता. या दोन गांवांना जाण्यासाठीं बीडला यावेंच लागत असे. परंतु या नवीन सडकेमुळें जवळ जवळ तीस मैलांचें अंतर कमी होत आहे. त्यामुळें जनतेचा पैसा व वेळ यांची बचत होणार आहे. या योजनेसाठीं ५५,६१५ रुपये खर्च करण्यांत आला आहे. या सडकेवरील लिंबा गणेश या गांवीं एस्. टी. च्या गाडीची रहदारी सुरू झाली आहे.

गेवराई ते उमापूर रस्ता (चौदा मैल दोन फर्लांग)

गेवराई तालुक्यांत गोदावरी नदी सरहद्दीवर वहात असल्यामुळें या तालुक्याचा इतर तालुक्याशीं सडकेच्या अभावी बऱ्याच प्रमाणांत संबंध तुटला आहे. या तालुक्यांत दुसरी एकहि सडक नाहीं. त्याशिवाय उमापूर या गांवापासून कांहीं मैलांवर नगर जिल्ह्याच्या शेवगांव तालुक्याची हद्द सुरू आहे. या सडकेमुळें नगर जिल्हा गेवराई तालुक्यांतील लोकांना अंतराच्या दृष्टीनें अगदीं जवळचा होणार आहे. या सडकेवर ७,२८,४९९ रुपये खर्च करण्यांत आला आहे.

अष्टी ते दहीठण (अकरा मैल)

या सडकेमुळें नगर जिल्ह्याशीं अष्टी तालुक्याचा संबंध अधिक प्रमाणांत येईल. या रस्त्याचें तीन भागांत काम चालू असून जवळ जवळ आठ मैलाचें काम पूर्ण झालें आहे. राहिलेलें काम समाधानकारकरीत्या चालू आहे. या रस्त्यासाठीं २,७२,३३० रुपये खर्च करण्यांत आला.

अमळनेर ते दहिठण रस्ता (दहा मैल चार फर्लांग)

पाटोदा तालुक्यांतील अमळनेर हें गांव भांड्यांच्या कारखान्याबद्दल प्रसिद्ध आहे. परंतु सडकेच्या अभावीं पाहिजे तसा व्यापार होत नाहीं. म्हणून ही सडक सुचविण्यांत आली आहे. या सडकेमुळें अष्टी व नगर हीं दोन्हीं गांवें अमळनेर या गांवास अंतराच्या दृष्टीनें जवळ येतील. या सडकेवर आतांपर्यंत २,७२,३०४ रुपये खर्च करण्यांत आला.

माजलगांव ते सेलू रस्ता (बारामैल दोन फलांग

परभणी जिल्ह्यांतील सेलू हें तालुक्याचें व्यापारी ठिकाण आहे. बीड जिल्ह्यांतील माजलगाव हें तालुक्याचें ठिकाण आहे. म्हणून दोन्ही जिल्ह्याच्या दृष्टीनें ही सडक होणें अत्यंत आवश्यक आहे. या सडकेचें काम चालू असून आतांपर्यंत २,६१,८२० रुपये खर्च झाले आहेत.

बीड ते परळी रस्ता (पंचावन मल)

बीड जिल्ह्यांतील ही सर्वांत मोठी नवीन सडक आहे. ही सडक बीड माजलगांव ते केज तालुक्यांस जोडणारी असल्यामुळें केज तालुक्यांतील बरीचशीं मोठीं खेडीं या सडकेला जोडलीं जात आहेत. या सडकेच्या कामाची पूर्वतयारी झाली असून लवकरच कामाची गति वाढेल. यासाठीं ११,०४० रुपये खर्च करण्यांत आला आहे.

सिरसाळा ते सोनपेठ (आठ मैल)

माजलगांव तालुक्यांत सिंदफणा व गोदावरी नद्यांमुळें दळणवळणाची अडचण फारच मोठ्या प्रमाणावर भासत होती. म्हणून ही अडचण दूर करण्यासाठीं बीड ते परळी या नवीन सडकेवरील सिरसाळा हें गांव येत असल्यामुळें बीड ते सोनपेठ असा सरळ मार्ग तयार होत आहे. या सडकेचें काम नुकतेच सुरू करण्यांत आलें आहे. या रस्त्यासाठीं आतांपर्यंत १६,८२५ रुपये खर्च करण्यांत आला आहे.

चौसाळा ते शहागड (सत्तेचाळीस मैल)

ही सडक औरंगाबाद, सोलापूर अशीं मोठीं गांवें जोडणार असल्यामुळें राज्यांतील महत्त्वाची सडक म्हणून हिचा उल्लेख करतां येईल. पूर्वीच्या सडकेचें रूपांतर डांबरी सडकेंत करण्यांत येत आहे. या सडकेचें जवळ जवळ निम्मे काम संपलें असून ७,३३,०७३ रुपये खर्च करण्यांत आले.

बीड ते अहमदनगर रस्ता (पुलाचें काम)

बीड ते अहमदनगर ही अत्यंत महत्त्वाची सडक बीड जिल्ह्यांतील आहे. परंतु अष्टी तालुक्यांत बऱ्याच ठिकाणीं नद्या व नाल्यामुळें पावसाळ्यांत रहदारी बंद करावी लागते. म्हणून चिंचपूर, कासारी, जळगांव व काटरवेलवाडी व कडा व कांवळी या गांवांच्या नाल्यावरील पुलाच्या कामास सुरुवात झाली असून कडा व कांबळी येथील पुलांचें काम जवळ जवळ संपलें आहे. या कामामुळें मिरजगांव मार्गे जाण्याचा पंधरा मैलांचा फेरा वाचेल. या कामावर आतांपर्यंत ४,९८,५१५ रुपये खर्च करण्यांत आला आहे.

अंबेजोगाई ते कळंब पूलाचें काम

या सडकेवरील केज तालुक्यांतील डिगूळ, बोरी, सावरगांव, युसुफ वडगांव या गांवांच्या नाल्यावरील पुलाच्या कामास तांत्रिक मंजुरी नुकतीच मिळाली असून सावळेश्वर, सुकडी व मांगवडगांव येथील पुलाच्या कामाची मंजुरी यावयाची आहे. विभागामार्फत तीन पुलाच्या कामास सुरुवात झाली आहे. आतांपर्यंत या कामासाठीं ७१,८५६ रुपये खर्च करण्यांत आला.

घाटनांदर ते अहमदपूर (अकरा मैल)

या सडकेमुळें उस्मानाबाद जिल्ह्यांतील अहमदपूर या गांवाचा संबंध अंबेजोगाई तालुक्याशीं जोडला जातो. या सडकेमुळें नांदेड (अहमदपूर मार्गें) एस. टी. सुरू झाली असून एका अर्थानें नांदेड बीड जिल्ह्यास अगदीं जवळ आहे. या कामावर आतांपर्यंत ३,०२,१४५ रुपये खर्च करण्यांत आले आहेत. या नवीन सडकेमुळें बीड जिल्ह्यांत जवळ जवळ २११ मैल लांबीच्या सडकांची वाढ होणार आहे. त्यासाठीं जवळ जवळ एक कोटी रुपये खर्च करण्यांत येतील.

वरील सडकांचीं कामें पूर्ण झाल्यानंतर बीड जिल्हा विकास मंडळानें खाली नमूद केलेल्या सडकांचीं कामें हातीं घेण्याचें ठरविलें आहे. या सडकांची लांबी ३४८ मैल असून त्यावर अंदाजें खर्च १.६६ कोटि रुपये होईल.

अमळनेर ते पाथर्डी सडक	मैल ५
उखंडा ते निरगुडी	मैल ७
रेणापूर ते उद्गीर	मैल ५
पाटोदा ते भूम	मैल ६
अष्टी ते खडकत	मैल ११
राजूरी, खोकरमोह, रायमोह, शिरूर, मानुर, चिंचपूर (बीड जिल्हा)	मैल २६
दहिठण ते दौलावडगांव	मैल २०
वडवनी, ताडसोना, पिंपळनेर, गुंधा, लुकडगांव, वाहेगांव, पाडलसिंगी, मादलमोही कोलेगांव, तरडगांव, चकलांबा	मैल ४१
रेणापूर ते गंगाखेड (परळी बँच)	मैल ३०
नांदुरे, वाघेबाभुळगांव, येळंब, देवगांव, ईडा, येवता, धारूर, पांगरी, आडसऊमरी, अंबाजोगाई	मैल ४३
बीड ते पात्रूड (बीड जिल्हा)	मैल ३२
सादोळा ते सोनेपेठ (माजलगांव ता.)	मैल २७
अष्टी, सीरड रूई, पुंडी, लोनी	मैल २६
तांबा राजूरी, रायमोह, पाडळी, आर्वी, निंबगांव, चकलांबा, महारटाकळी	मैल ३०
कळंब ते केज ते चिंचोली सिरूर, नांदुर, पिंपरी, चौसाळा, पांचरी, ते सरढा	मैल ३०
वाग पिंपळगांव ते तळवाडा	मैल ९

इमारती

बांधकाम विभागातर्फे जवळ जवळ १,६४,११,००० रुपये खर्चाच्या इमारती बांधण्याचा भव्य कार्यक्रम हातीं घेतला आहे. इमारतीचें बांधकाम निरनिराळ्या अवस्थेंत असल्यामुळें केवळ इमारतींचा उल्लेख खाली केला आहे.

शेतकी विभाग अंबेजोगाई येथें शेतकी शाळा, राजुरी येथें संशोधन केंद्र, अंबेजोगाई, केज, खामगांव येथें बीज उत्पादन केंद्र, बिंदुसरा येथें प्रात्यक्षिक केंद्र.

पशु संवर्धन विभाग बीड, माजलगांव, गेवराई, केज, परळी येथें पशु चिकित्सालय, अंबेजोगाई येथें कुक्कुट पालन केंद्र व मेंढ्यानिपज केंद्र.

शिक्षण विभाग १५ प्राथमिक शाळेच्या इमारती, बीड येथें मुलींचें हायस्कूल, दोन मूलोद्योग शाळा, बीड येथील शिक्षणाधिकारी यांच्या कार्यालयाचें काम संपलें असून त्यासाठीं ५२,९३१ रुपये खर्च करण्यांत आले.

आरोग्य विभाग बीड येथें सिव्हील हॉस्पिटल बांधण्याचें लवकरच सुरूं करण्यांत येईल.

न्याय विभाग केज, गेवराई, येथील मुन्सफ कोर्ट, जिल्हा न्यायाधिशासाठीं बीड येथें राहण्यासाठीं बंगला.

महसूल विभाग केज येथें तहसिल कचेरी बांधण्यांचें काम लवकर हातीं घेतलें जाईल.

पोलीस विभाग बीड येथें डी. एस. पी. यांना राहण्यासाठीं एक बंगला, बीड व अंबेजोगाई येथें इन्स्पेक्टरसाठीं राहण्याकरितां इमारती. पोलीस सब् इन्स्पेक्टरसाठीं बीड येथें चार, अंबेजोगाई येथें दोन, परळी वैजनाथ येथें एक, याप्रमाणें राहण्यासाठीं एकूण सात इमारती. बीड येथें पोलीसासाठीं २१६ क्वॉर्टर्स (२६ क्वार्टरचें काम संपलें असून त्यासाठीं ९७,५०० रुपये खर्च झाला आहे.) बीड येथें होम इन्स्पेक्टरसाठीं राहण्याची इमारत बांधून झाली आहे.

समाज कल्याण दर्शन

बीड जिल्ह्यांत ३ एप्रिल १९५८ पासून समाज कल्याण योजना समितीच्या कार्यास सुरुवात झाली. या योजनेखालीं बीड तालुक्यांतील पंचवीस गांवें असून त्यांची लोकसंख्या तीन हजार सहाशें चार आहे. या विभागाची पांच केंद्रें असून प्रत्येक केंद्राखालीं चार उपकेंद्रें आहेत. ही योजना मध्यवर्ती सरकारची असून महाराष्ट्र राज्य समाज कल्याण सल्लागार समितीमार्फत हें कार्य केलें जातें. या योजनेचा दोन तृतियांश खर्च मध्यवर्ती सरकार करतें व एक तृतियांश खर्च राज्य सरकार करतें.

प्रमुख कार्य

या समितींत अकरा सभासद असून त्यांत दोन सभासद बिनसरकारी आहेत. या कार्यासाठीं नोकरवर्ग देण्यांत आला आहे. प्रत्येक केंद्राच्या ठिकाणीं तीन ते सहा वर्षांच्या वयांतील मुलांसाठीं बालवाडी चालविण्यांत येतें. बालवाडींत खेळ व मनोरंजनाद्वारें शिक्षण दिलें जातें. याशिवाय प्रौढ शिक्षण वर्ग, उद्योग वर्ग चालविला जात असून. प्रत्येक आठवड्यांत बाळंतपणासाठीं व इतर छोटया-मोठया रोगांसाठीं औषधपुरवठा केला जातो. प्रत्येक आठवड्यांत राष्ट्रीय सण साजरे केले जातात. मूलोद्योग, स्वच्छता व सांस्कृतिक कार्यक्रम घेतले जातात. याशिवाय कला व आरोग्य स्पर्धा घेण्यांत येतात. या समितीतर्फे करण्यांत आलेल्या कार्यावर पुढील प्रमाणें खर्च करण्यांत आला आहे.

वर्ष	मंजूर झालेली रक्कम	खर्च झालेली रक्कम
१९५८–५९	२९,९७६	२२,७९६
१९५९–६०	३०,०२०	२४,३७२
१९६०–६१	३२,५००	२२,०६०
		(नोव्हें. १९६०)

लोकांची वर्गणी

खेड्यांतील लोकांनीं व ग्रामपंचायतींनीं बालवाडीस लागणारें साहित्य व शिवण यंत्रें दिलीं. समाज सेवा विभागातर्फे २,००० रुपयांची औषधें व विकास गटातर्फे शिवण कामाचीं यंत्रें व बालवाडीचें पंधराशें रुपयांचें साहित्य दिलें. जिल्हा आरोग्य विभागातर्फे प्रत्येक महिन्यांत औषधांचा पुरवठा केला जातो. बालवाडींतील मुलांना रोज दूध दिलें जातें.

इमारती

तीन केंद्राच्या ठिकाणीं इमारती बांधण्याचें काम चालू असून बांधकाम जवळ जवळ पूर्ण होत आलें आहे. जिल्हा लोकल बोर्डातर्फे इमारती बांधण्यासाठीं बारा हजार रुपये मदत मिळाली.

बीड जिल्ह्यांत कारखाने नसल्यामुळें विशेष कामगार वर्ग नाहीं. तेलाच्या गिरण्या, कापसाचे गठ्ठे तयार करण्याचे कारखाने, बिडी कारखाने आदि कारखाने या जिल्ह्यांत आहेत. १० सप्टेंबर १९५९ पासून अंबेजोगाई तालुक्यांतील परळी या गांवीं कामगार कल्याण केंद्र उघडण्यांत आलें. परळी हें गांव व्यापारी पेठ म्हणून प्रसिद्ध आहे. या केंद्रांत मैदानी व बैठ्या खेळांचें साहित्य ठेवण्यांत आलें आहे. तसेंच स्त्रियांसाठीं शिवणकाम, भरतकाम शिकण्याची व्यवस्था केली आहे. या योजनेचा मुख्य उद्देश्य असा कीं, कामगार व त्याच्या कुटुंबांतील सर्व लोकांना फावल्या वेळांत या सर्व संधीचा फायदा घेतां यावा व त्यांचा वेळ विधायक कार्यांत जावा. याशिवाय या केंद्राला जोडूनच वाचनालय सुरू करण्यांत आलें आहे. लवकरच बीड व परळी येथें कामगार शिक्षण वर्ग उघडण्यांत येतील.

कामगार कल्याण

आतांपर्यंत १४८३ रुपये खर्च करण्यांत आले आहेत.

महिलाश्रम

बीड येथें १९५८ मध्यें महिलाश्रम सुरू करण्यांत आला आहे. या आश्रमांत परित्यक्त स्त्रियांना आश्रय दिला जातो. संस्थेंत पंचवीस स्त्रियांची सोय आहे. सध्या सतरा भगिनी या आश्रमाचा फायदा घेत आहेत. आतांपर्यंत नऊ आश्रमवासीयांची त्यांच्या आईबापांशीं व नवऱ्यांशीं तडजोड करून देण्यांत आली. चार भगिनींचीं लग्नें करून देण्यांत आली. पंधरा भगिनींची स्टेटहोमला बदली झाली. या महिलाश्रमांतील कांहीं मुली शाळेंत शिक्षण घेत आहेत व कांहींना आश्रमांत शिवणकाम, विणकाम आदि उपयुक्त धंदे शिकविले जातात. करमणुकीसाठीं सहली काढल्या जातात व सिनेमासुद्धां दाखविण्यांत येतो. १९५९ ते १९६० सालीं या कार्यावर ६,५५५ रुपये खर्च करण्यांत आला.

विद्युत योजना

प्रांतपुनर्रचनेपूर्वी बीड जिल्ह्यांत वीजपुरवठा झालेलीं गांवें नव्हतींच. परंतु राज्य विद्युत् मंडळानें गेल्या चार वर्षांच्या काळांत पुढील गांवांना वीजपुरवठा केला :

परळी वैजनाथ या गांवीं एकशें तीस किलोवॅट क्षमतेची अडीच मैल लांबीची लाईन बसविली. गांवांतील रस्त्यावर ९५ दिवे बसविण्यांत आले. यासाठीं दोन लक्ष चोवीस हजार पांचशें रुपये खर्च झाला.

बीड या जिल्ह्याच्या ठिकाणीं दीडशें किलोवॅट क्षमतेची साडे पांच मैल लांबीची लाईन बसविली व गांवांत १२५ दिव्यांची सोय करण्यांत आली. यासाठीं ३३३४०० रुपये खर्च आला.

बीड जिल्ह्याची विजेची गरज लक्षांत घेऊन सरकारनें जादा रक्कम देऊन माजलगांव या तालुक्याच्या ठिकाणीं वीज देण्याचें ठरविलें आहे. या गांवीं खांब उभारण्याचें काम चालू असून लवकरच अडीच मैल लांबीची लाईन बसविली जाईल. या कामावर २,६६,००० रुपये खर्च केला जाईल.

प्रत्येक तालुक्यास विद्युत पुरवठा मिळावा या दृष्टिकोनातून माजलगांव, गेवराई, अष्टी व अंबेजोगाई या तालुक्याच्या ठिकाणी वीज पुरवठा नुकताच देण्यांत आला आहे. बीड जिल्हयांतील सात तालुक्या पैकी सहा तालुक्यांना वीज पुरवठा देण्यात आला असून केज हें तालुक्याचें ठिकाण शिल्लक राहिलें आहे. अंबेजोगाई तालुक्यातील रेणापूर या गांवी ग्रामपंचायतीतर्फे विद्युत् गृह उघडण्यात आलें होतें. आतां सरकारतर्फे या ठिकाणीं विद्युत् पुरवठा करण्यात आला आहे.

निर्भेळ औषध पुरवठा

औषधांत भेसळ करून जनतेच्या प्राणाशीं खेळणाऱ्या व्यापारावर बंदी घालणारा १९४० चा ड्रग्ज ॲक्ट मराठवाडा विभागास एक ऑगस्ट १९५८ पासून लागू झाला आहे. बीड व उस्मानाबाद या दोन जिल्ह्यांसाठीं असलेले ड्रग्ज इन्स्पेक्टर, बीड यांचें कार्यालय बीड येथें फेब्रुवारी १९५९ पासून उघडलें आहे.

औषधाचें उत्पादन, वितरण व विक्री यावर दर्जा, शुद्धता इत्यादि गुणांच्या दृष्टीनें नियंत्रण ठेवलें जातें. नकली, खोटचा किंवा हलक्या प्रतीच्या औषधीवर फारच दक्षतेनें नियंत्रण ठेवलें जातें व वेळो-वेळीं त्यांचे नमुने तपासणीसाठीं घेतले जातात.

बीड आणि उस्मानाबाद जिल्ह्यांतून १५८ औषधी विक्री परवाने देण्यांत आले व १२ नाकारण्यांत आले. त्याचप्रमाणें विनापरवाना औषधांची विक्री करण्याची ८०० दुकानांना मनाई करण्यांत आली व विनापरवाना बनविलेल्या हलक्या प्रतीच्या औषधांचा सांठा वेळोवेळीं जप्त करण्यांत आला.

मासेमारीचा विकास

बीड जिल्ह्यांत चार धरणांचें काम संपलें असून सहा जलसिंचन योजनांचें काम निरनिराळ्या अवस्थेंत आहे. आतां मुबलक पाण्याचा सांठा लवकरच उपलब्ध होईल. म्हणून या स्थानीं मच्छीमारीचा विकास करण्यांत येणार आहे.

बिंदुसरा धरणाजवळील पाली या गांवीं १९५८ च्या जुलैमध्यें मच्छिमारीचें स्वतंत्र कार्यालय उघडण्यांत आलें. कलकत्त्याहून मुद्दाम कट्टा, रोहा,मृगल, या जातीचे लहान मासे आयात करण्यांत येऊन जिल्ह्यांतील रूटी, तलवार, कामळी व बिंदुसरा धरणांत त्यांची वाढ व संगोपन करण्यासाठीं सोडण्यांत आले. बिंदुसरा धरणांतील खोल पाण्यांतून मासे सहज पकडतां यावेत म्हणून कचेरीजवळ एक खास बोट असून या बोटीची रचना निराळ्या पद्धतीची आहे.

यांत्रिक पद्धतीनें मासेमारी

बीड येथें मासेमारी सहकारी संस्था स्थापन करण्यांत आली असून या धंद्यांतील अशिक्षित व मागासलेल्या लोकांना कर्ज सुद्धां दिलें जातें. एवढेंच नव्हे तर कापड, जाळें, ट्वीन व इतर मासेमारीचीं साधनें देऊन माश्यांचें उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न केला जात आहे. मासे पकडल्यानंतर त्यांची निर्यात त्वरित व सोयिस्कर व्हावी म्हणून एक खास रेफ्रिजिरेटर मोटार गाडी देण्याचा विचार आहे.

जमिन एकत्रीकरण योजना

जमिनीची तुकडेबंदी करून तुकडेजोड केल्याशिवाय शेतमालाचें उत्पादन वाढणार नाहीं, हें जाणून पूर्वीच्या हैद्राबाद सरकारनें बीड जिल्ह्यामध्यें जमीन एकत्रीकरण योजना प्रायोगिक स्वरूपांत अंमलांत आणण्याची मंजुरी एक वर्षासाठीं दिली होती व त्यासाठीं २५ गांवें निवडलीं होतीं त्या गांवांतील पोट-हिस्सा मोजण्याचें कार्य पूर्ण झालें. ही योजना हैद्राबाद शेतकी व कुळकायद अंतर्गत घेतलेल्या नियमानुसार सुरू करण्यांत आली होती. वरील पंचवीस गांवांपैकीं वीस गांवांत ब्लॉकींगचें काम पुरें झालें आहे.दोन गांवांत जमीन एकत्रीकरण योजना अंमलांत आणली गेली आहे व दहा गांवांत जमीन एकत्रीकरण योजनेचा मसुदा व चार गांवांत दुरुस्तीनंतरचा मसुदा प्रसिद्ध करण्यांत आला आहे. मुंबईचा तुकडेबंदी व तुकडेजोड कायदा मे १९५५ पासून या जिल्ह्यास लागू झाला आहे. या कायद्यानुसार बीड तालुक्यांतील ४४ गांवांना ही योजना लागू करण्यांत आली आहे. १९६० मार्च अखेर या विभागातर्फे ४५०३७ रुपये खर्च झाला आहे.

ग्राम पंचायत राज्यपुर्नरचनेपूर्वी बीड जिल्ह्यामध्यें १५७ ग्रामपंचायती स्थापन झाल्या होत्या व त्यामध्यें १५८ गांवें समाविष्ट होतीं. गेल्या चार वर्षाच्या काळांत पाचशें तीस ग्रामपंचायती स्थापन होऊन त्यामध्यें ८५२ गांवांचा समावेश करण्यांत आला. फक्त २५ गांवें ग्रामपंचायतीच्या कक्षेंत यावयाची आहेत.

ग्रामपंचायत चिटणीस ५९ उमेदवार तलाठी व ग्रामपंचायतीच्या चिटणीसाचें शिक्षण घेण्यासाठीं पाठविण्यांत आले. पास झालेल्या उमेदवारांची लवकरच नेमणूक करण्यांत येईल व त्यांना मुंबई ग्रामपंचायत कायद्यानुसार पगार दिला जाईल. बीड येथें ग्राम पंचायतचें शिक्षण तलाठयांनां देण्यासाठी शाळा उघडण्यांत आली आहे.

ग्रामपंचायतींना आपला कारभार उत्तमरीत्या चालवितां यावा म्हणून ग्रामपंचायतींना शेतसाऱ्याच्या शेकडा पंचवीस टक्के सरकारी मदत देण्यांत येते.

प्रत्येक विकास गटांत ग्रामपंचायत विस्तार अधिकारी असून विकास गट अधिकारी सहाय्यक ग्रामपंचायत अधिकारी म्हणून काम करीत असतात. जिल्ह्यांत तीन सब ऑडिटर्स नेमण्यांत आले आहेत. याशिवाय जिल्हा ग्रामपंचायत अधिकारीहि नेमण्यांत आला आहे. तालुक्याच्या ठिकाणीं पंचायत अव्वल कारकून नेमले आहेत. हा सारा नोकरवर्ग ग्रामपंचायतींना त्यांचा कारभार उत्तम रीतीनें चालविण्यासाठीं मदत करतो.

पंधरा सभासदांचें जिल्हा पंचायत मंडळ स्थापन करण्यांत आलें असून तें पंचायतीच्या कामावर देखरेख ठेवतात. जिल्ह्यांत आतांपर्यंत न्याय पंचायती स्थापन झालेल्या नाहींत व त्या स्थापण्याबावत विचार चालू आहे.

उत्पन्न व खर्च सर्व ग्रामपंचायतींचें एकूण उत्पन्न व खर्च १९५८–५९ वर्षी अनुक्रमें ४६११८६ रुपये व २५६९०९ रुपये होते.

तालुका	एकंदर खेडीं	ग्रामपंचायतींची संख्या
बीड	१६८	१०१
पाटोदा	९१	६८
अष्टी	१२०	८२
गेवराई	१५४	९९
माजलगांव... ...	१६२	९६
अंबेजोगाई ...	१६९	११६
केज	१६५	१२५
एकूण	१,०२९	६८७

विकास गटातर्फे ग्रामपंचायत प्रशिक्षण शिबिरें घेण्यांत येत असतात. शिबिरांत ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, पंच, चिटणीस व ग्रामीण लोकांना ग्रामपंचायतीच्या कारभाराबद्दल माहिती दिली जाते. तसेंच जिल्हा विकास मंडळातर्फे व विकास गटातर्फे विकास कामाबद्दल वारंवार स्पर्धा घेण्यांत येतात त्याचप्रमाणें उत्तम काम करणाऱ्या ग्रामपंचायतींना बक्षिसें दिलीं जातात. पाटोदा व रेणापूर येथील ग्रामपंचायतींनीं आपल्या गांवांत वीजपुरवठा करण्याची सोय केली आहे.

बेकारी कमी करण्याचा एक मार्ग आणि सर्वसामान्यांना नोकरीधंद्याबाबत मदत देण्यासाठीं म्हणून बीड येथें जानेवारी १९६० पासून उद्योग विनिमय विभाग उघडण्यांत आले आहेत. विभागामार्फत योग्य इसमांना योग्य ठिकाणीं नोकऱ्या देण्याची व्यवस्था केली जाते. हें कार्य विनामूल्य होतें. ज्याला नोकरी पाहिजे आहे त्यानें पोस्टानें किंवा कचेरींत येऊन अर्जाचा नमुना भरून द्यावा. अर्जाबरोबर शैक्षणिक व इतर आवश्यक शिफारसपत्रें सुद्धां द्यावींत. त्याचप्रमाणें आपला संपूर्ण पत्ता द्यावा. नंतर त्याला नोंदणीचा क्रमांक दिला जातो व तो क्रमांक येतांच त्यांना नोकरीसाठीं मुलाखतीकरितां पाठविण्यांत येते. या विभागाचा फायदा बीड जिल्ह्यांतील गरजू लोक घेत आहेत.

उद्योग विनियम विभाग

भारतांतील, प्रत्येक राज्यांतील व पर्यायानें प्रत्येक जिल्ह्यांतील पंचवार्षिक योजनेचें कार्य पुरें करण्यासाठीं जनतेंतून पैसा उभा केला जाणें जरूरी आहे. तसेंच देशांतील प्रत्येक नागरिकानें बचतीची संवय लागून या राष्ट्रकार्यास हातभार लावतां यावा या उद्देशानें सर्वत्र अल्पबचत मोहीम सुरू करण्यांत आली. अर्थात तशीच ती बीडमध्यें सुरू झाली आहे हे वेगळे सांगावयास नकोच.

अल्पबचत योजना

बीड जिल्ह्यासाठीं १९५८–५९ सालाकरितां आठ लक्ष रुपयांचें लक्ष्य देण्यांत आलें होतें. सरकारी अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, खाजगी संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था व बीड जिल्ह्यांतील जनतेनें या मोहिमेचें महत्त्व ओळखून भरपूर पाठिंबा दिला. परिणामतः तालुक्यानें दिलेल्या इष्टांकापेक्षां दुप्पट तिप्पट रक्कम गोळा केली व जिल्ह्यानें २०२८०५० रुपये राष्ट्रीय अल्पबचत योजनेंत गुंतविले. सरकारनेंहि या उत्कृष्ट कार्याबद्दल बीड जिल्ह्याच्या विकास कार्यासाठीं दोन लक्ष रुपये अधिक मंजूर केले. त्या वर्षीं द्विभाषिक मुंबई राज्यांत बीड जिल्हा पहिला आला होता.

१९५९–६० सालासाठीं अल्प बचत योजनेचा इष्टांक दहा लाख रुपयाचा होता. त्यावेळीं सुद्धां बीड जिल्ह्यानें मागील वर्षासारखीच प्रशंसनीय कामगिरी केली व ३२३९५४२ रुपये अल्पबचत योजनेंत गुंतवून महाराष्ट्र राज्यांत परत पहिला क्रमांक मिळविला. या वर्षीसुद्धां महाराष्ट्र सरकारनें तीन लाख रुपये जिल्ह्यांतील विकासाच्या कामासाठीं दिले. या पैशाचा विनियोग बीड येथें बचत मंदिर (टाऊन हॉल), सिव्हिल हॉस्पिटलमध्यें रोग्यांना व इतरांना थांबण्यासाठीं धर्मशाळा, तालीम, वाचनालय आदि बांधण्याकरितां केला जाईल.

राज्य पातळीवरील अल्पबचत ढाल बीड जिल्ह्यास मिळाली असून ती ढाल महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल श्री. श्रीप्रकाश यांच्या हस्तें बीड जिल्हाधिकारी यांना जिल्ह्याच्या वतीनें देण्यांत आली.

अल्पबचत योजनेचें कार्य बीड जिल्हा अल्पबचत मंडळातर्फे केलें जातें. या मंडळांत सरकारी अधिकारी व सामाजिक कार्यकर्ते असून प्रत्येक महिन्यांत किंवा दोन महिन्यांत मंडळाच्या सभा होत असतात.

जिल्ह्यांतील विविध विभागांनीं केलेल्या कार्याचा व प्रगतीचा वृत्तांत नकाशे, छाया चित्रें व मॉडेल्स याद्वारे संकलित करून बीड येथें जिल्हा माहिती केन्द्रांत ठेवला आहे. याशिवाय राज्यांतील प्रमुख दैनिकें, साप्ताहिकें व मासिकें तसेच सर्व प्रकारचीं माहितीयुक्त सरकारी प्रकाशनें मोफत वाचनासाठीं ठेवण्यांत आलीं आहेत. माहिती केंद्राचा फायदा बीड येथील लोक घेत आहेत. हें केंद्र प्रसिद्धि विभागामार्फत चालविलें जात आहे.

जिल्हा माहिती केंद्र

महाराष्ट्र सरकारच्या प्रसिद्धि विभागाच्या ग्रामीण रेडिओ विभागातर्फे सामुदायिक श्रवणासाठीं ग्रामपंचायती, सहकारी संस्था, नरगपालिका व इतर अनेक संस्थांना रेडिओ मिळूं शकतात. सुरुवातीला

सामुदायिक श्रवणा- साठीं रेडिओ

रेडिओ बसविण्याची वर्गणी १७५ रुपये व वर्षभराचा दुरुस्ती व बॅटरीचा खर्च ६० रुपये भरावा लागतो. त्यानंतर दर वर्षाला साठ रुपये वर्गणी लागते. या योजनेचा मुख्य उद्देश बहुसंख्य ग्रामीण जनतेस बाहेरच्या जगांत होत असलेल्या घडामोडींची माहिती देणें, शिवाय अनेक सरकारी कार्यक्रम व वार्ता त्यांच्या कानीं पडाव्यात व त्यांना करमणूकी-द्वारा शिक्षण मिळावें हा होय. या विभागामार्फत १२ रेडिओ सेटस् आतांपर्यंत बसविण्यांत आले. बीड येथें ही कचेरी डिसेंबर १९६० पासून उघडण्यांत आली आहे.

मागास जाती व जमाती

बीड जिल्ह्यांत हरिजन समाजाची लोकसंख्या एक लाख पन्नास हजार असून गिरीजन (भिल्ल)
लोकांची संख्या दोन हजार आहे. विमोचित जातींमध्यें वडार, कैकाडी, फांसेपारधी व लमाण आदि
जातींचा समावेश आहे. विमोचित जातींची संख्या सव्वीस हजार आहे.

मागासलेल्या जातींचा सर्वांगीण विकास होण्यासाठीं समाज कल्याण विभाग सर्व दृष्टीनें प्रयत्न
करीत आहे. याशिवाय केज तालुक्यांतील धारूर विभागांत मागासलेला वर्ग अधिक असल्यामुळें तेथील
३९ खेडयांना सर्वोदय योजना १९५८ सालापासून लागू करण्यांत आली आहे. या विभागांत
भरीव प्रयत्न करून मागासलेल्या जातींची उन्नति घडवून आणणें हा या योजनेचा उद्देश आहे
हरिजन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अस्पृश्य वर्गांतील पोटजाती सर्व महाराष्ट्रांत पसरलेल्या असल्यानें
त्यांची वेगळी ओळख करून देण्याची गरज नाहीं. परंतु विमोचित, गिरीजन, आदिवासी आणि वर्गीकृत
जातींत येणाऱ्या जातीजमातींचे लोक आपल्या राज्याच्या कांहीं भागांत आढळतात. त्यापैकीं, ज्या
जातीजमातींचे लोक बीडमध्यें स्थायिक झाले आहेत त्यांची थोडक्यांत माहिती पुढें दिली आहे.

या जमातीला महाराष्ट्राच्या बऱ्याच भागांत वंजारा किंवा बंजारी म्हणूनहि ओळखतात. ऐति-
सिक काळांत यांचा व्यवसाय बहुधा व्यापाराचा असावा. लमाणाचे तांडे व्यापारासाठीं महाराष्ट्रांत नेहमीं
संचार करीत असतात असे उल्लेख इतिहासांत ठायी ठायी आढळतात. वाहतुकीची जलद
साधनें उपलब्ध झाल्याने कालांतरानें यांचा पूर्वपरंपरागत पेशा नष्ट झाला आणि हे लोक
भारतभर ठिकठिकाणीं स्थायिक झाले. ईशान्य, उत्तर आणि आग्नेय या दिशांच्या दरम्यान
महाराष्ट्र राज्याचा जो अर्धचंद्राकृति भाग येईल त्या भागांत लमाणांचे तांडे मोठ्या संख्येनें आहेत. बीड
जिल्ह्याच्या बीड, गेवराई, माजलगांव, अंबेजोगाई, अष्टी अणि केज तालुक्यांतील कांहीं खेडयांत
यांचे तांडे आहेत.

लमाण

लमाणी लोकांच्या विशेषतः स्त्रियांच्या पेहरावावर राजस्थानी पेहरावाची दाट छाप आहे.
शिवाय त्यांच्या बोलींत (लमाणी) मारवाडी, मेवाडी, गुजराती शब्दांचें प्राबल्य आहे. शब्दांचे उच्चार
करण्याची पद्धत मारवाडीसारखी. त्यामुळें मुळांत हे लोक मारवाडनिवासी असावेत.
लमाणी समाजांतील सुशिक्षितांत आपण रजपूत असल्याचा समज आहे. लमाण
स्त्रियांचा पोशाख रंगीबेरंगी असतो. आणि चांदी व हस्तिदंताचे दागिने त्या फार
प्रमाणांत वापरतात. हे लोक शिवपूजक आहेत. शिक्षणाचें प्रमाण लमाणी समाजांत अगदीं कमी. लमाणी
तांड्यांतील घरें देखील अगदीं निकृष्ट असून मुख्यतः गवत व बांबूची असतात. मातीचें घर क्वचित आढळतें.

लमाणी स्त्रियांचा पोषा

वडार लोकांची वस्ती बीड, अंबेजोगाई, परळी, अष्टी, आडगांव, गढी, खोपकरमोहा, उखंडा
आदि खेडयांत असून हे लोक दगड फोडण्याचा धंदा प्रामुख्यानें करतात. पुरुष धोतर व सदरा आणि

वडार स्त्रिया साड्या वापरतात. त्या अंगांत चोळी घालीत नाहींत. स्त्रियांना चांदीच्या दागिन्यांची आवड असते. यांचीं घरें गवत, वेळू, तट्टे किंवा पत्र्यांचीं असतात . हे लोक म्हशी व रेडे फार प्रमाणांत पाळतात. मंगाई त्यांचें मुख्य दैवत. तेलगु आणि मराठीच्या मिश्रणांतून यांची बोली तयार झाली आहे. उच्चार-साधर्म्य तेलगुशीं. यात्रा, उत्सव व रोगराईच्या प्रसंगीं हे लोक प्राण्यांचा बळी देतात. इतर जातींमध्यें कैकाडी लोक टोपल्या विणण्याचा धंदा करतात. गाढवें ही या लोकांची प्रमुख संपत्ति. वन्य श्वापदाची पारध करून त्यावर उदरनिर्वाह करणाऱ्या पारधी जमातीचीही वस्ती जिल्ह्यांत आहे. पागोटे व लंगोटी हीं पुरुषांचीं वस्त्रें. स्त्रिया साडी नेसतात व चोळी घालतात. हे लोक श्रीकृष्णाची पूजा करतात. केज तालुक्यांत आसोला व यवता या गांवीं कांहीं वासुदेवहि राहतात.

लमाण, वडार, कैकाडी व पारधी लोकांच्या प्रगतीसाठीं खालील योजना अंमलांत आणल्या जात आहेत.

विमोचित जातीसाठीं कल्याण योजना

माजलगांव तालुक्यांतील रोजेगांव या गांवीं वरील जातींसाठीं स्वतंत्र शाळा स्थापन करून ३५ लमाणी विद्यार्थ्यांना फुकट शैक्षणिक सोयी उपलब्ध करून दिल्या आहेत. १६३ लमाणी विद्यार्थ्यांना ४९०२ रुपयांच्या शिष्यवृत्त्या देण्यांत आल्या. वसतिगृहांतील विमोचित विद्यार्थ्यांना ६६२५ रुपये देण्यांत आले. लमाणी लोकांना सात बैलजोड्या देण्यांत आल्या. त्यासाठीं २,१०० रुपये खर्च करण्यांत आले. लोखंडी नांगर, बीबियाणें आदि शेतीच्या साहित्यासाठीं ३७ कुटुंबांना ७०३ रुपये देण्यांत आले. राजूरी नवगण, परळी येथील वडार सहकारी संस्थांना प्रत्येकी एक हजार रुपये, बीड येथील वडार सोसायटीस दोन हजार रुपये देण्यांत आले. परळी येथें वडार लोकांसाठीं १७,००० रुपये खर्च करून एक चाळ बांधून देण्यांत आली.

अस्पृश्यता निवारण योजना

आतांपर्यंत ६० नवीन विहिरी बांधण्यांत आल्या व १५ जुन्या विहिरींची दुरुस्ती करण्यांत आली. यासाठीं ४८,३२३ रुपये खर्च करण्यांत आले. यामुळें हरिजनांना पिण्यासाठीं पाणी मिळण्याची सोय झाली. ग्रामीण विभागांत घरें बांधण्यासाठीं ३१ एकर २९ गुंठे जमीन देण्यांत आली. त्यासाठीं ८,२०६ रुपये खर्च करण्यांत आले. चष्मे, कृत्रिम दांत व इतर वैद्यकीय मदतीसाठीं १४४ हरिजनांना ६३४९ रुपये औषधीच्या रूपानें देण्यांत आले. सामाजिक ऐक्य साधण्यासाठीं तीन आंतरजातीय विवाहांना ६०० रुपयांची मदत देण्यांत आली. ६९ हरिजन कुटुंबांना धंदा करून स्वावलंबी होता यावें म्हणून १०,६५४ रुपयांची मदत देण्यांत आली. हरिजनांना पुनर्वसनासाठीं चांगलीं घरें मिळावीं म्हणून १६२ कुटुंबांना घरें बांधण्यासाठीं १३४९९ रुपये देण्यांत आले. ६६६ हरिजन विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य घेतां यावें म्हणून ९,२४० रुपये खर्च करण्यांत आले. गेवराई, तालखेड व बनसारोळा या गांवीं ११००० रुपये खर्च करून सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमासाठीं समाज मंदिरें बांधण्यांत आलीं. तसेंच आठ वसतिगृहांना १९,९७१ रुपये अनुदान देण्यांत आलें. दहा कुटिरोद्योग संस्थांना १५,००० रुपये मदत देण्यांत आली. पाली येथें ५० घरें बांधण्यासाठीं २७३५५ रुपये खर्च करण्यांत आले. बनसारोळा येथील बालवाडीला २९६ रुपयांची मदत देण्यांत आली. ९९८ हरिजन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या म्हणून १५४८१ रुपये देण्यांत आले.

दुधाचा धंदा करण्यासाठीं गाई व म्हशी विकत घेतां याव्या म्हणून आठ हरिजनांना २,४०० रुपये देण्यांत आले. अस्पृश्यांना गांवाच्या मध्यवस्तींत स्पृश्य हिंदूंनीं आपलीं घरें भाड्यानें दिलीं म्हणून सरकारकडून सवर्ण हिंदूंना २४ रुपयांची मदत देण्यांत आली. केन्द्रीय सरकारच्या मदतीनें बीड तालुक्यांतील नवगण राजूरी येथें हरिजनांचीं १०० घरें बांधण्यांत आलीं असून त्यासाठीं ७५,००० रुपये

खर्च करण्यांत आला. याव्यतिरिक्त शेतीकरितां १०० बैल देण्यांत आले. या कार्यावर १७०० रुपये खर्च करण्यांत आला. प्रत्येक कुटुंबासाठीं सहा एकर जमीन व त्यासाठीं लागणारीं उपकरणें विकत घेऊन देण्यांत आलीं. फळझाडांच्या लागवडीसाठीं सहा एकर जमीन १२ कुटुंबाना देण्यांत आली. एवढेंच नव्हे तर एक ऑईल एंजिन व पंप पण देण्यांत आला आहे.

मागासलेल्या वर्गास मदत

मागासलेल्या वर्गांतील ११२ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ति म्हणून ६५९० रुपये व ३४ विद्यार्थ्यांना २२६० रुपये आर्थिक सहाय्य देण्यांत आलें. हे सर्व विद्यार्थी शाळेंत शिक्षण घेत आहेत. आठ मागासलेल्या कुटुंबांना ६७९ रुपये धंद्यासाठीं मदत म्हणून देण्यांत आले. खाजगी वसतिगृहासाठीं ११२७५ रुपये सहाय्य देण्यांत आलें. वार्षिक ९०० रुपयांपेक्षां कमी उत्पन्न असणाऱ्या सर्व जातींतील १,००२ विद्यार्थ्यांना ३१,९४५ रुपये शिक्षणासाठीं देण्यांत आले.

बीड जिल्हा सर्वोदय योजना

१९५६ सालीं त्यावेळच्या द्विभाषिक राज्यांत मराठवाड्याचा अंतर्भाव झाल्यावर बीड जिल्ह्यांत धारूर विभागांत सर्वोदय योजना लागू करण्यांत आली. त्यापूर्वी मराठवाड्यांत सर्वोदय योजना नव्हती. सर्वोदय केन्द्राचें उद्घाटन दिनांक १५ मार्च १९५९ रोजीं झालें.

ही सर्वोदय योजना ज्या भागांत लागू केली आहे तो पट्टा सुमारे २० मैल लांब व दहा मैल रुंदीचा असून अत्यंत डोंगराळ आहे. या भागांतील लोकवस्ती मुख्यतः मागासलेल्या वर्गाची. सध्यां कळंब ते माजलगांव या नव्या रस्त्याचें बांधकाम चालूं आहे. या सडकेशिवाय एकहि रस्ता या भागांत नाहीं. यापूर्वी तर जिल्ह्यांतील इतर भागाशीं या भागाचें दळणवळणच नव्हतें. या भागांत राहणाऱ्या मागासलेल्या वर्गांत लमाणी लोक बहुसंख्य आहेत. हे लोक मागासलेले असले तरी वृत्तीनें धार्मिक असल्यानें आषाढी कार्तिकेला पंढरपूरच्या वाऱ्या चालू असतात.

उद्योगधंदे

सर्वोदय विभागांत एकंदर ३९ खेडीं असून त्यांची लोकवस्ती २५ हजार आहे. शेतीवर सर्व प्रकारचे प्रयत्न करूनहि वर्षाला पुरेल एवढें धान्यसुद्धां शेतकरी काढूं शकत नाहीं. येथील जमीन हलक्या प्रकारची असल्यामुळें फक्त खरीप पीकच घेतलें जातें. या कारणास्तव शेतीचें काम मिळविण्यासाठीं जिल्ह्यांतील गोदावरी नदीच्या कांठीं असलेल्या गांवांकडे तात्पुरतें स्थानांतर करण्याची प्रवृत्ति या लोकांत फार. गुरें व मेंढ्या पाळणें हा दुसरा प्रमुख धंदा. या भागांत सुमारे ५७ हजार गुरें आहेत. जमीन हलकी असल्यामुळें गुरें पाळून दूधदुभत्याचा धंदा कांहीं प्रमाणांत हे लोक करतात.

पिण्याच्या पाण्याकरितां विहीर

या भागांतील लोकांना उन्हाळ्यांत प्यावयास पाणी मिळणें देखील कठीण. जें कांहीं पाणी उपलब्ध आहे तें सुद्धां फारच दूर अंतरावरून आणावें लागतें. एवढेंच नव्हे तर हें अंतर कापतांना टेकड्या चढाव्या व उतराव्या लागतात. नद्यानाले सारे उन्हाळ्यांत सुकतात. ही अडचण दूर करण्यासाठीं घागरवाडा या गांवीं हरिजन लोकांसाठीं पिण्याच्या पाण्याची विहीर बांधण्याकरितां ५०० रुपयाचें सहाय्य देण्यांत आलें. मौजे पिंपळा व ढगेवाडी येथील लोक विहिरीचें काम करीत असल्यामुळें त्यांनाहि आर्थिक मदत देण्याचा केन्द्र सरकार विचार करीत आहे. आरोग्याच्या दृष्टीनें दोन तीन गांवांत सफाईचे कार्यक्रम घेण्यांत आले. केन्द्रांत औषधाची पेटी ठेवण्यांत आली असून जनतेस हीं औषधें विनामूल्य दिलीं जातात.

या भागांत वडवणी हें मोठें गांव असून त्या ठिकाणीं एक माध्यमिक शाळा आहे. केन्द्र स्थापन होण्यापूर्वी या ठिकाणीं २४ प्राथमिक शाळा होत्या. आज ती संख्या ३३ वर गेलेली आहे. केन्द्रातर्फे दहीफळ

शिक्षण या गांवीं एक प्राथमिक शाळा उघडण्यांत आली आहे. विद्यार्थ्यांची संख्या ४५ असून एक शिक्षक काम करीत आहे. मागील वर्षी कोठारबंद व धुनुकवाड या गांवीं प्रौढ शिक्षण वर्ग उघडण्यांत आले. दोन्ही वर्गांत निरक्षर प्रौढांची उपस्थिती समाधानकारक होती. मौजे पिंपळा व हिंगणी या ठिकाणीं नवीन वर्ग उघडण्याचा केंद्र सरकार विचार करीत आहे.

सहकार वडवणी या गांवीं हातमाग उत्पादक मजूर संघ या संस्थेशिवाय दुसरी कुठलीहि औद्योगिक सहकारी संस्था या केंद्रांत नाहीं. केंद्र स्थापन होण्यापूर्वी दोन तीन सहकारी पतपेढ्या होत्या. आज १८ सेवा सहकारी संघांची स्थापना झाली असून मौजे धुनुकवाड व दहीफळ येथें सामुदायिक शेती करण्याबाबत प्रयत्न चालू आहे.

ग्रामपंचायती यापूर्वी फक्त नऊ-दहा ग्रामपंचायती होत्या. परंतु आज केंद्रांतील एकूण ४० गांवें व १८–१९ तांडे ग्रामपंचायतीच्या कक्षेंत आलेलीं आहेत.

शेती तीन नांगर, दोन डस्टींग मशिन, दोन स्प्रेअर्स, एक सीड ड्रिलींग मशिन, एक चारा कापण्याचें मशिन, एक ऑईल एंजिन व एक पंपिंग सेट व एक केणी केंद्रांत ठेवली असून या सुधारलेल्या औजारांचा उपयोग शेतकरी वर्ग हंगामांत घेत असतो. एवढेंच नव्हे तर बी-बियाणें, रासायनिक खतें व कीटकनाशकें घेण्यासाठीं गरजूंना योग्य ती मदत केंद्रांतर्फे केली जाते. याचप्रमाणें सुधारलेलीं अवजारें व चांगल्या वळूंसाठीं सुद्धां आर्थिक मदत दिली जाते.

केन्द्राचें इतर कार्य या केंद्रांत दारूबंदी सप्ताह, ग्रामसुधार सप्ताह, वनमहोत्सव सप्ताह आदि सप्ताहाबरोबर राष्ट्रीय दिनसुद्धां साजरे केले जातात. यावेळीं निरनिराळ्या गांवांत कलापथकाचे कार्यक्रम उदा. भजनें, कीर्तनें, भाषणें वगैरे कार्यक्रम घेतले जातात. सिनेमाद्वारें इतर अनेक विकास कार्याची ओळख करून देण्यांत येते.

अल्पबचत योजना कार्य सर्वोदय केंद्रांतील बहुतेक लोक मागसलेल्या वर्गांतील असल्यामुळें त्यांची आर्थिक परिस्थिति समाधानकारक नाहीं. शिवाय परंपरागत संवयीमुळें पैसा हातांत टिकत नाहीं. सबब बचतीची संवय लावल्याशिवाय या लोकांची आर्थिक परिस्थितींतील हंगामी चढउतार संपुष्टांत येणार नाहीं. या उद्देशानें या भागांत अल्पबचतीचा प्रचार करण्यांत आला. परिणामत: येथील लोकांनीं १९५९–६०वर्षी सुमारे५०,०००रुपये अल्पबचतींत गुंतविले. विशेष म्हणजे केंद्रांतील तरनाळी या गांवास 'बचत ग्राम'होण्याचा मान मिळाला. तालुका बचत समितीनें मौजे पिंपरवाडा येथें एक सार्वजनिक विहीर तयार करून देऊन या भग्गांतील लोकांच्या कार्याचा गौरव करण्याचें ठरविलें आहे. तसेच जिल्हा लोकड बोर्डातर्फे तरनाळी येथें एक विहीर, एक धर्मशाळा व काळूच्या वाडीपर्यंत एक जोड रस्ता तयार करून देण्याचें आश्वासन दिलें आहे.

सर्वोदय केंद्राची मंजूर झालेली रक्कम व खर्च १९५८–१९५९

कामाचा तपशील	मंजूर रक्कम	झालेला खर्च
	रुपये	रुपये
ऑफिस व शेतीचें साहित्य ...	......	४,५००
घागरवाडा येथील हरिजन विहिरीस मदत	६,३२०	५००
	६,३२०	५,०००

१,३२० रु. खजिन्यांत भरले

स्थानिक स्वराज्य संस्था

बीड जिल्ह्यांत, अंबेजोगाई बीड व परळी वैजनाथ येथें नगरपालिका कार्य करीत असून अष्टी, गेवराई, धारूर व माजलगांव या ठिकाणीं टाऊन कमिटचा आहेत. केज व पाटोदा येथें ग्रामपंचायती कार्य करीत असतात.

लोकनियुक्त जिल्हा लोकड बोर्डाची स्थापना १९५८ सालीं झाली असून बोर्डाची स्वतंत्र इमारत बीड येथें आहे. बोर्डाचे एकंदर सभासद १७ आहेत. बोर्डानें केलेल्या कार्याचा तपशील खालीलप्रमाणें आहे.

जिल्हा लोकल बोर्डाचीं कामें

पाणी पिण्याच्या विहिरी ...	२८
सडका	६
शाळेच्या इमारती	७६
चावडी, पंचायती हॉल ...	१७
एकूण ...	१२७ कामें

हीं कामें डिसेंबर १९५९ अखेर पूर्ण करण्यांत आलीं आहेत. पुढील कामें चालूं आहेत.

विहिरी	१६
शाळेच्या इमारती	६७
सडका	५
चावड्या	१३
एकूण ...	१०१ कामें

आतांपर्यंत झालेल्या खर्चाचा तपशील

वर्ष	मंजूर रक्कम रुपये	खर्च रुपये
१९५६–५७	१,१०,०००	१,१०,३८७
१९५७–५८	१,१७,५००	९२,४४२
१९५८–५९	१,६७,५००	१,५६,६९१
१९५९–६०	१,६३,०००	३४,६१९
		(डिसेंबर १९५९ अखेर)

परळी वैजनाथ नगरपालिका बीड जिल्ह्यांतील सर्वांत प्रगत नगरपालिका असें हिचें सार्थ वर्णन करतां येईल, इतक्या चांगल्या सुधारणा या नगरपालिकेनें आपल्या क्षेत्रांत केल्या आहेत. इ. स. १९५२ मध्यें परळी येथें टाऊन कमिटीची स्थापना झाली व इ. स. १९५३ मध्यें टाउन कमिटीचें रूपांतर नरगपालिकेंत करण्यांत आलें.

सध्यां या नगरपालिकेचे १७ सभासद असून नगरपालिकेच्या अधिकारक्षेत्राखालीं १४१५ एकर क्षेत्रफळ आहे. परळी गांवांत अंदाजें ३,००० घरें असून लोकसंख्या २२,००० च्या आसपास आहे. गांवांत विजेची सोय आहे.

नगरपालिकेतर्फे झालेलीं कामें--

कामाचा तपशील	झालेला खर्च
तीन मैल दोन फर्लांगाच्या सिमेंट सडका	२,९०,०००
सात मैल एक फर्लांग खडीच्या सडका	१,७०,०००
गणेशपार मोंढा रस्त्यावरील पूल	३२,०००
लेंडी नदीवर ह्यूम पाइपचा लहान पूल ...	२७,०००
गटारांचें बांधकाम	२६,०००
प्रमुख ठिकाणीं पांच विहिरी	१९,०००
गंज स्टेशन रस्त्यावरील पूल	१२,०००
नगरपालिकेच्या इमारतीचें बांधकाम	१२,०००
डाक बंगला	१०,०००
महाराणी लक्ष्मीबाई टॉवर	५,०००
बैलांसाठीं शेड	३,०००
स्मशान भूमि आच्छादन	३,०००
कोंडवाडा	२,०००

कमी उत्पन्न असणाऱ्या लोकांना राहण्यासाठीं लवकरच घरें बांधलीं जातील. याशिवाय टाऊन हॉल, सार्वजनिक बाग व पाणीपुरवठा योजना नजिकच्या भविष्यांत हातीं घेऊन जनतेच्या सुखसोयींत वाढ करण्याचा नगरपालिकेचा विचार आहे.

बीड नगरपालिका बीड येथील नगरपालिकेची सन १९५२ मध्यें प्रथमतः निवडणूक घेण्यांत आली. सध्या नगरपालिकेचे १७ सभासद आहेत.

गेल्या ८ वर्षांच्या काळांत नगरपालिकेनें साडेतीन मैल लांबीचे सिमेंट रस्ते जवळ जवळ एक लाख रुपये खर्च करून, बिंदुसरा नदीवरील पूल २० हजार रुपये खर्च करून, सार्वजनिक संडास व मुताऱ्यांचें काम व ३५हजार रुपये खर्च करून गांवांतील गटारें अशा प्रकारे जवळ जवळ पांच लाख रुपयांचीं जनतेच्या हिताचीं कामें आतापर्यंत केलीं आहेत. चालू वर्षांत नगरपालिकेनें आपल्या कार्यालयासाठीं स्वतःची इमारत सुद्धां बांधली आहे. १९५९-६० मध्यें घरपट्टीमध्यें वाढ करून नगरपालिकेनें आपलें उत्पन्न २,४४,००० रु. पर्यंत वाढविलें आहे. याशिवाय अंदाज-पत्रकसुद्धां ५०,००० रुपये वाढीचें केलें आहे. सध्या गांवांतील डांबरी

सडका, संडास, मुताऱ्या आदि कामें नगरपालिकेनें हातीं घेतलीं असून महाराष्ट्र सरकारनें २२,००,००० रु. खर्चाच्या नळयोजनेस मान्यता दिली आहे.

तीन एकर जमिनीमध्यें नरगपालिकेतर्फें नागरिक उद्यान तयार करण्यांत आलें आहे.

अंबेजोगाई नगरपालिका

अंबेजोगाई हें जिल्ह्यांतील उपविभागाचें ठिकाण आहे. येथील नगरपालिकेच्या १९५४ च्या फेब्रुवारी महिन्यांत प्रथमतः निवडणुका घेण्यांत आल्या. नगरपालिकेचे एकंदर १७ सभासद आहेत.

नगरपालिकेनें केलेलीं कार्यें

(१) शहराच्या विकासाच्या दृष्टीनें नवीन घरें बांधण्यासाठीं चार एकर जमीन दिली. त्यांत नवीन २५ घरें बांधून तयार झालीं आहेत. या कॉलनीजवळच ३०० रुपये वार्षिक भाड्यानें १५ वर्षाच्या करारानें पेट्रोल पंपाकरितां जागा दिली आहे. तसेच दोन सिनेमागृहासाठीं सुद्धां जागा देण्यांत आली आहे. विकास गट कार्यालयासाठींहि नगरपालिकेनें जागा दिली आहे. कारखान्यास उत्तेजन देण्यासाठीं कापूस व जिनिंग फॅक्टरीसाठीं जागा देऊन नवीन कारखाना स्थापन करण्यांत आला. मोटार स्टँड नवीन जागेवर हालवून जनतेची मोठी गैरसोय दूर करण्यांत आली.

यावर्षी २०,००० रुपये खर्च करून सहा फर्लांग सिमेंट सडक लवकरच तयार करण्यांत येईल. त्याप्रमाणें वीजपुरवठा करण्यासाठीं गांवांची पहाणी झाल्यानंतर शहरांत वीजपुरवठा देण्यांत आला आहे.

१९४३ मध्यें नळयोजना सुरू करण्यांत आली असून प्रत्येक माणसीं दहा गॅलन पाणीपुरवठा प्रत्येक दिवशीं होत असतो. यासाठीं झालेला ४ लाख रुपये खर्च कर्ज रूपानें सरकारकडून घेण्यांत आला.

नगरपालिकेचें उत्पन्न व खर्च

वर्ष			जमा रुपये	खर्च रुपये
१९५७–५८	...	...	८१,९३६	६३,३४२
१९५८–५९	...	...	५४,३६३	८५,०३५
१९५९–६०	...	...	३९,९५३	५७,०५७
	एकूण	...	१,७६,२५२	२,०५,४३४

माजलगांव पूरपालिका

माजलगांव लोक नियुक्त पूरपालिका १९५८ सालीं स्थापन करण्यांत आली. यावेळीं पूरपालिकेची आर्थिक स्थिति वाईट होती. पूर पालिकेजवळ १५,५०० रुपये फक्त शिल्लक होते. त्यामुळें पूर पालिकेनें वसुलीकडे अधिक लक्ष देऊन ३६३४ रुपये वसूल केले. उत्पन्न मिळविण्याच्या दृष्टीनें धंदेवाईक कर, वाहन कर, गुराढोरांवर कर, बांधकाम फी, सर्टिफिकेट फी आदि मार्गांनीं पूरपालिका आपली आर्थिक स्थिति सुधारण्याचा प्रयत्न करीत आहे. या दृष्टीनें पूरपालिकेनें २८ एकर जमीन ताब्यांत घेऊन ५५ प्लॉटसचे लिलाव केले. या प्लॉट्सच्या एकूण २,७०,६०० रु. किंमतीपैकीं २,१४,६०६ रुपये रोख जमा झाले आहेत. त्यामुळें पूरपालिकेची आर्थिक स्थिती बऱ्याच प्रमाणांत सुधारली.

गांवांतील सात गॅस बत्त्यांची संख्या तेरावर नेऊन गांवांतील सर्व रस्त्यांवर दिव्यांची सोय केली आहे. तसेच केरकचरा वाहण्यासाठीं एक गाडी विकत घेतल्यानें गांवाची स्वच्छता सुधारली. या गाडीच्या जोडीला तीन हातगाड्या घेण्यांत आल्या. गांवांतील कचरा वाहण्यासाठीं त्यांचा उपयोग होतो. गांवांत सहा डांबरी सडका बांधावयाचें निश्चित झालें असून या योजनेसाठीं ४४,७०६ रुपये खर्च येणार आहे. त्यापैकीं ३६,००० रुपयांचें अंदाजपत्रक वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे मंजुरीस पाठविण्यांत आलें आहे. मंजूरी मिळताच कामास सुरुवात केली जाईल

नगरपालिकेनें केलेलीं कामें

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळातर्फे या गांवाला वीज देण्याचें निश्चित झालें असून विद्युत् उपकरणें व साहित्य गांवांत आलेलें आहे. विद्युत् योजनेसाठीं गांवांत खांब रोवण्याचें काम चालू असून येत्या महिन्या दोन महिन्यांत गांवांत वीज येईल. तसेच नागरिकांना पिण्याच्या शुद्ध पाण्याचा पुरवठा व्हावा म्हणून २,९८,००० रुपयांची योजना सरकारकडे पाठविली असून पाहणीसाठीं योग्य ती अनामत रक्कम सुद्धां पालिकेनें भरली आहे. या योजनेमुळें पाण्यांतील जंतूंपासून उद्‌भवणाऱ्या रोगांपासून जनतेचें संरक्षण करतां येईल. गांवांत सर्वत्र गटारें बांधण्याची योजना हातीं घेण्यांत येणार असून त्याबाबतचें अंदाजपत्रक तयार होत आहे.

वीजपुरवठा

गेवराई येथें १९५४ सालीं पूरपालिकेची स्थापना झाली असून सध्या तिचे बारा सभासद आहेत. पालिकेनें आतांपर्यंत केलेल्या कामाचा तपशील खालील प्रमाणें.

गेवराई पूरपालिका

कामाचा तपशील	झालेला खर्च
	रुपये
गांवांतील रस्त्यावर मुरुम टाकणें	१,०००
दोन स्लॉटर हाऊस (कत्तल खाने)	१,५००
स्त्रियांसाठीं चार संडास	५,०००
हरिजन लोकांसाठीं चावडी	५००
चार विहिरींची दुरुस्ती	१,०००
हरिजन वाड्यांतील चावडीची दुरुस्ती ...	३००
बस स्टॅन्डवर पाणी पिण्यासाठीं पंप ...	७००
बस स्टॅन्डवर धर्मशाळा	......
बालक मंदिरास व महिला मंडळास मदत ...	१,०००

या शिवाय १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धाच्या स्मरणार्थ बस स्टॅन्डवर स्तंभ उभारण्यांत आला आहे त्याच्या बाजूस बसण्यासाठीं ओटे व शोभेसाठीं झाडें लावण्यांत आलीं आहेत. तसेच कोल्हेरवेस ते मोमीनपुऱ्यापर्यंत पक्की सडक करण्यांत आली.

सदर बाजारांतील डांबरी सडकेसाठीं १३,५६५ रुपयांची मंजूरी मिळाली असून लवकरच हें काम सुरू करण्यांत येईल. गांवांतील पाणीपुरवठ्याच्या नळ योजनेसाठीं ३७,०६,००० रुपयांची योजना वरिष्ठ अधिकाऱ्याकडे योग्य त्या कारवाईसाठीं पाठविण्यांत आली आहे. विद्युत् विभागातर्फे पाहणी झाली असून लवकरच वीजपुरवठा मिळेल अशी अपेक्षा आहे.

हातीं घेण्यांत येणाऱ्या योजना

धारूर हें केज तालुक्यांतील प्रमुख गांव आहे. १९५८ च्या जून महिन्यांत लोकनियुक्त पालिकेची स्थापना करण्यांत आली असून पालिकेचे एकूण बारा सभासद आहेत.

धारूर पूरपालिका

केरकचरा वाहण्यासाठीं दोन सफाई गाड्या, भंग्यास मैला वाहण्यासाठीं दोन गाड्या, कचरा सांठविण्यासाठीं वीस लोखंडी पिंप, उंदरांचे वीस पिंजरे, चार पेट्रोमॅक्स आदि नित्योपयोगी साहित्य विकत घेण्यांत आलें असून जुन्या गटारांची दुरुस्ती, बारा कमान समोरील रस्त्याची दुरुस्ती, खन्नापूर वेशीजवळील कच्च्या रस्त्याची दुरुस्ती, मारुतीचें देऊळ ते पोलीस ठाण्यापर्यंत मुरुमाचा रस्ता व गटारें, काशिनाथ चौक ते बारीक वाड्यापर्यंत नाल्यांचें बांधकाम, इत्यादि कामासाठीं १४,२९८ रुपये खर्च करण्यांत आला आहे. याशिवाय कंपोस्ट खताचे खड्डे खोदून घेणें, झाडें लावणें आदि कार्यक्रमांत नगरपालिका उत्साहानें भाग घेते.

पालिकेनें केलेलें कार्य

नळयोजनेसाठीं एकूण ३२,०१,६०० रुपये खर्च होणार आहे. यापैकीं निम्मी रक्कम सरकार देणगीरूपानें देईल व पूरपालिकेतर्फे निम्मी रक्कम म्हणजे १६,००,८०० रुपये लवकरच गोळा करण्यांत येतील. ही योजना सरकारतर्फे मंजूर करण्यांत आलेली आहे.

हातीं घ्यावयाच्या नवीन योजना

गांवांत वीज आणण्यासाठीं पूरपालिका योग्य ते प्रयत्न करीत आहे. याशिवाय सूतिका गृह, सरकारी दवाखान्यांतील कर्मचारी वर्गासाठीं घरें, ग्रंथालय, बालक मंदिर, व्यायाम शाळा, करमणूक केंद्र, आश्रमालय, दोन मैल लांबीच्या कच्च्या सडका व गटारें, संडास व मुताऱ्या हीं कामें शक्य तोंवर विकास गटाच्या मदतीनें पूरपालिका पूर्ण करील. सध्या पालिकेजवळ दहा हजार रुपये शिल्लक आहेत.

अष्टी हें तालुक्याचें ठिकाण असून येथील लोकसंख्या नुकत्याच झालेल्या खानेसुमारीप्रमाणें ५,८२३ आहे. येथील लोकनियुक्त पूरपालिका १९५४ मध्यें स्थापन करण्यांत आली. पालिकेचे एकंदर अकरा सभासद आहेत.

अष्टी पूरपालिका

उतारूंकरितां एक विश्रांति गृह, बाजारांत विक्री करणाऱ्यांच्या सोईसाठीं ओटयांचें व स्त्रियांसाठीं प्रसूतिगृहाचें बांधकाम करण्यांत आलें व जनावरांचा दवाखाना उघडला. मोटार स्टॅन्ड ते गांवापर्यंत पुलाचें काम, सडकांची दुरुस्ती व मुरूम रस्ता हीं कामें केलीं.

पालिकेनें केलेलें कार्य

विद्युत् योजना, नळ योजना या दोन प्रमुख योजना लवकरच पुऱ्या करण्यासाठीं पालिका प्रयत्न करीत आहे. पालिकेचें उत्पन्न वाढविण्यासाठीं धंदेवाईक कर, जकात, कर, आदि कर बसवून उत्पन्न वाढविण्यांत आलें.

हातीं घेण्यांत येणाऱ्या योजना

सार्वजनिक संस्था

चंपावती शिक्षण संस्था

बीड गांवांतील ही सर्वांत जुनी संस्था असून या संस्थेतर्फे चंपावती विद्यालय चालविलें जातें या विद्यालयांत प्राथमिक शिक्षणापासून मॅट्रीकपर्यंत शिक्षण मिळण्याची सोय आहे. विद्यालयासाठीं संस्थेची स्वतंत्र इमारत आहे.

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ

या संस्थेची शाखा बीड येथें १९६० सालीं स्थापन करण्यांत आली. या शैक्षणिक संस्थेतर्फे बीड येथें जून १९६० पासून बलभीम आर्ट्स व सायन्स कॉलेज उघडण्यांत आलें आहे. या कॉलेजचें उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनीं केलें. या कॉलेजमुळें बीड जिल्ह्यांतील शैक्षणिक अडचण मोठ्या प्रमाणांत दूर झाली आहे. आतां बीड जिल्ह्यांतील सामान्य परिस्थितीचा विद्यार्थी जिल्ह्यावाहेर न जातां महाविद्यालयांत शिक्षण घेऊं शकेल. या महाविद्यालयांत पहिल्या वर्षी कला व विज्ञान विभागाचा पहिला वर्ग उघडण्यांत आला आहे. विद्यार्थ्यांची संख्या ५० असून प्राध्यापकांची संख्या नऊ आहे.

मराठवाडा साहित्य परिषद

या परिषदेची शाखा बीड येथें असून नामांकित साहित्यकांची पुण्यतिथी व जन्मदिन साजरे करणें, साहित्यविषयक स्पर्धा ठेवणें व विजेत्यांना बक्षिसें देणें, शारदोत्सव साजरा करणें, नामांकित वक्त्यांचीं भाषणें ठेवणें इत्यादि कार्यक्रम घेऊन ही संस्था मराठी साहित्याच्या अभिवृद्धिसाठीं झटत असते. परिषदेतर्फे घेतल्या जाणाऱ्या मराठी परीक्षा ही शाखा घेते.

सानेगुरुजी कथा माला

महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते व मराठींतील थोर साहित्यिक कै. साने गुरुजी यांच्या साहित्याची लहान मुलांना ओळख करून देण्याच्या दृष्टीनें ही संस्था प्रयत्न करीत आहे. चित्रांचें प्रदर्शन, सांस्कृतिक कार्यक्रम, गोष्टी सांगणें आदि कार्यक्रमाद्वारें लहान मुलांची बौद्धिक व नैतिक पातळी वाढविणें हें या संस्थेचें मुख्य ध्येय आहे.

महिला मंडळ

१९५५ सालीं महिला मंडळाची स्थापना बीड येथें झाली. तेव्हांपासून या संस्थेमार्फत स्त्रियांची व बालकांची सर्वांगीण उन्नति करण्याचे प्रयत्न करण्यांत येतात. या संस्थेतर्फे बालक मंदिर, वाचनालय, बाल क्रीडांगण, शिवण कला वर्ग, रुग्णोपयोगी वस्तु भांडार इत्यादि शाखा काढण्यांत आल्या आहेत. या शाखांचें कार्य समाधानकारक आहे. याशिवाय अनेक खेड्यांत जाऊन स्त्रीसंघटना, महिलांमध्यें जागृति, अस्पृश्यता निवारण करण्यासाठीं सांस्कृतिक कार्यक्रम घेणें इत्यादि कामें या संस्थेतर्फे केलीं जातात. या संस्थेतर्फे १९५६ सालीं बीड येथें एक महिला परिषद व १९५८ मध्यें

मराठवाडा महिला परिषद बोलावण्यांत आली होती. स्त्रियांच्या प्रश्नाचा सांगोपांग विचार करणारी व त्यांच्या उन्नतीचें कार्य करणारी ही एकमेव महिला संघटना आहे.

याशिवाय सांस्कृतिक कार्यक्रम घेणाऱ्या संस्था म्हणजे कला विकास मंडळ, ललित कला मंडळ (सांधिक कार्यक्रम घेणारे) संगीत गुरुवार मंडळ या संस्था होत. या संस्था, शास्त्रीय गाणीं, नाटकें, भजन कीर्तन, प्रवचनादि कार्यक्रम घेतात. बीड येथील कला निकेतन मंडळातर्फे विविध नाटकांचे प्रयोग सादर केले जातात.

मराठवाडा खादी ग्रामोद्योग समिती

मराठवाडा खादी ग्रामोद्योग समितीनें बीड जिल्ह्यांत खादीच्या उत्पादनाचें काम इ. स. १९५९ पासून चालूं केलें. बीड जिल्ह्यांत वार्षिक एक लक्ष रुपयांच्या वर खादीचें उत्पादन होतें. खादी भांडारांतून ७५ हजारांच्यावर खादीची विक्री दरवर्षी होतें. अंबर चरखा शिकविण्याचें सत्र निरनिराळ्या गांवीं नियमित चालू आहे.

जिल्हा सर्वोदय मंडळ

पू. विनोबाजींच्या पदयात्रेचा मुहूर्त साधून १९५८ मध्यें सर्वोदय केन्द्राची स्थापना झाली. सर्वोदय पात्राचा प्रयोग फार मोठ्या प्रमाणावर करण्यांत आला. सध्या सर्वोदय वाङमयाच्या प्रचाराचें काम चालूं आहे.

महिला मंडळ अंबेजोगाई

महिलांच्या सर्वांगीण विकासाठीं प्रयत्न करणारी ही संस्था सुमारे वीस वर्षांपूर्वीं स्थापन झाली. सामुदायिक कथा व कीर्तनाचे कार्यक्रम घेऊन स्त्रियांच्या ज्ञानांत भर घातली जाते. हळदीकुंकुवांचे समारंभ, हलवा प्रदर्शन व रांगोळ्यांच्या स्पर्धा ठेवल्या जातात. सध्या महिला मंडळामार्फत शिवण वर्ग व भरतकाम वर्ग चालू आहेत.

बालक मंदिर

भारतीय सामाजिक कार्य परिषदेच्या पुरस्कारानें दोन वर्षांपूर्वीं, १९५८ मध्यें बालक मंदिराची स्थापना झाली. बालक मंदिर उत्तम स्थितींत चालूं आहे. २५ मुलें संस्थेंत शिक्षण घेत आहेत. सध्या एक शिक्षिका बालक मंदिराचें काम पाहात आहे.

जिल्हा हरिजन सेवक संघ, बीड

समाजांत अस्पृश्य समजल्या गेलेल्या लोकांची आर्थिक व शैक्षणिक पातळी वाढवून त्यांना इतर समाजाबरोबर आणण्याचा प्रयत्न करण्याच्या व अस्पृश्यता दूर करण्याच्या उद्देशानें सेवक संघाची स्थापना १९५४ मध्यें करण्यांत आली. भारतीय हरिजन सेवक संघाशीं हा संघ संलग्न करण्यांत आला. अस्पृश्यता दूर करण्यासाठीं मंदिरें, पाणवठे व इतर सार्वजनिक ठिकाणीं हरिजनांच्या प्रवेशाला अनुकूल वातावरण निर्माण करण्यांत येते.

अंबेजोगाई येथील कांहीं संस्था

श्री योगेश्वरी शिक्षण संस्था

योगेश्वरी शिक्षण संस्थेची स्थापना २५ वर्षांपूर्वी कांहीं सामाजिक कार्यकर्त्यांनीं जनतेच्या सहकार्यानें सन १९३५ मध्यें केली. मराठवाड्यांतील विद्यार्थ्यांची नैतिक, शारीरिक प्रगति होईल अशा रीतीनें प्राथमिक, माध्यमिक आणि महाविद्यालयीन शिक्षण देणें, (२) मातृभाषेच्या अभिवृद्धीला हातभार लावणें, (३) शिक्षण घेणारा विद्यार्थी भावी जीवनांत उत्तम नागरिक व्हावा म्हणून प्रयत्न करणें हे या संस्थेचे उद्देश आहेत.

या उद्देशांच्या पूर्तीसाठीं संस्थेनें सुरुवातीचीं पहिलीं २० वर्षे प्राथमिक व दुय्यम शिक्षण हें आपलें कार्यक्षेत्र आखून योगेश्वरी नूतन विद्यालय या संस्थेमार्फत कार्य केलें. घाटनांदूर व बर्दापूर येथील शाळांना

सहाय्य व मार्गदर्शन केलें. जून १९५६ मध्यें योगेश्वरी विज्ञान महाविद्यालय सुरू झालें. १९५८ पासून आर्टस् कॉलेज उघडण्यांत आलें. आगामी शैक्षणिक वर्षापासून (जून १९६१) वाणिज्य विषयाचा महाविद्यालयीन अभ्यासक्रम चालू करण्याचा संस्थेनें निर्णय घेतला आहे. सध्या महाविद्यालयांत निरनिराळे अभ्यासक्रम चालू आहेत. प्राथमिक विभागांत २५० विद्यार्थी व सहा शिक्षक असून हायस्कूल विभागांत १,००० विद्यार्थी व ३३ शिक्षक आहेत.

श्री शिवाजी शिक्षण संस्था

दिनांक १७–२–६० रोजीं संस्थेची स्थापना झाली व त्याच दिवशीं संस्थेचें उद्घाटन मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांच्याहस्तें झालें. संस्थेचें ध्येय वाक्य–"न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते" असें आहे. या ध्येयानुसार बहुजन समाजांत शिक्षणाचा प्रसार करण्याकरितां श्री मुकुंदराज विद्यालय दिनांक १५ जून १९६० रोजीं उघडण्यांत आलें. विद्यालयांत ५ वी ते ९ वी पर्यंतचें शिक्षण सध्या दिलें जातें. सुमारें २०० विद्यार्थी शिक्षण घेत असून आठ शिक्षक ज्ञानदानाचें काम करीत आहेत.

या संस्थेच्या विद्यमाने ग्रामीण विभागामध्यें शिक्षण केंद्राची स्थापना करून तेथील जनतेस सुशिक्षित करण्याचा उद्देश आहे. तसेच गरीब व होतकरू विद्यार्थ्यांची खाण्यापिण्याची व कपडेलत्त्यांची मोफत सोय व्हावी या उद्देशानें अनेक ठिकाणीं वसतिगृहें स्थापन करण्याचाहि संस्थेचा विचार आहे.

श्री खोलेश्वर शिक्षण प्रसारक संघ

विद्यार्थी वर्गांतून आदर्श नागरिक तयार करण्याच्या उद्देशानें २८ जून १९५१ रोजीं हा संघ स्थापन झाला. संस्थापकांनीं श्री खोलेश्वर विद्यालयाद्वारे शिक्षण प्रचाराचें कार्य चालू केलें. "केल्यानें होत आहे रे आधी केलेचि पाहिजे" हें संस्थेचें ध्येयवाक्य आहे. विद्यालयाचे प्राथमिक व माध्यमिक असे दोन शिक्षण विभाग आहेत. बालवर्गापासून १० वी पर्यंत (एच एस. सी.) चें शिक्षण दिलें जातें. संस्थेनें अगोदर पैसा जमा करून कामास सुरुवात करण्याऐवजीं प्रथम कार्य जनतेसमोर ठेवलें व मग सहाय्याची मागणी केली.

शाळेकरितां सर्वप्रथम भासणारी जागेची व इमारतीची अडचण, शिक्षक व विद्यार्थी या दोघांच्या सहाय्यानें व श्रमदानानें इमारत बांधून दूर केली आहे. शिक्षक व विद्यार्थी वेळोवेळी खेडोपाडीं जाऊन मुलांना व तरुणांना शिक्षण घेण्यासाठीं उद्युक्त करीत असतात. तसेंच प्रौढ शिक्षणाचे वर्गहि चालवितात.

याशिवाय मुख्याध्यापकासह चार सभासद मिळून सात जणांची कार्यकारिणी आहे. तसेच वरील कार्यकारिणीला सहाय्यक म्हणून सात शिक्षकांचें एक सल्लागार मंडळ आहे.

श्री दासोपंत संस्कृत विद्यालय

प्राचीन संस्कृत वाङमयाचें अध्ययन व अध्यापन करणारे ध्येयनिष्ठ तरुण निर्माण करणें हा या संस्थेचा उद्देश असून तिची स्थापना आषाढ वद्य त्रयोदशी शके १८७७ (१७–७–५५) रोजीं झालीं. विद्यालयांत एकंदर ८४ विद्यार्थी शिक्षण घेत असून दोन शिक्षक ज्ञानदानाचें काम करीत आहेत.

मराठी मंडळ

मराठी साहित्याच्या अभिवृद्धीसाठीं प्रयत्न करणारी ही संस्था चार वर्षांपूर्वीं १९५६ मध्यें स्थापन करण्यांत आली. या संस्थेतर्फें नारळी पौर्णिमेस मराठी उपासना दिन, शारदोत्सव, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, काव्य-गायन व साहित्य विषयक कार्यक्रम दरवर्षीं होत असतात. नामवंत साहित्यिकांची भाषणें व सुप्रसिद्ध कवींचीं संमेलनें वेळोवेळीं भरविलीं जातात.

हिंदी प्रेमी मंडळ

भारतीय घटनेनें हिंदी भाषेला राष्ट्रभाषा म्हणून मान्यता दिली असल्यामुळें तिचा प्रसार करण्याच्या उद्देशानें हिंदी प्रेमी मंडळाची स्थापना करण्यांत आली. महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणें, या संस्थेशीं हें मंडळ संलग्न करण्यांत आलें आहे. हिंदी परीक्षांचे वर्ग चालविणें, साहित्यिकांचे दिन साजरे करणें, नामवंत हिंदी साहित्यिकांच्या भाषणांचे कार्यक्रम घडवून आणणें हीं कामें प्रामुख्यानें संस्थेतर्फे केली जातात.

गणेश व्यायाम शाळा

"शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्" या ध्येयवाक्यानें प्रेरित होऊन तरुण पिढी शारीरिक दृष्ट्या कार्यक्षम होण्यासाठीं सुमारे २० वर्षापूर्वी मंगळवार पेठ विभागांत हनुमान व्यायाम शाळा स्थापन झाली. व्यायाम शाळेंत कुस्ती, मलखांब इत्यादीचें शिक्षण दिलें जातें. संस्थेला स्वतःची जागा नगरपालिकेकडून मिळाली असून बांधकामासाठीं सरकारी अनुदान मिळालें आहे. संस्थेच्या वार्षिक समारंभाच्या वेळीं विद्यार्थ्यांच्या शारीरिक शिक्षणाची प्रात्यक्षिकें करून दाखविलीं जातात.

साहित्य निकेतन

साहित्यिक आणि सांस्कृतिक विकासाकरितां देवनागरी लिपींत लिहिलेली राष्ट्रभाषा हिन्दी समृद्ध करणें, तिचा मराठी भाषेशीं वैचारिक सलोखा प्रस्थापित करणें हे या संस्थेचे उद्देश आहेत. संस्थेची स्थापना १ ऑगस्ट १९४५ रोजीं झाली. संस्थेचें ध्येयवाक्य "एक हृदय हो भारत जननी" आहे.

संस्थेचें कार्य

(१) हिंदी प्रचार सभा हैद्राबाद आणि राष्ट्रभाषा प्रचार समिती वर्धा यांच्या वतीनें होणाऱ्या परीक्षांचे वर्ग घेणें, परीक्षा केंद्र चालविणें (२) उच्च अभिरुचीचें साहित्य मागवून सामान्य जनतेस साहित्याभिलाषी व बहुश्रुत बनविणें, (३) निरनिराळीं हिंदी, मराठी, इंग्रजी वर्तमानपत्रें जनतेस मोफत वाचावयास मिळण्याची सोय करणें.

बौद्धिक विकासाबरोबरच शरीरसंवर्धनाकरितां व्यायाम शाळा चालविण्याचा संस्थेनें निर्णय घेतला आहे.

कला केन्द्र

भारत सरकारच्या संगीत अकादमीनें मान्यता दिलेली ही संस्था १९५२ सालीं कांहीं उत्साही तरुणांनीं स्थापन केली. साहित्य, संगीत व नाटच या क्षेत्रांत कार्य करणारी ही एक सांस्कृतिक संस्था आहे. वेळोवेळीं निरनिराळ्या नाटकांचे प्रयोग करणें, कलावंताचे कार्यक्रम घडवून आणणें व जनतेमध्यें संगीत कलेची आवड उत्पन्न करणें या गोष्टी संस्था करीत असते.

आतांपर्यंत अंमलदार, भाग्यवान, देवमाणूस घराबाहेर ही नाटकें संस्थेनें सादर केलीं. मराठी साहित्याचें दर्शन घडविणारी 'रसवंती' महाराष्ट्र दर्शन श्रुतिका फारच लोकप्रिय ठरली.

शिवाय बीड जिल्ह्यांत असलेल्या खाजगी शिक्षण संस्था पुढील प्रमाणें आहेत :—

क्रमांक	संस्थेचें नांव	गांव	तालुका	वर्ग
१	स्थानिक शिक्षण समिती	खुंटेफळ	अष्टी	९ वी पर्यंत
२	स्थानिक शिक्षण समिती	शिराळ	अष्टी	८ वी पर्यंत
३	बनेश्वर शिक्षण संस्था	बनसारोळा	केज	९ वी पर्यंत

४	स्थानिक शिक्षण संस्था	आडस	केज	९ वी पर्यंत
५	स्थानिक शिक्षण समिती	चिंचोली	केज	९ वी पर्यंत
६	स्थानिक शिक्षण समिती	गंगामसला	माजलगांव	मॅट्रीक पर्यंत
७	स्थानिक शिक्षण संस्था	यळंब	बीड	८ वी पर्यंत
८	स्थानिक शिक्षण संस्था	चौसाळा	बीड	९ वी पर्यंत

खाजगी शिक्षण संस्थांना मिळालेलें आर्थिक सहाय्य

प्राथमिक शाळा

क्रमांक	संस्थेचें नांव	गांव	तालुका	संख्या	मदत रु. न.पै.
१	योगेश्वरी नूतन विद्यालय	अंबेजोगाई	—	२२६	३,८०८.६२
२	खोलेश्वर विद्यालय	अंबेजोगाई	—	१७४	४,५००.९२
३	सरस्वती विद्यालय	परळी	अंबेजोगाई	२८९	३,७७३.२३
४	वैजनाथ विद्यालय	परळी	अंबेजोगाई	१५४	२,८६६.२२
५	चंपावती विद्यालय	बीड	बीड	२७४	४,०५६.६८
६	अमोलक विद्यालय	कडा	अष्टी	१५५	२,६०३.०५

दुय्यम शाळा

क्रमांक	संस्थेचें नांव	गांव	तालुका	संख्या	मदत
१	योगेश्वरी नूतन विद्यालय	अंबेजोगाई	—	८३८	३३,९७७.००
२	खोलेश्वर विद्यालय	अंबेजोगाई	—	२४२	१०,०१८.००
३	वैजनाथ विद्यालय	परळी	अंबेजोगाई	९२	५,६९८.००
४	सोमेश्वर विद्यालय	घाटनांदूर	अंबेजोगाई	२०३	६,१९८.००
५	शंकर विद्यालय	बरदापूर	अंबेजोगाई	१२८	४,५६४.००
६	चंपावती विद्यालय	बीड	बीड	४२०	१५,८८१.००
७	अमोलक विद्यालय	कडा	अष्टी	१७८	८,२३५.००
८	गणेश विद्यालय	अमळनेर	पाटोदा	२५	२,१९०.००

इतर शिक्षण संस्था

सातारा येथील रयत शिक्षण संस्थेची एक शाखा पाटोदा तालुक्यांतील अमळनेर या गांवीं उघडली आहे. या शाखेतर्फे नववीपर्यंत वर्ग उघडण्यांत आले आहेत. अंबेजोगाई तालुक्यांतील बरदापूर या गांवीं नूतन विद्यालयातर्फे ९ वीपर्यंत वर्ग व पोहरेगांव या गांवीं शंकर विद्यालय उघडलें असून या ठिकाणीं ८ वीपर्यंत वर्ग आहेत. अष्टी तालुक्यांतील कडा या गांवीं अमोलक विद्यालयातर्फे मॅट्रीकपर्यंत वर्ग चालविले जातात.

संगीत वर्ग

माजलगांव या तालुक्याच्या ठिकाणीं १९५९ सालीं गांधर्व संगीत विद्यालय उघडलें असून या विद्यालयांत २५ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. केज या ठिकाणीं शिक्षण प्रसारक मंडळ असून विद्यार्थ्यांची संख्या वाढविणें, तालुक्यांतील शैक्षणिक अडचणी वरिष्ठ अधिकाऱ्याकडे मांडणें व शैक्षणिक प्रचारासाठीं या मंडळांतील सभासद वारंवार दौरे करीत असतात.

परळी येथील कांहीं संस्था

परळी या गांवीं श्री वैद्यनाथ विद्यालय १९४१ सालीं सुरू करण्यांत आलें आहे. येथें ९ वीपर्यंत वर्ग असून विद्यार्थ्यांची संख्या ५५७ आहे व शिक्षकांची संख्या १२ आहे. या खाजगी विद्यालयास सरकारी मदत नियामानुसार दरवर्षीं मिळत असते. तसेंच या ठिकाणीं सरस्वती विद्यालय १९५२ सालीं उघडण्यांत आलें. या खाजगी विद्यालयांत ८ वी पर्यंत वर्ग असून विद्यार्थ्यांची संख्या ४३० आहे. या विद्यालयास सुद्धां सरकारी मदत मिळत असते.

याशिवाय परळी येथें कला सेवक मंडळ असून भजन, साप्ताहिक सोमवार, गणेश मेळे आदि कार्यक्रम वारंवार होत असतात. हनुमान व्यायाम शाळा ही संस्था तरुणांना शारीरिक शिक्षणाचे विविध खेळ शिकविते व त्यांची शारीरिक उन्नति करते. या ठिकाणीं एक खाजगी बालक मंदिर सुद्धा आहे.

तीर्थक्षेत्रें

बीड जिल्ह्यांतील तीर्थक्षेत्रांचा त्रोटक परिचय प्रस्तावनेंत देण्यांत आला आहे. तेथें देण्यांत आली ती एका दृष्टिपथांत सामावणारी नामावळी. नाममहात्म्य हें स्थानमहात्म्यापेक्षां मोठें खरें. पण निव्वळ त्याच्या माहितीनें स्थानाचा सौंदर्यविशेष किंवा भक्तिवात्सल्याचें आकलन होत नाहीं. कांहीं झालें तरी बीड हा मायबोलीच्या माहेराचा घटक. किशोरावस्थेंत मायबोलीवर शब्दांलंकार, अर्थालंकार घातले गेले ते या भूमींतच. मराठी संस्कृतीचें उत्थान आणि उन्नीयन याच भूमींत झालें.

त्या ऐतिहासिक काळांत बीड जिल्ह्यानेंहि आपला वांटा उचलला. कुणी आपल्या विदग्ध कलेच्या स्पर्शानें दगडांत देवपण ओतलें तर कुणी मानवी जीवनाची क्षणभंगुरता आपल्या प्रतिभा विलासानें जिंकून चिरस्मरणीय चिरंजीवन मिळविलें. तीर्थक्षेत्रें तयार झालीं तीं या दोन्ही प्रकारच्या कर्तृत्व शक्तींतून, ज्याच्या मागे उभी असलेली चित्शक्ति शतकें उलटून गेलीं तरी दिंड्या पताकांच्या घोषणांतून आणि यात्रेकरूंच्या नामस्मरणांतून क्षणाक्षणाला व्यक्त होते आहे.

स्वयंभू ज्योतिर्लिंग—परळी वैजनाथ

भारतांत, विशेषत: महाराष्ट्रांत शिवपूजेचें महात्म्य फार. महादेव हें दंडकारण्यांतील अनार्य संस्कृतीनें आर्य संस्कृतीला दिलेलें दैवत. तेव्हां दंडकारण्यांतील या भूभागांत त्याचें विशेष महत्त्व असणें स्वाभाविक. महादेवाचें राऊळ नाहीं असें गांव महाराष्ट्रांत दुर्मिळ. शिवराऊळाच्या या भाऊगर्दींत ज्योतिर्लिंगाचें स्थान आगळेंच. जीवसृष्टीची उत्पत्ती करणारे कैलासाधिपतीचें आत्मलिंग भारतांत ज्या बारा स्थानीं स्वयंभू प्रगटलें तिथें ज्योतिर्लिंगें स्थापण्यांत आलीं. हीं सारीं स्थानें भारतीयांच्या श्रद्धेची आणि आदराची पूजास्थानें आहेत. परळी वैजनाथ हें त्यापैकींच एक.

वैजनाथाचें मंदिर परळी या गांवाच्या नैऋत्य दिशेस दोन तीन फर्लांगाच्या अंतरावर आहे. हें मंदिर (नारायण) मेरु पर्वताच्या पूर्व कक्षेंत आहे. मंदिराची मूळ बांधणी हेमाडपंती. त्याची प्रचीति देवालयांतील नंदीवर असलेल्या दगडी बांधकामावरून पटू शकते. तेराव्या शतकांत केव्हांतरी हें मंदिर बांधलें असावें. अहिल्याबाई होळकर हिनें शके १७०६ त देवालय बांधून पूर्ण केलें, असा उल्लेख देवालयाच्या आंतील दरवाज्याच्या उत्तर भागीं संस्कृत भाषेंत असलेल्या शिलालेखांत आहे. यावनी स्वाऱ्यांमुळें पडझड झालेल्या या देवालयाचा जीर्णोद्धार अहिल्याबाईंनीं केला आणि देवालयाच्या मुख्य प्रवेशद्वारावर शिखराच्या बांधकामांतर्गत मल्हारराव होळकरांचा पुतळा बसविला.

देवालयाला तीन गाभारे असून त्यांची बांधणी घडीव, चिरेबंदी आणि मजबूत आहे. भोवताली चौफेर दगडी चिरेबंदी टोपाच्या ओवऱ्या आहेत. देवालयांत जाण्यासाठीं पूर्व, दक्षिण व उत्तर बाजूनें दगडी

पायऱ्याचे घाट बांधलेले आहेत. या घाटावर १० ते १२ हजार लोकांचा समुदाय सहज बसूं शकेल. हल्लीं या घाटाचा उपयोग जाहीर सभा-समारंभासाठीं केला जातो. पूर्वेकडील घाटावर सुबक बांधणीचा दीपस्तंभ आहे. या दीपस्तंभाच्या समान रेषेंत भव्य प्रवेशद्वार आहे. या प्रवेश द्वारास "पितळी दरवाजा" असें म्हणतात.

याचप्रमाणें दक्षिण व उत्तर बाजूस अशाच प्रकारचे दरवाजे आहेत. देवालयाच्या मध्यभागीं भक्तजनांकडून मिळालेल्या देणग्यांतून सागवानी बिनखांबी विस्तीर्ण सभामंडप बांधण्यांत आला आहे. देवालयाच्या दक्षिण बाजूस 'हरिहर' म्हणून पवित्रतीर्थ आहे. या तीर्थाच्या पाण्यानें प्रभूस नित्य अभिषेक व पूजाअर्चा होत असते. या तीर्थाच्या बाजूसच श्री ब्रह्मेश्वराचे एक मंदिर आहे. अवर्षणाच्या काळांत भाविक लोक ब्रह्मेश्वराची थालिका पाण्यांत बुडवितात. थालिका पाण्यांत बुडविली कीं दोन तीन दिवसाच्या आंत पाऊस पडल्याचा अनुभव असल्याचें स्थानिक लोक सांगतात.

प्रतिवर्षी माघ वद्य महाशिवरात्रीस येथें फार मोठी यात्रा भरते. यात्रेसाठीं विदर्भ, खानदेश, सोलापूर, व मद्रासकडील कांहीं भाविक लोक दरवर्षी येत असतात. यात्रेची व्यवस्था स्थानिक सेवा समाज या संस्थेतर्फे करण्यांत येत असते. याशिवाय वैजनाथ देवस्थान कमिटी यात्रेची सर्व दृष्टीनें व्यवस्था ठेवते. यात्रेंत सरकारी प्रदर्शनें भरविण्यांत येतात. त्याचप्रमाणें इतर खाजगी व व्यापारी लोकहि आपलीं दुकानें मांडीत असतात. यात्रेच्या दुसऱ्या दिवशीं अमावस्येस पारणें असते. तिसऱ्या दिवशीं श्रीची चांदीच्या पालखींतून सवाद्य मिरवणूक काढण्यांत येते. त्या दिवशीं रोषणाई केली जाते व दारूकामहि उडवितात. मोठ्या प्रमाणावर अन्नदान होतें. ही यात्रा जवळ जवळ आठ दिवस चालते.

वैजनाथ देवस्थान कमिटी मंदिराचा हिशोब व खर्च ठेवते. या कमिटीस महत्त्वाचें उत्पन्न म्हणजे श्री वैद्यनाथ फंड होय. हा वैद्यनाथ फंड स्थानिक व्यापारी व शेतकरी यांच्या होणाऱ्या मालविक्रीच्या व्यवहारांतून शेंकडा एक आणा याप्रमाणें प्रत्येकाकडून घेतला जातो. वर्षाखेर जवळ जवळ १२ ते १५ हजारापर्यंत उत्पन्न सहज होतें. याशिवाय पूजेसाठीं मिळणारी दक्षिणा, देणगी रूपानें मिळणारा पैसा, लग्न कर, गंधर्व कर यांचें उत्पन्न मिळतें. याशिवाय कमिटीच्या ताब्यांत माजलगांव तालुक्यांतील नाथरा या गांवांतील व परळी येथील कांहीं जमीन आहे. या कमिटीतर्फे यात्रेच्या वेळीं अन्नदान करण्यांत येतें. प्रदर्शनास व कुस्तिगीरांना बक्षिसें दिलीं जातात. त्याचप्रमाणें भंडारा, रोषणाई, मिरवणूक, नोकरांचे पगार व आवश्यक बांधकामावरहि खर्च केला जातो.

या कमिटीच्या कार्यालयाजवळ एक उद्यान आहे. या उद्यानास धन्वंतरी उद्यान असें म्हणतात. दर्शनास येणाऱ्यांच्या विश्रांतीसाठीं ही जागा आहे.

श्री गोराराम मंदिर

हें मंदिर बाजार पेठेच्या पूर्वेस थोड्या अंतरावर आहे. प्रतिवर्षी चैत्र महिन्यांत दहा दिवस उत्सव होत असून कथा, पुराण, ब्राह्मण भोजनादि धार्मिक नित्य कर्में होत असतात. चैत्र शुद्ध दशमीस श्री रामाची पालखी मिरवणूक निघते. अंबेवेसच्या जवळ श्री काळाराम मंदिर असून चैत्र महिन्यांत उत्सव होतो. गांवांतील मोठ्या रस्त्यांत श्री सावळाराम मंदिर असून दरवर्षी चैत्र शुद्ध द्वादशीस पालखी निघते. गांवाच्या मध्यवस्तींत अंबेजोगाई येथील दत्त संस्थानांतील पोट संस्थान म्हणून श्री दत्त मंदिर आहे. दरवर्षी मार्गशीर्ष महिन्यांत उत्सव होत असतो.

गांवांत श्री व्यंकटेश मंदिर असून याचे पुजारी दंड ब्राह्मण आहेत. या मंदिरास पुष्कळ उत्पन्न मिळतें. पुजारी व्यंकटेशाची काठी घेऊन गिरी बालाजीची यात्रा करतात. ती काठी गांवांत श्रावण महिन्यांत मिरव-

तात. दरवर्षी श्रावण वद्य अष्टमीस श्री कृष्णजन्म उत्सव होत असतो. या मंदिरास दाऊतपूर येथील जमीन असून त्या उत्पन्नावरच उत्सव होत असतो. मध्यवस्तींतील जैनांचें वसई मंदिर प्रेक्षणीय असून दरवर्षी श्रावण भाद्रपद महिन्यांत वसईची मिरवणूक निघून उत्सव होतो. अंबेवेस बाहेरचे व देशपांडे गल्लींतील अशीं दोन विठ्ठल मंदिरें आहेत. कार्तिक शुद्ध ११ ते १५ पर्यंत दररोजच्या कथा, कीर्तन, पौर्णिमेचे दिवशीं गोपाल काला व ब्राह्मणभोजन होतें. उख्खड वेशीजवळ श्री कालिका देवीचें मंदिर असून कासार लोक या देवीची नित्य पूजा करतात. भाद्रपद महिन्यांत पोथी व आरतीची मिरवणूक निघत असते.

देवस्थानांतील उत्सव

प्रतिवर्षी चैत्र शुद्ध ११ स ध्वजारोपण होऊन या दिवशीं अलंकार वस्त्रांनीं पूजा केली जाते. दर्शनास आलेले लोक प्रसाद वाटतात. मानकऱ्यातर्फे गुळाची एक ढेप प्रसाद म्हणून वाटली जाते. एक झेंडा नगनारायण पर्वतावर व दुसरा झेंडा गोराराम मंदिरावर चढवतात. श्रावण महिन्यांत देवावर अभिषेक होत असून भाविक लोक बेलाची लाखावली वाहतात. रुद्राभिषेकासाठीं बारा मैलांवरून श्री गोदावरी नदीचें पाणी आणतात. आश्विन शुद्ध दशमीस देवाची पालखी सीमोल्लंघन करण्यासाठीं निघते. हरिजनांना देवदर्शनाचा लाभ व्हावा म्हणून पालखी हरिजन वाडींतून जाते. आश्विन शु. १५ पर्यंत देवाची पूजा होत असते. कार्तिक महिन्यांत वैकुंठ चतुर्थीच्या दिवशीं रात्री १२ वाजतां श्री वैद्यनाथावर बेल वाहण्याचा समारंभ मोठचा थाटांत होत असतो. सर्व लोक या दिवशीं मेरू पर्वत प्रदक्षणा व नगरप्रदक्षणा करतात.

इतर माहिती

परळी या शहराची वस्ती जवळ जवळ २५,००० आहे. बीड जिल्ह्यांतील हें एकमेव रेल्वे स्टेशन होय. येथून मिटरगेज द्वारा परभणीकडे व ब्रॉडगेजद्वारा हैद्राबादकडे जाता येते. मराठवाडचांतील एक प्रमुख बाजारपेठ म्हणून या शहराची ख्याती आहे.

कापूस, शेंगा, गूळ, भुसार माल, धान्य व कडधान्याची आयात व निर्यात नेहमीं येथून चालत असते. इ. स. १९०५ मध्यें दोन इटालियन व्यापाऱ्यांनीं २२ जीनाची एक जिनिंग फॅक्टरी येथें स्थापली. मराठवाडचांतील ही कापसाची पहिली गिरणी होय. याशिवाय कापसाच्या चार, तेल गाळण्याच्या आठ, पिठाच्या १६ आणि लांकडाच्या चार गिरण्या येथें आहेत. येथील व्यापार भारतांतील सर्व प्रमुख शहरांशी, त्यांतल्यात्यांत बेजवाडा येथून तांदूळ, शहाबाद यथून दगड व निजामाबादहून सागवानी लांकडाची आयात येथें मोठचा प्रमाणावर होते. या शहरांत सर्व जातीचे लोक असून ब्राह्मणवर्ग विद्वान व पुढारलेला आहे.

येथील नगरपालिका सुधारणेच्या दृष्टीनें अतिशय अमोल अशी कामगिरी करीत असल्यामुळें सिमेंटचे रस्ते, गटारें, उद्यान आदि कामें आपल्या दृष्टीस दिसतात. याशिवाय मार्केट कार्यालय, नगरपालिका कार्यालय, पोस्ट, तार व टेलीफोन कार्यालय येथें आहेत. वीजपुरवठा विभागातर्फे गांवांत विजेची सोय करण्यांत आली आहे. या गांवापासून बीड, उस्मानाबाद, नांदेड, बार्शी, औरंगाबाद आदि शहरांना जाण्यासाठीं एस. टी. गाडचा सुटतात. मुलांसाठीं मॅट्रिकपर्यंत शिक्षणाची सोय आहे.

अंबेजोगाई (मोमिनाबाद)

सुंदर बागा, उंच आकाशाशीं स्पर्धा करणारें मंदिर, प्रशस्त राजपथ असा उल्लेख असलेलें शहर "मनोहर अंबा नगरी" म्हणजेच बीड जिल्ह्यांतील अंबेजोगाई शहर होय. वरील उल्लेख आद्य कवि मुकुंदराजांनीं केलेला आहे. हें वर्णन वाचल्यानंतर वाचकांच्या मनांत सहाजिकच या शहराबद्दल उत्कंठा वाढल्यास नवल नाहीं. काळाच्या ओघात आज तें वैभव नष्ट झालें असलें तरी अंबेजोगाई शहराचा वाङमयीन, सांस्कृतिक, शैक्षणिक व राजकीय

दृष्ट्या आघाडीवर असलेलें शहर म्हणून नामनिर्देश करतां येईल. या शहराबद्दल बरीचशी माहिती येथें सांपडलेल्या शिलालेखावरून मिळते.

विविध शिलालेख

माया मोचन तीर्थाजवळ अर्धवट फुटलेला शिलालेख, संगीत मशिदींतील देवगिरीच्या सिंगण राजाचा उल्लेख देणारा शिलालेख, राजा बन्सीलाल याच्या बागेंतील मूळचा संकलेश्वर मंदिरांतील शिलालेख—या शिलालेखांत उमराईच्या सिंदणाच्या पराक्रमी सेनापती खोलेश्वराबद्दल माहिती असून खोलेश्वरानें एलिचपूर या गांवीं एक विष्णु मंदिर बांधल्याचा यांत उल्लेख आहे. खोलेश्वराची संपूर्ण वंशवेल, आपल्या पराक्रमानें पादाक्रांत केलेले देश, पराभूत केलेले राजे यांचा इतिहास यांत सामावलेला आहे (इ स. ११५०).

चौभारा भागांतील शिलालेख

हा लेख माधव धनेश्वर यानें रचला आणि त्रिलोचन यानें खोदला. यांत खोलेश्वरानें योगेश्वरीस दिलेल्या दानाचा उल्लेख आहे. त्याशिवाय ग्राम-प्रशस्ति असून त्या काळीं हें नगर विद्वानांचें माहेरघर होतें असाहि उल्लेख आढळतो.

खोलेश्वर मंदिरांतील शिलालेख

(इ. स. ११६२) पूर्व वैभवाची साक्ष देणाऱ्या या मंदिरास रामनारायण मंदिर म्हणतात. खोलेश्वराचा पराक्रमी पुत्र राम हा युद्धांत कामास आला. आपल्या पराक्रमी भावाच्या स्मरणार्थ त्याच्या बहिणीनें हें मंदिर बांधलें अशी माहिती या शिलालेखांत आहे.

जाईच्या माहेरांतील शिलालेख

(इ. स. १०६६) हा शिलालेख संपूर्ण मराठींत असून इतका जुना व मोठा शिलालेख मराठींत दुसरा नाहीं. या शिलालेखांत महामंडलेश्वर, उदयादित्य, देवयानें शिवमंदिरास दिलेल्या दानाचा उल्लेख आहे. अंबेजोगाई जवळ असलेल्या सेलू, कुंभेफळ व जवळगांव या गांवांचा त्यांत उल्लेख आहे.

विवेक सिंधु

मराठीचे आद्य कवी मुकुंदराज यांनीं या गांवाजवळ असलेल्या बाणगंगेच्या तीरीं एकांतस्थळीं निवास केला व शके १११० मध्यें विवेक सिंधु ग्रंथ लिहिला. १६ व्या शतकांत प्रसिद्ध नागपंथी योगी दासोपंत यांनीं ग्रंथराज, गीतार्णव, पदार्णव आदि प्रचंड ग्रंथांची निर्मिती केली. संत ज्ञानेश्वरांनीं आद्य कवीच्या समाधीचें दर्शन घेऊन गेल्याची साक्ष त्यांच्या पादुका आज देत आहेत. रामदास स्वामी आपल्या भारत भ्रमंतीमध्यें येथें येऊन गेल्याचें दास विश्रामधामकर्ते सांगत आहेत. महानुभव पंथाचे आद्य प्रवर्तक चक्रधर स्वामी योगेवश्वरीच्या दर्शनास आल्याचा उल्लेख या चरित्रांत आहे.

नाथपंथाचें पीठ

नाथपंथाचें एक पीठ असा लौकिक या ठिकाणचा आहे. लीलाचरित्रांत खोलनायकाच्या अंबेचा उल्लेख आहे. गांवांत मधोमध वाहणारी जयवंती नदी जयंतपाळ राजाची आठवण करून देते. जयंतपाळ हा राजा जैनधर्मी होता व त्याची ही राजधानी असल्याचा उल्लेख आढळून येतो.

शहराची रचना व बांधकाम

या शहराची रचना बहुतांशीं हेमाडपंथी बांधकामासारखी आहे. शहरामध्यें जागोजागीं अनेक देवालयें आढळतात. येथील जुनी मंदिरें कमीत कमी एक हजार वर्षांपूर्वीचीं असलीं पाहिजेत, असा अंदाज बांधकामावरून करावयास कांहींच हरकत नाहीं. दासोपंताचें देवघर १५१० ते १६१५ जवळ जवळ ४०० वर्षांपूर्वींच बांधलेलें आहे. मुसलमानी काळांत या शहराचा अनेक वेळां विध्वंस करण्यांत आला. त्यामुळें गांवांत जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारती दिसतात.

गेल्या ८०० ते १००० वर्षांतील लिहिलेल्या अनेक धार्मिक, साहित्यिक व ऐतिहासिक ग्रंथांतून

अंबेजोगाईचें मोमिनाबाद

अंबेजोगाई, मनोहर अंबानगरी, आम्रपुरी, आम्रदेश अशा नांवानीं या शहराचा उल्लेख केलेला आहे. निजामी राजकर्त्यांनीं १९०३ मध्यें या शहराचें नांव मोमिनाबाद असें ठेवलें. त्याचप्रमाणें मंगळवार पेठेला उस्मानगंज आणि सदर बाजाराला महेबूब गंज अशीं नांवें देण्यांत आलीं. महाराष्ट्र सरकारच्या खास हुकुमान्वयें 'मोमीनाबाद' शहराचें नांव 'अंबेजोगाई' असे ठेवण्यात आले आहे. (१९६१)

अंबेजोगाई शहराच्या परिसरांतील जी कांहीं प्रेक्षणीय स्थळें आहेत त्यांची माहिती त्या स्थळांचें महत्त्व ओळखून मुद्दाम देण्यांत आलीं आहे.

अंबेजोगाई येथें उपलब्ध असलेल्या यादवकालीन शिलालेखांत आम्लेश्वरासंबंधीं उल्लेख

आम्लेश्वर महादेव मंदिर

आहे. मंदिराचें बांधकाम हेमाडपंती पद्धतीचें आहे. पाषाणावरील कोरीव काम प्रेक्षणीय असून तेथील तीर्थाचें वैशिष्टच असें सांगतात कीं, तीर्थांतील पायरी जवळच्या जागेंत बेलाचीं पानें सोडलीं असतां तीं बुडून जातात व इतर ठिकाणीं मात्र पानें पाण्यावर तरंगतात. या मंदिराच्या जीर्णोद्धाराचें काम नुकतेंच संपलें आहे.

अंबेजोगाई शहराच्या वायव्य दिशेस सुमारे दोन मैलांच्या अंतरावर बालेघाट पर्वताच्या रांगेंतील एक डोंगराचें उतरणीवर एकांत ठिकाणीं मराठीचे आद्यकवी मुकुंदराज यांच्या समाधीचें ठिकाण आहे.

श्री. मुकुंदराज समाधि, अंबेजोगाई

मुकुंदराजांनीं आपल्या 'विवेकसिंधू' ग्रंथांत वर्णिलेली बाणगंगा नदी या समाधी-स्थानाजवळून वाहते. मुकुंदराजाचा काळ ज्ञानेश्वराच्या किंचित अगोदरचा म्हणजे शके १११०. मुकुंदराजांचें समाधिस्थान अंबेजोगाई येथलेंच असल्याचा निर्णायक पुरावा श्री. वि. अ. कानोले, नांदेड यांनीं आपल्या ग्रंथांत सादर केला आहे.

समाधिस्थानावर एक मंदिर नंतर उभारण्यांत आलें आहे. डोंगराच्या उतरणीवर एका कपारींत समाधिस्थान असल्यामुळें तेथें जाण्यासाठीं सुमारे १०० पायऱ्या उतरून जावें लागते. मंदिराच्या समोर पश्चिम बाजूस यात्रेकरूंना निवाऱ्यासाठीं ४० वर्षांपूर्वीं सुमारे ४०० चौ. फू. आकाराच्या जागेवर दगडी ओवऱ्या बांधण्यांत आल्या आहेत. मंदिरासमोरची जुनी भिंत पडल्यानंतर जिल्हा लोकलबोर्डातर्फे नवीन भिंत बांधतांना समोर मोठें पटांगण ठेवण्यांत आलें आहे. पायऱ्यांची रुंदी वाढविण्यांत आली व एका बाजूनें मजबूत कट्टा बांधून घेतला. अंबेजोगाई शहरापासून मंदिरापर्यंत पक्की सडक तयार करण्यांत आली आहे. पिण्याच्या पाण्यासाठीं नळाची सोय करण्यांत आली आहे.

डोंगरसपाटीवरच्या या पटांगणावर भक्तगणांच्या प्रयत्नांनीं सुमारे ३६०० चौ. फू. आकाराचा एक भव्य सभामंडप बांधण्यांत आला आहे. या ठिकाणीं अखंड नामकीर्तन चालू असतें. दर महिन्याच्या वद्य एकादशीस भोवतालच्या विभागांतून भाविक लोक दर्शनास येतात. रात्रीं भजन-कीर्तन होतें. द्वादशीस भंडारा होतो. भंडाऱ्यासाठीं प्रत्येक महिन्याची द्वादशी ठरवून दिलेली आहे. मार्गशीर्ष वद्य एकादशीस यात्रा भरत असते. दूरदूरचे सुमारे २५ ते ३० हजार यात्रेकरू येत असतात. पालखीची मिरवणूक निघते. शोभेची दारू उडविण्यांत येते. वारकरी संप्रदायाच्या कीर्तनाचे अनेक फड येतात. शेतकी विभागातर्फे व इतर सरकारी विभागांतर्फे प्रदर्शनें भरविण्यांत येतात. पहिलवानांच्या कुस्त्या होतात, भजनी मंडळाच्या स्पर्धा होतात. यात्रा तीन दिवसपर्यंत चालूं असते.

श्री योगेश्वरी मंदिर

अंबेजोगाई शहराच्या मधोमध वाहणाऱ्या जयवंती नदीच्या पश्चिम तीरावर योगेश्वरी देवीचें मंदिर पुराण कालापासून अस्तित्वांत आहे. देवीचा अवतार दंतासुर नांवाच्या राक्षसाच्या वधासाठीं झाला असल्याचें योगेश्वरी महात्म्यांत वर्णन आहे. मंदिराचा जीर्णोद्धार झालेला आहे. पूर्वींचें मंदिर तीन शिखरांचें अतिशय भव्य आणि विस्तीर्ण असल्याचें यादवकालीन शिलालेखांत वर्णन आहे. सध्याचें मंदिर नागोजी त्रिमल व शामजी बापूजी यांनीं सुमारें २५० वर्षांपूर्वीं बांधलें. मंदिराच्या बांधकामासाठीं पूर्वी पडलेल्या मंदिराचा मालमसाला वापरला असल्यामुळें त्याची रचना हेमाडपंथी बांधकामासारखी आहे. मंदिरावरचें उंच शिखर आणि सभा मंडप सुमारे १०० वर्षांपूर्वी शहरांतील प्रमुख मंडळीच्या प्रयत्नानें बांधण्यांत आला. मंदिराच्या मागच्या ओवऱ्या सर दिनकरराव राजवाडे ग्वाल्हेरचे प्रधान यांनीं ८० वर्षांपूर्वी बांधल्या. ५० वर्षांपूर्वीं समोरचा दरवाजा बांधण्यांत आला आहे.

मंदिराच्या सभोवार कोट आहे. मंदिराच्या उत्तर बाजूला सर्वेश्वर तीर्थ किंवा सर्वतीर्थ आहे. त्यावर सर्वेश्वर काळभैरव व मारुती यांचीं लहान लहान मंदिरें आहेत. तीर्थांमध्यें गंगेच्या पाण्याचें कधीकधी आगमन होतें व मूळचें हिरवट दिसणारें पाणी पांढरे स्वच्छ दिसं लागते असें तीर्थ महात्म्यांत वर्णन केलें आहे. देवालयाच्या आग्नेय बाजूला महाद्वाराजवळ एक मोठी धर्मशाळा आहे. यात्रेकरूंच्या सोयीसाठीं अनेक ओवऱ्या बांधलेल्या आहेत. वर्षांतून दोन वेळेस देवीचे मोठे उत्सव होतात व यात्रा भरत असते.

आश्विन मासांत शुद्ध प्रतिपदेपासून नवरात्र बसतें. शतचंडी हवन होतें. दसऱ्याच्या दिवशीं देवीची भव्य मिरवणूक हजारो नागरिक व भक्तजनासह नगर प्रदक्षिणा करते. मार्गशीर्ष मासांत होणाऱ्या उत्सवांत शुद्ध सप्तमीपासून दररोज मंदिरांत भजन, पूजन, कीर्तन छबीना, गोंधळ आणि गायन वगैरे कार्यक्रम होतात. पौर्णिमेच्या दिवशीं शतचंडी हवनाची पूर्णाहूति होते. योगेश्वरी देवीचा हा अवतारदिवस आहे. दहा ते पंधरा हजार भाविक लोक दूरदूरच्या भागांतून दर्शनाला येतात व मोठी यात्रा भरते. रात्री शहरभर पालखींतून श्रीची मिरणूक निघते. शोभेची दारू उडविली जाते. यात्रेनिमित्त जनावरांचें प्रदर्शन भरतें व नामांकित पहिलवानांच्या कुस्त्या होतात.

श्री खोलेश्वर मंदिर

या मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळच्या भिंतीमध्यें शके ११६२ मध्यें लिहिलेला शिलालेख आहे. त्यांतील वर्णनाप्रमाणेंच सिंघण यादवाचा सेनापती जो खोलेश्वर त्याच्या लक्ष्मी नांवाच्या मुलीनें हें मंदिर बांधलें आहे. खोलेश्वराचा पराक्रमी पुत्र राम हा युद्धांत कामास आला म्हणून त्याच्या स्मरणार्थ हें मंदिर बांधण्यांत आलें असल्याचा त्यांत उल्लेख आहे. खोलेश्वर मंदिरास पूर्वी रामनारायण मंदिर म्हणत असत. खोलेश्वर अंबेजोगाईजवळील उमराइ गांवचा राहणारा असून त्यानें एलिचपूर येथें अगदीं याच नमुन्याचें विष्णु मंदिर बांधलें आहे. खोलेश्वर मंदिरास यावनी उच्छेदापासून वाचविण्यासाठीं त्याच्या चोहोबाजूनें बुरूज बांधल आहेत. मंदिरांत जाण्यासाठीं भुयारी रस्ता होता. निजामी राजवटींत बुरुजाशेजारच्या गढींत मुन्सफी कचेरी (न्यायालय) भरत असे. पुढें गढीची भिंत पडल्यावर हें मंदिर उघडें पडलें. मंदिरांत महादेवाची भव्य पिंड आहे. यावनी काळांत त्याला थोडी अवकळा आली होती पण स्वातंत्र्यप्राप्तीनंतर त्याचा जीर्णोद्धार करण्यांत आला. यात्रा चैत्र शुद्ध एकादशीस भरते व पालखीची भव्य मिरवणूक निघते.

बिदर येथील बहामनी राजवटीच्या कारकीर्दींत नारायणपेठ येथें शके १४७३ मध्यें देशपांडे व राण्यांत दासोपंताचा जन्म झाला. वडिलांचें नांव दिगंबरपंत व आईचें नांव पार्वतीबाई. दासोपंतांच्या

दासोपंत व त्यांची पासोडी

बाळपणी नारायणपेठ परगण्यांत दुष्काळ पडला. लोकांची उपासमार थांबवण्यासाठीं दिगंबरपंतांनीं सरकारी गोदामांतील धान्य गरीबांना वाटून टाकलें. यामुळें बादशहानें दासोपंतास ओलीस ठेवून घेतले आणि एक महिन्याच्या आंत धान्याची किंमत दोन लाख रुपये दाखल न झाली तर दासोपंताला मुसलमान केले जाईल अशी दिगंबरपंताना ताकीद दिली. या संकटामुळें दासोपंताचें लक्ष परमार्थाकडे वळलें. सुदैवानें त्यांची त्या संकटांतून सुटका झाली. दासोपंत नंतर अंबेजोगाईस आले व पुढचें सबंध जीवन त्यांनीं तेथेंच व्यतीत केलें.

ग्रंथनिर्मिति

दासोपंतांनीं पुष्कळ ग्रंथनिर्मिती केली. (१) गीतार्णव, (२) गीतार्थचंद्रिका, (३) प्रबोधोदय, (४) पदार्णव (५) ग्रंथराज, (६) उपनिषद भाष्यें (संस्कृत), (७) पासोडी-पंचीकरण ही त्यांची उपलब्ध ग्रंथरचना आहे.दासोपंतांनीं लिहिलेली पासोडी चाळीस फूट लांब व चार फूट रुंद आहे. पासोडीवर पंचीकरण नांवाच्या वेदांत विषयाचें विवेचन आलें आहे. विषय-प्रतिपादनाच्या सोयीसाठीं पासोडीचे १३ भाग करण्यांत आले आहेत व प्रत्येक भाग दुसऱ्यापासून वेगळा दाखविण्यासाठीं जाडसर लाल रेषेचा उपयोग केला आहे. केलेलें विवेचन सुलभतेनें समजावें म्हणून अनेक आकृत्या काढून त्यांची फोड करण्यांत आली आहे. वेदांत विषयांवरील पंचीकरणावर एवढा प्रचंड विस्तार दासोपंतांशिवाय दुसऱ्या कोणत्याहि ग्रंथकारानें केलेला नाहीं असें विद्वानांचें मत आहे.

जोगाईचें माहेर अथवा हत्तीखाना

अंबेजोगाई येथील योगेश्वरी मंदिराच्या वायव्य दिशेस सुमारे दोन फर्लांगाच्या अंतरावर हें कोरीव शिवमंदिर असून जोगाईचें माहेर या नांवानें प्रसिद्ध आहे. या लेण्यांत संवत् १०६० मध्यें लिहिलेला शिलालेख होता. सुरक्षिततेच्या दृष्टीनें तो आतां येथील मामलेदार कचेरींत ठेवला आहे. शिलालेखांत हें लेणें राष्ट्रकूटाच्या काळांतील (इ. स. ६५० ते १०००) असल्याचा उल्लेख आहे. या लेण्यांत तांडवनृत्य करणाऱ्या महादेवाच्या आकृति कोरलेल्या आहेत. महादेवाच्या समोर भला मोठा नंदीहि होता. चार बाजूस चार हत्ती, सप्तमातृका व एक कोंबडा यांच्या आकृति कोरलेल्या आहेत. कोंबडयाच्या शिल्पासंबंधीं एक दंतकथा प्रसिद्ध आहे आणि याच कथेच्या आधारे बहुधा या लेण्यास जोगाईचें माहेर हें नांव रूढ झालें असावें. कुमारी अंबा परळी वैद्यनाथाशीं विवाहबद्ध होण्यासाठीं कोकण प्रांतांतून आली आणि सर्व देवतांसह सध्याच्या लेण्याच्या जागेवर तळ देऊन बसली. लग्न घडी ठरली होती. पण कोंबडयाच्या आरवण्यामुळें मुहूर्त टळून गेल्याचें आढळून आलें. लग्न रहित झालें. कुमारी अंबा येथेंच कायमची राहिली व सर्व देव पाषाणरूप होऊन राहिले तेंच हें लेणें होय.

येथें सांपडलेला शिलालेख महाराष्ट्री भाषेंत आहे. शिलालेखांत महामंडलेश्वर उदयादित्यानें या शिवमंदिरास दिलेल्या दानाचा उल्लेख आहे. कोरलेला मंडप ३२ खांबी असून सुमारे दोन हजार लोक बसूं शकतील एवढा विस्तीर्ण आहे.

नागझरी तीर्थ

अंबेजोगाई शहराच्या पूर्वेस एक मैलाच्या अंतरावर हें तीर्थ आहे. बालेघाट पर्वताच्या रांगेंतील एका डोंगर कडयाच्या मध्यभागीं गोमुखांतून संतत पाण्याची धार पडते. योगेश्वरी महात्म्यांत या तीर्थाचें वर्णन आलें आहे. नागझरी ऋषींचा कमंडलु लवंडल्यापासून त्यांतून बाहेर पडलेल्या ओघळापासून या तीर्थाची उत्पत्ती झाली. अंबू वाहान (अंबे होळ) नदी या तीर्थाजवळून वाहत आहे. गोमुखांतून पडणारें पाणी आरोग्यदायक असल्यामुळें नियमानें स्नानासाठीं

येणाऱ्यांची येथें नेहमीं गर्दी असते. तीर्थाचें नियमितपणें प्रातःस्नान केल्यामुळें लोकांची प्रकृति सुधारल्याचें अनेक दाखले ऐकिवांत आहेत. महादेवाचें मंदिर तीर्थाच्या कांठावर आहे. या तीर्थाचें वैशिष्टच असें कीं, कितीहि अवर्षण पडलें तरी गोमुखांतून पाणी पडणें बंद होत नाहीं.

कनकालेश्वर मंदिर

बीड शहराच्या मध्यभागांतून वाहत जाणाऱ्या बिंदुसरा नदीच्या पूर्व दिशेस एक फर्लांग अंतरावर हें रमणीय जागृत देवस्थान आहे. या मंदिराचा आकार ताऱ्यासारखा असून त्याच्या चारी बाजूस पाणी असल्यामुळें मंदिराची शोभा वाढली आहे. मंदिरांत प्रवेश करण्यासाठीं लहान दगडी पूल बांधला आहे. या मंदिराचें एकंदर क्षेत्रफळ ६७६०० चौ. फूट असून पाण्याचें क्षेत्रफळ ६६,१३६ चौ. फूट असल्याची नोंद कांहीं पुस्तकांत आहे. चोवीस अशा मजबूत दगडावर हें मंदिर उभारण्यांत आलें आहे. मंदिराच्या बाजूनें पाणी बाराही महिने असते. पूर्वीं गुलेनिलोफर फुलें येथें नेहमीं असत.

या मंदिराबद्दल हिंदु व मुसलमान लोकांत वाद होता. मुसलमान लोक या मंदिरास खान खा असे म्हणत तर हिंदु कनकालेश्वर असे म्हणत. या वादाचा प्रश्न १३११ फसलीमध्यें राजा किशनप्रसाद यांनीं न्यायालयांत सोडविला व मंदिर हिंदूंच्या ताब्यांत दिलें. आतां या मंदिराबाबत बीड येथील हिंदु मुसलमान कुठलाहि वाद राहिलेला नाहीं.

कोरीव बांधकाम

मंदिराचें बांधकाम पाहिलें असतां सहज लक्षांत येईल कीं हें बांधकाम वेरुळ येथील कोरीव लेण्या-सारखे आहे. मंदिराची मूळ वास्तु भव्य आणि त्यावरील शिल्पकला उत्कृष्ट आहे. मंदिरावरील बरींच शिल्पें यावनी स्वाऱ्यांमुळें भग्न झालीं आहेत. त्यावरील नवीन काम विटांनीं केल्यामुळें या मंदिराची मूळची शोभा बऱ्याच प्रमाणांत नष्ट झाली. या मंदिरास आधुनिकपणा बराच आला आहे. त्याला सोनेरी रंग दिला आहे. संगमरवरी दगडाच्या महादेव, राम, सीता, लक्ष्मण व हनुमान यांच्या सुंदर मूर्ति मंदिरांत आहेत. वर जाण्यासाठीं पायऱ्या असून प्रशस्त गच्ची आहे.

दरमहा शिवरात्रीस येथें मोठी यात्रा भरत असते. पूर्वीं या मंदिराच्या आजूबाजूस बरेंच घनदाट अरण्य होतें. बहामनी काळांत बीड शहराचा हबी बुल्ला हा जहागीरदार होता. त्यावेळीं उत्तरेकडून हुमायून-शहा जालीम या सरदारानें चाल केली .दोघांच्या सैन्याची घनघोर लढाई या मंदिरावजवळ झाली. त्यांत हजारो लोक मारले गेले व त्यांना तेथेंच पुरण्यांत आले. आज मंदिराजवळ अनेक थडगीं दिसतात तीं त्यांचीच असावींत असा अंदाज करावयास हरकत नाहीं.

भद्रशर्मा नांवाच्या एका भक्तपरायण गरीब ब्राह्मणास महादेव प्रसन्न होऊन सोन्यानें भरलेले एक हजार कुंभ या जागेवर त्याला शंकरानें दिले. ती जागा म्हणजेच आजचे कनकालेश्वर मंदिर होय (ईश्वर-कनक-आलय).

पुलकेशी दुसरा या राजाच्या कारकीर्दींत हें मंदिर बांधण्यांत आलें असें कांहीं लोक सांगतात.

खंडोबा मंदिर

कनकालेश्वर मंदिराप्रमाणेंच हें मंदिर प्राचीन आहे.असें म्हणतात कीं, बीड येथील जहागीरदार सुलतानजी निंबाळकर यांनें हें देऊळ बांधलें. कांहीं लोक असे सांगतात कीं, तें महादजी शिंदे यांनीं बांधलें. कांहीं लोकांचा असा दावा आहे कीं, सुप्रसिद्ध गणितज्ञ भास्कराचार्य यांनीं

आपल्या उपासनेच्या बळावर तुळजापूरच्या देवीस बीडला येण्यास भाग पाडले व त्यावेळीं नजिकचें खंडेश्वरी मंदिर बांधलें व त्याच वेळीं हें खंडोबा मंदिर बांधण्यांत आलें असलें पाहिजे.

मंदिर कोणीहि बांधलें असलें तरी बीड शहरास या मंदिरामुळें शोभा निश्चितपणें आली आहे. या मंदिराचें संपूर्ण बांधकाम दगडी असून कांहीं ठिकाणीं आठ नऊ फुटाच्या लांबीचे अखंड खांब वापरण्यांत आले आहेत. मंदिराच्या प्रत्येक बाजूस आठ खांब आहेत. मुख्य मंदिराचा आकार साधारण ४० ते २५ फूट असा आहे. मंदिरावर चारहि कोपऱ्यास चार गोलघुमट असून त्या ठिकाणीं निरनिराळ्या देवदेवतांच्या व इतर मूर्ति आहेत. मंदिरावर जाण्यासाठीं पायऱ्या असून जवळ जवळ ६० ते ४० फूट प्रशस्त गच्ची आहे. थेट कळसापर्यंत जाण्यासाठीं पायऱ्या आहेत.

मंदिराचें बांधकाम

मंदिरासमोरील दीपमाळ अत्यंत प्रेक्षणीय आहे. दीपमाळेची उंची ६०–७० फूट असून दीपमाळेवर अनेक मूर्ति कोरल्या आहेत. वर जाण्यासाठीं पायऱ्यांची सोय आहे.

या मंदिराच्या जवळच खंडेश्वरीचे मंदिर आहे. खंडेश्वरीच्या मंदिराबाबतचीं दंतकथा वर आलीच आहे.

प्रेक्षणीय स्थळें

बीड — जिल्ह्याचें ठिकाण असून पूर्वीं गुप्त्या व पाण्याच्या छगल्या तयार करण्याबद्दल प्रसिद्ध होतें. येथे कनकालेश्वराचें व खंडेश्वराचें हीं देवालयें व खंडेश्वरी समोरील दीपमाळ प्रेक्षणीय आहेत. महाशिवरात्रीस कनकालेश्वराची मोठी यात्रा भरते. पुराण वस्तु संशोधनाच्या दृष्टीनें महत्त्वाच्या इमारती शहरांत व तालुक्यांत आहेत, त्यांतील एक बीडचा किल्ला होय. हा किल्ला देवगिरी येथील राजा सिंहगलदेव यानें बांधला. दुसरा पुरावा असा आहे कीं, सुलतान महंमद तुघलक याच्या हुकूमावरून सहीसद्दीन या वास्तुशास्त्रज्ञानें या किल्ल्याचा आराखडा तयार केला.

अंबेजोगाई — तालुक्याचें ठिकाण असून राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रांतील आघाडीवरील शहर. येथें आद्यकवि मुकुंदराजाची समाधि आणि दासोपंत, जोगाई व खोलेश्वर यांचीं प्रेक्षणीय मंदिरें आहेत. व मराठवाड्यांतील सुप्रसिद्ध क्षयनिवारण केन्द्रहि येथेंच आहे. या गांवीं आर्टस व सायन्स व शेतकी शाळा असून दासोपंतांची सुप्रसिद्ध पासोडी येथेंच आहे.

परळी वैजनाथ — भारतांतील बारा ज्योतिर्लिंगांपैकीं एक ज्योतिर्लिंग. महाशिवरात्रीस मोठी यात्रा भरते. तार व टेलिफोन आदि आधुनिक सुखसोयी असलेलें शहर. रेल्वेचे दोन फाटे म्हणजे हिंगोली, पूर्णा, परभणीहून एक व दुसरा हैद्राबाद, विकाराबाद व विदरहून येतो आणि परभणीकडे जातो.

बरदापूर, — (ता. अंबेजोगाई) औरंगजेबाच्या काळापासून येथें एक मठ असून एका थोर लिंगायत साधूच्या सामर्थ्यानें तत्कालीन निझाम प्रभावीत झाला व त्यानें या साधूस इनामें दिलीं असें म्हणतात.

धर्मापुरी — (ता. अंबेजोगाई) विष्णु, शिव व अनेक अवतारांतील अनेक देवदेवतांच्या सुबक मूर्ती असलेल्या हेमाडपंथी मंदिरांत दोन शिलालेख आहेत.

रेणापूर — (ता. अंबेजोगाई) येथील रेणाई देवीच्या मंदिरांत एक पंचवीस फूट उंचीची दीपमाळ आहे. विशेष म्हणजे वर चढून हलविली असतांना ती हलते. येथें गुरांचा मोठा बाजार भरतो. मराठवाड्यांतील सर्व भागांतून उत्तम जनावरें येथें येतात. येथें आदर्श ग्राम-पंचायत असून लहानशा गांवांत विजेची सोय आहे.

घाटनांदूर — (ता. अंबेजोगाई) श्री सोमेश्वराचें रमणीय मंदिर, मॅट्रिक पर्यंत शिक्षणाची सोय असून रेल्वे स्टेशन आहे.

केज तालुक्याचें ठिकाण असून उद्धव स्वामींची (रामदास स्वामीचे आवडते शिष्य) समाधि आहे. बालाजीचें मंदिर व कुतुबुद्दीनचा नातु यानें बांधलेला दर्गा येथें आहे.

धारूर हें बीड जिल्ह्यांतील केज तालुक्यांतील सर्वात मोठें गांव आहे. या गांवाजवळ खुल्या मैदानांत फत्तेहाबाद नांवाचा एक किल्ला आहे. असें सांगतात कीं, विजापूर येथील अली आदिलशहाचा सेनापति किश्वरखान लारी यानें हिजरी ९७५ मध्यें अहमदनगरच्या निजामशाहीच्या सैन्याचा पराभव केला, त्याप्रीत्यर्थ हा किल्ला बांधण्यांत आला. इ. स. ९७७ मध्यें मूर्तझा निजामशहा बहरी यानें हा किल्ला ताब्यांत घेतला व किश्वरीखानचा शिरच्छेद केला. महंमद तुघलकाच्या एका सेनापतीनें हिंदु शिल्पकलेची छाप असलेल्या पद्धतीनें बांधलेली येथें एक मशिद आहे.

वडवणी (ता. केज) येथें सहाशें हातमाग असून विणकर संघ स्थापन करण्यांत आला आहे. सरकारतर्फे विणकाम शाळा चालविली जाते. सोनें, चांदी व अन्य भुसार मालाचें व्यापारी ठिकाण.

बनसारोळा (ता. केज) गांव लहान, परंतु शिक्षणाच्या दृष्टीनें आघाडीवर. एक हायस्कूल, बालवाडी व दोन वसतिगृहें येथें चालतात. विद्यार्थ्यांची संख्या पांचशें आहे.

पाटोदा महालाचें ठिकाण असून येथें महानुभाव पंथी लोकांचें मंदिर आहे. ग्रामपंचायतीतर्फे विजेची सोय करण्यांत आली आहे. येथें विकासगटाचें कार्यालय, प्राथमिक आरोग्य केन्द्र व हायस्कूलची उत्तम इमारत आहे. या तालुक्यांत पांच नद्यांचा उगम असून तालुक्यांत बैलगाडी करण्याचा धंदा, बिडीचा कारखाना, लोंकर-विणकाम शाळा व एक जीनिंग फॅक्टरी आहे.

सौताडा (ता. पाटोदा) चिखली भागापासून विंचरणा नदीचा उगम असून येथें दोनशें सव्वा दोनशें फूट उंचीचा प्रेक्षणीय धबधबा आहे. त्याशिवाय धबधब्याच्या पायथ्याशीं रामेश्वर मंदिर असून श्रावण महिन्याच्या तिसऱ्या सोमवारीं मोठी यात्रा भरते.

चिंचोली, (ता. पाटोदा) जिल्ह्यांतील, समुद्रसपाटीपासून सर्वात उंच वसलेलें ठिकाण (दोन हजार नउशें सतरा फूट). येथें गहिनीनाथाचें मंदिर आहे. यास अपरा हिल असें सुद्धां संबोधतात. या गांवापासून सिंधफणा नदीचा उगम होतो.

अमळनेर (ता. पाटोदा) भांडीं तयार करण्याचें सुप्रसिद्ध ठिकाण. या लहान गांवांत रयत शिक्षण संस्थेचें हायस्कूल आहे.

मानूर (ता. पाटोदा) लिंगायत पंथी लोकांचा मठ असून शनीचें मंदिर प्रेक्षणीय आहे.

शिरूर (ता. पाटोदा) येथें महादेव व काळबादेवीचें मंदिर असून बिडीचा कारखाना आहे.

नारायण गड येथें विठ्ठल व महादेवाचें मंदिर असून कार्तिकी पौर्णिमेस मोठी यात्रा भरते. हें ठिकाण उंचावर असल्यामुळें यास नैसर्गिक शोभाहि लाभली आहे. तीनशें वर्षांपासून चालत आलेल्या गादीवर आतांपर्यंत सात महाराज झाले असून येथें प्रत्येकाच्या समाध्या आहेत. येथील वैशिष्टय म्हणजे संपूर्ण काम दगडी आहे. (खुंटया सुद्धा) लांकडाचें काम कोणतेंहि नाहीं.

गेवराई तालुक्याचें ठिकाण असून राजस्थानांतून खास संगमरवरी दगड आयात करून चाळीस हजार रुपये खर्च करून लक्ष्मी-नारायणाचें मंदिर नुकतेंच बांधण्यांत आलें. कुष्ठ निवारण केन्द्र येथें आहे. हें व्यापारी गांव असून हजरत शहा निझामुद्दीन या मुसलमान संताची समाधि येथें आहे.

राक्षस भुवन (ता. गेवराई) येथील गोदावरी नदीच्या कांठीं शनीचें मंदिर असून शनि अमावस्येच्या दिवशीं खानदेश, विदर्भ व मराठवाड्यांतील भाविक लोक यात्रेसाठीं येथें येतात. १८६३ सालीं मराठ्यांनीं निजामाचा पराभव या गांवींच केला.

तलवाडा (ता. गेवराई) येथें तुळजापूरच्या माता देवीचें प्राचीन मंदिर असून एप्रिल महिन्यांत मोठी यात्रा भरते.

पांचालेश्वर (ता. गेवराई) महानुभाव पंथी लोकांचें स्थान. दत्ताचें मंदिर असून मार्गशीर्ष महिन्यांत मोठी यात्रा भरते.

हिरापूर (ता. गेवराई) सिंधफणा नदीवरील प्रमुख गांव, मंगळवारीं गुरांचा मोठा बाजार भरतो. दुसऱ्या भागांतील उत्तम जनावरें येथें विक्रीसाठीं येतात.

अष्टी तालुक्याचें ठिकाण असून घोरी घराण्यांतील इमारतीचे कांहीं अवशेष येथें सांपडले आहेत. धर्मशील अहिल्याबाई होळकर हिचा जन्म याच गांवीं झाला असें म्हणतात. येथें हजरत शहा बुखारी या मुस्लीम संताचें थडगें आहे.

पारगांव जोगेश्वरी (अष्टी) हेमाडपंथी देवीचें देऊळ आहे.

वळूच (ता. अष्टी) भैरवनाथाचें मंदिर असून चैत्र पौर्णिमेस (रविवारीं) मोठी यात्रा भरते.

शृंगेरी (ता. अष्टी) पौष पौर्णिमेस मोठी यात्रा भरते.

नागतळा (ता. अष्टी) येथें मोठा तलाव असून हें गांव उंचावर आहे. महाशिवरात्रीस नागनाथाची मोठी यात्रा भरते.

पाली (बीड) पाली येथें बिंदुसरा नदीवर ५८.६८ लाख रुपये खर्च करून बिंदूसरा धरण बांधण्यांत आलें आहे. मत्स्यसंवर्धन केन्द्राची कचेरी येथेंच आहे.

मांजरसुंबा (ता. बीड) येथून जवळ असलेल्या कपिलेश्वर या स्थानीं मन्मथ स्वामींचें मंदिर असून लिंगायत लोकांचें श्रद्धास्थान आहे.

नेकनूर (ता. बीड) सर्व जातींच्या आंब्यासाठीं व द्राक्षांसाठीं प्रसिद्ध गांव, ग्रामपंचायत, कृत्रिम गर्भधारणा केन्द्र, हायस्कूलच्या इमारती असून प्रायमरी प्रशिक्षण महाविद्यालय आहे.

यळंब (ता. बीड) महादेवीचें हेमाडपंथी मंदिर व सय्यद खुदावक्ष याचा दर्गा आहे. माघ वद्य चतुर्थीस येथें मोठा उरूस असतो. दर्ग्यांत औषधी महावृक्ष असून वृक्षाच्या ढोली फारच मोठ्या आहेत. ग्रामपंचायत, सहकारी धान्य गुदाम, प्राथमिक आरोग्य केन्द्र, हरिजन कॉलनी व प्राथमिक शाळा या ठिकाणीं असल्यामुळें विकास योजनेंतील अग्रेसर गांव.

नवगण राजरी (ता. बीड) येथें गणपतीचें मोठें देवालय आहे. गांवांत नऊ गणपती असल्यामुळें या गांवास नवगण राजूरी म्हणतात. हरिजनांची कॉलनी, ग्रामपंचायत, बालक मंदिर व वसतिगृह असल्यामुळें विकासाच्या क्षेत्रांतील आघाडीवर गांव आहे.

खजाना विहीर (ता. बीड) बीडपासून पांच मैलांवर ही विहीर आहे. विहिरीचें वैशिष्टय असें कीं, सतत ठराविक पातळीवर दहा बारा फूट इतकेंच खोल पाणी या विहिरींत असतें. या विहिरीच्या पाण्यापासून साडे चारशें एकर जमीन भिजते. हिजरी ९९१ मध्यें सलाबतखानानें ही विहीर बांधली व त्यासाठीं खूप पैसा खर्च केला आणि खजिना रिकाम केला म्हणून यास खजाना विहीर असें संबोधण्यांत आलें. असें म्हणतात कीं, अहमदनगर या शहरास चांदबिबीच्या काळांत येथून पाणीपुरवठा होत असे. विहिरींत पाणी येतें कोठून याचा मात्रा अद्याप पत्ता लागला नाहीं.

दहिफळ या गावीं खंडीबाची यात्रा दरवर्षीं मोठ्या प्रमाणावर भरते. ही यात्रा जवळजवळ तीन आठवडे चालते.

मांजरथ (ता. माजलगांव). गोदावरी नदीच्या उगम व संगमाच्या मध्यभागीं हें गांव असल्यामुळें यास गोदावरी नाभीस्थान संबोधतात. हेमाडपंथी त्रिविक्रम मंदिर सुद्धां आहे.

केसापुरी या गांवीं केशवराजाचें हेमाडपंथी मंदिर असून मूर्तीच्या ओठाला फोड आल्यासारखें दिसतें.

शुक्लतीर्थ महादेवाचें मंदिर असून दरवर्षी मोठी यात्रा भरते.

गंगामसला मोरेश्वराचें मंदिर असून या लहान गांवांत हायस्कूल आहे.

लिंबागणेश:—(ता. बीड) गणपतीचें प्राचीन मंदिर असून प्राथमिक शाळेची भव्य इमारत आहे.

कांहीं उपयुक्त माहिती

बियाण्याची शुद्धता कशी राखावी ?

बियाण्याची शुद्धता राखणें अत्यंत महत्त्वाचें असतें. त्याकरितां जेव्हां पीक फुलावर असतें तेव्हां वेगळ्या पिकांचीं रोपें उपटून टाकावीं. तसेंच मळणीच्या वेळीं, मळणीची जागा स्वच्छ ठेवावी आणि अन्य जातीचें बियाणें तेथें ठेवूं नये.

कंपोस्ट कसें तयार करावे ?

कृत्रिम खतांचा वापर करीत असतांनाहि शेणखत व कंपोस्ट यांचा वापर करणें आवश्यक असतें. कारण त्यामुळें जमिनीचा कस वाढतो आणि रासायनिक खतांचे अनिष्ट परिणाम टाळतां येतात.

ग्रामीण कंपोस्ट

यासाठीं १० × ६ × ३ फूट अशा आकाराचा एक खड्डा खोदावा. त्यांत शेतांतील केरकचरा व शेण टाकून तो पद्धतशीरपणें भरावा. प्रथम एक फूट जाडीचा केरकचऱ्याचा थर लावावा व त्यावर शेण आणि राख पसरावी. अशा रीतीनें एकूण पांच थर देण्यांत यावेत. जमिनीच्या पातळीच्या वर दोन ते तीन फूट एवढे थर देण्यास हरकत नाहीं.त्यानंतर त्यावर चोहों बाजूंनीं माती घालावी. खड्डा फक्त दोन तीन दिवसांत भरावयाचा असतो. हें सर्व साहित्य कुजल्यानंतर चार ते सहा महिन्यांत चांगलें खत तयार होतें. सामान्यतः एका खड्ड्यांतून अडीच टन म्हणजे पांच गाड्या खत मिळतें.

शेणखत

या प्रकारचें खत तयार करण्यासाठीं कंपोस्ट खतासाठीं ज्या आकाराचा खड्डा खणावा लागतो त्याच आकाराचा खड्डा खोदावा. या खड्ड्यांत गोठ्यांतील गुरांच्या पायाखालचा केरकचरा, शेणमूत वगैरे थराथरानें भरावें. गोठ्यांतील दिवसभराचा कचरा या खड्ड्यांत भरून झाल्यावर त्यावर शेण व राख टाकावी. पातळसा मातीचा थरहि द्यावा. अशा रीतीनें हा खड्डा भरावा. खड्डा पूर्ण भरून झाल्यावर मातीनें तो झाकावा. हें खतहि कंपोस्ट खताप्रमाणेंच चार सहा महिन्यांत चांगलें तयार होतें. एका खड्ड्यांतून अडीच टन म्हणजे पांच गाड्या खत मिळतें.

शहरी कंपोस्ट

शहर भागांत केरकचरा आणि मानवी मलमूत्रापासून कंपोस्ट तयार करण्याच्या बाबतींत नगरपालिकांना उत्तेजन देण्यांत येतें. या खतासाठींहि वर उल्लेखिलेल्या आकाराचाच खड्डा खोदतात. ज्या मानानें खतासाठीं साहित्य उपलब्ध असेल त्या मानानें खड्ड्याची लांबी वाढवितां येतें. हें खतहि चार ते सहा महिन्यांत तयार होतें. पुष्कळ शेतकऱ्यांकडून या खताला मागणी असल्यामुळें बहुतेक नगरपालिकांनीं हें काम हातीं घेतलें आहे. या विभागामध्यें (डिव्हिजन) सालीना ४०,००० टन कंपोस्ट तयार होतें.

मुंबई विभागाला लांबच्या लांब समुद्रकिनारा लाभला असून त्यामुळें माशांचें खत भरपूर प्रमाणांत मिळूं शकतें. मासळीच्या खतांत आणि हाडांच्या भुकटींत अनुक्रमें दोन ते तीन टक्के आणि १६ ते १८ टक्के फॉस्फेट असतें. हें खत मुख्यतः फळझाडासाठीं वापरतात. बाजारांत स्थानिक विक्रेत्यांकडे तें मिळूं शकतें.

मासे आणि हाडांची भुकटी

खेडेगांवांत चराच्या आणि गोपुरी संडासाची शिफारस करण्यांत आली आहे. कारण अशा प्रकारच्या संडासामुळें सोनखत सुलभतेनें तयार करतां येतें. खत तयार करण्याचें काम ग्रामपंचायत करते. ग्रामपंचायतींना अशा प्रकारचे संडास बांधण्याकरितां ५००० रुपयांपर्यंत कर्ज देण्यांत येतें व त्यापैकीं २००० रुपये आर्थिक मदत म्हणून मानण्यांत येते. या संडासांमुळें गांवें स्वच्छ राहण्यास आणि खतांची तूट थोडीफार भरून काढण्यास मदत होते. ग्रामपंचायतींना हें खत शेतकऱ्यांना विकतां येतें.

चराचे आणि गोपुरी संडास

रासायनिक खतें--निरनिराळ्या रासायनिक खतांतील घटक द्रव्यें पुढें देण्यांत आलीं आहेत.

अनुक्रम नं.	रासायनिक खताचें नांव	नायट्रोजन किती टक्के	फॉस्फरस किती टक्के	पोटॅश किती टक्के
१	प्राण्याचें मूत्र	०.६ ते ०.८	०.३	०.४ ते ०.९
२	मेंढ्यांची लेंडी	०.७	०.४	०.८
३	गाळ-खत	७.४	२.७	२.७
४	मानवी मूत्र	४.९	०.६	०.६
५	लोंही	११ ते १३	१.२	०.७
६	मासळीचें खत	५ ते १०	३ ते ७	०.३ ते १.५
७	हाडाची भुकटी	४.४	२०.२	०.२
८	पेंड खत	६.५ ते ७.५	२ ते ३	१.३ ते २.००
९	अमोनियम सल्फेट	२० ते २१	......	......
१०	सोडियम नायट्रेट	१.५	......	......
११	युरिया	४४	......	......
१२	सुपर फॉस्फेट	......	१६–१८	......
१३	सल्फेट ऑफ पोटॅश	......	......	४५ ते ५७
१४	शहरी कंपोस्ट	१.३ ते १.५	१.०	......
१५	ग्रामीण कंपोस्ट	०.५ ते ०.७	......	......

असंख्य रोगांपासून आणि कृमिकीटकांपासून आपल्या पिकांचें नुकसान होतें. त्यापैकीं कांहींचा निर्देश खालीं करण्यांत आला असून त्याविरुद्ध करावयाचे इलाजहि देण्यांत आले आहेत.

पिकाचें नांव	रोगाचें अगर किटकांचें नांव	इलाज	एकरीं प्रमाण
कापूस	मुरडचा, तुडतुडे किंवा पानें गुंडाळणारी अळी	५ टक्के डी. डी. टी. पावडर किंवा ५० टक्के डी. डी. टी. फवारणें, (१ पौंड २५ गॅलन पाण्यांत)	१५ ते २० पौंड

	बोंड अळी	खुंट जमा करून स्वच्छ करणें एन्ड्रीनचे २० टक्के दुधासारखें सत्त्व	अर्धा गॅलन एंड्रीन व १०० गॅलन पाणी
भात	वीट (निळे भुंगे), करपा, टोळ, लष्करी अळया	५ टक्के बी. एच. सी. पावडर	२५ ते ३० पौंड
	सुरळयांतील अळी आणि तुडतुडे (टोळ), भिरूड, पीस, पानावर ठिपके वगैरे	५ टक्के डी. डी. टी. पावडर ५० टक्के डी. डी. टी. पावडर डब्ल्यु. पी. १ पौंड ६२५ गॅलन पाणी फवारणें, बियाण्यास बोर्डीक्स मिक्श्चर किंवा ३:५०या प्रमाणांत मर्क्युरी कंपौंड लावावें.	२ते ३पौंड; २० पौंड बियाण्यास दोन गॅलनचे फवारे पुरे होतील. २५ ते ३० पौंड भातासाठीं १ औंस बियाणें चालेल .
		बोर्डो मिक्श्चरचे फवारे ३:५० उभ्या पिकांवर कॉपर कंपोंडचे फवारे मारणें	६०–८० गॅलनचे फवारे
भुईमूग	मावा	१० टक्के बी. एच्. सी. पावडरचे फवारे १:६० किंवा १:८० या प्रमाणांत निकोटीन सल्फेटचे फवारे	१५ ते २० पौंड १०० गॅलन
	टिक्का	२००–३०० मेश सल्फरचे फवारे	१५ ते २० पौंड दोन तीन वेळां मारल्यानें रोग आटोक्यांत येतो
		बोर्डीक्स मिक्श्चर ५: ५: ५०	५० गॅलनचे फवारें दोन तीन वेळा मारावे.
गहूं	तांबेरा	सल्फरचे फवारे	१५ ते ३० पौंड.

कोणत्या महिन्यांत कोणतीं कामें करावींत ?

चैत्र –जमिनीची नांगरणी आणि वखरणी करावी. बांध दुरुस्ती करावी व खत शेतांत न्यावें. भाजीपाल्याच्या व उंसाच्या पिकांस पाणी द्या.वें

वैशाख –नांगरटीचीं व वखरणीचीं कामें पूर्ण करावीत. जमीन समपातळीवर आणून बांध दुरुस्त करावेत शेतें तयार करावींत. खत शेतावर न्यावें उभ्या पिकांना पाणी द्यावें.

ज्येष्ठ –पेरणीकरितां जमीन तयार करावी. खतें घालावी आणि ज्वारी, बाजरी, कापूस, भुईमूग, मूग उडीद इत्यादींची पेरणी करावी. धानाचीं (भाताचीं) रोपें तयार करावी.

आषाढ –खरीप पिकांचीं पेरणी पूर्ण करावी. रासायनिक खत द्यावें. वेणणी (निंदणें) करावी. उंसाच्या पिकाला मातीची भर द्यावी.

श्रावण –अंतरमशागत करावी व तण काढावें. रबीची जमीन नांगरावी. रासायनिक खत द्यावें.

भाद्रपद –खरीपांच्या पिकाची अंतरमशागत करावी व आवश्यक असल्यास ऊंस व इतर पिकांना पाणी द्यावें. उडीद व भुईमूग तयार झाला असेल तर त्याची कापणी करावी.

आश्विन –भुईमुगाच्या शेंगा काढा व लवकर येणाऱ्या धानाची (भाताची) व उडीद, मूग, पालेभाज्या यांची कापणी करा. उंसाला पाणी द्या. रबीची जमीन नांगरा व हरभरा, गहूं व रबी ज्वारी यांची पेरणी करा.

कार्तिक –कापूसवेचणी सुरू करावी. रबी पिकांची पेरणी व बाजरी, खरीप ज्वारी, धान इत्यादि खरीप पिकांची कापणी पूर्ण करावी.

मार्गशीर्ष –रबी पिकांना पाणी द्यावें व त्यांची अंतरमशागत करावी. कापूस वेचावा, उंसाची कापणी करावी. खरीप पिकांची कापणी झाल्यानंतर जमिनीची नांगरणी करावी.

पौष –गव्हाच्या पिकांस पाणी द्यावें व त्याची अंतरमशागत करावी. उंसाची कापणी करावी. उंसाची नवीन पेरणी करावी.

माघ –हरभरा व कोरडा गहूं यांच्या कापणीला सुरुवात करावी. गव्हाला व उंसाला पाणी द्यावे. उंसाची कापणी पुरी करावी. जमिनीची नांगरणी चालूं ठेवावी.

फाल्गुन –गहूं, ज्वारी व हरभरा यांची कापणी करावी. जमिनीची नांगरणी चालूं ठेवावी. उंस, भाजीपाला वगैरे पिकांना पाणी द्यावे.

एका दृष्टिक्षेपांत बीड जिल्हा

क्षेत्रफळ–चार हजार दोनशे तेहतीस चौरस मैल
भौगोलिक क्षेत्रफळ–सत्तावीस लक्ष एकूणसाठ हजार नऊशें बावीस एकर
लोकसंख्या –दहा लक्ष एक हजार एकशें पांच
तालुके–सात
गांवें–एक हजार सदतीस
पुरुष–पांच लक्ष नऊ हजार आठ
स्त्रिया–चार लक्ष ब्याण्णव हजार सत्याण्णव
नागरी लोकसंख्या–अकरा टक्के
ग्रामीण–एकूणनव्वद टक्के

शेती

शेतकरी वर्ग–सेहेचाळीस हजार सहाशें तेवीस
कुळांची संख्या–बत्तीस हजार दोनशें अठ्ठावन
सर्वोत्कृष्ट पिकें–ज्वारी व गहूं
जंगलाखाली एकूण क्षेत्र–पंचावन हजार तीनशें सत्त्यात्तर एकर
शेतीशिवाय उपयोगांत आणलेली जमीन–पासष्ठ हजार सातशें एकूणऐंशीं एकर
एकूण जमीन–चोवीस लक्ष एकूण ऐंशी हजार आठशें बहात्तर एकर
स्वतः शेती करणारे–पंचेचाळीस हजार सहाशें ऐक्यांशीं
जमीनमालक व खंड वसूल करणारे–तेहतीस हजार दोन
शेतीखालील एकूण जमीन–वीस लक्ष एकवीस हजार सातशें श्याहत्तर एकर
पिकाखालील क्षेत्र–वीस लक्ष एकतीस हजार तीनशें सत्तावन एकर
धरणांच्या एकूण योजना–अकरा
पाण्याखाली भिजणारी एकूण जमीन–एक लक्ष चोवीस हजार दोनशें अठरा एकर
लागवडीस अयोग्य जमीन–बत्तीस हजार एकशें बेचाळीस एकर
कुरणाखालील जमीन–एक लक्ष एक हजार दोनशें एकोणवीस एकर
वृक्षें व राईखालील जमीन–तीन हजार आठशें चव्वेचाळीस एकर

पशुधन

म्हशी–ऐंशी हजार तीनशें एक्कावन
मेंढचा–त्रैंशी हजार तीनशें सात

गाढवें –तीन हजार अकरा
कोंबड्या–एक लक्ष बारा हजार सातशें पांच
घोडे–अकरा हजार एकशें एकवीस
शेळ्या–एकोणीस लक्ष चार हजार दोनशें सदुसष्ठ
डुकरें–सहा हजार चारशें नऊ
उंट–चोवीस

सहकारी संस्था

संस्थांची संख्या–एक हजार एकशें अडोतीस
खेळतें भांडवल–साडे नऊ कोटि
सभासद–सत्त्यात्तर हजार सातशें अकरा
बँकींग कचेऱ्या–एक

शिक्षण

शैक्षणिक संस्था–नऊशें एक्केचाळीस
प्राथमिक शाळा–नऊशें
माध्यमिक शाळा–बत्तीस
विद्यार्थ्यांची संख्या–त्रेसष्ठ हजार आठ
प्राथमिक विद्यार्थ्यांची संख्या–एकावन हजार आठशें शाहत्तर
माध्यामिक विद्यार्थ्यांची संख्या–दहा हजार सातशें चोवीस
महाविद्यालयें–दोन
विद्यार्थ्यांची संख्या–चारशें बावन
साक्षरतेचें प्रमाण – शहरीं ६.५
–ग्रामीण, २.१.

एकूण ८.६

(१९६१ च्या शिरगणतीनुसार बीड जिल्ह्यांतील साक्षरतेचें प्रमाण) १४.५ आहे,
वैद्यकीय सोयी, सरकारी (१९५१ प्रमाणें)

दवाखान्यांची संख्या–तेवीस
डॉक्टरांची संख्या–(ग्रामीण आरोग्य केन्द्रासहीत) तेरा
हॉस्पिटलांची संख्या–दोन.
खाटांची संख्या –दोनशें सत्याणव
रोगी (इनडोअर)–दोन हजार दोनशें सत्तावन
रोगी (आउट डोअर)–दोन लक्ष सव्वीस हजार चारशें अकरा

दळणवळण

सडका–दोनशें शाहण्णव मैल
डांबरी–सेहेचाळीस मैल
रेल्वेमार्ग–तीस मैल

स्टेट ट्रान्सपोर्ट गाडया–पस्तीस

इतर सर्व मोटार गाडया–दोनशें तीन

समाज विकास कार्यक्रम

समाज विकास गटांची संख्या–बारा

लोकसंख्या–आठ लक्ष सव्वीस हजार सेहेचाळीस

लोकांचा हिस्सा–रुपये चार लक्ष सदोतीस हजार दोनशें बासष्ठ

समाजविकास कार्यक्रमाखालील खेडीं–एक हजार सदोतीस

एकूण खर्च :–रुपये पंचेचाळीस लक्ष आठ हजार नऊशें बारा

वीजपुरवठा

प्रस्थापित शक्ति –दोनशें ऐंशी कि. वॅ.

वापरात आलेली शक्ति–तवीस हजार पांचशें पंच्याऐशीं कि. वॅ. (सरासरी प्रत्येक महिन्यासाठीं)

स्थानिक नगरपालिका–तीन

संस्था– ग्रामपंचायती–सहाशें सत्याऐशीं

टाऊन कमिटया–चार

औद्योगिक कारखाने

कारखान–तेवीस

कामगार–एक हजार दोनशें पंच्चाण्णव

महसूल एकूण महसूल–रुपये बावीस लक्ष चौदा हजार पांचशें सत्तावन

एकूण महसूल खर्च–तीन लक्ष चौऱ्याण्णव हजार एकूणचाळीस रुपये

कर्मचारी वर्ग–पांचशें एकसष्ठ

कांहीं वैशिष्टचें

बीड येथें यादवांच्या काळांत इ. स. १२०० ते १३०० मध्यें सुप्रसिद्ध गणिती भास्कराचार्य होऊन गेला

अंबेजोगाई येथें यादवांच्या काळांतील मराठीचे आद्य कवि मुकुंदराज यांनीं मराठींतील आद्य ग्रंथ "विवेक सिंधु" लिहिला.

बीड शहराचें मूळचें नांव दुर्गावती असून त्यानंतर चंपावतीनगर ठेवण्यांत आलें होतें. १३२६ च्या सुमारास महंमद तघलकानें बीड हें नांव ठेवलें.

भारतांतील बारा जोतिर्लिंगांपैकीं एक जोतिर्लिंग बीड जिल्ह्यांतील परळी वैजनाथ हें होय

पुण्य श्लोक, धर्मशील अहिल्याबाई होळकर हिचा जन्म बीड जिल्ह्यांतच झाला असें म्हणतात.

नानासाहेब पेशव्यांकडून ब्रह्मावर्तास आज्ञापत्र नेणारा श्रीयुत रंगराव रत्नाकर पागे हा बीड जिल्ह्यांतील होय.

१८८३ मध्यें थोरले माधवराव पेशवे यांनीं निझामचा ज्या ठिकाणीं दणदणीत पराभव केला तें ठिकाण राक्षसभुवन बीड जिल्ह्यांतील गेवराई तालुक्यांतील गोदावरीकांठी आहे.

१८९९ मध्यें इंग्रजांशीं झालेला स्वातंत्र्य-लढा बीडजवळील साखरवाडी येथें झाला. स्वातंत्र्य-लढ्यांतील प्रमुख सेनानी जगन्नाथ उर्फ बाबासाहेब उर्फ रावसाहेब यास ब्रिटिशांनीं पकडून शिक्षा दिली होती . परंतु नंतर ही शिक्षा रद्द करून त्यास जन्मठेपेची शिक्षा देण्यांत आली. परंतु मानी रावसाहेबास कैदेंतील अवमानित जीवन न पटल्यामुळें वर्षांतच तो तुरुंगांत मृत्यु पावला.

१८२७ मध्यें मोमिनाबाद येथें एका भारतीय शिपायानें त्यावेळच्या फौजी तुकडींतील कॅप्टन डेव्हिड इव्ह्यान्सला गोळी मारून ठार मारलें.

१८१९ मध्यें प्रतापराव यानें वंजारी समाजाच्या मदतीनें इंग्रजांशीं लढा दिला. परंतु ब्रिटिश फौजी अधिकारी लेकनन सदर लॅन्ड यानें बंडाचा मोड केला.

१८२५ मध्यें बीड जिल्ह्यांतील भिल्ल लोकांनीं एकत्र येऊन ब्रिटिशांशीं लढा दिला.

बीड जिल्ह्याची जहागिरी श्रीयुत निंबाळकर सुलतानजी यास मिळाली होती. पुढें ती जहागिरी त्याचा मुलगा जानूजी निंबाळकर यास मिळाली. तदनंतर जानूजीचा मुलगा हणमंतराव यास मिळाली. हणुमंतराव यानें मराठ्यांना मिळण्याचा प्रयत्न केला. पुढें त्याचा मुलगा धनपतराय याच्या हातून जहागिरी जाऊन ती १७७३-७४ च्या सुमारास खालसा झाली व निझामी राजवटींत हैद्राबाद राज्यांत एक जिल्हा म्हणून त्याचें अस्तित्व राहिलें.

हैद्राबादच्या स्वातंत्र्यासाठीं बीड येथील पापामिया कलेक्टरचा मुलगा यानें सुद्धां बरेच प्रयत्न केले व लढाईंत त्यानें प्रत्यक्ष भाग घेतला.

हैद्राबाद राज्यांत वैयक्तिक सत्याग्रहासाठीं म. गांधींनीं पांच सत्याग्रहींपैकीं दोन सत्याग्रही बीड येथील निवडले होतें.

विकासाचीं वैशिष्टचें

सर्व साधनांनीं सुसज्ज्य असलेलें क्षय निवारण केंद्र—टी. बी. सॅनेटोरियम बीड जिल्ह्यांतील अंबेजो-गाई या ठिकाणीं आहे. मराठवाड्यांत असें केंद्र दुसरें कोणतेंच नाहीं.

बीड जिल्ह्यांत दुसऱ्या पंचवार्षिक योजनेपूर्वीं एकूण १५७ ग्रामपंचायती होत्या व आज त्या ६८७ असून जिल्ह्यांतील फक्त २४ खेडीं ग्रामपंचायतीच्या क्षेत्रांत समाविष्ट व्हावयाची आहेत.

बीड जिल्ह्यांतील एक हजार सदतीस खेडीं आहेत व आज जवळ जवळ एक हजार प्राथमिक शाळा आहेत.

बीड जिल्हा सहकारी विभागानें जिल्ह्यांतील ९३.७ टक्के खेडीं सहकारी चळवळीच्या क्षेत्रांत आणलीं आहेत.

बीड मलेरिया विभागानें बीड जिल्ह्यांतील ९३ टक्के घरांवर डी.डी.टी. चे फवारे मारून मलेरियाचें जवळ जवळ उच्चाटन केलें.

बीड जिल्ह्यांतील सातहि तालुक्यांत विकास गट योजना लागूं करण्यांत आली असून सर्व खेडीं या योजनेंत आलीं आहेत.

अल्पबचत योजनेंत १९५८-५९, ५९-६० या दोन्ही वर्षीं बीड जिल्ह्यानें अनुक्रमें भारतांत व महाराष्ट्रांत पहिला क्रमांक मिळविला आहे.

१९५८-५९ सालीं रब्बी पिकाच्या अधिक उत्पादनाबद्दल भारत सरकारकडून बीड जिल्ह्यास दहा हजार रुपयांचीं रोख बक्षिसें मिळालीं.

विदर्भ व मराठवाडा या विभागासाठीं शेतीचे बिनचूक हिशेब ठेवण्याबद्दल घेतलेल्या स्पर्धेंत नेकनुर व लिंबागणेश या बीड तालुक्यांतील शेतकऱ्यांनीं पहिलें व तिसरें बक्षीस पटकावलें.

१९६१-६२ मध्यें अधिक धान्य उत्पादनाबद्दल महाराष्ट्र राज्य पातळीवरील तीन्हीही बक्षीसें बीड जिल्हयानें मिळवली आहेत.

संत कवींची मालिका

नांव.	जन्म स्थान, निवास	जन्म शक व मृत्यु	रचना.
मुकुंदराज	अंबेजोगाई	१११०	विवेक सिंधु, परमामृत, पवन विजय मूळस्तंभ
जगमित्र नागा	परळी वैजनाथ	१२५२	पदें व अभंग
मुक्तेश चांगदेव	अंबेजोगाई	१४२७	....
जनी जनार्दन	बीड	१७२३	निर्विकल्प, महावाक्य, विवरण, सीतास्वयंवर.
दासोपंत	अंबेजोगाई	१४७९	गीतार्णव, पदार्णव, पासोडी
कृष्ण दयार्णव	अंबेजोगाई	१५९६ ते १६६२	दत्तजननोत्साह, विचारचंद्रिका, हरिवरदा, तन्मयानंद बोध
शिव कल्याण	अंबेजोगाई	१५५७	नित्यानंद, दीपिका, (अमृतानुभवावर टीका) भागवतावर विस्तृत ओवीबद्ध टीका
विठ्ठल	गेवराई	१५९६	....
उद्धव चिद्घन	धाहुर ता. केज धारूर	......	गीतार्थ मंजीरी, शुकरंभा संवाद श्रीयाळ चरित्र, भक्त कथामृत, सार (अनुपलब्ध) त्रिलोचन चरित्र
नरहरी मोरेश्वर	अीट ता. बीड	१६५०	....
निरंजन बुवा	कळंब अंबे ता. केज	१६५५	अमृतानुभवावर प्राकृत टीका, गोंधळी, पतिव्रताख्यान, केशव-चैत्यन्य कथा, कल्पतरू
उत्तम श्लोक	बीड	१६२१ ते १७०८	प्रबोधसार
नागदेवाचार्य	बीड	११५८ ते १२२४	....
महदंबा	बीड	१२०८	(आद्य मराठी कवयित्री) धवळे, गर्भावळी
विश्वनाथ व्यास	बीड	......	ध्यानामृत स्तोत्र
हयग्रीव बास	राक्षस भुवन ता. गेवराई	११९० ते १२४६	गद्यराज स्तोत्र

शेखमहंमद बावा	धारूर ता. केज	१६१८	योग संग्राम, निष्कलंक बोध, ज्ञानसागर, पवन विजय.
खोलेश्वर	उमराई, अंबेजोगाई जवळ	११२२ ते ११७२	सिंदव यादव कालीन सुप्रसिद्ध सेनापति
भास्कराचार्य	बीड	१११४	सिद्धांत शिरोमणी, करमकुतुहल वासनाभाष्य
अहिल्याबाई होळकर	चौडी ता. केज	१६४७ ते १७१७	प्रातः स्मरणीय थोर महिला, ज्ञानेश्वरी, विजय, संप्रदाय
निरंजन माधव	रामडोह	१६८०	परिमल अद्वैतामृत, छंद शास्त्रावर तीन ग्रंथ
बंकट स्वामी	निनगूर	......	

टीप– उपरिनिर्दिष्ट संत कवींपैकीं कांहीं कवींच्या रचनेसंबंधीं माहिती न मिळाल्यामुळें ती देतां आली नहीं.

कोणाकडे कशाची चौकशी करावी

कामाचें नांव	पत्ता
(१) लागवडीकरितां जमीन, तगाई कर्ज, लोखंड, सिमेन्ट	जिल्हाधिकारी व अध्यक्ष, जिल्हा विकास मंडळ, बीड व तालुका पातळीवर तालुक्याचे मामलेदार
(२) शेतीच्या सुधारलेल्या पद्धति, रासायनिक खतें, सुधारलेलें बी-बियाणें, व अवजारें आणि कीटकनाशक औषधें	जिल्हा शेतकी अधिकारी. बीड अथवा तालुका पातळीवरील संबंधित तालुक्याचे शेतकी अधिकारी
(३) शेतकी शिक्षणक्रम, शेतकी शाळेंत प्रवेश व त्यासंबंधींची माहिती	मुख्याध्यापक शेतकी शाळा, मोमिनाबाद आणि जिल्हा शेतकी अधिकारी, बीड
(४) पीक-स्पर्धा व प्रदर्शनें	जिल्हा विकास मंडळ, बीड
(५) सहकारी संस्थांची स्थापना, कार्यपद्धति व सहकारी चळवळीसंबंधीं माहिती	असिस्टंट रजिस्ट्रार, सहकारी संस्था, बीड किंवा तालुका पातळीवर विकास योजना क्षेत्रांतील सहकारी विभागाचे अधिकारी
(६) शिक्षण संस्थांची स्थापना, कार्य व त्यासंबंधींची माहिती	जिल्हा शिक्षण अधिकारी, नगर रोड, बीड
(७) मागासलेल्या वर्गांतील जनतेस मिळणाऱ्या आर्थिक, शैक्षणिक व इतर सवलती	समाज कल्याण अधिकारी, बशीर गंज, बीड
(८) रस्ते, पूल बांधकामासंबंधीं माहिती	एक्झिक्युटिव्ह इंजिनियर, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड
(९) पाटबंधारे व धरण योजनेसंबंधीं माहिती	डेप्युटी इंजिनियर, लघुसिंचन योजना जुना बाजार , बीड

(१०) ग्रामीण भागांतील लहान उद्योगधंद्यास सरकारी सहाय्य, मार्गदर्शन	लघु उद्योगधंदे व कुटिरोद्योग अधिकारी, बशीरगंज बीड
(११) जनावरांचें संगोपन, त्यांच्या रोगावरील उपाययोजना, आणि कोंबडीपालन	जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, बशीरगंज, बीड व तालुक्यांतील जनावरांचे दवाखान्यांतील अधिकारी
(१२) प्रवाश्यांचें विश्राम स्थान व त्यांत जागा राखून ठेवण्यासाठीं	एक्झिक्युटिव्ह इंजिनियर, बीड
(१३) मासेमारी संस्था, त्यांची कार्यपद्धति, त्यास मिळणारे सरकारी सहाय्य व मार्गदर्शन	असिस्टंट सुपरिंटेंडेंट मासेमारी विभाग मु. पो. पाली, ता. जि. बीड
(१४) ग्रामपंचायती व सहकारी संस्थांना सामुदायिक श्रवणासाठीं रेडिओ	टेक्निशियन इन चार्ज ग्रामीण रेडिओ विभाग हिरालाल चौक, बीड
(१५) सार्वजनिक आरोग्य संवर्धन, उपचार व्यवस्था, सांथीचे रोग प्रतिबंधक उपाययोजना	जिल्हा आरोग्याधिकारी, धोंडीपुरा, बीड
(१६) मलेरिया निर्मूलन व डी. डी. टी. फवारण्यासंबंधीं	मलेरिया निर्मूलन अधिकारी, कनकालेश्वर मंदिराजवळ, बीड
(१७) विहिरी, तलाव, रस्ते, शाळागृहें आदि संबंधींच्या स्थानिक विकास कार्यक्रमांतून होणाऱ्या बांधकामासंबंधीं	जिल्हा विकास मंडळ (कलेक्टर कचेरी) बीड
(१८) विकास गट क्षेत्रांतील विकास कामें, कार्य पद्धति व त्यास मिळणाऱ्या सहाय्यासंबंधीं	संबंधित विकास गटाचे अधिकारी, अथवा जिल्हा प्रकल्प अधिकारी, बीड
(१९) सर्वोदय क्षेत्रांतील विकास कामें व त्यांची कार्यपद्धति	संचालक, सर्वोदय केंद्र, मु. पो. पहाडी, पारगांव, धारूर विभाग, ता. केज
(२०) महाराष्ट्र राज्य विद्युत् मंडळातर्फे होणाऱ्या संकल्पित विद्युत् योजनांची माहिती	इलेक्ट्रिकल इंजिनियर, महाराष्ट्र राज्य विद्युत् मंडळ, औरंगाबाद, सहाय्यक इंजिनियर, महाराष्ट्र राज्य विद्युत् मंडळ, सुभाष रोड, बीड
(२१) जिल्ह्यांतील पोलीस यंत्रणा व तत्संबंधींची माहिती	जिल्हा पोलीस प्रमुख, बशीर गंज बीड
(२२) जंगलाचें संरक्षण व संवर्धन आणि तत्संबंधींचे नियम व माहिती	रेंज ऑफिसर, वन विभाग, मु. पो. ता. मोमिनाबाद जिल्हा, बीड
(२३) गांवांत पोस्ट सुरू करणें, टपाल, तार संबंधीं कार्यपद्धति व माहिती	सुपरिंटेन्डेंट पोस्ट ऑफिस, औरंगाबाद
(२४) एस्. टी. चे मार्ग, कार्य पद्धति व तत्संबंधींची माहिती	डिव्हिजनल कंट्रोलर, स्टेट ट्रान्सपोर्ट , औरंगाबाद
(२५) ग्रामीण भागांतील रस्ते, शाळा, ग्रामपंचायती व विहिरी यांच्या बांधकामासंबंधीं	जिल्हा परिषद , बीड
(२६) नोकरी मिळणाऱ्यांच्या नांव नोंदणी संबंधीं	उद्योग विनिमय अधिकारी, जुना बाजार, बीड

(२७)	जिल्ह्यांतील विविध विभागांच्या योजनांची माहिती व त्यासंबंधींची प्रगति	जिल्हा प्रसिद्धि अधिकारी, कलेक्टर कचेरी, समोर बीड
(२८)	अल्पबचत योजना, तत्संबंधींची माहिती	अल्प बचत संघटक बीड, कलेक्टर कचेरी
(२९)	ग्रामपंचायत, अंदाजपत्रकास मंजुरी देणें, त्यासंबंधीं मार्गदर्शन करणें	जिल्हा ग्रामपंचायत अधिकारी, कलेक्टर कचेरी, बीड
(३०)	जिल्ह्यांतील सर्व विषयांची आंकडेवार माहिती (उदा.–एकूण जमीन, शैक्षणिक संस्था, कारखाने इत्यादि)	जिल्हा सांख्यिकी अधिकारी कलेक्टर कचेरी, बीड
(३१)	धान्य दुकानांना परवानगी देणें, धान्य व नियंत्रित वस्तु आयात निर्यात संबंधीं परवानगी, गोदामावर देखरेख	जिल्हा पुरवठा अधिकारी, कलेक्टर कचेरी, बीड
(३२)	सिव्हिल हॉस्पिटल, बीड संबंधीं माहिती व आरोग्यविषयक योजनांची माहिती व मार्गदर्शन	सिव्हिल सर्जन, बीड किंवा जिल्हा आरोग्य अधिकारी, धोंडीपुरा, बीड
(३३)	क्षय रोग्यांना प्रवेश देणें व त्या संबंधीं माहिती व मार्गदर्शन	सिव्हिल सर्जन, क्षय निवारण केंद्र मु. पो. ता. ता. अंबेजोगाई, जिल्हा बीड
(३४)	स्थानिक शहरांतील रस्ते, आरोग्य योजना संबंधीं माहिती	संबंधित टाऊन कमिटी व नगर पालिका अध्यक्ष
(३५)	दारूबंदी धोरणासंबंधीं माहिती	जिल्हा दारुबंदी अधिकारी, राजुरी वेस, बीड
(३६)	जमिनीस ताली घालणें, दुर्जल शेती करण्यासाठीं उपाय योजना आदि संबंधीं माहिती	जिल्हा भूसंरक्षण अधिकारी, जुना बाजार, बीड
(३७)	जिल्ह्यांतील औषधांच्या दुकानांना परवानगी देणें व त्यासंबंधीं माहिती व मार्गदर्शन	ड्रग्ज इन्स्पेक्टर, नवा पूल, बीड
(३८)	जमिनीचे तुकडे एकत्रीकरण करण्यासंबंधीं माहिती व मार्गदर्शन	जमीन एकत्रीकरण अधिकारी, जुना बाजार, बीड
(३९)	स्थानिक आयात व निर्यात धान्याची नोंद ठेवणें, शेतकरी व व्यापारी यांच्या मालविक्री व खरेदी व्यवहारांत मदत	संबंधित स्थानिक मार्केट सुपरिंटेंडेंट
(४०)	बीड, गेवराई, अष्टी व पाटोदा तालुक्यांतील महसूल व जमिनीसंबंधीं माहिती	डेप्युटी कलेक्टर, बीड विभाग, बीड
(४१)	परित्यक्ता स्त्रियांना प्रवेश व व्यवसाय.	सुपरिन्टेंडेंट, महिलाश्रम, बोबडेश्वर गल्ली बीड

विविध माहिती

डाक बंगले

बीड तालुका

(१) बीड
(२) चौसाळा
(३) पिंपळनेर

अष्टी तालुका

(१) अष्टी
(२) कडा

अंबेजोगाई तालुका

(१) अंबेजोगाई
(२) परळी
(३) रेणापूर

माजलगांव तालुका

(१) माजलगांव

पाटोदा तालुका

(१) सौताडा
(२) नायगांव

गेवराई तालुका

(१) गेवराई

केज तालुका

(१) धारूर

टपाल कचेऱ्या

बीड तालुका

बीड
पाली
चौसाळ
लिंबा गणेश
नेकनूर
यळंब
खडकी घाट
पोथ्रा
पालसिंगन
राजूरी
कामखेडा

माजलगांव तालुका

माजलगांव
किटी आडगांव
गंगा मसला
नितूड
कुप्पा
लहळ
पात्रूड
दिंदुड
तालखेड
टाकरवन
राजेगांव

पिंपळनेर
नालवडी
ताडसोन्ना

अंबेजोगाई तालुका

अंबेजोगाई
धानोरा
देवळा
पाटोदा
सायगांव जागीर
परळी
नागापूर
घाटनांदूर
बरदापूर
धर्मापूरी
रेणापूर
पानगांव

पाटोदा तालुका

पाटोदा
पारगांव धुमरा
सौताडा
अमळनेर
डोंग किन्ही
पारनेर
डोमरी
रोहतवाडी
दासखेड
रायमोह
शिरूर
खोकरमोह

गेवराई तालुका

गेवराई
मादलमोही
धोंडराई
पाडळसिंगी
चकलांवा
उमापूर
सिसदेवी
पाचेगांव
तलवाडा
जातेगांव

हिवरा
सिरसाळा
पिंपळगांव

केज तालुका

केज
चिंचोली
सावळेश्वर
युसूफ वडगांव
इडा
वाघोबावूळगांव
लहूरी
सिंदी
काळेगांव घाट
धारूर
देवळा
वडवणी

अष्टी तालुका

अष्टी
खडकत
लोणी
वाघळूज
धानोरा
कडा
देवी निमगांव
बीड सांगवी
धामणगांव

तार कचेऱ्या

बीड
अंबेजोगाई
परळी
गेवराई
माजलगांव

टेलीफोन कचेऱ्या

बीड, अंबाजोगाई, परळी

बीडमधील टेलिफोन्स

गणेश ऑईल मिल्स, शॉफ मोंढा	१
पंजाब ऑईल मिल्स	२
रामचंद अॅन्ड सन्स	३
गणेश जिनींग फॅक्टरी, मोंढा	४
प्रभु बापू तेली, रविवार पेठ	५
श्रीकिशन बद्रीनाथ, जिनिंग फॅक्टरी	६
कलेक्टर, बीड (ऑफिस)	७
डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंन्ट ऑफ पोलीस, (ऑफिस)	८
राघोजी नानजी, धोंडीपूरा	९
भिकाचंद भागचंद सुराना	१०
किशनलाल हिरालाल मोंढा	११
सोशल वेलफेअर ऑफिसर, (ऑफिस)	१२
पब्लिक कॉल ऑफिस	१३
डिस्ट्रिक्ट सुपरिंटेन्डेन्ट ऑफ पोलीस (घर)	१४
हिरालाल नंदलाल, मोंढा	१५
आर्. टी. डी. बस डेपो	१६
स्टेट बॅन्क ऑफ हैद्राबाद	१७
पी. डब्ल्यू. डी. एक्झिक्युटिव्ह इंजिनियर, ऑफिस	१८
कलेक्टर, बीड, (घर)	१९
सिटी म्युनिसिपालिटी, एक्झिक्युटिव्ह ऑफिसर	२०
असिस्टंट रजिस्ट्रार, को-ऑपरेटिव्ह	२१
पी. ए. टु. कलेक्टर (घर)	२२
डिस्ट्रिक्ट लोकल बोर्ड	२३
एज्युकेशनल इन्स्पेक्टर ऑफ स्कूल	२४
डिस्ट्रिक्ट कोर्ट	२५
डिस्ट्रिक्ट जज्ज, (घर)	२६
डिस्ट्रिक्ट पब्लिसिटी ऑफिस	२७
आर्. टी. डी. मोटार स्टॅन्ड	२८
एक्झिक्युटिव्ह इंजिनियर	२९
श्री. श्रीपतराव कदम, वकील	३०
श्री. द्वारकादास मंत्री, वकील	३१
व्यवस्थापक, महिलाश्रम	३२
डेप्युटी सुपरिंटेन्डेन्ट ऑफ पोलीस	३३
बीड पोलिस स्टेशन	३४
बीड डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव्ह बॅंक	३५
ड्रग्ज इन्स्पेक्टर	३६
मार्केट कमिटी	३७

श्री. महादेव मीटकरी ...	३८
वसंत विठ्ठल सरवटे	३९
विश्वनाथ महारूद्र मिटकरी	४०
असाराम कासात	४१
मनोहर रामराव	४२
साईनाथ ट्रान्स्पोर्ट कं.	४३
रमेशलाल मारूतिराव जाजू	४४
चीन सुखलाल तुशारचंद	४५
दगडूलाल सुरजमल	४६
ब्रँच मॅनेजर, आयुर्विमा खाते	४७
उद्योगविनिमय खाते	४८
को–ऑपरेटिव्ह मार्केटिंग सोसायटी	४९
चौकशी व दुरुस्ती	५०
जलसिंचन खाते	५१
पी. डब्ल्यू डी. डाकबंगला	५२

परळी वैजनाथ येथील टेलिफोन

बँक ऑफ महाराष्ट्र ...	२८
बंकटलाल नंदलाल ...	३१
बंसिलाल गणेशलाल ...	३०
चतुरभुज छगनलाल दराक	५
नगरपालिका कार्यालय ...	१२
दामजी डूंगरसे ...	२५
दिपचंद नेमिचंद ...	४१
दिगंबर नारायण दुबे ...	३५
चौकशी व तक्रारी, टेलेफोन एक्सचेंज ...	२०
गणेशलाल बद्रिनारायण भंसाळी	३८
गंगाधर महादेव चौधरी ...	३३
गुरूलिंग धोंडप्पा मानकेडले	११
हरिराम श्रीनिवास ...	२४
जयनारायण बंकटलाल ...	७
कन्हैयालाल शंकरलाल ...	२२
मदनलाल मुरलीधर सारडा	२७
माधव जयवंतराव देशमुख	१७
मानिकचंद झुमरलाल ...	४०
मानचंद बाबूलाल ...	१०
मार्केट कमिटी कार्यालय...	१८
मोहन ऑईल मिल्स ...	३९
पोलीस स्टेशन ...	३६

प्रभु शिवराज हालजी	... ...	३७
सार्वजनिक टेलिफोन कचेरी, पोस्ट ऑफिस	... ...	१३
परळी जनरल स्टोअर्स	... ...	६
परळी ऑइल व इंडस्ट्रीज	... ...	१६
आर्. टी. डी. बस डेपो	... ...	१४
रामनारायण रामचंदर	... ...	२१
रेल्वे स्टेशन	... ...	८
शालिग्राम निवास	... ...	३
शाह मुळजी देवशी आणि कंपनी	... ...	९
श्री. गोपाळ दौलताराम आणि कंपनी	... ...	१५
स्टेट बँक ऑफ हैद्राबाद	... ...	४
सईद असाद पाशा	... ...	१९
टोकारशी लालजी आणि कंपनी	... ...	२
वसंत वैजनाथ गेडगुळ	... ...	२३
वासुदेव शेषाद्री दुबे	... ...	२९
विष्णुदास रामगोपाळ राठी	... ...	१
चिमनाजी बापू मगर	... ...	३२
गोविंद प्रभू गिरवलकर	... ...	४४
गिरीधरलाल बो. ठक्कर	... ...	४६
म्युनिसिपल डाक बंगला	... ...	४२
राधाकृष्णन लक्ष्मीनारायण सोनार	... ...	४३
श्री. राधाकृष्ण गुलाबचंद सोनी	... ...	४७
वासुदेव शेषाद्री दुबे आणि कंपनी	... ...	४५

(प्रकरण एकवीस मधील वसतिगृहांच्या यादींतील दहा ते चौदा वसतिगृहांतील नंबर पुढील प्रमाणें आहेत)

(१०) सरस्वती वसति गृह	... ...	२२
(११) डॉ. आंबेडकर वसतिगृह	... ...	१८
(१२) आनंद वसतिगृह	... ...	१२
(१३) वंजारा बोर्डिंग	... ...	६४
(१४) वंजारा बोर्डिंग	... ...	३५

कांहीं महत्त्वाच्या यात्रा व यात्रास्थळांची तालुकावार यादी पुढील प्रमाणें आहे.

बीड तालुका

ठिकाण	दिवस	अंदाजे यात्रेकरू	देवस्थान
बीड	महाशिवरात्र	२०,०००	कनकालेश्वर
बीड	१० आश्विन	५,०००	खंडेश्वरी
बीड	१८ सप्टेंबर	५,०००	मनसुरशहा

बीड	१८ सप्टेंबर	५,०००	कोचकशहावली
दहिफळ (बदीली)	८ चैत्र	५,०००	धर्माउली
साखरे बोरगांव	६ खुर्दाद	५५,०००	रजब बवितरसाहेब
अंबेजोगाई तालुका			
अंबेजोगाई	१५ मार्गशीर्ष	८,०००	जोगेश्वरी
अंबेजोगाई	११ मार्गशीर्ष	१०,०००	मुकुंदराज
परळी	महाशिवरात्र	२५,०००	वैजनाथ
परळी	१ चैत्र	५,०००	गोराराम, काळाराम
रेणापूर	१५ चैत्र	५,०००	रेणूकादेवी
शेरी	३० पौष	५,०००	महाशिवलिंग
अष्टी तालुका			
अष्टी	१४ भाद्रपद	५,०००	गणेश
सुलेमान देवळा	६ पौष	५,०००	खंडोबा
धामणगांव	१३ झिल्कत	३,०००	पीर साहेब
धानोरा	३ चैत्र	५,०००	अंकायी देवी
वाघळून	१४ चैत्र	५,०००	भंडारनाथ
गेवराई तालुका			
गेवराई	६ फाल्गुन	५,०००	खंडोबा
निमगांव	१ चैत्र	५,०००	खंडोबा
राक्षसभुवन	शनिअमावश्या	२५,०००	शनि
तलवाडा		२२,०००	देवी
पांचालेश्वर	१५ चैत्र	१०,०००	देवदत्त
माजलगांव तालुका			
दहिफळ	६ मार्गशीर्ष	१०,०००	खंडोबा
माजलगांव	२१ भाद्रपद	८,०००	रामनाथ पालखी
मानूर	१५ आश्विन	५,०००	देवी
रामपूरी	५ बस्मन	८,०००	मसाजी बाबा
केज तालुका			
धनेगांव	१५ माघ	८,०००	मरीयम देवी
मानूर	२ खुर्दाद	६,०००	नागनाथ
पाटोदा	५ चैत्र	५,०००	हसन पठाणसाहेब
नारायण गड	१५ कार्तिक	२५,०००	नारायणगड जत्रा
रूपवाडी	१४ चैत्र	३,०००	भवानी देवी

वाचनालयें

महिला वाचनालय	...	...	अष्टी मु. पो. तालुका अष्टी
नूतन वाचनालय	...	...	मु. पो. हिंगणी घाट, ता. बीड
महिला वाचनालय	...	...	धोंडीपूरा, बीड
साहित्य निकेतन ग्रंथालय ...		...	मु. पो. ता. अंबेजोगाई
शीतलदास वाचनालय	...	...	मु. पो. गिरवली, ता. अंबेजोगाई
श्रीराम जनता वाचनालय ...		...	मु. पो. गोवर्धन (हिवरा) ता. माजलगांव
पुरोगामी वाचनालय	...	...	मु. पो. ता. माजलगांव
नवयुग वाचनालय	...	...	मु. पो. परळी वैजनाथ ता. अंबेजोगाई
विजय वाचनालय	...	...	परळी वैजनाथ ता. अंबेजोगाई
देवराव वाचनालय	...	...	मु. पो. ता. पाटोदा
अश्वलिंग वाचनालय	...	...	मु. पो. पिंपळवडी, ता. पाटोदा

याशिवाय बीड, पाटोदा, अष्टी, अंबेजोगाई या तालुक्यांतील विकास गटांत जवळ जवळ पंधरा ते वीस खेडयांत वाचनालयें आहेत. या वाचनालयांना पन्नास ते तीनशें रुपयांपर्यंत विकास गटातर्फें आर्थिक सहाय्य दिलें जातें. जिल्हा शिक्षण विभागातर्फें सुद्धां सर्व तालुक्यांतील वाचनालयांना आर्थिक मदत दिली जाते.

भारतीय दलित वर्ग	...	...	२००	बशिर गंज, बीड
मराठा वसतिगृह	...	...		
जनता बोर्डिंग ...	...	...	५०	खडकपूरा बीड
भारतीय दलित वर्ग	...	...	१८२	अंबेजोगाई
भारतीय दलित वर्ग	...	...	३०	मोरगांव, ता. बीड
शेडयूलकास्ट हॉस्टेल	...	...	२०	अष्टी
बालाश्रम विद्यार्थी वसतिगृह ...		...	२०	चौसाळा ता. बीड
शेडयूल कास्ट हॉस्टेल	...	...	३०	बनसाराळा, ता. केज
गणेश बोर्डिंग ...	...	...	२०	नवगण राजूरी, ता. बीड
सरस्वती वसतिगृह (मुलींचे)	...	...		नवगण राजूरी, ता. बीड
डॉ. आंबेडकर वसतिगृह	...	...		गेवराई
आनंद विद्यार्थी वसतिगृह	...	...		पाटोदा
बंजारा (लमाण) बोर्डिंग	...	...		अंबेजोगाई
बंजारा बोर्डिंग...	...	...		अंबेजोगाई

या जिल्ह्यांत स्थानिक स्वरूपाची आठ नऊ मनोरंजन गृहें आहेत. त्याशिवाय दोन फिरते सिनेमा थिएटर्स आहेत. बीड येथें विजय, गणेश व अशोक अशीं तीन सिनेमा गृहें आहेत. त्याचप्रमाणें परळी वैजनाथ येथें व्हिक्ट्री व लक्ष्मी, अंबेजोगाई येथें सागर, माजलगांव येथें श्रीराम, गेवराई येथें भागवती सिनेमा गृहें आहेत. दहिफळ (ता. माजलगांव) व धारूर (ता. केज) या ठिकाणीं अनुक्रमें लक्ष्मी व व्यंकटेश असे दोन फिरते सिनेमा थिएटर्स आहेत.

जनता व सरकार यांच्या सहकार्याची अमोल ठेव

अंबेजोगाई येथें विविध शिक्षण संस्थेंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ५ ते ६ हजार असून ४ हायस्कुलें, एक कला व विज्ञान महाविद्यालय, अनेक प्राथमिक शाळा, मुलोद्योग शिक्षण केंद्र व चर्मोद्योग शिक्षण संस्था आहेत. मुलींच्या साठी मात्र स्वतंत्र हायस्कूलची उणीव होती. बीड जिल्ह्यांतील जनता सह शिक्षणाला तितकीशी अनुकूल नसल्यामुळें बहुतेक मुलींना शिक्षण सोडून घरी बसावे लागत असे. मुलींचे हायस्कूलचे वर्ग चालविण्यासाठीं इमारतीची अडचण सर्वांच्या पुढें होती.

१९५५ सालीं अंबेजोगाई येथील जनतेने कन्या हायस्कूलासाठीं एक इमारत बांधण्याचे ठरविले. त्यासाठीं एक हंगामी समिती नियुक्त करण्यांत आली. जागेचा प्रश्न स्थानिक नगरपालिकेने सोडविला. शहराचे मध्यभागी बाग असलेली जागा नगरपालिकेने विनामूल्य दान दिली.

इमारतीचा कोनशिला समारंभ हैद्राबाद राज्याचे शिक्षण मंत्री श्री. गोपाळराव एकबोटे यांच्या हस्ते झाला. जनता व सरकार यांच्या साहाय्याने जवळ जवळ एक लाख रुपये खर्च करून दोन वर्षांच्या अवधींत हें बांधकाम बहुतांशीं पूर्ण झालें. बांधकामासाठी जनतेकडून देणग्यांच्या स्वरूपांत सुमारें ४६ हजार रु. जमा झाले. हैद्राबाद राज्याचे मुख्यमंत्री माननीय श्री. बी. रामकृष्णराव यांनी आपल्या अधिकृत फंडातून १५ हजार रुपयांची देणगी दिली. सरकारी विकास खात्यांतून २७,८०० रु. रोख मिळाले. जिल्हा लोकल बोर्डाकडून बरीच रक्कम मदत म्हणून मिळाली. अशा प्रकारे जमलेल्या निधींतून कन्या हायस्कूलसाठीं १२ खोल्या व एक भव्य सभागृह असलेली इमारत बांधण्यांत आली. व कन्या शाळेचे वर्ग या इमारतींत सुरूं करण्यांत आले. ही इमारत नंतर शिक्षण खात्याला जनतेच्या वतीने नियुक्त समितीने दान दिली.

या इमारतीच्या बांधकामास त्या वेळचे सरकारी अधिकारी, अंबेजोगाई येथील सामाजिक कार्यकर्ते, नगरपालिका व जनता यांचे अविश्रांत परिश्रम कारणीभूत आहेत.

पंचायत राज्य

दिनांक १ मे, १९६२ पासून महाराष्ट्रांत लोकशाही विकेंद्रीकरण कायदा अंमलांत आला असून त्यानुसार लवकरच जिल्हा परिषदांच्या निवडणुका होतील. ही घटना महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक जीवनांत मोठें परिवर्तन घडवून आणणारी आहे. महाराष्ट्राच्या ग्रामीण विभागांतील आजचें जीवन आणि १५ वर्षापूर्वीचें जीवन यांत बराच मोठा फरक पडला आहे. सर्वसामान्य शेतकरी आतां विकास कार्याविषयीं जागरुक होत असल्यामुळें परिणामतः राजकीय दृष्टयाहि जागृत होत चालला आहे. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागांतील शेतकऱ्यांची आणि कामकऱ्यांची अस्मिता जागृत झाली आहे आणि म्हणूनच, या जागृत नवीन पिढीच्या आकांक्षा पूर्ण करणारा लोकशाही विकेंद्रीकरणाचा हा धाडसी प्रयोग करण्यांत येत आहे.

लोकशाही विकेंद्रीकरणाची नवी योजना, हें योग्य दिशेनें धैर्यानें टाकलेलें पाऊल असून जिल्हा हा या योजनेचा मूलभूत घटक होय. बलवंतराय मेहता समितीनें सुचविल्याप्रमाणें तालुका हें मूलभूत विकास क्षेत्र न स्वीकारण्यास कांहीं कारणें आहेत. पहिलें कारण असें कीं लोकल बोर्डस्, स्कूल बोर्डस्, विकास मंडळें इत्यादि स्थानिक स्वरूपाच्या संस्था आजवर जिल्हा पातळीवर काम करीत आल्या आहेत. तेव्हां या नवीन योजनेचा सांगाडा उभारण्यासाठीं, या परंपरेचा भक्कम आधार घेणें हितावह आणि सोयीचें ठरणार आहे. जनतेला संस्थांचा विचार जिल्हा पातळीवरून करण्याची संवय जडली आहे. तिचाच उपयोग करणें इष्ट होईल. दुसरें असें कीं, " जिल्हा " हाच घटक मानला तर स्थानिक नेतृत्वाच्या वाढीला पुरेसा वाव मिळेल. तिसरें म्हणजे योजनाबद्ध कार्यक्रम अंमलांत आणण्याच्या मार्गात, लहान घटकामुळें अनेक अडचणी उपस्थित होण्याची शक्यता आहे. शिवाय साधनसामग्री, निरनिराळया कार्यातील एकसूत्रीपणा, कर्मचारी आणि कामगार इत्यादि बाबतींत जिल्हा हेंच अत्यंत सोयिस्कर क्षेत्र आहे.

बलवंतराय समितीच्या अहवालांत अप्रत्यक्ष निवडणुकीची कल्पना मांडण्यांत आली असली तरी आपल्या राज्यांत जिल्हा परिषदा प्रत्यक्ष मतदानानें निवडल्या जाणार आहेत. कारण अप्रत्यक्ष निवणुकांबाबत लोकांना पुरेसा उत्साह वाटणार नाहीं. त्यामुळें एकदा ग्रामपंचायतींच्या निवडणुका झाल्या कीं, मग लोकांचा जिल्हा परिषदांशी तसा प्रत्यक्ष संबंध उरणार नाहीं. तेव्हां ज्या पातळीवरील संघटनेच्या हातीं खरी सत्ता असेल, त्या संघटनेच्या निवडणुका प्रत्यक्ष मतदानानेंच व्हावयास पाहिजे. म्हणून जिल्हा परिषदांच्या निवडणुका प्रत्यक्ष होणें श्रेयस्कर आहे.

विकास गटाचा अध्यक्ष, जिल्हा सहकारी संघटनेचा प्रमुख व इतर अशाच प्रकारच्या संघटनांचे प्रमुख जिल्हा परिषदांचे सभासद राहणार असले तरी प्रत्यक्ष निवडणुका लढविण्याची गरज नाहीं. त्यांची निवड अप्रत्यक्षरीत्या होईल.

जिल्हाधिकाऱ्यांचें कार्यक्षेत्र परिषद कार्यापासून अलग ठेवण्यांत आलेले आहे. जिल्हाधिकाऱ्यांचा परिषदेशीं संबंध येतो तो केवळ परिषदेचे नोकर निवडण्यासाठीं असलेल्या समितीचे सदस्य या

नात्यानें; पण त्यामुळें जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयाचें महत्त्व संपुष्टांत येईल असें मानण्याचें कारण नाहीं. कारण जिल्हाधिकाऱ्याला अन्य अनेक प्रकारचीं कामें जबाबदारीनें पार पाडावयाचीं असून त्या दृष्टीनें त्याला भरीव अधिकारहि देण्यांत आलेले आहेत. जिल्हाधिकाऱ्यांच्या अधिकाराचें व कार्यक्षेत्राचें स्थूलमानानें पुढील स्वरुप राहील.

राज्य सरकारच्या आदेशानुसार जिल्हाधिकाऱ्याला जिल्हा परिषदेच्या कामकाजासंबंधीं कोणतीहि माहिती अगर आंकडेवारी मागविण्याचा अधिकार आहे.

जिल्हा परिषद अगर पंचायत समिती यांच्या ठरावाच्या अंमल बजावणीनें अगर अन्य कोणत्याही आदेशामुळें शांतताभंग होईल, अगर जनतेस त्यामुळें त्रास होईल असें जिल्हाधिकाऱ्याचें मत असलें तर आपल्या लेखी आदेशानें अशी अंमलबजावणी स्थगित करण्याचा त्याला अधिकार आहे. मात्र या आदेशाची प्रत संबंधित परिषद व कमिशनर यांच्याकडे पाठविली पाहिजे. कमिशनरना सदर आदेशांत जरुर तो फेरफार करण्याचा अधिकार आहे.

निकडीच्या प्रसंगी सार्वजनिक आरोग्य व सुरक्षितता याबाबतींत कांहीं विशेष असाधारण काम पार पाडणें असल्यास ती बाब परिषदेच्या कक्षेंतील असली तरी जिल्हाधिकाऱ्याला त्या संबंधी जरुर ती व्यवस्था करण्याचा अधिकार आहे व यासाठीं होणारा खर्च अगर द्यावयाच्या मेहनताना परिषदेनें देण्याची सूचना करण्याचा जिल्हाधिकाऱ्याला अधिकार आहे.

जिल्हा परिषदेच्या कार्यासाठीं घ्यावयाच्या नोकरांचीं निवड करण्यासाठीं या कायद्यान्वयें अस्तित्वांत येणाऱ्या समितीवर जिल्हाधिकारी पदसिद्ध सभासद आहेत.

जिल्ह्यांतील कायदा व सुव्यवस्था पालनाची जबाबदारी सर्वस्वी जिल्हाधिकाऱ्यांची आहे.

लोकशाही विकेंद्रीकरण कायदा अंमलांत आल्यापासून म्हणजेच १ मे, १९६२ पासून आपल्या राज्यांतील प्रत्येक जिल्ह्यांत जिल्हा परिषदेची स्थापना करण्यांत आली आहे. या परिषदेवरील प्रतिनिधी जनतेनें निवडून द्यावयाचे असून जास्तींत जास्त ३५,००० लोकसंख्येला एक या प्रमाणांत हे प्रतिनिधी निवडले जातील. या परिषदेत प्रतिनिधींचीं संख्या जास्तींत जास्त साठ आणि कमींत कमी चाळीस राहील. त्यांत एक स्त्री प्रतिनिधी (सभासद), अनुसूचित जाति आणि संयुक्त सहकारी संस्थेचे अध्यक्ष हे सहयोगी सभासद म्हणून राहील.

ही परिषद जिल्ह्यांतील विकास कार्याबाबत पूर्ण जबाबदार राहणार आहे. आणि म्हणून परिषदेच्या स्थायी समितींत अर्थसमिति, बांधकाम समिति, कृषि समिती, सहकार समिती, शिक्षण समिती आणि आरोग्य समिती अशा अनेक समित्या असतील. जिल्हा परिषदेचा अध्यक्ष हा स्थायी समितीचा पदसिद्ध अध्यक्ष राहतील.

जिल्हा परिषदेसाठीं एक मुख्य कार्यकारी अधिकारी आणि दुसरा उपमुख्य अधिकारी यांची नियुक्ती राज्य शासनाकडून करण्यांत आली आहे.

जिल्ह्यांतील प्रत्येक गटासाठीं पंचायत समिती असेल आणि ती लोकांनीं निवडून द्यायची आहे. या समितीनें निवडून आलेले सभासद, एक स्वीकृत सभासद, शेतकी सहकारी संस्थेचे अध्यक्ष, गटांतील स्त्रिया, अनुसूचित जाति आणि जमाति यांचा प्रतिनिधी समितींत निवडून आलेला नसल्यास प्रत्येकीं एक आणि पंचायतीच्या सभासदांनीं निवडून दिलेले दोन सरपंच इतके सदस्य असतील.

पंचायत समितीसाठीं एका गटविकास अधिकाऱ्याची नेमणूक झाली आहे. गटविकास अधिकारी हा पंचायत समितीचा पदसिद्ध चिटणीस असेल. पंचायत समितीचे सभापति आणि उपसभापति सभासदांनीं निवडून द्यायचे आहेत.

जिल्हा परिषदेवर कोणत्याहि विकास कार्याची अंमलबजावणी अगर देखभाल करण्याची जबाबदारी सोपविण्यांत येईल आणि जिल्हा परिषद शासनाचे या बाबतींत एजन्ट म्हणून काम पाहील. जिल्हा परिषद शक्यतो सर्व कामें पंचायत समित्या द्वारें पार पाडील. कांहीं ठराविक कामें पंचायत समित्यांमार्फतच पार पाडलीं जातील. जिल्हा परिषदेकडे पुढील कामें सोपविण्यांत आली आहेत.

शेतकी

शेतकी शाळा स्थापन करणें, त्यांची व्यवस्था ठेवणें, त्या सुस्थितींत राखणें आणि त्यांना अनुदानें देणें (सहाय्यित शेतकी शाळांना अनुदान देणें या बाबी समाविष्ट करून) परंतु त्यांत पुढील गोष्टींचा समावेश होणार नाहीं:--

(१) अभ्यासक्रम ठरवून देणें.
(२) पाठ्य पुस्तकें विहित करणें,
(३) शेतकी शाळांची तपासणी, आणि;
(४) वार्षिक परीक्षा घेणें.

पीक स्पर्धा.

पीक संरक्षण.

पीक मोहिमा (खरीप आणि रब्बी पिकांच्या मोहिमा आणि प्रकृष्ट भात शेतीची लागवड धरून.)

मिश्र खतें व स्थानिक खतें.

रासायनिक खतें, शेतीचीं अवजारें आणि शेतीसाठीं लागणारें लोखंड, पोलाद आणि सीमेंट यांचें वांटप.

सुधारलेल्या शेतीपद्धतीचें प्रात्यक्षिक.

दुय्यम बीज केंद्रांचें आदर्श प्रात्यक्षिक.

सुधारलेल्या बियाण्यांची आयात व वांटप.

गुदामें बांधणें आणि त्यांची व्यवस्था ठेवणें.

शेतीची प्रगति व सुधारणा.

घातक वनस्पतींचा नाश करणें.

अन्यस्थानीय झाडें लावून तीं आपल्या प्रदेशांत वाढविणें.

पशुसंवर्धन

पशु वैद्यकीय सहाय्य. (जिल्ह्यांतील गुरांचीं रुग्णालयें वगळून परंतु गुरांचे दवाखाने, पशुवैद्यकीय सहाय्य केंद्रें आणि खेड्यांतील पशुवैद्यकीय पेट्या समाविष्ट करून.)

गुरांच्या, घोड्यांच्या आणि इतर पशुधनाच्या पैदाशीची सुधारणा (यांत कृत्रिम रेतन उपकेंद्रें, प्रमुख ग्राम केंद्रें, वळू बैलांचीं प्रमुख केंद्रें, वैरण सुधारण्याच्या जागा, वैरण मुरवावयाचे खड्डे, तालुका आणि जिल्हा पशुधन सुधारणा संघ व इतर तत्सम संस्था स्थापणें आणि मेंढ्यांच्या सुधारलेल्या पैदाशीचें वांटप यांचा समावेश होतो.

सुधारलेल्या कोंबड्या पुरविणें.

गुरांचीं प्रदर्शनें व मेळावे भरविणें.

जंगलें

गांवजंगलें व कुरणें (यांत कुरणाकरितां व जळणाकरितां गांवजंगलांचा विकास करावयाच्या उपाययोजनांचा समावेश होतो.)

समाज कल्याण

मागासलेल्या वर्गांचा शैक्षणिक विकास—यांत पुढील बाबींसंबंधीच्या उपाययोजनांचा समावेश होतो :

मागासलेल्या वर्गाच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या, नादाऱ्या व परीक्षेची फी देणें, आणि

मागासलेल्या वर्गाच्या विद्यार्थ्यांकरितां वसतिगृहें आणि शाळा स्थापन करणें आणि त्यांची व्यवस्था ठेवणें. यांत वसतिगृहांचें बांधकाम आणि त्यांची व्यवस्था करणें यासाठीं सहाय्यित वसतिगृहांस अनुदानें देण्याचा आणि अशा वसतिगृहांस आणि शाळांस इतर सहाय्य देण्याचा समावेश होतो. परंतु त्यांतून जिल्ह्यापेक्षां अधिक क्षेत्रासाठींचीं वसतिगृहें वगळण्यांत येतील.

मागासलेल्या वर्गांचा आर्थिक विकास, यांत पुढील बाबींचा समावेश होतो:—

शेतीची साधनसामग्री खरेदी करण्यासाठीं व्यक्तिशः शेतकऱ्यांस कर्जाच्या व अर्थ-सहाय्याच्या स्वरूपांत आर्थिक सहाय्य देणें;

कुटीरोद्योग आणि उद्योगधंदे यासाठीं व्यक्तिशः कारागीरांस कर्जाच्या व अर्थ सहाय्याच्या स्वरूपांत आर्थिक साहाय्य देणें;

विमुक्त जातींना चरखे पुरविणें.

मागासलेल्या क्षेत्रांत दळणवळणाचा विकास करणें;

सहकारी स्टोअर्सची व्यवस्था ठेवणें आणि कर्मचाऱ्यांच्या व्यवस्थेसाठीं बहुउद्देशीय सहकारी संस्थांस अर्थ सहाय्य देणें (ज्यांचें खेळतें भांडवल, प्रत्येकीं पांच लाख रुपयांहून अधिक नाहीं आणि ज्यांचें अधिकार क्षेत्र जिल्ह्यापेक्षां कमी आहे अशा सहकारी संस्थांशीं संबंध येत असेल तेथवर);

हस्तव्यवसायाच्या केंद्रांची स्थापना करणें ; आणि गुरांच्या पैदाशीचा आणि कुक्कुटप्रजनन केंद्राचा विकास.

अस्पृश्यतेचें निवारण यांत पुढील गोष्टींचा समावेश होतो :—

हरिजन सप्ताह साजरे करणें;

झुणका—भाकर कार्यक्रम;

सवर्ण हिंदु आणि हरिजन यांच्यांतील आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन देणें; आणि

अस्पृश्यता निवारणासाठीं उत्कृष्ट काम करणाऱ्या खेड्यांस बक्षिसें देणें.

मागासलेल्या वर्गाच्या हितसंवर्धनाचे कार्यक्रम, यांत पुढील गोष्टींचा समावेश होतो:—

महिलांच्या आणि बालकांच्या हितसंवर्धनाचे कार्यक्रम व योजना;

बालवाड्यांची स्थापना करणें व त्यांची व्यवस्था ठेवणें;

मागासलेल्या वर्गाच्या विकासासाठीं प्रचार व प्रसिद्धि सुरूं करणें;

मागासलेल्या वर्गासाठीं करमणुकीचे कार्यक्रम आयोजित करणें.

सामाजिक मेळे भरविणें;

मागासलेल्या वर्गासाठीं संस्कार केंद्रे, सामूहिक व करमणुकीचीं केंद्रें आणि सामूहिक सभागृहें.

विमुक्त जातींना कपडे पुरविणें.

औषधी खरेदी करण्यासाठीं व्यक्तींना आर्थिक-सहाय्य देणें आणि स्वतः होऊन मदत देऊं केलेल्या संस्थांना, वैद्यकीय मदत देण्यासाठीं, अनुदानें देणें;

मागासलेल्या वर्गाच्या इसमांसाठीं घरांची तरतूद करणें; आणि

पिण्याच्या पाण्याच्या विहिरींची तरतूद करणें;

मागासलेल्या वर्गांचें प्रशिक्षण, यांत पुढील बाबींचा समावेश होतोः—

प्रशिक्षण शिबिरांचें आयोजन करणें; आणि

तांत्रिक प्रशिक्षण आणि पारंपारिक व्यवसायांच्या सुधारलेल्या पद्धतींचें प्रशिक्षण

शिक्षण

प्राथमिक शाळांची आणि मूलोद्योग शाळांची स्थापना, व्यवस्था, त्या सुस्थितींत ठेवणें, त्यांची तपासणी करणें आणि त्यांना भेटी देणें, सहाय्यित शाळांना अनुदानें देणें, समाविष्ट करून पुढील गोष्टीं-संबंधींच्या बाबी वगळून :—

अभ्यासक्रम ठरवून देणें;

पाठ्य पुस्तकें ठरविणें.

शिष्यवृत्त्या देण्यासाठीं परीक्षा घेणें;

विदर्भांतील प्राथमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा आणि चौथ्या वर्गाच्या परीक्षा घेणें; आणि मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९४७, अन्वयें राज्य सरकारकडे निहित केलेले इतर अधिकार.

माध्यमिक शाळांची स्थापना, त्या सुस्थितींत ठेवणें, त्यांची तपासणी करणें आणि त्यांना भेटी देणें, परंतु त्यांतून पुढील गोष्टी वगळण्यांत आल्या पाहिजेत :—

अभ्यासक्रम ठरविणें;

पाठ्य—पुस्तकें ठरविणें;

परिक्षण अनुदानाचे दर आणि त्यासाठींच्या शर्ती;

उच्च शाळांचें उच्चतर माध्यमिक शाळांत रूपांतर करण्यासाठीं परवानगी देणें;

फीचे दर;

मान्यतेच्या सर्वसाधारण शर्ती ठरविणें;

प्राथमिक आणि उच्च शाळांच्या शिष्यवृत्तीसाठीं परीक्षा घेणें; आणि

सहाय्यक—अनुदान—संहितेनुसार, शिक्षण-संचालकांकडे विशेषरीत्या सोंपविण्यांत किंवा राज्य सरकारांकरितां राखून ठेवण्यांत येतील असे इतर अधिकार.

खाजगी माध्यमिक शाळांच्या बाबतींत, अनुदानें व कर्जें याबाबत केवळ शिफारस करणें आणि शिक्षणसंचालकांची मंजुरी मिळाल्यानंतर त्यांचें वांटप करणें.

प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाच्या संबंधांत विद्यार्थ्यांस कर्जें आणि शिष्यवृत्त्या देणें.

माध्यमिक शाळांच्या इमारती बांधणें आणि त्या सुस्थितींत ठेवणें.

इतर शक्षणिक उद्दिष्टें.

शाळांसाठीं साधनसामग्री व क्रीडांगणें यांची तरतूद करणें.

वैद्यकीय

तालुका दवाखाने आणि तालुका दवाखान्यांच्या दर्जांत वाढ करणें.

सिव्हिल आणि कॉटेज रुग्णालयें, त्याचप्रमाणें सिव्हिल रुग्णालयाप्रमाणें असलेलीं इतर मोठीं

सरकारी रुग्णालयें वगळून इतर रुग्णालयें.

वैद्यक व्यवसायींची अर्थ-सहाय्यित केंद्रें.

ग्रामीण वैद्यकीय मदत केंद्रें आणि सार्वजनिक वैद्यकीय मदत.

पिसाळलेलीं कुत्रीं चावल्यानंतर, निर्धन इसमावर त्यासाठीं प्रतिबंधक असा इलाज करणाऱ्या संस्थांना आर्थिक-सहाय्य देणें.

खाजगी धर्मार्थ रुग्णालयें, औषधालयें, प्रसूतिगृहें आणि तत्सम इतर संस्था.

आयुर्वेद

आयुर्वेदिक व युनानी दवाखाने (यांत अशा दवाखान्यांना अनुदानें देण्याचा समावेश होतो.)

खेड्यांतील आयुर्वेदिक औषधांच्या पेट्यांतील औषधांचा सांठा पुन्हां भरून काढणें.

सार्वजनिक आरोग्य

प्राथमिक आरोग्य केंद्रें.

फिरती आरोग्य पथकें.

वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्यासाठींचीं एकत्रित पथकें.

देवीप्रतिबंधक लस टोचणें.

शालेय आरोग्य सेवा.

' यॉज ' रोगाविरुद्ध उपाययोजना.

प्रसूति व शिशुकल्याण केंद्रें.

खेड्यांत औषधी पेट्या ठेवणें.

आरोग्य शिक्षणासाठीं सोयी.

ग्रामीण साफसफाई.

सार्वजनिक आरोग्य रक्षणासाठीं आवश्यक ती उपाययोजना करणें.

गलिच्छ वस्त्यांचें पुनर्वसन (त्या कारणांसाठीं खाजगी व्यक्तीस किंवा संस्थांस कर्जें देण्याचा समावेश करून.)

इमारती व दळणवळण

ग्रामीण रस्ते;

इतर जिल्हा रस्ते;

प्रमुख जिल्हा रस्ते; आणि

वरील रस्त्यांवरील पूल;

यांचें बांधकाम, ते सुस्थितींत राखणें व त्यांची दुरुस्ती.

ग्रामीण उद्यानें आणि बगीचे (राष्ट्रीय उद्यानें आणि बगीचे वगळून.)

जिल्हा परिषदेच्या गरजांच्या संबंधांतील प्रशासनविषयक आणि इतर इमारतींचें बांधकाम.

रस्त्यांव्यतिरिक्त दळणवळणाचीं इतर साधनें.

सार्वजनिक नावा.

रस्त्याच्या आजूबाजूला झाडें लावणें.

छोटे लोहमार्ग व ट्रामचे मार्ग.

टेलिफोन लाईन्स.

सार्वजनिक आरोग्यविषयक इंजीनिर्यारिंगचीं कामे

ग्रामीण पाणीपुरवठा
ग्रामीण विभागांतील जत्रांसाठीं सुरक्षित पाणीपुरवठा.
ग्रामीण गटारें.
पिण्यासाठीं, स्नानासाठीं किंवा स्वयंपाकासाठीं लागणारें पाणी दूषित होऊं नये म्हणून त्याचें संरक्षण करण्यासाठीं बांधकाम.

(प्रत्येक बाबतींत पांच लाख रुपयांहून अधिक भांडवली खर्चाच्या योजना वगळून)

पाटबंधारे

छोटी पाटबंधाऱ्यांचीं कामें [प्रत्येकीं २५० एकर किंवा त्याहून कमी एकर (जमीन) भिजविणारीं जलसिंचनाचीं कामें.]

उद्योगधंदे व कुटीरउद्योग

स्थानिक उद्योगधंदे
स्थानिक कला.

(कुटीरोद्योग व लहान प्रमाणावरील उद्योगधंदे यांचे बाबतींत दहा हजार रुपयांपर्यंतचीं कर्जे मंजूर करण्याच्या मर्यादेपर्यंत.)

जिल्ह्यापेक्षां मोठ्या असलेल्या क्षेत्रासाठीं असलेल्या संशोधन संस्था वगळून प्रशिक्षण संस्था आणि शाळा.
प्रशिक्षण—उत्पादन केंद्रें आणि उत्पादन केंद्रें.
विक्री भांडारें व विक्रीचीं दुकानें.
वैयक्तिकरीत्या कारागिरांस सहाय्यक अनुदानें व कर्जे देणें.
प्रशिक्षण घेणारांस विद्यावेतनें देणें.
कुटीर उद्योग आणि ग्रामोद्योग यांची वाढ व विकास.
कुटीर उद्योग किंवा ग्रामोद्योग यांतील उत्पादनासाठीं विक्रीच्या सोयी उपलब्ध करून देणें.
औद्योगिक संस्थांस सहाय्यक अनुदानें व कर्जे देणें.
हातमाग.
वजनें व मापें अधिनियम यांच्या अंमलबजावणीशीं संबंधित असलेलें अंमल-बजावणीचें काम.

सहकार

सहकारी संस्थांची नोंदणी (ज्या संस्थांचें खेळतें भांडवल पांच लाख रुपयांहून अधिक नसेल आणि ज्यांचें अधिकारक्षेत्र एका जिल्ह्यापेक्षां कमी आहे, केवळ अशाच संस्थांच्या बाबतींत.)

वरील नोंद ७५ मध्यें निर्दिष्ट केलेल्या प्रकारच्या संस्थांच्या उपविधींस मंजूरी.

वरील नोंद ७५ मध्यें निर्दिष्ट केलेल्या प्रकारच्या संस्थाचे सदस्य होण्यास प्रवेश न मिळाल्यामुळें केलेलीं अपीलें.

सहकारी संस्थांवरील, प्रशासनविषयक देखरेख (केवळ संस्थांनीं आणि त्यांच्या पदाधिकाऱ्यांनीं अंगिकारलेला, व्यापाराचा दर्जा सुधारण्याच्या तसेंच त्याच्या कामांची व्याप्ति वाढण्याच्या दृष्टीनें संस्थांचें सर्वसाधारण कामकाज, त्यांची व्यवस्था आणि त्यांची आर्थिक परिस्थिति यांची तपासणी करण्याच्या मर्यादेपर्यंतच.)

(टीपः— नोंदी ७५, ७६, ७७ आणि ७८ मध्यें दिलेलीं वरील कामें, जिल्हा परिषदेखालीं काम करणाऱ्या सहाय्यक रजिस्ट्रारनें, सहकारी संस्थांच्या रजिस्ट्रारनें केलेले नमुनेवजा उपविधी आणि काढलेल्या सूचना यानुसार पार पाडावयाची आहेत. जेव्हां एखाद्या नवीन प्रकारच्या सहकारी संस्थेची नोंदणी

करावयाची असेल व तिच्यासाठीं नमुनेवजा उपविधि उपलब्ध नसतील तेव्हां तिचे उपविधि, अशा संस्थांची नोंदणी करण्यापूर्वी सहकारी संस्थांच्या रजिस्ट्रारकडून प्रथम संमत करून घेतले पाहिजेत.)

सहकारी संस्थांची वाढ आणि व्याप्ति वाढविणें (सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांच्या बाबतींत.)

राज्य सरकारकडून आर्थिक-साहाय्य मिळण्यासाठीं सहकारी संस्थांच्या अर्जाचें प्रवर्तन करणें.

शेअर भांडवलांत सहभागी होण्याच्या बाबतींत सहकारी संस्थांचें (सहकारी संस्थांच्या रजिस्ट्रारकडून निर्दिष्ट करण्यांत येतील अशा) अर्जाचें, संयुक्त संस्थांकडे प्रवर्तक करणें.

ज्या बाबतींत, सहकारी संस्थांच्या रजिस्ट्रारनें घालून दिलेले शर्तीस अधीन राहून राज्य सरकार शेअर घेऊं शकते त्या बाबतींत सहकारी संस्थांचे शेअर घेणें.

शेतीच्या उत्पन्नाच्या बाजारांवरील देखरेख व नियंत्रण (हें देखरेखीचें व नियंत्रणाचें काम केवळ जिल्हा पातळीवरीलच असेल)

प्रकाशन

फिरत्या प्रकाशन गाड्या.

जिल्हा प्रदर्शनें आयोजित करणें.

करमणुकीच्या कार्यक्रमाद्वारें प्रसिद्धि.

ग्रामीण विभागासाठीं नभोवाणीचे कार्यक्रम.

सामूहिक विकास

सामूहिक विकास कार्यक्रम.

स्थानिक विकास कामांचा कार्यक्रम.

समाज शिक्षण

सामूहिक मनोरंजन केंद्रें.

प्रौढ साक्षरता केंद्रें.

क्रीडा, खेळ, क्रीडांगणें, सामग्री, इत्यादि आणि कल्याणकारी संघटना.

किसान मेळे.

बाहेरील भागांना भेटी देण्याचा कार्यक्रम आंखणें.

माहिती वितरण.

अल्पमुदतीचीं शिबिरें.

महिला संघटना व कल्याण.

शिशु–संघटना व कल्याण.

फिरत्या चित्रपट गाड्या.

ग्रंथालयें आणि वाचनालयें.

जत्रा, देखावे आणि प्रदर्शन.

ग्रामीण घर बांधणी.

संकीर्ण

ग्रामोद्धार.

आदर्श गांवें वसविणें (त्यासाठींची अनुदानें आणि कर्जें धरून.)

खेड्यांचें आर्थिक कल्याण.

लोकांचें आरोग्य, सुरक्षितता, सुख किंवा सोय यांची ज्यामुळें वाढ होण्याचा संभव आहे अशी स्थानिक स्वरूपाचीं कामें.

बाजार.

धर्मशाळा, विश्रामगृहें, मुशाफिरखाने, सराई वगैरे.

चावड्या.

इतर सार्वजनिक संस्था.

औद्योगिक बेकारी वगळून (इतर) स्थानिक बेकारी.

गांवठाणांची सुधारणा करणें व तीं वाढविणें (त्या कारणासाठीं द्यावयाचीं अनुदानें व कर्जे धरून.)

नवीन गांवठाणें वसविणें (त्या कारणांसाठीं द्यावयाचीं अनुदानें व कर्जें धरून.)

जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांचें स्वास्थ्य.

जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांसाठीं घरांचीं तरतूद.

सार्वजनिक जागांत आणि उद्यानांत झाडें लावणें व त्यांची जोपासना करणें.

रानटी जनावरांचा नाश करण्याबाबत बक्षिसें.

जाहीर सत्कार, समारंभ आणि मनोरंजन.

स्थानिक यात्रांबाबत व्यवस्था करणें.

दफन भूमि व दहन भूमि (प्रेतांची विल्हेवाट लावण्याचें काम धरून.)

ग्राम पंचायतीचे पंच, सरपंच, आणि बिनसरकारी इसम यांचीं संमेलनें.

स्थानिक भटक्या गरीब लोकांसाठीं मदत.

गरीबांसाठीं घरांची व्यवस्था करणें.

गट यादी

पंचायत समितीच्या अधिकार क्षेत्रांतील कामें

शेतकी

खरीप व रबी पीक मोहिमा;

प्रकृष्ट भातशेतीची लागवड;

शेतीची प्रगति व सुधारणा;

सुधारलेल्या शेतीपद्धतींचें प्रात्यक्षिक व त्याबाबत प्रचार करणें आणि नमुनेदार शेतकीच्या संस्था स्थापन करणें व त्या सुस्थितींत ठेवणें.

शेतीविषयक सुधारलेल्या अवजारांचा प्रचार करणें;

फळें व भाजीपाला यांच्या उत्पादनांत वाढ करणें.

गुदामें बांधणें व त्यांची व्यवस्था ठेवणें;

रासायनिक खतें, शेतीचीं अवजारें व शेतीसाठीं लागणारें लोखंड, पोलाद व सिमेंट यांचें वांटप करणें.

पशु संवर्धन

खेड्यांतील पशुवैद्यकीय पेट्या;

पशु वैद्यकीय साहाय्य केंद्रें;

तालुका पशुधन सुधारणा संघ व तशाच प्रकारची संस्था स्थापन करणें.

वैरण सुधारण्याच्या जागा;
वैरण मुरवावयाचे खड्डे;
कोंबडयांच्या सुधारलेल्या पैदाशीचें वांटप;
मेंढयांच्या सुधारलेल्या पैदाशीचें वांटप;
गुराढोरांचीं प्रदर्शनें व मेळे भरविणें;

जंगलें

गांव जंगलें व कुरणें. (चांगल्या प्रतीचें गवत उगविणें या गोष्टींचा समावेश करून);
कुरण व जळण यांसाठीं गांव शिवारांच्या विकासासाठीं उपाय योजना;

समाज कल्याण

मागासलेल्या वर्गाचा आर्थिक विकास, यांत पुढील गोष्टींचा समावेश होतो:—
शेतीचीं साधनसामुग्री खरेदी करण्यासाठीं कर्जें व अर्थसहाय्य यांच्या रूपानें व्यक्तिशः शेतकऱ्यास आर्थिक साहाय्य देणें;
कुटीरोद्योग व व्यवसाय यांसाठीं कर्जें व अर्थ सहाय्य यांच्या रूपानें व्यक्तिशः कारागीरांना आर्थिक साहाय्य देणें.
विमुक्त जातींना चरखे पुरविणें;
हस्तव्यवसाय केंद्रांची स्थापना करणें;
अस्पृश्यता निवारण, यांत पुढील गोष्टींचा समावेश होतो :—
हरिजन सप्ताह साजरे करणें;
सवर्ण हिंदु व हरिजन यांच्यांतील आंतरजातीय विवाहांस प्रोत्साहन देणें; आणि
मागासलेल्या वर्गाच्या हितसंवर्धनाचे कार्यक्रम, यांत पुढील गोष्टींचा समावेश होतो:-
महिलांच्या व बालकांच्या हितसंवर्धनाचे कार्यक्रम व योजना;
बालवाडयांची स्थापना करणें व त्यांची व्यवस्था ठेवणें;
मागासलेल्या वर्गाच्या विकासासाठीं प्रचार व अशा कार्यक्रमास प्रसिद्धी देणें;
मागासलेल्या वर्गांसाठीं करमणुकीचे कार्यक्रम आयोजित करणें;
सामाजिक मेळे भरविणें;
मागासलेल्या वर्गांसाठीं संस्कार केंद्रें, सामूहिक व करमणुकीचीं केन्द्रे आणि सामूहिक सभागृहें;
विमुक्त जातींना कपडे पुरविणें;
औषधे खरेदी करण्यासाठीं व्यक्तींना आर्थिक साहाय्य देणें आणि स्वतःहून मदत देऊं केलेल्या संस्थांना वैद्यकीय मदत देण्यासाठीं अनुदानें देणें;
मागासलेल्या वर्गाच्या इसमांसाठीं घरांची तरतूद करणें; आणि
पिण्याच्या पाण्याच्या विहिरींची तरतूद करणें.

शिक्षण

प्राथमिक शाळेच्या इमारती बांधणें व त्या सुस्थितींत ठेवणें.
प्राथमिक शाळांसाठीं साहित्य व खेळाचीं मैदानें यांची तरतूद करणें.

वैद्यकीय

वैद्यक व्यवसायींचीं अर्थ सहाय्यित केंद्रें;
ग्रामीण वैद्यकीय मदत केंद्रें;

आयुर्वेद

खेड्यांतील आयुर्वेदिक औषधांच्या पेटयांतील औषधांचा सांठा पुन्हा भरून काढणें

सार्वजनिक आरोग्य

प्रसूति व शिशुकल्याण केंद्रें;
खेड्यांत औषधी पेट्या ठेवणें;
ग्रामीण साफसफाई;
सार्वजनिक आरोग्य रक्षणासाठीं आवश्यक ती उपाययोजना करणें;

इमारती व दळणवळण

ग्रामीण रस्ते बांधणें, ते सुस्थितींत ठेवणें व त्यांच्या दुरुस्त्या;
ग्रामीण रस्त्यावर पूल व नाले बांधणें;
सार्वजनिक (तरी) नावा.
रस्त्यांच्या आजूबाजूस झाडें लावणें;

सार्वजनिक आरोग्यविषयक इंजिनीअरींगची कामें

ग्रामीण पाणीपुरवठ्याच्या विहिरी;
गावांत जमिनीच्या पृष्ठभागांवर गटारें बांधणें.

कुटीरोद्योग

वैयक्तिकरीत्या कारागीरांस सहाय्यक अनुदानें व कर्जें देणें;
कुटीरोद्योग व ग्रामोद्योग यांची वाढ व विकास;

सहकार

सहकारी चळवळीची वाढ करणें व तिची व्याप्ति वाढविणें;

प्रकाशन

ग्रामीण नभोवाणी कार्यक्रम;
करमणुकीच्या कार्यक्रमाद्वारें प्रसिद्धी;

सामाजिक विकास

समाज विकास कार्यक्रम;
स्थानिक विकास कामांचा कार्यक्रम.

समाजशिक्षण

समाज मनोरंजन केंद्रें;
प्रौढ साक्षरता केंद्रें;
क्रीडा, खेळ, क्रीडांगणें, सामुग्री आणि कल्याणकारी संघटना;
शेतकऱ्यांचे मेळावे;
बाहेरील भागांना भेटी देण्याचा कार्यक्रम आंखणें;
माहिती वितरण;
अल्पमुदतीचीं शिबिरें;
महिला संघटना व कल्याण;
शिशु संघटना व कल्याण;

फिरत्या चित्रपट गाड्या;
ग्रंथालयें व वाचनालयें;
जत्रा, देखावे व प्रदर्शनें;

संकीर्ण

ग्रामीण घर बांधणी;
ग्रामोद्धार;
आदर्श गांवे वसविणें (त्यासाठींची अनुदानें व कर्जें धरून);
खेड्यांचे आर्थिक कल्याण;
लोकांचें आरोग्य, सुरक्षितता, सुखसोयी यांची ज्यामुळें वाढ होण्याचा संभव आहे अशी स्थानिक स्वरूपाचीं कामें;
बाजार;
धर्मशाळा, विश्रांतिगृहें, मुशाफिरखाने, सराई वगैरे;
चावड्या;
इतर सार्वजनिक संस्था;
औद्योगिक बेकारी वगळून इतर स्थानिक बेकारी;
गांवठाणाची सुधारणा करणें व ती वाढविणें (त्यासाठीं द्यावयाची अनुदानें व कर्जें धरून.)
नवीन गांवठाण वसविणें (त्यासाठीं द्यावयाची अनुदानें व कर्जें धरून)
सार्वजनिक जागा व बागा यामध्यें झाडे लावणें व त्यांची जोपासना करणें;
रानटी जनावरांचा नाश करण्याबाबत बक्षिसें
जाहीर सत्कार व सभारंभ आणि मनोरंजन
स्थानिक यात्रांबाबत व्यवस्था करणें
ग्रामपंचायतींचे पंच, सरपंच व बिन-सरकारी इसम यांची संमेलनें;
स्थानिक भटक्या गरीब लोकांसाठीं मदत ;
गरीबांसाठीं घरांची व्यवस्था करणें.

५१४